# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक ०६-०१-१९९६ ते १९-०३-१९९६**

## रजिष्टर क्र. ०२

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ६-१-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.शनिवार दि.६-१-९६ रोजी दुपारी ३.०० वाजता मा.सभापती श्री.प्रदीप कुमार जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभागृहात स्थायी समिती सभेस सुरुवात झाली.सभेस निम्ननिर्दिष्ट स.सभासद उपस्थित होते.तसेच महानगरपालिकेचे अधिकारीही उपस्थित होते.**

१) श्री.अब्दुल रशिदखान (मामू)
२) श्री.सुभाष कच्छवाह.
३) श्री.डॉ.कराड भागवत.
४) श्री.गौतम खरात.
५) श्री.प्रकाश निकाळजे.
६) श्री.कंवरसिंग बैनाडे.
७) कु.माया लाडवाणी.
८) श्री.प्रभाकर विधाते.
९) श्री.महादेव सुर्यवंशी.
१०) सौ.पद्मा शिंदे.
११) श्री.हमदीउद्दीन ताबा.

**संवाद :**

**मा.सभापती :** मागील स्थायी समिती सभेस विकास आराखडया संदर्भाने श्री.रशिदखान (मामू) यांनी काही प्रश्न विचारले होते.आजच्या सभेत उपसंचालक नगर रचना यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.त्यांनी स.सभासद श्री.रशिदमामू यांच्या प्रश्नावर खुलासा सभागृहासमोर करावा.

**श्री.अब्दुल रशिदखान (मामू) :** स.सभापतींचे मी मनःपुर्वक आभार मानतो.तथापि स.सभापतींनी निर्देशित केल्यानंतरही उप संचालक नगर रचना आजच्या बैठकीत स्वतः उपस्थित राहीले नाहीत.त्यामुळे मी त्यांना निषेध करतो.पुढील बैठकीत स्वतः उप संचालकांनी बैठकीस उपस्थित राहण्याबाबत आदेश देण्यात यावेत.विकास आराखडयासंदर्भाने शासनाच्या नेमक्या काय गाईड लाईन्स आहेत.त्याबाबत त्यांनी स्वतःच माहिती दयावी.विकास आराखडया संदर्भाने शासनाच्या ज्या गाईड लाईन्स असतील त्या देण्याबाबत मुद्दाम विलंब केला जात आहे.

**मा.सभापती :** आजच्या बैठकीत उप संचालक नगर रचना उपस्थित राहू शकणार नाहीत असे बोलणे झाल्यानंतरच त्यांनी आपला प्रतिनिधी सदर बैठकीस पाठविलेला आहे.त्यांच्या उत्तरानेही आपले समाधान झाले नाही तर पुढील बैठकीस उप संचालकांनी स्वतः हजर राहण्याबाबत आदेशित करण्यांत येईल.

**श्री.नायर(प्रतिनिधी उप संचालक नगर रचना) :** या संदर्भाने उप संचालकांशी चर्चा झालेली आहे.घोषित झोपडपट्टया आरक्षणांतून वगळण्यात यावे असे परिपत्रकात म्हटले आहे.

**मा.सभापती :** चर्चा हा कायदा होवू शकत नाही.विकास आराखडयातून नेहमी कशी आरक्षणे ठेवावीत वा ठेवू नयेत या संदर्भाने कोणते कायदे बनलेले असतील

व एखादयात तशी तरतूद असेल तर त्यांची सभागृहास माहिती देण्यांत यावी.

**श्री.अब्दुल रशिदखान(मामू) :** शहराचा विकास आराखडा बनविण्या संदर्भाने उप संचालक नगर रचना यांच्या अधिपत्याखाली स्वंतत्र घटक स्थापन करण्यात आलेला आहे व यात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा,अधिकाऱ्यांचा पगार महानगरपालिका करते.तेव्हा महानगरपालिका हद्दीतील विकास आराखडा व त्यातील आरक्षण ठरविण्यांपुर्वी या घटकांतील जबाबदार अधिकाऱ्यांनी महानगरपालिकेच्या संबंधित विभागाशी संपर्क साधावयास पाहिजे होता.कैसर कॉलनी सारख्या भागात मागील १५/२० वर्षापासून वस्ती झालेली आहे.ही बाब विचारात घेता या भागात आरक्षण कशी ठेवणार व ती अंमलात कशी आणली जाणार हा मुख्य प्रश्न आहे.त्यामुळे अनेक गरीबांचे नुकसान होणार आहे.

**मा.सभापती :** उप संचालक नगर रचना यांनी दिलेली उत्तरे समाधानकारक नाहीत.पुढील बैठकीत उप संचालक नगर रचना,श्री.चौधरी यांनी संपूर्ण माहिती व कागदपत्रांसह उपस्थित राहण्याबाबत सहा.संचालक यांनी संचित करावे.

**डॉ.भागवत कराड :** माझ्या वॉर्डातील समता नगर भागातील भाग प्ले ग्राऊंडसाठी आरक्षित केलेला आहे.आज तेथे झालेली वस्ती पाहता प्ले ग्राऊंडसाठी ही वस्ती उठविता येणे आज शक्य आहे का? या भागात या कारणामुळे घरे बांधण्यात अडचणी येत आहेत.यावरही विचार करण्यांत यावा.

**मा.सभापती :** या शहरातील बऱ्याचशा वसाहती या अनधिकृत आहेत.या अनधिकृत वसाहती असल्या तरी आज त्या पुर्णपणे उठविणे महानगरपालिके बरोबरच शासनासही शक्य होणार नाही.तेव्हा या वसाहती अधिकृत करून घेण्याबाबत प्रयत्न करणे महत्वाचे आहे.रिव्हाईड डेव्हलपमेंट प्लॅन जर अंमलात आणावयाचा असेल तर यासाठी नऊशे कोटी रुपयांची महानगरपालिकेस आवश्यकता भासणार आहे.अधिकृत वसाहती व त्यात राहणारी जनसंख्या पाहता या भागांमध्ये आरक्षण अमंलात आणणे शक्य होणार नाही.तेव्हा प्लॅनिंग कमिटीने चर्चा करुन अशा भागातील आरक्षणे वगळण्या बाबत या अनधिकृत वसाहती अधिकृत करण्याबाबत सर्वसाधारण सभेमार्फत शासनाकडे निवेदन पाठवावे.

**श्री.हमीदउद्दीन ताबा :** उप संचालक,नगर रचना यांच्या अधिपत्याखाली काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर महानगरपालिका खर्च करत आहे.त्यांच्यावर योग्य नियंत्रण रहावे व कामे वेळेवर व्हावीत यासाठी त्यांची बसण्याची व्यवस्था महानगरपालिका मुख्यालयात करण्यात यावी.

**मा.सभापती :** या घटकाची काम करण्याची पध्दती पाहता व मुख्यालयातील जागेची अडचण पाहता त्यांना मुख्यालयांत जागा देणे सध्यातरी शक्य होणार नाही.

**श्री.अब्दुल रशिदखान(मामू) :** अशातच महानगरपालिकेतर्फे खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.मात्र या स्पर्धेच्या निमंत्रण पत्रिका सर्व सभासदांचा अपमान आहे.

**उप आयुक्त-२ :** आयोजित करण्यात आलेल्या खो-खो स्पर्धाच्या पत्रिका सर्व नगर सेवकांना देण्यात आलेल्या आहेत.अशा प्रकारचा अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

**श्री.अब्दुल रशिदखान(मामू),श्री.हमीदउद्दीन ताबा :** सर्व नगर सेवकांना पत्रिका वाटल्या नसतांनाही त्या वाटल्या आहेत अशी चुकीची माहिती उप आयुक्त सभागृहांस देत आहेत.हा नगर सेवकांचा अपमान आहे.

**मा.सभापती :** महापौर चषक सारख्या स्पर्धा होत असतांना या स्पर्धेच्या पत्रिका नगर सेवक,अधिकारी यांना दिल्या जात नाहीत,ही गंभीर बाब आहे.या स्पर्धेच्या पत्रिका कशा प्रकारे वाटप केल्या गेल्या याची सभागृहास उप आयुक्तांनी माहिती दयावी.

**उप आयुक्त :** सर्व नगर सेवकांना पत्रिक दिलेल्या आहेत.असा तोंडी अहवाल क्रिडा अधिकारी,कांचन सप्रे यांनी माझ्याकडे दिला होता.

**क्रिडाधिकारी :** माझ्या विभागात असलेले शिपाई हया महिला असल्याने त्यांना या स्पर्धेच्या वाटपाचे काम न देता सचिवांकडे दिल्या होत्या.तथापि वेळेवर या पत्रिका एखादया स.नगरसेवकांना मिळालेली नसेल तर मी दिलगिरी व्यक्त करते.

**मा.सभापती :** एवढया मोठया प्रमाणावर एखादी स्पर्धा होत असतांना क्रिडा अधिकाऱ्यांनी सर्व नगर सेवक,अधिकारी यांना पत्रिका मिळाल्या आहेत की नाहीत याची स्वत: खात्री करावयास पाहीजे होती.प्रकरणांत उप आयुक्त-२ यांनी पत्रिका वाटपा बाबत दिरंगाई केल्याने अहवाल तयार करुन येत्या स्थायी समिती बैठकीत ठेवावा म्हणजे त्यानुसार दोषी अधिकाऱ्यां विरुध्द कार्यवाही करता येवू शकेल.

**श्री.प्रभाकर विधाते :** महानगरपालिकेने दहा लाईनमनची मुले लाईनमन म्हणूनच कामावर घेतलेली आहेत.मात्र यातील बरेचजण क्लीरिकल कामे करतात.त्यांना लाईनमन म्हणून कामावर घेतांना त्यांची शैक्षणिक पात्रता पाहण्यांत आली होती का.या लाईनमनला देण्यांत येणाऱ्या वेतनातही तफावत आहे.त्यांच्याकडे लाईनमन म्हणून काम करण्याबाबत शैक्षणिक पात्रता आहे काय याची चौकशी करण्यांत यावी.

**श्री.अब्दुल रशिदखान (मामू) :** विद्युत विभागात सध्या जे लाईनमन काम करत आहेत त्यांच्यावर कोणाचेही नियंत्रण नाही.त्याच्या कामाच्या वेळाही निश्चित अशा नाहीत.रस्त्यावरील बंद असलेले विद्युत दिवे चालू करण्यासाठी विद्युत मंडळाचे लाईनमन येतात परंतु महानगरपालिकेचे लाईनमन केव्हाही वेळेवर उपलब्ध होत नाहीत.पुर्वी लाईनमनने दिवसभरात करावयाच्या व केलेल्या कामाची तपासणी करण्याबाबत विशिष्ट असे फॉर्म होते.आपले लाईनमन विद्युत दिव्याची अधिकृत विक्रीही करतात.अशा प्रकारचे फॉर्महीं सध्या विद्युत विभागात उपलब्ध नाहीत.

**उप अभियंता विद्युत :** मागील दोन महिन्यापासून हे फॉर्म्स संपलेले आहेत.भांडार विभागाकडे त्याची मागणीही नोंदवलेली आहे.तथापि अद्याप हे फॉर्म्स छापुन मिळालेले नाहीत. लाईनमनची सकाळी ९.०० वाजता आपले काम सुरु करावयास पाहीजे.लाईनमनंनी दररोज आलेल्या तक्रारीवरुन कामाचे टार्गेट दिले जाते.ते त्याने किती वेळात पुर्ण करावे त्याबाबत काही निश्चित असे नियम नाहीत.

**श्री.अब्दुल रशिदखान (मामू) :** आपले लाईनमन विद्युत खांबावर चढू शकत नाहीत.विद्युत मंडळाचे लाईनमन महानगरपालिकेच्या लाईनमन वाट पहात बसतात.दुपारी १२.०० नंतर पोल गरम झाले ही सबब सांगून आपले लाईनमन पोलवर चढत नाहीत.तसेच त्यांनी दिवसभरात केलेले कामही कोणी तपासून पहात

नाहीत.याच बरोबर महानगरपालिकेचे लाईनमन छोटी-मोठी दुरुस्त्यांची कामेही करु शकत नाहीत.विद्युत विभागाच्या कामाच्या पध्दती संदर्भाने काही निर्णय घ्यावयास पाहिजे.अथवा कामाचा व्याप पाहता एखादा उप अभियंता प्रतिनियुक्तीवर घ्यावा.

**मा.सभापती :** अतिरिक्त शहर अभियंता यांनी विद्युत लाईनमनच्या कामाच्या पध्दती व वेळा ठरवून दयाव्यात.शहरातील विद्युत दिव्याची देखभाल व दुरुस्ती झाल्यानंतर त्यांनी कार्यालयांतील किरकोळ दुरुस्तींची कामे करावीत.विद्युत लाईनमनच्या डयुटीवर येण्याच्या व जाण्याच्या वेळा ठरवून त्यांप्रमाणे त्यांची हजेरी ठेवण्यांत यावी.ही बैठक संपल्यानंतर संबंधित उप अभियंता,अतिरिक्त शहर अभियंता स.स.रशिदमामू सभासद यांच्यासह विद्युत विभाग मंडळास भेट दिली जाईल.

**श्री.गौतम खरात :** महानगरपालिकेकडे २०-२५ लाईनमन असले तरी विद्युत मंडळाचे लाईनमन मिळाल्याशिवाय महानगरपालिकेच्या लाईनमनना काम करता येत नाहीत.महानगरपालिकेकडे विद्युत विभागात विद्युत दिव्यांच्या देखभालीसाठी जी गाडी ठेवलेली आहे ती स्लम एरियामध्ये जाऊ शकत नाही.त्यामुळे स्लम एरियामधून नेहमीच अंधार असतो.यासाठी छोटया हॅड्रोलीक गाडया,शिडया घेण्यांत याव्यात.जेणेकरुन अरुंद गल्लीबोळातून विद्युत दिवे बसवता येतील.

**श्री.हमीदउद्दीन ताबा :** शहराचा वाढता विस्तार पाहता विद्युत विभागाचे दोन भाग करण्यात यावेत.

**मा.सभापती :** विद्युत मंडळ व महानगरपालिका यांच्या कामात सुसुत्रता रहावी व कामे वेळीच पार पाडली जावीत यासाठी महानगरपालिकेसाठी विद्युत दिवे देखभालीचे काम करणाऱ्या लाईनमनची हजेरी महानगरपालिकेकडे ठेवण्यात यावी अशा आशयाचा ठराव यापुर्वी झालेला होता.त्यास विद्युत मंडळाच्या अधिकाऱ्यांनी सुरुवातीस होकारही दिला होता मात्र ते स्वतःच हे बंधन पाळू शकले नाहीत.स्वतः अतिरिक्त शहर अभियंता यांनी लक्ष दयावे व जे कर्मचारी कामचुकारपणा करत असतील त्यांच्यावर कार्यवाही प्रस्तापित करावी.

**श्री.गौतम खरात :** मागे एकदा मा.आयुक्तांनी निवेदन केले होते की,लाईट मेटेन्सचे खाजगीकरण करावे.यावर विचार करण्यात यावा.

**मा.सभापती :** खाजगीकरणामुळे महानगरपालिकेच्या अर्थव्यवस्थेवर मोठया प्रमाणात बोजा पडेल.आयुक्तांनी निवेदन केलेले असले तरी अदयाप अशा प्रकारचा प्रस्ताव विचारार्थ स्थायी समिती समोर आलेला नाही.

**श्री.हमीदउद्दीन ताबा :** मजूर संस्थाकडून कामे करवून घेतली जावू नयेत वा त्यांना कामेही देण्यांत येवू नयेत.त्यांच्यातर्फे झालेल्या कामांचा दर्जा चांगला रहात नाही.तसेच मागील सभेत सांगितल्यानुसार सोन्या चांदीवरील जकात वसुली बाबत माहिती देण्यांत यावी.

**मा.सभापती :** शहरात मागील तीन वर्षात सरासरी किती सोने-चांदी आवक झाली याची आकडेवारी काढण्याबाबत जकात अधिक्षक यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.त्यानुसार शहरांत वर्षात सरासरी किती सोन्या चांदीची आवक झाली याची कल्पना येवु शकेल.ही आकडेवारी प्राप्त झाल्यानंतर प्रत्येक व्यापाऱ्यांस ठरविक असे टार्गेट दिले जाईल व त्यानुसार जकात वसुली केली जाईल.बाबतची कल्पना व्यापाऱ्यांना त्यांच्याशी झालेल्या बैठकीत देण्यात

आलेले आहे परत एकदा संबंधितांची बैठक बोलावण्यात येणार आहे.त्या बैठकीस मा.आयुक्तांनाही बोलावण्यात येईल ठोस निर्णय घेण्यांत येतील.

सुपर मार्केट मधील दुकांनाचे भाडे वाढवण्याचा प्रस्तावही स्थायी समितीकडे विचारार्थ आलेला आहे.ज्या व्यापाऱ्यांना दुकाने दिलेली आहेत.त्यांच्याशी करण्यांत आलेल्या करारात पांच वर्षानंतर भाडे वाढ केल्यास ते व्यापारी त्यांस एकदम तयार होतील काय याचाही विचार व्हावा.अन्यथा अशी प्रकरणे कोर्टात जातात व पर्यायाने महानगरपालिकेस आर्थिक झळ पोहचते.

**श्री.हमीदउद्दन ताबा :** रेल्वे स्टेशन समोरील जागा संपादित करण्याबाबत मागील सर्व साधारण सभेत चर्चा करण्यांत आली होती.ही चर्चा लक्षात न घेतांच जागा संपादित करण्याबाबत कार्यवाही करण्यांत येत आहे.

**सहा.संचालक नगर रचना :** मा.आयुक्तांनी मंजुरी दिल्या नंतर खाजगी वाटाघाटीसाठी संबंधितांस बोलावण्यात आलेले आहे.

**मा.सभापती :** प्लॅनिंग कमेटीचा निर्णय झाल्यानंतर या प्रकरणांत निर्णय घेण्यांत येईल असे संबंधितांस लिहिण्यांत यावे.

**डॉ.भागवत कराड :** महानगरपालिकेतर्फे एक कोंडवाडा चालवण्यांत येतो त्यात वेगवेगळया प्रकारची जनावरे टाकण्यांत येतात यात बऱ्याचशा बकऱ्या गरीबांच्या असतात.तेव्हा कोणत्या रस्त्यांवर बकऱ्या मोकाटपणे फिरु देवू नयेत याचे नियम बनवण्यात यावेत व रस्त्यांवर बकऱ्या आल्यास त्या पकडण्यात याव्यात.यामुळे गरीबांना होणारा त्रास वाचेल.

**श्री.सुभाष कच्छवाह :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ च्या अधिनियमातील कलम २३१ खाली आतापर्यंत काय कार्यवाही करण्यांत आली याची माहिती देण्याबाबत संबंधितांस सांगण्यांत यावे.

**मा.सभापती :** आज विधीसल्लागार कोर्टात गेलेले असल्याने यावर तात्काळ माहिती देता येणार नाही.

**श्री.प्रकाश निकाळजे :** जकात नाक्यावरुन आयात होणाऱ्या मालावर जकात आकारुन पावत्या फाडल्या जातात.या योग्यरितीने फाडल्या जाव्यात यासाठी महानगरपालिकेने एक स्वतंत्र पथकही स्थापन केलेले आहे मात्र हे पथकही स्थापन केलेले आहे.मात्र हे पथक योग्य प्रकारे काम करत नाही.काही नाक्यावरुन आयात होणाऱ्या मालाच्या पावत्या फाडल्या जात नाहीत.असेही दिसुन आलेले आहे.यावर योग्य ते नियंत्रण ठेवल्यास महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही.

**मा.सभापमती :** बाहेरगांवी जाणाऱ्या गाडयांची नोंद दोन्ही नाक्यांवर होत असते.याची पहाणी दररोज नाका चेकींग पथकाकडून केली गेल्यास नोंद झालेल्या सर्व गाडया शहराबाहेर गेल्या अथवा नाही हे स्पष्टपणे समजू शकेल.जकात अधिक्षकांनी स्वत: यात लक्ष घालून कार्यवाही करावी.

**श्री.गौतम खरात :** १९८२ मध्ये तत्कालीन राष्ट्रपतींच्या हस्ते नियोजित "वंदे मातरम्" सभागृहाची कोनशिला बसविण्यात आली हे काम महानगरपालिका करणार आहे की शासन याचा खुलासा व्हावा.

**श्री.हमीदउद्दीन ताबा :** ही जागा औकाफ बोर्डाची होती.त्यात काही वाद निर्माण झाल्याने जागा बदलण्यात आलेली आहे.

मा.सभापती : हा प्रकल्प शासनातर्फे राबविला जाणार आहे या विषयांशी महानगरपालिकेचा संबंध नाही.

श्री.अब्दुल रशिदखान(मामू) : शहरात देशी दारु तसेच स्पिरीट किती याची माहिती देण्यांत यावी यावर जकात बऱ्याच कमी प्रमाणात आकारली जात आहे.करंट आकाऊंट चालू करण्याची परवानगी दिल्यानंतरही यावर अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही हा सभागृहाचा अपमान आहे.

मा.सभापती : माजी मुख्य लेखा परिक्षकांनी या संदर्भाने अहवाल तयार केलेला होता.या संदर्भाने मा.आयुक्तांशी चर्चाही झालेली आहे.यात कोणाचाही अपमान करण्याचा मा.आयुक्तांचा उद्देश नव्हता.

लेखाधिकारी : ५४ लाखाचे डिपॉझिट घेण्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्यांत आलेला आहे.या संदर्भाने संचिका मा.आयुक्तांकडे सादर करण्यांत आलेली आहे.

मा.सभापती : डिपॉझिट घेण्याबाबत यापुर्वीच मंजुरी दिलेली आहे.त्यानुसार तात्काळ कार्यवाही करुन करंट अकाउंटस् पुर्ववत चालू करण्यात यावेत व वेळोवेळी कार्यवाहीचा अहवाल स्थायी समितीस दयावा.

श्री.अब्दुल रशिदखान(मामू) : अग्निशमन दल हे महानगरपालिकेचेच अस्थापनेवर काम करत असतांनाही या विभागातील कर्मचाऱ्यांच्या संचिका,सेवापट,गोपनिय अहवाल संबंधित अस्थापना विभागात ठेवण्यात यावा व त्यांच्या पगाराची देयकेही लेखा विभागातूनच काढण्यात यावीत.

सहा.आयुक्त : अग्निशमन दल पुर्वी महानगरपालिकेकडे नव्हते ते महानगरपालिकेकडे हस्तांतर झाले तेव्हापासून त्यांचेकडून अस्थापना चालवली जाते.कामकाजाच्या सोयीसाठी केवळ ही पध्दती अवलंबली जाते ही पध्दती मा.आयुक्तांच्या मंजुरीनेच अवलंबली जाते.

मा.सभापती : अग्निशमन दलातील कार्यरत कर्मचाऱ्यांचे सेवापट,संचिका,गोपनिय अहवाल मुख्य अस्थापना विभागाकडे तात्काळ हस्तांतरीत करण्यात यावे.तसेच कर्मचाऱ्यांची पगाराची देयकेही लेखा विभागातून काढण्यात यावीत.सहाय्यक आयुक्त यांनी या संदर्भाने आदेश निर्गमीत करावेत.

श्री.गौतम खरात : मुख्य अग्निशमन अधिकारी यांचे विरुध्द अनेक तक्रारी आहेत.त्यांनी अनेक कर्मचाऱ्यांचे गोपनिय अहावाल पाहण्याबाबत मा.महापौरांना विनंती करावी.त्यानुसार मा.आयुक्तांना निवेदन देण्यात येईल.

श्री.प्रकाश निकाळजे : एकाच शाळेत इमारती अभावी तीन-तीन शाळा भरवल्या जातात.त्यात तीन-तीन मुख्याध्यापकही काम करतात तेव्हा अशा शाळांमधून एकाच मुख्यध्यापकाकडून काम करवुन घेण्यांत यावे.

शिक्षणाधिकारी : विद्यार्थ्यांच्या संख्येवर शिक्षक व मुख्याध्यापक नेमले जातात.केवळ जागेअभावी अशा तीन-तीन शाळा एका इमारतीत भरवल्या जातात.

श्री.अब्दुल रशिदखान(मामू) : माजी आयुक्त,डॉ.गारे यांनी मुख्य अग्निशमन अधिकाऱ्यांच्या वर्ग-१ पदाबाबतचा चुकीचा प्रस्तावा शासनाकडे सादर केलेला आहे.तेव्हा हे पद परत वर्ग-२ चे करण्यात यावे.

मा.सभापती : सहाय्यक आयुक्त-१ यांनी या संदर्भाने आगामी स्थायी समितीस पूर्ण माहिती द्यावी.

**विषय क्र. ३४२/१ :**

दि.६-१-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

मा.सभापती : दि.२८-१२-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीतील ठराव क्र.३३१/२७ व ३३२/२८ मधील प्रस्तावित कामे महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारतीचे काम जे कंत्राटदार करत आहेत.त्यांच्याकडून प्राधान्याने करुन घेण्यांत यावीत,अशी दुरुस्ती करण्यांत यावी.तसेच दि.२८-१२-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेतील इतिवृत्तांत टंकलेखनातील झालेल्या चुका खालील प्रमाणे दुरुस्त करण्यात याव्यात.

पृष्ठ क्र.३ वरती श्री.अब्दुल रशिदखान(मामू) यांच्या निवेदनातील ओळ क्र.४मध्ये "अथवा गाडीत समोरील बाजूस सँपल ठेवतात व मागे औषधे ठेवतात.तेव्हा सँपलवरही जाकात आकारण्यात यावी.

पृष्ठ क्र.५ वरती सभापती यांच्या जलतरण तलावाबाबत दिलेल्या निर्णयातील ओळ क्र.३४ मध्ये "------- तर अशा व्यक्ती विरुध्द पोलिस केस करण्यांत यावी.

पृष्ठ क्र.१० ठरावातील मुद्या क्र.५ "डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटरच्या दुसऱ्या टप्प्याचे रक्कम रु. २५ लाखाचे काम सुरु करण्याबाबत टेंडर कॉल करण्यांत यावे,यासाठी तुर्त महानगरपालिकेने खर्च करावा व ठराव मंजूरीसाठी शासनाकडे पाठवावा."

श्री.अब्दुल रशिदखान(मामू) : मागील बैठकीत निर्देशित केल्यानुसार मंगल कार्यालयावर लावण्यात यावयाच्या कमर्शियल टॅक्स संदर्भाने माहिती देण्यांत याव्यात.

उप आयुक्त-२ : शहरातील सर्व मंगल कार्यालयांना कर आकारणी करण्यांत आलेली आहे.आगामी स्थायी समितीत अशा मंगल कार्यालयांची यादी व त्यावरील कराची यादी देण्यांत येईल.

डॉ.भागवत कराड : दि.२८-१२-९५ च्या स्थायी समितीत ठरल्याप्रमाणे शहरातील स्मशान भुम्यांना पुरविण्यांत आलेल्या सुविधाबाबत माहिती सादर करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यांत याव्यात.

उप अभियंता : शहरातील सर्व मंगल कार्यालयांना कर आकारणी करण्यांत आलेली आहे.आगामी स्थायी समितीत अशा मंगल कार्यालयांची यादी व व त्यावरील कराची यादी देण्यांत येईल.

मा.सभापती : स्मशान भूम्यांमध्ये आवश्यक त्या सुविधा पुरविण्यात याव्यात व त्यानुरुप आवश्यक तेथील कामांचे एस्टीमेंट बनविण्यात यावे.

श्री.हमीदउद्दीन ताबा : स्मशान भूमीचा विकास करण्यांचे कार्य महानगरपालिका करते.मुस्लीम समाजाच्या स्मशान भूम्यांची जागा औकाफ बोर्डाची असते.तेव्हा तेथे आवश्यक ती कामे कोण करणार.

मा.सभापती : मुस्लीम समाजाच्या स्मशानभूमीची जागा ही औकाफ बोर्डाची असते ती,त्यांनीच विकसित करावयास पाहिजेत.त्यांना मेन्टेनन्स करता येत नसेल तर अशा जागा औकाफ बोर्डाने महानगरपालिकेस हस्तांतरीत कराव्यात,मगच महानगरपालिका त्याची देखभाल दुरुस्ती करु शकेल,तरीही शहरातील अशा बऱ्याचशा स्मशान भूमीची महानगरपालिकेने दुरुस्ती वगैरे केलेली आहे.

डॉ.भागवत कराड : गत स्थायी समितीत चर्चा झाल्यानुसार बारुदगर नाल्यावरती जागा व तीवरील अतिक्रमणे या बाबत माहिती देण्यात यावी.

सहा.संचालक नगर रचना : ही जमीन सरकारी आहे व जिल्हाधिकाऱ्यांमार्फत तलत शिक्षण संस्थेत देण्यांत आलेली आहे.

श्री.हमीदउद्दीन ताबा : ही जागा महानगरपालिकेची आहे.यावर सदर संस्थने केलेले बांधकामही पाडण्यात आलेली आहे.

मा.सभापती : ही जागा महानगरपालिकेची आहे.यावर सदर संस्थने केलेले बांधकामही पाडण्यात आलेली आहे.

कार्यकारी अभियंता : दि.२८-१२-९५ स्थायी समिती ठराव क्र. ३२३/१९ च्या स्थगितीबाबत फेरविचार करण्यांत यावा.ब्लिचिंग पावडरचे तीन टेंडर आलेले होते.तसेच हे रेट तीन वर्षापुर्वीचे आहेत.ब्लिचिंग पावडर रेट डी.एस.आर.मध्ये येत नाहीत.तेव्हा ठराव मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती दि.२८-१२९५ च्या स्थायी समितीतील ठराव क्र.३२३/९९ च्या स्थायी समितीतील ठराव क्र. ३२३/१९.सर्वानुमते मंजूर करण्यात येतो.

कार्यकारी अभियंता : दि.२८-१२-९५ च्या स्थायी समितीतील ठराव क्र.३१५/११ बाबत फेर निविदा मागविण्यांचा निर्णयावर फेरविचार करण्यांत यावा.

मा.सभापती : या कामाबाबत असलेले दर पाहता संबंधित कंत्राटदार कामाचा दर्जा टिकवुन ठेवू शकेल का हा प्रश्न उपस्थित झालेला होता.जर कामाचा दर्जा टिकविण्यात आला नाही तर त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांसही जबाबदार धरण्यांत येईल.ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येईल.ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

श्री.अब्दुल रशिदखान(मामू) : दि.२८/-१२-९५ च्या स्थायी समितीत दोन कम्युनिटी ऑर्गनायझर्स संबंधाने माहिती विचारकली होती.ती देण्यांबाबत संबंधितांना सुचना देण्यात याव्यात.१९९२ पासून सदर कर्मचारी प्रकल्प विभांगात काम करत आहे.

प्रकल्प सं.: सदरचा प्रस्ताव प्रशासकीय काळात घेतलेला आहे.

मा.सभापती : सभागृहामध्ये जे प्रश्न विचारले जातात त्याची मुद्देसूद माहिती देण्यांत यावी.आगामी स्थायी समिती बैठकीत सहाय्यक आयुक्त-१ यांनी श्री.रशिदखान (मामू) यांच्या प्रश्नावर माहिती सादर करावी.

**ठराव :**

दि. २८-१२-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तातास खालीलप्रमाणे मंजुरी देण्यात येते.

१) प्रस्ताव क्र.३३१/२७ मधील प्रस्तावित काम मनपा नविन प्रशासकीय इमारतीचे काम जे कंत्राटदार करत आहेत,त्यांच्याकडून प्राधान्याने करवुन घेण्यांत यावे.
२) प्रस्ताव क्र.३३२/२८ मधील प्रस्तावित काम मनपा नविन प्रशासकीय इमारतीचे जे कंत्राटदार काम करत आहेत,त्यांच्या कडून प्राधान्याने करवुन घेण्यात यावे.
३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटरच्या दुसऱ्या टप्प्याचे रक्कम रु.२५ लाखाचे काम सुरु करण्यांबाबत टेंडर कॉल करण्यांत यावे.यासाठी तुर्त महानगरपालिकेने खर्च करावा व ठराव मंजुरीसाठी शासनाकडे पाठवावा.
४) प्रस्ताव क्र.३२३/१९ सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.
५) प्रस्ताव क्र. ३१५/११ सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

तथापि कामाच्या दर्जाची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर व कंत्राटदारांवर राहील. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४३/२ :**

मालमत्ता अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,औरंगाबाद जिल्हा निवृत्त सेवक संघ यांनी बन्सीलाल नगर येथील कोंडवाडयाची मोकळी जागा देण्यांत यावी म्हणून विनंती अर्ज दिला आहे.

बन्सीलाल नगर येथील कोंडवाडा सध्या बंद आहे.तेथील ३०' X ३०' ची जागा जिल्हा निवृत्त सेवक संघाना पाच वर्षाच्या मुदतीसाठी लिजवर भाडयाने देण्यांबाबत विचार होऊ शकेल,तसेच जागेचे भाडे नाममात्र रुपये १००/- प्रतिमहा भाडे ठरविणेसाठी प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद जिल्हा निवृत्त सेवक संघ यांनी बन्सीलाल नगर येथील कोंडवाडयाची मोकळी जागा देण्याबाबत केलेल्या विनंती अर्जानुसार बन्सीलाल नगर येथील कोंडवाडा सध्या बंद असल्याने तेथील ३०'X ३०'या आकाराची जागा जिल्हा निवृत्त सेवक संघास पाच वर्षाच्या मुदतीसाठी १००/- रुपये प्रतिमहा नाममात्र भाडयाने लिजवर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४४/३ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा.आयुक्त यांच्या मंजुरी नुसार प्रस्ताव सादर केला की,शहागंज भाजी मंडई येथे महानगरपालिकेच्या जागेवर प्रस्तावित केलेल्या मासळी व मटन दुकान केंद्रातील तळमजला १० दुकाने व पहिला मजला १० दुकाने असे एकूण २० दुकाने व्यापारी वापरासाठी अनुज्ञेय असलेले बांधीव क्षेत्र प्रत्येकी चौ.मी.करीता ठराविक अनामत रक्कम रुपये ३५००/- घेऊन ३० वर्षाच्या भाडे तत्वावर देण्यांसाठी कार्यालयीन प्रथम निविदा सुचना क्र.मनपा/३अ/(ई) ३३/ दि.७-१-९५ अन्वये निविदा मागविल्या असता को-या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (१३) निविदा फॉर्म विक्री झाल्या.निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (९) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या.त्या दि.१-२-९५ ला उघडण्यात आल्या.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| तळमजला दुकान क्रमांक | निविदा धारकांचे नांव | निविदा दप प्रति.चौ.मि.प्रति महा (रुपये) |
|---|---|---|
| २ | मोहम्मद अब्दुल समस | १०३=०० |
| ३ | शेख कमालुद्दीन | १०४=०० |
| ६ | मोहंमद साजिद | ११०=०० |
| ७ | मोहंमद साजिद | १०१=०० |
| ८ | मोहंमद अयुब | |
| पहिला मजला | | |
| १४ | मोहंमद येजाज | १०३=०० |
| १५ | शेख वाहेद | १०१=०० |
| १६ | अब्दुल कादर | १०२=०० |
| १७ | अब्दुल शेख मुस्ताक | १०४=०० |

दुकान क्र.१,४,५,९,१०,११,१२,१३,१८,१९,२० असे (११) दुकानासाठी पहिल्या व दुस-या वेळेस एकही निविदा प्राप्त झालेल्या नाही.

उपरोक्त दुकान क्र.२,३,६,७,८,१४,१५,१६,१७ यांना दिनांक १३-३-९५ मा.आयुक्तांचे मान्यतेन्वये अनामत रक्कम भरणा बाबत पत्र दिले असता संबंधितानी दि.२४-४-९५ अन्वये लेखी पत्र देऊन विनंती केली आहे की,सदरील अनामत रक्कम व भाडे दर खुपच जास्त आहेत,कारण आम्ही सर्व गरीब लोक आहोत त्याअन्वये संबंधितांस दि.३०-११-९५ रोजी मा.आयुक्त यांचे दालनात चर्चा करण्यासाठी बोलाविले होते.चर्चेच्या वेळी मनपा अधिकारी पैकी सहा.संचालक नगररचना,शहर अभियंता उपस्थित होते.चर्चेअंती भाडे व अनामत रक्कम खालीलप्रमाणे घेण्याबाबत निर्णय झाला.

१) दुकानाचे मासिक भाडे दरमहा रुपये ३५०/- निश्चित करण्यात आले.
२) अनामत रक्कम रुपये १३०००/- जमा करुन घेण्यात यावे,तसेच अनामत रक्कम खालील प्रमाणे वसुल करावी.(निविदा सोबत भरलेली अनामत रक्कम रुपये ५०००/- वजा जाता.)

१) दुकानाचा ताबा देण्यापुर्वी रुपये ३०००/- घेण्यांत यावे.
२) ताबा दिल्यानंतर एक महिन्यात रुपये ३०००/- घेण्यांत यावे.
३) ताबा दिल्यानंतर दोन महिन्याने रुपये २०००/- करण्यांत यावे.

तसेच शिल्लक दुकाने भाडयाने मिळण्याबाबत असलेल्या नविन अर्जदाराकडून खालीलप्रमाणे अनामत रक्कम घेण्यांत यावी.

१) दुकानाचा ताबा देण्यापुर्वी रुपये ८०००/-
२) ताबा दिल्यानंतर एक महिन्यात रुपये ३०००/-
३) ताबा दिल्यानंतर दोन महिन्यांत रुपये २०००/-

विद्युत व्यवस्था विद्युत शुल्क दुकानदारांना भरावे लागेल म.न.पा.तर्फे पाण्याची व्यवस्था करण्यांत येईल.

तरी वरीलप्रमाणे भाडे दर व अनामत रक्कम संबंधिता कडून भरणा करुन घेण्याबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा.सभापती : भाजी मंडईच्या बाजुस मच्छीमार्केट नसावे,या ठिकाणी मच्छी मार्केट होऊ नये म्हणून बरेचसे आक्षेप अर्ज आलेले होते.आरोग्याच्या दृष्टीकोनातूनही हे बरोबर नाही.

डॉ.भागवत कराड : जे जास्त भाडे देतील त्यांनाच दुकाने देण्यात यावीत.

मा.सभापती : संबंधितां कडून पुर्ण डिपॉझिट घेऊन नंतरच दुकाने भाडयाने देण्यांत यावीत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या नुसार शहागंज भाजी मंडई येथे महापालिकेच्या जागेवर प्रस्तावित केलेल्या मासळी व मटन दुकान केंद्रातील तळमजला व पहिल्या मजल्या वरील २७ दुकाने खालील अटी व शर्तीवर भाडयाने देण्याबाबत सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>अटी व शर्ती</u>**

१) दुकानाचे मासिक भाडे दरमहा रुपये ३५०/- राहील.
२) विद्युत व्यवस्था विद्युत शुल्क दुकानदारांना भरावे लागेल.
३) महापालिकेतर्फे पाणी पुरवठयाची व्यवस्था करण्यांत येईल.
४) संबंधितांकडून पुर्ण डिपॉझीट घेतल्या नंतरच भाडयाने देण्यात यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४५/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो भिमनगर भावसिंगपुरा स्लम येथे नविन खांडकी बसविणे (उत्तर विभाग) कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसुची नुसार रुपये ३,४४,२६७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील काम नविन खांडकी रस्ते रुपये ३५.०० लाख शिर्षकातून करण्यांत येईल.सदरच्या अंदाजपत्रकास मा.साहेबा कडून दि.१५-९-९५ ला प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.सदरच्या प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविला असता मा.सभापतींची शहर अभियंताशी चर्चा करुन सदरील खांडकी पेव्हींग ऐवजी २" जाडीची शहाबाद फरशी टाकण्याचे सुचविले वरुन सदरील कामाच्या अंदाजपत्रकाची रक्कम रु.३१,६७०/- ने कमी होत आहे.

तरी सदरील कामाचे खांडकी पेव्हींग ऐवजी २" जाडीचे फरशी करण्याबाबत कामाच्या नांवातील बदलासह अंदाजपत्रक रुपये ३,१२,५६०/- च्या अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.भिमनगर भावसिंगपुरा स्लम येथे नविन खांडकी बसविणे (उत्तर विभाग) कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रु. ३,४४,२६७/- चे अंदाजपत्रकास मा.सभापती व शहर अभियंता यांचेशी झालेल्या चर्चेनुसार सदरील खांडकी पेव्हींग ऐवजी २" जाडीची शहाबाद फरशी टाकण्याचे सुचविल्या वरुन २" जाडीचे फरशी करण्याबाबत कामाच्या नांवातील बदलासह तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,१२,५६०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४६/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,शहानुरवाडी येथील स.नं.१२ आरक्षण नंबर २६७ या ठिकाणी परदेशी धोबी समाज करीता धोबीघाट बांधावयाचे आहे,यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रुपये ३,८०,२२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदर खर्च विकास योजना अंतर्गत संरक्षण या तरतुदी मधुन करण्यांत येणार आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रुपये ३,८०,२२५/- चा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या नुसार शहानुरवाडी येथील स.नं.१२ आरक्षण नंबर २६ या ठिकाणी परदेशी धोबी समाजा करीता धोबी घाट बांधण्याचे कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रुपये ३,८०,२२५/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च विकास योजना अंतर्गत भुखंडाचे आरक्षण या तरतुदीमधुन करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४७/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,बन्सीलाल नगर येथील प्राथमिक शाळेच्या पहिल्या मजल्यावर दोन वर्ग खोल्या बांधणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम

खात्याचे जिल्हा दरसुची सन १९९४-९५ नुसार रक्कम रुपये ३,५४,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.

सबब सदर कामाचे रक्कम रुपये ३,५४,२००/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.सदरचा खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने बांधणे या लेखा शिर्षामधून करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार बन्सीलाल नगर येथील प्राथमिक शाळेच्या पहिल्या मजल्यावर दोन वर्ग खोल्या बांधणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु.३,५४,२००/-चे अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च विकास ईमारती शाळा व दवाखाने बांधणे या लेखा शिर्षामधुन करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४८/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.दादा कॉलनी (कैलास नगर) येथे दवाखान्यासाठी व वाचनालयासाठी इमारत बांधावयाच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९४-९५ चे जिल्हा दर सुची नुसार रक्कम रुपये ४,५०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन वाढीव तरतुदी अंती सदर कामाचा प्रस्ताव सादर करावा,या अटीवर मा.आयुक्तांनी दि.२६-१२-९५ अन्वये मंजुरी दिलेली आहे.सबब सदर कामाचे रक्कम रुपये ४,५०,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव वाढीव तरतुद मिळेल या अटीवर विचारार्थ सादर.

सदरचा खर्च विकास इमारती,शाळा दवाखाने बांधणे या लेखा शिर्षामधुन करण्यांत येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.दादा कॉलनी (कैलास नगर) येथे दवाखान्यासाठी व वाचनालयासाठी इमारत बांधण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रुपये ४,५०,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव वाढीव तरतूद मिळेल या अटीवर व सदरचा खच्र विकास इमारती,शाळा,दवाखाने बांधणे या लेखा शिर्षामधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४९/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मोहल्ला पिरबाजार येथील नियोजित आठवडी बाजाराच्या जागेकरीता नाल्यालगत रिटेनिंग वॉल बांधणे,नाल्यावर स्लॅब टाकणे व जागेचे सपाटीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९४-९५ च्या दरसुची नुसार रक्कम रुपये ४,२७,७५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदर कामाचा खर्च आठवडी बाजार विकसित या तरतुदी मधून करण्यात येणार आहे.तरी अंदाजपत्रक रक्कम रुपये ४,२७,७५०/- चा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला पिरबाजार येथील नियोजित आठवउी बाजारच्या जागेकरीता नाल्या लगत रिटेनिंग वॉल बांधणे,नाल्यावर स्लॅब टाकणे व जागेचे सपाटीकरणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रुपये ४,२७,७५०/- चे अंदाजपत्रकास

तसेच सदर कामाचा खर्च आठवडी बाजार विकसित या तरतुदी मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५०/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,भावसिंगपुरा येथील स्मशान भुमी येथे बर्निग शेड,रेस्टींग शेड,तार फेन्सींग इ.काम करावयाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाखाचे) सन ९४-९५ च्या सा.बां.खात्याच्या दरसुची अन्वये तयार करण्यात आले.त्यास मा.आयुक्तांनी मंजुरी दिली आहे.सदर ठिकाणी स्थानिक नागरिकांची अडचणी लक्षात घेता नागरिकांच्या सोईच्या दृष्टीकोनातून काम त्वरीत करणे जरुरीचे असल्याने औरंगाबाद जिल्हा मजुर कामगार सहकारी संस्था चेअरमन यांना विनंती पत्र पाठविण्यात आले.त्यात नमूद केले की,मजुर संस्थेच्या नावाची शिफारस करुन पाठवावे त्या अनुषंगाने चेअरमन,औरंगाबाद जिल्हा मजूर कामगार सहकारी संस्था यांनी चेअरमन देवगिरी मजुर सहकारी संस्था यांनी अनुषंगाने चेअरमन,औरंगाबाद जिल्हा मजूर कामगार सहकारी संस्था यांनी चेअरमन देवगिरी मजूर सहकारी संस्था मु.पो.पाल,ता.जि.औरंगाबाद यांच्या नावाची शिफारस करुन पाठविली.शिफारस अन्वये अंदाजपत्रकीय दरात काम देण्यांसाठी मा.आयुक्त यांच्याकडे सादर करण्यांत आले त्यास मंजुरी देण्यात आली.

सदरील खर्च स्मशान भुमी या तरतुदी मधुन करण्यांत येणार आहे.करीता रुपये (२लाख) २,००,०००/- च्या अंदाजपत्रकास देवगिरी मजुर सहकारी संस्थेकडून काम करुन घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

शहर अभियंता : शासनाचे आदेश आहेत की,रुपये दोन लाखापर्यंतची कामे मजुर संस्था कडून करवून घेण्यांत यावीत.

मा.सभापती : शासनाचे आदेश असले तरी महानगरपालिकेतर्फे हाती घेतली जाणारी कोणतीही कामे मजुर सहकारी संस्था देण्यांत येवू नयेत.

**ठराव :**

महानगरपालिकेच्या वतीने हाती घेतली जाणारी कामे मजूर सहकारी संस्थाना न देण्याबाबत सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.तसेच सदरचा प्रस्ताव रद्द करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५१/१० :**

सहाय्यक आयुक्त-१ महानगरपालिका,ओरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,महानगरपालिकेतील वर्ग तीन मधील काही संवार्गातील उदा.जेष्ठ स्वच्छता निरिक्षक,स्वच्छता निरिक्षक मलेरिया विभागातील कर्मचारी,यांत्रिकी विभागातील कर्मचारी,अग्निशमन विभागातील कर्मचारी,वरिष्ठ क्षेत्र कर्मचारी व इतर जे कर्मचारी दुसऱ्या व चौथ्या शनिवारी काम करतात.त्यांना केलेल्या कामाचा मोबदला देणे योग्य आहे.तथापि संबंधिताने काम केल्याचे संबंधितांना दुसरा व चौथा शनिवारचा मोबदला देणेबाबतचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.महादेव सुर्यवंशी :प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे या व्यतिरिक्त पाणी पुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांनाही निर्धारित वेळेपेक्षा जास्त वेळ काम करावे लागते.दैनिक

वेतनावरील कर्मचारी ही निर्धारीत वेळेपेक्षा जास्त वेळ काम करावे लागते त्यांनाही ज्यादा कामाचा मोबदला देण्यात यावा.

श्री.रशिदखान (मामू) : विभागीय अधिकारी व पाणी पुरवठा कनिष्ठ अभियंता यांनाही अतिरिक्त मोबदला देण्याबाबत विचार व्हावा.

मा.सभापती : ठराव ठेवत असतांना संबंधित अधिकाऱ्यांनी तो सर्वसमावेशक असेल याची खात्री करवून घ्यावी.पाणी पुरवठा मजुरांना व दुय्यम आवेक्षकांनाही जादा कामाचा मोबदला देण्यांत यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेतील वर्ग-३ मधील काही संवर्गातील उदा.ज्येष्ठ स्वच्छता निरिक्षक,मलेरीया विभागातील कर्मचारी,यांत्रिकी विभागातील कर्मचारी,अग्निशमन विभागातील कर्मचारी,वरिष्ठ क्षेत्र कर्मचारी,दुसऱ्या व चौथ्या शनिवारी जादा काम करतात अशा कर्मचाऱ्यांनी काम केल्याचे विभाग प्रमुखाने प्रमाणित केल्या नंतरच त्यांना दुसऱ्या व चौथ्या शनिवारचा जादा कामाचा मोबदला देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५२/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,शहरातील नविन उद्याने विकसित करणे यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९४-९५ च्या दरसुची नुसार रक्कम रुपये ५८.१५ लाखाचे (५८,१५,०००/-) अंदाजपत्रक तयार करण्यात आले एकूण ९ उद्यानाचे समावेश असून त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | उद्यानाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | गारखेडा म.न.पा.शाळेजवळील परिसर (शास्त्री नगर) येथे उद्यान विकास करणे. | ६.२८ लाख |
| २ | जयविश्वभारती कॉलनी येथे उद्यान विकसित करणे | ३.६१ लाख |
| ३ | जवाहर कॉलनी दवाखान्या जवळ उद्यान विकसित करणे. | ३.५० लाख |
| ४ | विद्यानगर येथे उद्यान विकसित करणे | ५.३१ लाख |
| ५ | नारेगांव येथे उद्यान विकसित करणे | ३.०० लाख |
| ६ | हत्तेसिंगपुरा येथे उद्यान विकसित करणे | २.५३ लाख |
| ७ | राजनगर येथे उद्यान विकसित करणे | ४.५२ लाख |
| ८ | ज्योतीनगर येथे उद्यान विकसित करणे | ७.०० लाख |
| ९ | मजनुहिल (पश्चिम बाजुस) उद्यान विकसित करणे. | २२.४० लाख |
| | **एकूण** | **५८.१५ लाख** |

सदरील दर्शविलेल्या ठिकाणच्या अंदाजपत्रकात संरक्षित भिंत बांधणे,गेट बसविणे,सपाटीकरण करणे,बेंचेस बसविणे,पथदिवे,कर्बींग व छोटा कारंजा बसविणे,प्लॉवर बेड बांधणे,खेळणी बसविणे,पिण्याच्या पाण्याचा हौद बांधणे,चौकीदारास खोली बांधणे,स्वच्छतागृह बांधणे मातीची भरती करणे इ.बाबींचा समावेश आहे.तसेच मजनुहील येथील नविन उद्यानात मिनीट्रेन बसविणे,कामाची छोटे पुल बांधणे इ.बाबींचा समावेश आहे.या सर्व कामांचे एक एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ५८.१५ लाख रुपयास मा.आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.सदर खर्च शासकीय अनुदान सन ९५-९६ च्या (१०कोटी) या तरतुदी मधून करण्यांत येणार आहे.तरी अंदाजपत्रक रक्कम रु. ५८.१५ लाखाचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.हमीद ताबा : शहरात अनेक रिकाम्या जागा आहेत त्यावर नेहमी अतिक्रमणे होत असतात त्या त्या भागातील नागरिकांना सोयीचे व्हावे.या साठी खुल्या जागावर उद्याने विकसित करण्यांत यावीत.

मा.सभापती : प्रस्तावित कामे ही शासकीय अनुदानातून हाती घेतली जाणार आहेत.उद्याने विकसित करण्याबाबत विकास आराखडयात प्रथम तरतुद बनविली जाते व ती कामे नंतर हाती घेतली जातात शहरात जेथे जेथे खुल्या जागा असतील व त्या उद्यानासाठी राखीव ठेवलेल्या असतील अशा सर्व उद्यानासाठी विकसित करण्याबाबत एकत्रित प्रस्ताव सादर करावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शहरातील नविन उद्याने विकसित करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.५८.१५ लाखाचे (५८,१५,०००/-) चे अंदाजपत्रकास तसेच खालील दर्शविलेल्या एकूण ९ उद्यानांमधील विविध विकास कामे करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | उद्यानाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | गारखेडा म.न.पा.शाळेजवळील परिसर (शास्त्री नगर) येथे उद्यान विकास करणे. | ६.२८ लाख |
| २ | जयविश्वभारती कॉलनी येथे उद्यान विकसित करणे | ३.६१ लाख |
| ३ | जवाहर कॉलनी दवाखान्या जवळ उद्यान विकसित करणे. | ३.५० लाख |
| ४ | विद्यानगर येथे उद्यान विकसित करणे | ५.३१ लाख |
| ५ | नारेगांव येथे उद्यान विकसित करणे | ३.०० लाख |
| ६ | हत्तेसिंगपुरा येथे उद्यान विकसित करणे | २.५३ लाख |
| ७ | राजनगर येथे उद्यान विकसित करणे | ४.५२ लाख |
| ८ | ज्योतीनगर येथे उद्यान विकसित करणे | ७.०० लाख |
| ९ | मजनुहिल (पश्चिम बाजुस) उद्यान विकसित करणे. | २२.४० लाख |
| | **एकूण** | **५८.१५ लाख** |

सदरील ठिकाणांच्या अंदाजपत्रकास संरक्षित भिंत बांधणे,गेट बसविणे,सपाटीकरण करणे,बेंचेस बसविणे,पिण्याच्या पाण्याचा हौद बांधणे,मातीची भरती करणे,तसेच सदर खर्च शासकीय अनुदान सन ९५-९६ च्या (१०कोटी) या तरतुदीमधून करणेस सव्‌रनुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळचे विषय**

**दुरुस्ती प्रस्ताव**

**विषय क्र. ३५३/१२ :**

सहाय्यक आयुक्त-१ यांनी दिनांक २१-१२-९५ च्या स्थायी समितीमध्ये प्रस्ताव क्र.२५३/३४ अन्वये महानगरपालिकेतील रोजंदारी वरील वाहन चालकांना शासन निर्णय क्र.मभवा/-११९४/३०/सेवा-१०/मंत्रालय,मुंबई दि. २७-४-९४ रोजंदारी अस्थापने वरील काम दि.१-१-९४ पासुन दैनिक दर दर्शविणारे विवरण भाग (क) कामगार नुसार दैनिक वेतनाचे दर रुपये ६५.७५ नसुन त्यामधील दर रुपये ६१.२० असे आहेत.त्यामध्ये दुरुस्ती करणे योग्य.

तसेच शासन निर्णय १२९५/९४/सेवा-१० दि.२६-४-१९९५ ते दि.१ जानेवारी १९९६ चे दैनिक दर दर्शविणारे विवरण पत्र भाग (क) नुसार दै.वेतन दर रु.६५.७५ दर्शविण्यात आलेले आहे.त्यानुसार दि.१-१-९५ पासुन सुधारीत दर देण्यांस मान्यतेस्तव व दोन्ही शासन निर्णयाच्या कालावधी मध्ये नमुद केलेले दै.वेतनावरील दर मान्यतेस्तव तसेच वेळोवेळी शासन निर्णया नुसार दैनिक वेतनांचे सुधारीत दर लागू करण्या बाबतचा (सुधारीत) दुरुस्ती प्रस्ताव स्थायी समितीच्या निर्णयास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्थायी समिती ठराव क्र.२५३/३४ दि. २१/१२/९५ अन्वये महानगरपालिकेतील दैनिक वेतनावर काम करणाऱ्या वाहन चालकांना शासन निर्णय क्र.मभवा-११९४/३०/सेवा-१०/दि.२७-४-९४ अन्वये रुपये ६५.७५ प्रतिदिन दैनिक वेतन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली होती.

उपरोक्त ठरावात दर्शविलेल्या दैनिक वेतनामध्ये दि.१-१-९४ पासुन ते दि.३१-१२-९४ पर्यंत दैनिक वेतनाचा दर रुपये ६१=२० प्रदान करण्यास व दिनांक १-१-९५ पासून शासन निर्णयानुसार रुपये ६५=७५ या दैनिक वेतनावर काम करणाऱ्या वाहन चालकांना दैनिक वेतनाचे सुधारीत दर लागू करण्यांस वरील दुरुस्तीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५४/१३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.कबाडीपुरा येथील शाह जमालबाबा दर्गाच्या बाजूला खुल्या जागेवर वाचनालय इमारत बांधणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९४-९५ चे जिल्हा दरसुची नुसार रक्कम रुपये ३,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आल आहे.

सबब सदर कामाचे रक्कम रुपये ३,००,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.प्रस्तावित कामाचा खर्च सन ९६-९७ या वित्तिय वर्षात करण्यांत यावा या अटीवर दि.२८-१२-९५ रोजी मा.आयुक्त यांची मंजुरी प्राप्त झाली आहे.प्रकरण विचारार्थ सादर.

**संवाद :**

व्यायामशाळा बांधण्या बाबतचे प्रस्ताव इत:पर स्थायी समिती समोर मंजुरीसाठी ठेवू नयेत या पुर्वीही व्यायाम शाळेसाठी एखादया समिती बैठकीत मंजुरी दिली असल्यास ती रद्द समजण्यात यावी.व्यायाम शाळेऐवजी लायब्ररी चालू करण्या शाळे ऐवजी लायब्ररी चालू करण्या बाबतचे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर करण्यांत यावेत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार कबाडीपुरा येथील शाह जमाल बाबा दर्ग्याच्या बाजूस खुल्या जागेवर व्यायाम शाळा बांधण्या बाबतच्या प्रस्तावात व्यायाम शाळे ऐवजी लायब्ररी असा बदल करुन या कामासाठी येणाऱ्या खर्च रक्कम रुपये ३,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५५/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहेकी, मो.इंदिरानगर (स्लम) भागात अर्धगोलाकार आर.सी.सी.गटार बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.विभागाचा सन ९४-९५

च्या दरसुची नुसार तयार करण्यांत आले आहे.सदरील कामास मा.आयुक्त साहेब यांनी दिनांक ३-१-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सदरील काम पृष्ठभागावरील गटार बांधणे या शिर्षका अंतर्गत घेण्यात आले आहे.या शिर्षका अंतर्गत रुपये ५१.०० लाखाची तरतुद उपलब्ध आहे.तरी उपरोक्त कामासाठी तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रुपये ४,६१,६२१=०० यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या नुसार मो.इंदिरा नगर (स्लम) भागात अर्धगोलाकार आर.सी.सी.गटार बांधण्याच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रुपये ४,६१,६२१/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर काम पृष्ठ भागावरील गटार बांधणे या शिर्षका अंतर्गत असलेल्या रु.५१.०० लाख चे तरतुदी मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५६/१५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.काझीवाडा भडकल गेट येथे समाज मंदिर बांधणेच्या कामासाठी श्री.गौतम खरात व सौ.अलका पाटील स.नगर सेवक यांची मागणी नुसार रक्कम रुपये ३,७५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते.परंतु सदर काम हाती घ्यावयाचे झाल्यास समाज मंदिर बांधकाम होणाऱ्या भागातील नागरिकांकडून अंदाजपत्रकीय रकमेच्या २५% रक्कम भरणा करुन घेणे सध्या बंधनकारक आहे.कारण मा.प्रशासक यांचे काळात ठराव क्र.५०७ दि.१०-७-९४ अन्वये असा ठराव पारीत करण्यांत आला होता (ठरावाची प्रत जोडली आहे.) सदर ठरावामध्ये नमूद करण्यांत आले आहे की,ज्या भागात २५%रक्कम नागरिकांचे योगदान म्हणून महानगरपालिकेमध्ये भरणा करावी व मगच महानगरपालिका उर्वरित रक्कम ७५% खर्च करेल मा.सर्वसाधारण सभा दिनांक १६-९-९५ मध्ये विभागातील नागरिकांचे २५% योगदान न घेता पुर्ण रक्कम महापालिकेने खर्च करावी व २५% रक्कमेची अट रद्द करावी या बाबत स.नगरसेवक व मा.महापौर यांनी ठराव पारीत केला आहे.(सर्वसाधारण सभेच्या चर्चेची व ठरावाची सत्यप्रत सोबत जोडली आहे.) सबब सदर अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २५% नागरिकांनी योगदान करण्याची अट रद्द करणे अथवा चालु ठेवणे बाबत योग्य त्या आदेशास्तव सादर.तसेच अंदाजपत्रक रक्कम रु.३,७५,०००/- विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.काझीवाडा भडकल गेट श्री.गौतम खरात व सौ अलका पाटील स.नगर सेवक यांचे मागणी नुसार समाज मंदिरा ऐवजी अभ्यासिका बांधणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु. ३,७५,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच मा.सर्व साधारण सभा दि.१६-९-९५ मध्ये विभागातील नागरिकांचे २५% चे योगदान न घेता पुर्ण रक्कम महापालिकेने खर्च कराव व २५% रक्कमेची अट रद्द करावी असे ठरल्यानुसार सदर अट रद्द करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५७/१६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,नारेगांव येथील प्राथमिक शाळेच्या पहिल्या मजल्यावर तीन खोल्या जिन्यासह बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि.२८-९-९५ ठराव क्र.१२८/१२ अन्वये रक्कम रु. ३,६०,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे.सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना

क्र.मनपा/लेखा/नि/४६/९५ दि.३०-११-९५ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा स्विकारणेच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण (२) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दिनांक १७-१२-९५ ला उघडण्यात आल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.शेख शरीफ १०% जास्त दराने.

२) श्री.सिद्दीकी एस.झेड. ९.१८७% जास्त दराने.

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.१८७% जास्त दराची श्री.एस.झेड.सिद्दीकी यांची निविदा असल्यामुळे त्यांना दराचे वाटाघाटीसाठी प्रत्यक्ष मा.आयुक्तांचे दालनात दि. २६-१२-९५ ला बोलावून दराचे वाटाघाटी मध्ये सदरील काम हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.१८७% जास्त दराऐवजी २% जास्त दराने करण्यांस मा.आयुक्तांनी मंजुरी दिली व त्यास श्री.एस.झेड.सिद्दीकी यांनीही लेखी संमती दिली.सबब सदर कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा दराचे वाटाघाटी अन्वये २% जास्त दराची श्री.एस.झेड सिद्दीकी यांची निविदा दर मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

प्रकल्प संचालक : स्थानिक नागरिकांकडून १% पर्यंतचा सहभाग असे प्रकल्प राबविण्यासाठी घेतला तर त्या भागातील नागरिकांनाही अशा योजना बद्दल आस्था राहील.

मा.सभापती : आंबेडकर नगर भागातील ड्रेनेज लाईनच्या संदर्भाने कार्यकारी अभियंता यांनी खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता : या कामाच्या संदर्भाने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालया तर्फे नोटीसा देण्यांत आलेल्या आहेत.

मा.सभापती : ही लाईन टाकून वर्ष झाली आहेत ती आज पर्यंत सुरळीत चालू असतांना आताच चोकअप कशी होऊ लागली बाबतची सविस्तर माहिती पुढील बैठकीत देण्यांत यावी.

श्री.महादेव सुर्यवंशी : आंबेडकर नगर या भागात ड्रेनेज लाईन टाकत असतांना महापालिकेचे वेळेवर रिंग व ढापे पुरविले गेले नाहीत व त्यामुळे ती वारंवार चोकअप होत आहे.या लाईनची टेस्टीगंही घेण्यांत आलेली आहे,परंतु ही लाईन मेन लाईनला क्रास कनेक्शनने न मिळवतांना कनेक्शन देण्यांत आले हे काम होऊन चार एक वर्ष झालेली आहेत,परंतु काही अधिकारी हे काम करणाऱ्या अधिकाऱ्यास बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहेत ही निषेधार्ह बाब आहे.

मा.सभापती : काम करत असतांना अशा कामातील लेव्हलिंग बरोबर आहे का,टेस्टींग बरोबर झाली का याचीही खात्री करावयास पाहिजे तीन वर्षा नंतरच हे प्रश्न का उद्‌भवतो याचाही प्रथम विचार करावयास हवा.

कार्यकारी अभियंता : कोणत्याही अधिकाऱ्यांस बदनाम करण्याचा प्रश्न नाही.ही लाईन टाकण्यांत आल्यानंतर बरेच दिवस त्यावर कनेक्शन झालेले नव्हते.त्यामुळे लाईन चोकअप होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.प्रथम ही लाईन सुरु करण्यांत आली तेव्हा पासून हा प्रश्न उद्‌भवलेला आहे.

श्री.महादेव सुर्यवंशी : सफाई कामगारांनी पावसाचे पाणी या लाईनमध्ये सोडल्यानेच हा प्रश्न उद्‌भवला.

मा.सभापती : कार्यकारी अभियंता यांनी येत्या बैठकीत सविस्तर अहवाल सादर करावा.

श्री.गौतम खरात : स्पेशल प्रोग्राम अंतर्गत शहरात बऱ्याच ठिकाणी ड्रेनेजची कामे करण्यांत आलेली आहेत,मात्र ही कामे बऱ्याच ठिकाणी अर्धवट सोडण्यांत आलेली आहेत.काही ठिकाणी अशा लाईन्स नाल्यातच सोडून देण्यांत आलेल्या आहेत.

मा.सभापती : या स्पेशल प्रोग्रामची स्क्रीम शह कन्स्लटन्सी कडून बनवण्यात आलेली होती.ही स्कीमच फोल झालेली आहे.

श्री.अब्दुल रशिद (मामू) : झैन टेलर्स ते तहसील ऑफीस या भागातील ड्रेनेज लाईन न टाकताच तीचे बील अदा करण्यांत आले ही चौकशी व्हावी.

डॉ.भागवत कराड : स्थायी समितीकडे प्रस्ताव पाठवत असतांना त्या त्या भागात प्रस्तावित कामे केव्हा करण्यात आली,त्यावर किती खर्च झाला या सर्व गोष्टींची माहिती देण्यांत यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारेगांव प्रा.शाळेच्या पहिल्या मजल्यावर तीन खोल्या जिन्यासह बांधण्याच्या कामासाठी अंदाजपत्रकीय तुलनात्मक दृष्टया व वाटाघाटीनुसार २% जास्त दराची गुत्तेदार श्री.एस.झेड.सिद्यीकी यांची निविदा मंजुर करण्यांत येते.कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५८/१७ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व जलनि:सारण) प्रस्ताव सादर करीत आहे की,जलनि:सारण विभाग-२ तर्फे झोन नं.३ मधील ड्रेनेज लाईनची देखभाल व दुरुस्ती करीता ९५-९६ आर्थिक वर्षाकरीता रुपये ९,००,०००=०० लाखास प्रशासकीय मान्यता मा.आयुक्तांनी दिलेली आहे,आतापर्यंत एकूण खर्च ८,३७,२३७=०० झाला आहे.

देखभाल व दुरुस्तीसाठी लागणारे एस.एफ.आर.सी.ढापे हे महानगरपालिका भांडारातून देण्यांत येत असत.सध्या ढापे उपलब्ध नाही. कामे तातडीचे असल्याने व अपघात होण्यांची शक्यता नाकारता येत नसल्याने व ढापे खुल्या बाजारातून पुरवणेस ठेकेदार तयार असल्याने २०० नग चालू निविदा पुरवठा दर ७४८=०० प्रति नग प्रमाणे खरेदी करणे आवश्यक आहे.

याकरीता ३१ मार्च ९६ पर्यंत अपेक्षीत खर्च १०,५०,०००=०० व एस.एफ.आर.सी.ढापे खरेदी करीता येणारा खर्च २००X७४८=०० १,४९,१००=०० म्हणजे एकूण खर्च ११,१९,६००=००मंजुरीसह निव्वळ मंजूरी ११,९९,६००=००- ९,००,०००=०० - २,९९,६००=००च्या मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

सदरील प्रस्तावास मा.आयुक्तांनी दि.१-१-९६ रोजी मंजूरी दिलेली आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जलनि:सारण विभाग-२ तर्फे झोन क्र.३ मधील ड्रेनेज लाईनचे देखभाल व दुरुस्तीसाठी वर्ष ९५-९६ च्या आर्थिक तरतुदीतून २०० नग ढापे ७४८/- प्रति नग प्रमाणे येणाऱ्या खर्चास १,४९,६००/- चे खर्चास एस.एफ.आर.सी.ढापे खरेदी करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५९/१८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.शारदाश्रम कॉलनी येथे वाचनालय बांधण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९४-९५ च्या जिल्हा दरसुचीनुसार

रक्कम रु.३,७३,७५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आल असून सुधारीत अंदाजपत्रकामध्ये वाढीव तरतूद उपलब्धतेच्या आधीन राहून व तरतूद प्रत्यक्ष उपलब्धतेअंती काम हाती घ्यावे या अटीवर मा.आयुक्तांनी दि.३-१-९६ अन्वये मंजुरी दिली आहे.

सबब सदर कामाचे रक्कम रुपये ३,७३,७५०/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.सदरचा खर्च इतर वाचनालय या लेखा शिर्षामधून सन ९५-९६ मधील इतर उपलब्ध होणाऱ्या वाढीव तरतुदी मधून करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला शारदाश्रम कॉलनी येथे वाचनालयाच्या बांधकामासाठी बाकी ९४-९५ च्या दरसुची नुसार रुपये ३,७३,७५०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६०/१९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,औरंगाबाद शहराच्या हद्दीत एका चांगल्या म्युझियमची व त्यासाठी इमारतीची आवश्यकता आहे.

त्यास्तव म्युझियमसाठी इमारती बांधण्याच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आहे आहे.सदरील प्रस्तावित इमारतीचे अंदाजपत्रक व नकाशे आराखडे श्री.दिपक देशपांडे (आर्कीटेक्ट) मोडयुल आर्कीटेक्ट्स यांच्यातर्फे मागविण्यात आले या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.२५.०० लक्ष एवढी आहे.

या कामासाठी जो खर्च प्रस्तावित करण्यांत आला आहे,तो राज्य शासनाकडून मिळणाऱ्या विशेष अनदान रु.१०.०० कोटी मधून प्रस्तावित आहे.

तरी कृपया अंदाजपत्रक रु.२५.०० लक्ष चे मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा हद्दीत एका चांगल्या म्युझियम इमारत बांधकाम करण्यासाठी प्रस्तावित इमारतीच्या अंदाजपत्रक व नकाशे आराखडे नुसार कामास मंजुरी देण्यात येवून रुपये २५,००,०००/- सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६१/२० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,सिटी क्लब समोरील नव्यानेच तयार झालेल्या वाहतूक बेटाचा विकास करणे व सौंदर्यीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये ३,९४,९८०/- (रु.तीन लक्ष चौऱ्यान्नव हजार नऊशे ऐंशी) चे तयार करण्यांत आले आहे.

या कामासाठी सौंदर्यीकरणाचा आराखडा श्रीमती स्वाती बसु (आर्किटेक्ट) यांच्यातर्फे तयार करण्यांत आला आहे.व त्या आराखडयास मा.आयुक्त साहेबांनी मंजूरी दिली असून त्यानुसार अंदाजपत्रक तयार करुन मा.स्थायी समितीसमोर मंजुरीस्तव ठेवण्यांचे आदेश दिले आहेत.

तरी अंदाजपत्रक रु.३,९४,९८०/- चे तयार करण्यांत आहे असून काम तातडीचे असल्याने व या ठिकाणी अपघात होण्यांची दाट शक्यता असल्याने क्र.अंदाजपत्रकास मंजुरी मिळावी.

तरी अंदाजपत्रक रुपये ३,९४,९८०/- चे मंजूरीस्तव सादर.सदरील कामाचा खर्च शासनाकडून मिळणाऱ्या रुपये १०.०० कोटीच्या विशेष अनुदानातून मागविण्यांत येईल.

**संवाद :**

मा.सभापती : संबंधित वास्तुशास्त्रज्ञाने वारंवार स्थळ भेटी घ्याव्यात तसेच संबंधित वास्तुशास्त्रज्ञाचा कर्मचारी कायम साईटवर राहील.याबाबत त्यास ताकीद देण्यांत यावी.

अति.शहर अभियंता : संबंधित वास्तुशास्त्रज्ञाने वारंवार स्थळ भेअी द्याव्यात व तेथे माणूस कायम ठेवावा,याबाबत त्यास सुचना देण्यांत येतील.तसेच मॉडेल सुपरव्हिजनसाठी वास्तुशास्त्र २.५% पेमेंट देण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिटी क्लब समोरील नविन वाहतूक बेटाचा विकास व सौंदर्यीकरण करणेसाठी रुपये ३,९४,९८०/-रुपयास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.सदरील काम १० कोटीच्या विशेष अनुदानातून करण्यांत यावे.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६२/२१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,उस्मानपुरा ते रेल्वे स्टेशन रस्त्यांच्या मधोमध सोडीयम व्हेपरचे दिवे लावुन विद्युतीकरण करण्यांच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुची नुसार रक्कम रु.६,०३,४१३=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील खर्च महाराष्ट्र शासनाकडून सन १९९५-९६ या वर्षासाठी मिळणाऱ्या रक्कम रु.१०.०० कोटीच्या अनुदानामधून करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उस्मानपुरा ते रेल्वे स्टेशन रस्त्यांच्या मधोमध सोडीयम व्हेपरचे दिले लावण्याकरीता सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार रुपये ६,०३,४१३/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.सदरील काम १० कोटीच्या विशेष अनुदानातून करण्यांत यावे.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६३/२२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,निराला बाजार ते नागेश्वरवाडी रोडवर सोडीयम व्हेपरचे दिवे लावून विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसुचीनुसार रक्कम रु.३,४०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च महाराष्ट्र शासनाकडून सन १९९५-९६ या वर्षाकरीता मिळणाऱ्या रक्कम रु.१०.०० कोटीच्या अनुदानामधून करण्यांत येईल.

तरी रक्कम रु.३,३४,०००/- चे अंदाजपत्रक मंजूरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे निराला बाजार ते नागेश्वरवाडी रोडवर सोडीयम व्हेपरचे दिवे लावण्यांच्या कामासाठी बांधकाम खात्याच्या दर सुचीनुसार व विशेष अनुदान १० कोटीच्या पैकी रु. ३,४०,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६४/२३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,विद्युत विभागासाठी टयुब,स्टार्टर,टयुब होल्डर इत्यादी विद्युत साहित्य खरेदी करण्यांच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसुचीनुसार रक्कम रु.१,१६,०००/- चे अंदाजपत्रक तयार

करण्यांत आले आहे.सदरील खर्च सन १९९५-९६ च्या विद्युत साहित्य खरेदी या शिर्षकातून करण्यात येईल.

तरी रक्कम रु.१,१६,०००/- चे अंदाजपत्रक मंजूरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विद्युत विभागासाठी टयुब,स्टार्टर इत्यादी विद्युत साहित्य खरेदी करण्यांकरीता बांधकाम खात्याच्या दर दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,१६,०००/- स सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६५/२४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,शहानुरमिया दर्गा ते गादीया विहार या रस्त्यांवर विद्युत खांब रोऊन त्यावर २५० वॅटचे सोडीयम व्हेपरचे दिवे लावून विद्युतीकरण करण्यांच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.४४,६५९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील खर्च महाराष्ट्र शासनाकडून सन १९९५-९६ या वर्षासाठी मिळणाऱ्या रक्कम रु.१०.०० कोटीच्या अनुदानामधून करण्यांत येईल.

तरी रक्कम रु.५,४४,६५९/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानुरमिया दर्गा ते गादीया विहार या रस्त्यांवर विद्युत खांब रोवून त्यावर २५० वॅटचे सोडीयम व्हेपरचे दिवे लावण्यांकरीता ९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय रक्कम रु.५,४४,६५९/- यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६६/२५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,ज्योतीनगर वॉर्ड क्र.७० मध्ये विविध ठिकाणी सोडीयम व्हेपरचे दिवे लावण्यांच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुची नुसार रक्कम रु. १,०४,६३२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील खर्च महाराष्ट्र शासनाकडून सन १९९५-९६ या वर्षाकरीता मिळणाऱ्या रक्कम रु.१०.०० कोटीच्या अनुदानातून करण्यांत येईल.

तरी रक्कम रु.१,०४,६३२/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार ज्योतीनगर वॉर्ड क्र.७० मध्ये विविध ठिकाणी सोडीयम व्हेपरचे दिले लावण्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,०४,६३२/- सन १९९५-९६ चे दरसुचीनुसार काम करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.सदरील काम विशेष अनुदान १० कोटीच्या अनुदानामधून करण्यांत यावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६७/२६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,श्री.गजानन महाराज मंदिर ते महाराणा प्रताप चौक या रस्त्यावर सोडीयम व्हेपरचे दिवे लावून विद्युतीकरण करण्यांच्या

कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.८,१८,०५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सदरील खर्च महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या रक्कम रुपये १०.०० कोटीच्या अनुदानामधुन करण्यांत येईल.

तरी रक्कम रु.८,१८,०५०/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलयाप्रमाणे गजानन महाराज मंदिर ते महाराणा प्रताप चांक या रस्त्यांवर सोडीयम व्हेपरचे दिवे लावण्यांकरीता अंदाजपत्रकीय रककम रु.८,१८,०५०/- सर्वानुमते मंजुरी देण्यांत येऊन सदरील काम विशेष अनुदान १० कोटीमधुन व्हावे.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६८/२७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,गजानन महाराज मंदिर ते सिडको हद्दीपर्यंतच्या १०० फुट रुंद रस्त्याचे रुंदीकरण करणे,पुलाचे रुंदीकरण करणे आणि दुभाजक टाकण्यांच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१४,१७,२१४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील खर्च महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या रक्कम रु.१०.०० कोटीच्या अनुदानामधून करण्यांत येईल.

तरी रक्कम रु.१४,१७,२१४=०० चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.गजानन महाराज मंदिर ते सिडकोच्या हद्दीपर्यंतच्या १०० फुट रुंद रस्त्यांचे रुंदीकरण करणे व दुभाजक टाकण्याच्या कामाकरीता ९४-९५ च्या दरसुचीनुसार १४,१७,२१४/- अंदाजपत्रकीय रक्कमेस मंजुरी देण्यात येते.सदरील काम विशेष अनुदान १० कोटीमधून करण्यांत यावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६९/२८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,त्रिमुर्ती चौक जवाहर कॉलनी चौकाचा विकास करून सौंदर्यीकरण करावयाचे असल्याने सदरील कामात अनुभवी असलेले मारुती फायबर्स यांचेकडून कोटेशन घेण्यांत आले.मारुती फायबर्स यांनी कोटेशनमध्ये सिव्हील वर्क सहीत रु. ८०,०००/- नमूद केले आहेत.

मा.आुक्तांनी प्रत्यक्ष वाटाघाटी करुन सदरील काम त्यांनी रक्कम रु.६०,०००/- मध्ये करण्यांस सांगितले असुन संबंधिताने ते मान्य केले आहे.

तरी सदरील काम मे.मारुती फायबर्स यांचेकडून रक्कम रु.६०,०००/- मध्ये टर्न की बेसीस वर करण्यांत येईल व सदरचा खर्च शहर सौंदर्यीकरण ९५-९६ मधून करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे त्रिमुर्ती चौक,जवाहर कॉलनी चौकाचा विकास करुन सौंदर्यीकरण करणेच्या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु.६०,०००/- सर्वानुमते मंजुरी देवून वाटाघाटीनुसार मे.मारुती फायबर या एजन्सीस ९५-९६ च्या दरसुचीनुसार काम करण्यांची मंजुरी दिली जाते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७०/२९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,अदालत रोडवरील तापडीया टॅरेस चौकाचा विकास करुन सौंदर्यीकरण करण्यांच्या कामाकरीता सदरील कामात अनुभवी असलेले मे.मारुती फायबर्स यांच्याकडून कोटेशन मागविण्यांत आले.कोटेशनमध्ये सदरील कामाची किंमत रु.९०,०००/- दर्शविण्यात आली होती,त्यानंतर मा.आयुक्तांनी संबंधितास

चर्चेस बोलावून सदरील काम रुपये ७८,०००/- मध्ये करावयास सांगितले व संबंधिताने ते मान्य केले असुन मान्यता झाल्यास सदरील काम सिव्हील वर्कसहित मे.मारुती फायबर्स यांच्याकडून रक्कम रु. ७८,०००/- मध्ये टर्न की बेसीसवर करुन घेण्यांत येईल व सदरचा खर्च शहर सौंदर्यीकरण ९५-९६ मधुन करण्यांत येईल.करीता प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अदालत रोडवरील तापडीया टेरीस चौकाचा विकास व सौंदीर्यीकरण करण्याच्या कामाकरीता अंदाजपत्रकीय रक्कम रु.७८,०००/- वाटाघाटी नुसार एजन्सी मे.मारुती फायबर्स यांचे कडून वर्ष ९५-९६ वर्षाच्या दर सुचीनुसार करण्यांत यावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७१/३० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,स्टेट बँक कॉलनी,पीर बाजार चौकाचा विकास करुन सौंदर्यीकरण करण्याच्या कामासाठी या कामात अनुभवी असलेले मारुती फायबर्स यांच्याकडून कोटेशन मागविण्यात आले.कोटेशनमध्ये त्यांनी सदरील कामाची किंमत रुपये ९५,०००/- दाखवली आहे.मा.आयुक्तांनी संबंधितास दराचे वाटाघाटीस बोलावून सदरील काम रुपये ७५०००/- मध्ये करण्यांस सांगितले व संबंधिताने ते मान्य केले आहे.तरी मान्यता झाल्यास सदरील काम सिव्हील वर्कसहित मारुती फायबर्स यांच्याकडून वर दर्शविल्याप्रमाणे रुपये ७५,०००/- मध्ये टर्न की बेसीसवर करुन घेण्यांत येईल व सदरचा खर्च शहर सौंदर्यीकरण ९५-९६ मधून करण्यांत येईल.तरी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्टेट बँक कॉलनी ,पीर बाजार चौकाचा विकास करुन सौंदर्यीकरण करण्यांच्या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रुपये वाटाघाटीनुसार ७५,०००/- सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.सदरील काम मे.मारुती फायबर्स यांचेकडून ९५-९६ चे दर सुचीनुसार करण्याची मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७२/३१ :**

श्वानदंश प्रतिबंधक योजना औरंगाबाद करीता महाराष्ट्र शासनाचे वाहन क्र.एमटी मे/७३२७ सध्या चालू आहेत.हे वाहन मार्च १९८४ मध्ये खरेदी केलेले असुन अतिशय खिळखिळे झालेले आहे.दुरुस्तीसाठीचा खर्च न परवडणारा असल्यामुळे व हे वाहन निर्लेखित केल्याशिवाय नविन वाहन शासनाकडून मिळणार नसल्यामुळे महानगरपालिकेतर्फे एक नविन डॉग-व्हॅन खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

सध्याचे वाहन बजाज कंपनीचे आहे.त्याऐवजी टाटा ४०७ वर कुत्र्यांसाठी पिंजरा व कुत्रे पकडण्यासाठीच्या लेबर करीता बसण्याची व्यवस्था करुन डॉग-व्हॅन बनविणे योग्य होईल.टेल्को कंपनीचे स्थानिक अधिकृत विक्रेते मे.सतिश मोटर्स लि.औरंगाबाद यांचे दरपत्रका प्रमाणे (govt.Rate) नुसार टाटा ४०७ व बॉडी करीता रुपये ३,२३,८८३/- खर्च येतो.तर कुत्र्यांचा पिंजरा व मजुरांना बसण्याची व्यवस्था करण्यांसाठी अंदाजे रु. २५०००/- खर्च येईल.याप्रमाणे नविन डॉगव्हॅन करीता एकूण रुपये ३,४८,८८३/- खर्च अपेक्षीत आहे.टाटा-४०७ ट्रकच्या दरात बदल येवू शकतो.वाहनाचा पुरवठा करतांना जी किंमत असेल त्याप्रमाणे रक्कम अदास करावी लागेल.वाहन खरेदीसाठी संपूर्ण रक्कम ॲडव्हॉंस

अदा करावी लागेल.हा खर्च शासकीय अनुदान नविन वाहने खरेदी तरतुदीतून करता येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्वानदंश प्रतिबंध योजना औरंगाबाद महाराष्ट्र शासनाचे वाहन क्र.एमटीओ ७३२७ अतिशह ना दुरुस्त झाल्यामुळे नविन वाहन खरेदी करण्यांकरीता अधिकृत विक्रेते मे.सतीश मोटर्स लि.औरंगाबाद यांचे दर पत्रकाप्रमाणे टाटा-४०७ कब व बॉडी एकूण रु.३,२३,८८३=०० तसेच कुत्र्याचा पिंजरा व मजुरांना बसण्याची व्यवस्था करण्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु. २५०००/- च्या अंदाजपत्रकीय खर्चास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७३/३२ :**

शहरातील सर्व झोनमधील कचरा वाहतुक करण्यांसाठी एकूण २९ट्रक/टिप्पर आहेत.दोन जुने झालेले ट्रॅक्टर स्पेअरला आहे.झोनमधील एखादी ट्रक नादुरुस्त असल्यास या ट्रॅक्टरची व्यवस्था केली जाते.परंतु या ट्रॅक्टरमुळे ट्रकप्रमाणे संपूर्ण कचरा वाहून नेली जाऊ शकत नाही.

तसेच शहरातील जनतेसाठी ज्या भागात पाण्याच्या नळाची व्यवस्था नाही.तेथे पाणी पुरवठा करण्यांसाठी सध्या चार मोठे दहा हजार लिटर क्षमतेचे व एक लहान तीन हजार लिटर क्षमतेचे पाण्याचे टँकर आहेत.यावर्षी पाऊस कमी झाल्यामुळे पाणी टंचाईची शक्यता आहे.त्यासाठी पाच नविन टँकर्स खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे,हे टँकर मध्यम आकाराचे आठ हजार लिटर क्षमतेचे टिप्पर मध्ये बसवुन पाणी पुरवठा करण्यांत येणार आहे.ज्यावेळेस पाणी टंचाई नसेल त्यावेळेस हेच टिप्पर कचरा वाहतुकीसाठी वापरले जाणार आहेत.

महानगरपालिकेकडे कचरा वाहतुकीसाठी सर्व टाटा कंपनीचे टिप्पर्स आहेत.हे टिप्पर मजबुद व चांगल्या प्रतिचे आहेत.तसेच दुरुस्ती व स्पेअर पार्ट उपलब्धतेच्या दृष्टीने सोईचे आहे.नविन १६१२ टिप्पर खरेदीसाठी टेल्कोचे स्थानिक अधिकृत विक्रेते मे.सतीश मोटार्स लि.औरंगाबाद यांचे कडून (गर्व्ह.रेट) प्रमाणे दरपत्रक मागविण्यात आले.

| | | | दर रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १) | टाटा एस.के.१६१२/३६ बॉक्स टिप्पर. | ०५ नग | ६,६५,७५०/- | ३३,२८,७८५/- |

वरीलप्रमाणे पाच टिप्पर्स खरेदी करण्यांसाठी ३३,२८/- खर्च येतो हे दर जकात कर सोडून आहेत.तसेच वाहनाचा पुरवठा करताना जी कमी किंवा जास्त किंमत असेल त्याप्रमाणे रक्कम अदा करावी लागेल.संपूर्ण रक्कम ॲडव्हान्स अदा करावी लागेल सध्या नविन वाहने खरेदीसाठी तरतूद नाही.तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मे.सतिश मोटार्स लि.औरंगाबाद यांचेकडून अधिकृत खरेदी करण्याचे रक्कम रु.३३,२८,०८५/- रुपयास मंजुरी देण्यांत येते.सदरील रकमेतून ५ टिप्पर्स १६१२ खरेदी करण्यांत यावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७४/३३ :**

शहरातील जनतेसाठी पाणी पुरवठा करण्यांकरीता दहा हजार लिटर क्षमतेचे चार मोठे व तीन हजार लिटर क्षमतेचे एक लहान पाण्याचे टँकर आहेत.उन्हाळयामुळे पाणी टंचाईची शक्यता लक्षात घेऊन आठ हजार लिटर क्षमतेचे पाच टँकर खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

यांत्रिकी कार्यशाळेत आवश्यक मशिन नसल्यामुळे गोलाकार टँकर बनविणे असल्यस बाहेरच्या एजन्सीकडून बनवावे लागेल.त्यासाठी प्रति टँक अंदाजे रु.७०,०००/- प्रमाणे एकूण पाच टँककरीता रुपये ३,५०,०००/- खर्च येईल.

गोलाकार टँकरऐवजी चौकोनी आकाराच्या टँक बनविल्यास महानगरपालिका कार्यशाळेत बनविणे शक्य आहे.एकूण पाच चौकोनी टँक बनविण्यासाठी अंदाजे रुपये २,५०,०००/-खर्च येईल.टँक बनविण्यासाठी आवश्यक मटेरियल जसे एम.एस.प्लेट,अँगल,पाईप,व्हॉल्व,वेल्डींग रॉड इत्यादी स्थानिक बाजारातून खरेदी करावे लागेल.

वरीलप्रमाणे गोलाकार व चौकोनी आकाराच्या टँक बनविण्यासाठी अनुक्रमे रु. ३,५०,०००/-व २,५०,०००/- अंदाजे खर्च येईल.टँक खरेदीसाठी तरतूद नाही. तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहागंज पाणी पुरवठा करण्यांकरीता ८ हजार लिटर क्षमतेचे ५टँकसचौकोनी आकाराच्या बनविण्याकरीता मटेरियल एस.एस.प्लेट,अँगल्स,पाईप,व्हाल्व,वेल्डींग रॉड इत्यादी खरेदी करण्याकरीता अंदाजप पत्रकीय रक्कम रुपये २,५०,०००/- लाख रुपयास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३७५/३३ :**

सध्या विद्युत विभागांतर्फे रस्त्यांवरील पथदिव्यांची दुरुस्ती करण्यांसाठी एक १३ मी.उंचीची व एक ९.८ मी.उंचीची अशा दोन हायड्रॉलीक लॅडर आहेत.शहरातील पथदिव्याची संख्या दिवसेंदिवस वाढत असून त्याचे दुरुस्तीचे काम जलद गतीने व चांगल्या प्रकारे होण्यासाठी नविन दोन ९.८ मी.उंचीचे हायड्रालीक लॅडर खरेदी करणे आहे.

टाटा-४०७ चे सीजवर बसविण्यात येणाऱ्या ९.८ मी.उंचीच्या हायड्रालीक लॅडर खरेदी करणेसाठी खालील प्रमाणे खर्च येतो.

१) टाटा-४०७/३१ कॅब पी.टी.ओ.सह ०१ नग रु. ३,१५,३४३=०० अंदाजे.

२) ९.८ मी.उंचीचा हायड्रॉलीक प्लॅटफार्म ०१नग रु.<u>३,६०,०००=००</u> अंदाजे.

तयार करुन पुरवठा केलेल्या टाटा-४०७/३१ एकूण रु.६,७५,३४३=००

एकूण दोन लॅडर करीता २X६,७५,३४३=०० = १३,५०,६८६=००

टाटा चेसीजचे दर टेल्को कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.सतिश मोटार्स लि.औरंगाबाद यांचे (गर्व्ह.रेटस) दरपत्रकाप्रमाणे आहेत.हे दर सध्याचे असुन त्यात बदल होऊ शकतो.वाहनाचा पुरवठा करताना जी किंमत असेल त्याप्रमाणे रक्कम अदा करावी लागेल,वाहन खरेदीसाठी संपूर्ण रक्कम अँडव्हॉन्स जमा करावी लागेल.एकूण दोन चेसीजकरीता रुपये ६,३०,६८६=०० खर्च येतो.दोन हायड्रालीक प्लॅटफॉर्म बसविणे व पुरवा केलेल्या चेसीजवर बसविण्यासाठी अंदाजे रुपये ७,२०,०००/- खर्च येतो.एकूण दोन हायड्रालीक लॅडर खरेदीसाठी वरीलप्रमाणे रुपये १३,५०,६८६/- खर्च येतो.हा खर्च शासकीय अनुदान नविन वाहने खरेदी तरतुदीतून करता येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विद्युत विभागा मार्फत रस्त्यांवरील पथदिव्यासाठी दुरुस्ती करण्यासाठी आणखी नविन हायड्रालीक लॅडर ९.८ मी.उंचीचे एकूण दोन लॅडर खरेदी करण्यांकरीता रक्कम रु.१३,५०,६८६/- मे.सतिश मोटार्स लि.औरंगाबाद शासकीय दराने खरेदी करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७६/३४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मध्यवर्ती जकात नाका बायजीपुरा येथे ३० टनाचा वजन काटा (प्वेईंग ब्रिज) नियोजीत जागेवर बसविण्यासाठी कार्यालयीन दरपत्रक सुचना क्र.मनपा/लेखा/नि/४५/९५ दि.२८-११-९५ अन्वये दै.लोकविजय,मुफस्सीर,लोकमत,महाराष्ट्र टाइम्स इ.वर्तमानपत्रात जाहिरात देवून रक्कम रु. १०००/- अनामत घेऊन दरपत्रके मागविली असता,शेवटच्या तारखेपर्यंत एकूण (४) दरपत्रके दर भरलेले प्राप्त झाले.ते दि.१२-१२-९५ ला मुख्य लेखा परिक्षक यांच्या दालनात उघडण्यात आले.

(१०००X७५०००) मी.मी.म्हणजेच १०"X२५" आकाराच्या प्लेट फॉर्म स्टील यार्ड टाईप ३० टन मोजणाऱ्या वजन काटयाचे तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी प्राप्त दर रक्कम रुपये ३,१५०००/- अधिक रु. १०००/- लेबर व इरेक्शन चार्जेस मिळून एकूण रक्कम रु. ३,३५,०००/- होत आहे.

उपरोक्त प्राप्त दर हे मे.महाराष्ट्र स्केल अँड वेट्स सर्व्हीसेसचे असून त्यांनी त्यांच्या दरपत्रकाबरोबर सादर केलेल्या अटी प्रमाणे १०"X२५" प्लेट फॉर्मचा काटा खरेदी करणेबाबतचा दि.१-१-९६ रोजी मा.आयुक्त यांची मंजुरी प्राप्त झालेली आहे.

सबब स्टील यार्ड टाईप ३० टन वजन मोजणारा १०X२५ फुट आकाराचा प्लेटफॉर्मचा वजन काटा प्राप्त दरानुसार तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व रक्कम रुपये ३,३५,०००/- (लेबर चार्जेससह) चे मे.महाराष्ट्र स्केल अँड वेट्स सर्व्हीसेस औरंगाबाद यांचे दर मंजुरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सेंट्रल नाका येथे वजन करण्यासाठी १०X२५ फुट आकाराचे प्लेट फॉर्म स्टील यार्ड टाईप ३० टन वजन मोजणाऱ्या वजन काटयाचे तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी प्राप्त रक्कम रु. ३,१५०००/- सर्व चार्जेससह मे.महाराष्ट्र स्केल अँड वेट्स सर्व्हिसेस औरंगाबाद यांचेकडून खरेदी करुन फिट करुन घेण्याची सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७७/३५ :**

महानगरपालिका हद्दीतील मिळकत धारकांनी/घरमालकांनी मालमत्ता कर व त्यास संलग्न असलेले इतर कराचा भरणा केल्यानंतरही पुन्हा सदर कराची थकबाकी म्हणून मागणी करण्यांत येत असल्याचे निदर्शनास आल्याने दिनांक २८-१२-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीने मिळकत धारकांना घर मालकांना मालमत्ता कर व त्यांस असलेले संलग्न "कराचा भरणा पुस्तक" देण्यांचा निदेश दिलेला आहे.महानगरपालिकेच्या हद्दीत सध्या कर आकारणी केलेल्या सुमारे ८५७३० मिळकती असून त्यांत आणखी वाद होण्याची शक्यता नाकारता येत नाही.मिळकत धारकांना /घरमालकांना भरलेल्या आणि थकबाकी असलेल्या सदर कराची जाणीव रहावी व कराचा भरणा वेळोवेळी व्हावा म्हणून सदर पुस्तक देणे आवश्यक आहे.सदर कामासाठी सुमारे रुपये पाच लाख (अपेक्षीत) खर्च लागणार आहे.सदर खर्च मिळकत धारकांकडून/घरमालकांकडून ना नफा ना तोटा या धरतीवर किंमत निश्चित करुन वसुल करण्यात येईल.करीता सोबत जोडलेल्या नमुन्यांत सदर पुस्तक तयार करून मिळकत धारकांना/घरमालकांना दिनांक १-४-९६ पासुन देण्यांचा प्रस्ताव मंजुर करुन सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यांसाठी सादर करीत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा हद्दीतील मालमत्ता धारकांना कराचा भरणा पुस्तक देण्यासाठी मालमत्ताधारक अंदाजे ८५,७३०/- मिळकत असुन यात वाढ होण्याची शक्यता

आहे,म्हणून या कामासाठी सुमारे एक लाख पुस्तकाची तुर्त आवश्यकता असल्याने त्यासाठी अंदाजीत खर्च रु. ५,००,०००/- मंजुरी देण्यात येते.सदरील मालमत्ता धारकांना ना नफा ना तोटा या धरतीवर किंमत निश्चित करुन वसुल करण्यांची मंजुरी दिली जावून सदरील ठराव सर्व साधारण सभेस शिफारस करण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७८/३६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.कोहीनुर कॉलनी येथील मनपाच्या खुल्या जागेवर तळमजल्यावर एक छोटे कार्यक्रम गृह व पहिल्या मजल्यावर वाचनालय व समोरील मोकळया जागेवर संरक्षित भिंतीसह सुशोभिकरण करणे व कचरा कुंडया तयार करण्यांत आले असुन त्यास मा.आयुक्तांनी दि.३-१-९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे.सबब सदर कामाचे रक्कम रुपये ४,४०,०००/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे मो.कोहीनुर कॉलनी येथे मनपाच्या खुल्या जागेवर तळमजल्यावर एक छोटे कार्यक्रम गृह व पहिल्या मजल्यावर वाचनालय तसेच सरंक्षित भिंतीसह सुशोभिकरण तसेच कचरा कुंडया तयार करण्याच्या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४,४०,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी दिली जाते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.सभापती : श्री.टी.डी.राजपुत व शेख खमर यांनी त्यांच्या पदोन्नती संदर्भाने स्थायी समितीसमोर सादर केलेल्या निवेदना संदर्भाने सहा.आयुक्त-१ यांनी सविस्तर टिप्पणी सादर करावी.

यानंतर "राष्ट्रगीताने " ६.१५ वाजता सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत /-
नगर सचिव,
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत /-
सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १९-१-१९९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.शनिवार दि.१९-१-१९९६ रोजी दुपारी ३.०० वाजता मा.सभापती श्री.प्रदीप कुमार जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभागृहात स्थायी समिती सभेस सुरुवात झाली.सभेस निम्ननिर्दिष्ट स.सभासद उपस्थित होते.तसेच महानगरपालिकेचे अधिकारीही उपस्थित होते.**

१) श्री.अब्दुल रशिदखान (मामू)
२) श्री.डॉ.कराड भागवत.
३) श्री.गौतम खरात.
४) सौ. रजनी जोशी.
५) श्री.प्रकाश निकाळजे.
६) श्री.कंवरसिंग बैनाडे.
७) श्री.महंमद मुश्ताक अहमद.
८) कु.माया लाडवाणी.
९) श्री.विजयकुमार मेहेर.
१०) श्री.प्रभाकर विधाते.
११) श्री.महादेव सुर्यवंशी.
१२) सौ.पद्मा शिंदे.
१३) श्री.सुदाम सोनवणे
१४) श्री.हमदीउद्दीन ताबा.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) यांनी ठराव मांडल्यानुसार स.सभासद रशिद अब्दुल सत्तार यांच्या पत्नीचे निधन झाल्यानु दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.याच संदर्भाने स.सभासद श्री.अब्दुल रशिद सत्तार यांच्या कुटुंवियांकडे शोक संदेश पाठविण्याबाबत मा.सभापती यांनी निर्देश दिले.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : जकात चालू खाते पुर्ववत सुरु करण्यांबाबत संबंधितांना सुचित करण्यांत यावे.

**संवाद :**

मा.सभापती : १ फेब्रुवारी,९६ पासूनही "चालू खात्याची" सवलत पुर्ववत सुरु करण्यांत येणार आहे.

श्री.प्रकाश निकाळजे : सोने-चांदी वरील जकात आकारणी व वसुलीबाबतही यापुर्वी बैठकीत चर्चा झालेली आहे,यावर पुढे काय कार्यवाही झाली,याची माहिती देण्यांत यावी.या संदर्भाने शहरातील सोने-चांदीचे व्यापारी व मनपा अधिकारी यांची संयुक्त बैठक घेण्यात आलेली आहे.मागील तीन वर्षात आकडेवारी काढण्यांत येत आहे.तीन वर्षाची आकडेवारी काढण्यात येते आहे ती उपलब्ध होताच पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

मागील स्थायी समिती बैठकीत उप अभियंता श्री.टी.डी.राजपुत यांनी शेख खमर,उप अभियंता यांच्या पदोन्नती व मानी व तारखेबाबत एक अपिल दाखल केले होते.सहाय्यक आयुक्त-१ यांनी यावर प्रथम खुलासा करावा.

श्री.महंमद मुश्ताक अहमद : या अभियंतावरती सांगोपांग चर्चा व विचार विनिमय होऊन निर्णय घेतला जावा,यासाठी स्थायी समितीची एक विशेष सभा बोलावण्यांत यावी.

मा.सभापती : दि.२२-१-९६ रोजी दुपारी ३.०० वाजता स्थायी समितीची विशेष सभा या संदर्भाने घेण्यात येईल. या सभेत अपिलार्थी अधिकारी यांचे बरोबरच मा.आयुक्त,उप आयुक्त,मुख्य लेखा परिक्षक लेखाधिकारी,विधी सल्लागार व सहा.आयुक्त हे उपस्थित राहतील.

कार्यकारी अभियंता : माजी उप आयुक्तांनी ज्येष्ठता सुचीवर सुनावणी झाल्यानंतर जे इतिवृत्त तयार केले व ज्या इतिवृत्ताच्या आधारावर श्री.शेख खमर यांना मानी व दिनांक देण्यात आलेला आहे.त्या इतिवृत्तावरच आमचा मुख्य आक्षेप आहे.तेव्हा आम्हांसही विशेष स्थायी समिती सभेस उपस्थित राहण्याची परवानगी देण्यांत यावी.

श्री.गौतम खरात : श्री.टी.डी.राजपुत व शेख खमर या दोघांनीही स्थायी समितीकडे अपिल केलेले आहे.आवश्यकता भासल्यास इतर संबंधित अधिकाऱ्यांना पत्र देवून सभेस बोलावले जावे.

श्री.विजयकुमार मेहेर : संबंधित अधिकाऱ्यांना बैठकीस उपस्थित राहण्यांची परवानगी देण्यांत यावी.

मा.सभापती : या विषयाच्या संदर्भाने अधिकारी विशेष स्थायी समिती बैठकीस उपस्थित राहू इच्छितात,त्यांनी आपले म्हणणे लेखी स्वरुपात सादर करावे.निवेदनाच्या प्रती संबंधितांनी सर्व स. सभासदांना,आयुक्त,सहाय्यक आयुक्त-१,दोन्ही अपिलार्थी यांना बैठकीपुर्वीच पुरवाव्यात.ऐनवेळी येणाऱ्या निवेदनावर विचार केला जाणार नाही.

श्री.हमीद उद्दीनताबा : मनपाचे बोध चिन्ह मनपा इमारतीवर कोठे असावयास पाहिजे वा ज्या इमारतीवर बोधचिन्ह असेल त्या इमारतीतच मा.महापौरांचे दालन असावे असा एखादा कायदा वा नियम आहे का?

मा.सभापती : बोधचिन्ह कोठे लावावे हे कार्यालयाने ठरवायचे असते.यात कायदयाचा प्रश्न येत नाही. अतिरिक्त शहर अभियंता व शहर अभियंता यांनी सादर केलेल्या निवेदनावरती सहा आयुक्त-१ यांनी माहिति सादर करावी.

सहा.आयुक्त-१ : मध्यंतरीच्या काळात आस्थापना विभागांतील संचिका अभिलेख कक्षाकडे हस्तांतरीत करण्यांत आल्या होत्या.त्या शोधून आगामी सभेत माहिती सादर करण्यांत येईल.

मा.सभापती : २२-१-९६ च्या विशेष स्थायी समिती सभेत या अपिलावरती माहिती सादर करण्यांत यावी.एखादया बैठकीत विचारलेल्या प्रश्नांवर संबंधित विभाग प्रमुख वेळेच्या आत माहिति सादर करत नाहीत.त्यामुळे सदस्यांनीही वारंवार नाराजी प्रकट केलेली आहे.तेव्हा सर्व विभाग प्रमुखांनी सभेत विचारला गेलेल्या प्रश्नांवरती वेळेच्या आंत माहिती सादर करण्यांबाबत दक्ष असावे.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : शहर विकास आराखडयातील आरक्षणांबाबत माहिती देण्यासाठी या बैठकीतही संबंधित उप संचालक नगर रचना उपस्थित नाहीत,अशातच प्लॅनिंग कमिटीची घोषणा करण्यांत आलेली आहे व या कमीटीची एक औपचारीक बैठक २२-१-९६ रोजी बोलावलेली आहे.प्राप्त झालेल्या आक्षेपावरती सर्व संबंधितांना सुनावणी दिली जाईल.

डॉ.भागवत कराड : स्थायी समितीकडे विविध कामांचे प्रस्ताव सादर करतांना ती ती कामे पुर्वी केव्हा करण्यांत आली व त्यावरील खर्च आदी बाबतची माहिती प्रस्तावासोबत देण्यांत यावी अशी मागणी करण्यांत आली होती.मात्र त्यावर अंमलबजावणी होत नाही.

सभापती : आगामी आर्थिक वर्षातील कामे प्रस्तावित करतांना अशा प्रकारची माहिती पुरविली जाईल.

श्री.हमीदउद्दीन ताबा : सांस्कृतीक अधिकाऱ्यांच्या संवर्ग बदलण्याबाबतच्या ठरावावर विधी सल्लागार यांचे मत मागवावे अशी सर्वसाधारण सभेत मागणी झालेली असतांनाही सचिवांनी परस्पर शासनाकडे ठराव कसा पाठवला,विधी सल्लागारांनी संचिकेवर काय अभिप्राय दिलेले आहेत,याचाही खुलासा व्हावा.

विधी सल्लागार : विधी सल्लागार या नात्याने मी माझे मत संचिकेवर दिलेले आहे व संचिका मा.आयुक्तांकडे पाठविली आहे.त्यानुसार त्यावर कार्यवाही होईल.

श्री.महंमद मुश्ताक अहमद : शासनाकडे हा प्रस्ताव पाठवणे योग्य आहे काय हा सर्वसाधारण सभेपुढे प्रश्न होता.

श्री.गौतम खरात : सर्वसाधारण सभेत चर्चा झाली की,या ठरावाच्या अनुषंगाने विधी सल्लागाराचे मत घेवून नंतरच प्रस्ताव शासनाकडे पाठवावा.विधी सल्लागार यांचे मत सभेसमोर आले पाहिजे.एखादा प्रस्ताव शासनाकडे पाठवतांना तो संबंधित आयुक्तांच्या निदर्शनास आणून देण्यांत आली आहे काय यावरही विचार व्हावयास हवा.

सहाय्यक आयुक्त-१ : हे पत्र आस्थापना-१ मार्फत पाठविण्यांत आलेले नाही.

मा.सभापती : २२-१-९६ च्या विशेष स्थायी समिती सभेत या संदर्भाने माहिती सादर करण्यांत यावी.याच बरोबर संबंधित विभाग प्रमुखांकडून संचिका आल्याशिवाय मा.आयुक्तांनीही अशा संचिकावर स्वाक्षऱ्या करु नयेत असे पत्र मा.आयुक्तांना दिले जाईल.त्यामुळे असे प्रश्न उपस्थित होऊन एक दुसऱ्या बाबत कटुता उत्पन्न होणार नाही व आवश्यक चर्चाही टाळल्या जातील.

श्री.हमीदउद्दीन ताबा : शहरात टेलीफोन डिपार्टमेंटतर्फे ज्या अंडरग्राऊंड केबल वाकल्या जात आहेत,त्यामुळे जागोजागी रस्ते खोदले जातात,तसेच ड्रेनेज पाणी पुरवठा लाईन्सही तोडल्या जातात.या लाईन्स लवकर दुरुस्त होत नाही,त्यामुळे नागरिकांना बराच त्रास होतो.

मा.सभापती : संबंधित कार्यकारी अभियंता यांनी यात स्वतः लक्ष घालावे टेलिफोनच्या केबल्स टाकतांना ज्या नागरिकांच्या पाणी पुरवठा,ड्रेनेज लाईन्स फुटत असतील,त्या टेलीफोन डिपार्टमेंटकडूनच दुरुस्त करुन घेण्यांत याव्यात.हमीद ताबा यांनी मुद्दा उपस्थित केल्यानुसार शहाबाजार भागातील पहाणी करुन उपाययोजना करण्यांत यावी.

डॉ.विजयकुमार मेहेर : अशातच दैनिक वृत्तपत्रातून एक बातमी प्रकशित झाली होती की,शहरात हजारोंच्या संख्येने अनधिकृत नळ कनेक्शन आहेत.ही बाब सत्य असेल तर असे कनेक्शन शोधण्यांबाबत मोहीम हाती घेण्यांत यावी.यामुळे महानगरपालिकेच्या अर्थ व्यवस्थेवरही परिणाम होतो.

उप अभियंता(पा.पू) : शहरात ६४००० वैद्य नळ कनेक्शन आहेत.८००० अनधिकृत नळ कनेक्शन्स शोधून काढण्यांत आलेली आहेत.

श्री.प्रकाश निकाळजे : अनधिकृत नळ धारकांकडून दंडात्मक रक्कम वसूल करुन ते कनेक्शन रेग्युलराईज करण्यांत यावे.

मा.सभापती : शहरात आणखी काही अनधिकृत नळ जोडण्या झाल्या आहेत काय याची पाहणी करण्यांबाबत सर्व संबंधित विभागीय अधिकाऱ्यांना सुचना देण्यांत याव्यात.

श्री.हमीदउद्दीन ताबा : मनपातर्फे शहरातील विविध भागात जनतेसाठी पाण्याची सोय व्हावी या दृष्टीकोनातून सरकारी नळ बसविण्यांत आलेले आहेत.मात्र अशात हे सरकारी नळ बंद करण्यांत येत आहेत.यामुळे नागरिक नगरसेवकांना जबाबदार धरतात.तेव्हा सरकारी नळ बंद करण्यां येवू नयेत.

कार्यकारी अभियंता :अस्तित्वात असलेल्या सरकारी नळ कनेक्शन्स पैकी ८४ नळ कनेक्शन बंद करण्यांत आलेले आहेत.पाहणीत असे दिसून आले की,एकाच भागात अत्यंत जवळच्या अंतरावर हे कनेक्शन्स आहेत.शंभर फुटाच्या अंतरापर्यंत एक स्टँड पोस्ट असावा हे धोरण ठरवुन नंतरच ही कार्यवाही करण्यांत आलेली आहे.लोकांनी स्वतः होऊन नळ कनेक्शन्स घ्यावेत म्हणजे त्यापासून मनपासही उत्पन्न मिळू शकेल हीच भावना असे कनेक्शन्स बंद करण्यांमागे होती.

मा.सभापती : बंद करण्यांत आलेले नळ कनेक्शन्स हे बरेच जुने आहेत.स्टँड पोस्ट देतांनाच त्याची उपयुक्तता व आवश्यकता पहावयास पाहीजे.मनपाने ही मोहीम राबवल्यामुळे नगरसेवकांना जनता दोषी धरत आहे.इतःपर नविन स्टँड पोस्ट देतांना त्याची आवश्यकता व निकड प्रथम तपासुन पाहण्यात यावी व नंतरच नविन सरकारी नळ बसविण्यात यावा.कट करण्यांत आलेले सरकारी नळ परत पुर्ववत चालू करण्यांत यावेत.तसेच शहरातील वैध व अवैध नळ कनेक्शनची माहिती आगामी सभेत देण्यांत यावी.

श्री.गौतम खरात : नळ कनेक्शन देण्यांची पध्दत ही सोपी झाली पाहीजे,त्याशिवाय अनधिकृत नळ कनेक्शन्स देतांना ६००-८०० रुपये घेतले जातात हे चुक आहे.

डॉ.विजयकुमार मेहेर : पाण्याचा प्रश्न हा दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे.सार्वजनिक नळांना तोटया राहत नसल्याने पाण्याचा मोठया प्रमाणावर अपव्यय होतो.अत्यावश्यक ठिकांणीच सार्वजनिक नळ ठेवण्यांत यावेत व त्यांना तोटया लावण्यांत याव्यात याचबरोबर संबंधित वार्डाती नगरसेवकांनाही जनतेत पाणी वापराबाबत जागृकता निर्माण करावी.

मा.सभापती : सार्वजनिक नळांना तोटया लावण्यांत याव्यात तद्वत जनतेनेही आपल्या नळांना तोटया लावून पाण्याचा अपव्यय टाळावा अशी जाहीरात करण्यात यावी.उपरही मालमत्ताधारक पाण्याचा अपव्यय टाळण्यांसाठी नळांना तोटया लावत नसतील तर त्यांच्याविरुध्द कार्यवाही करण्यांत यावी.

श्री.महादेव सुर्यवंशी : स्लम एरियामध्ये नळ कनेक्शन देतांना बेटरमेंट चार्जेस व रुपये २०० घेण्यांत येतात यापूर्वी नळ कनेक्शनसाठी वर्षाचे भाडे रुपये ५०० व डिपॉझिट रुपये १०० घेतले जाते.नारेगांव सारख्या भागात रस्ते बनवतांना जर काही लोक थोडे बहुत पैसे भरुन नळ कनेक्शन घेऊ इच्छितात,त्यांना कनेक्शन देण्यांत यावे व हप्त्याहप्त्याने उर्वरित रक्कम घेण्यांत यावी.तसेच बेटरमेंट चार्जेस रु.३०० स्लम एरियात घेण्यांत येऊ नये.

उप अभियंता : इलीगल कनेक्शनमुळे रु.३०० घेतले जातात.रु.५०० हे ॲडव्हान्स चार्जेस आहेत.

मा.सभापती : कार्यकारी अभियंता यांनी संबंधित नगरसेवक श्री.महादेव सुर्यवंशी यांच्याशी चर्चा करुन प्रश्न सोडवावा.

श्री.सुदाम सोनवणे : शहरात अनेक ठिकाणी हात पंप बसविलेले आहेत.ते बंद असल्याबाबत वारंवार तक्रारी करुनही दुरुस्त करण्यांत आलेले नाहीत.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : पाणी पुरवठा चालू असतांना लोक नळांना मोटारी लावून पाणी घेतात.त्यामुळे अशा घरांच्या आजूबाजूच्या लोकांच्या नळांना पाणी व्यवस्थितरित्या येत नाही.

श्री.महादेव सुर्यवंशी : माझ्या वार्डातील काही भागात पाणी पुरवठा लाईन टाकून तीन-तीन वर्ष झाले आहेत.तथापि अद्यापही या लाईन्स सुरु करण्यांत आलेल्या नाहीत.त्यामुळे जनतेचे हाल होत आहेत.

अभियंता (पापू) : येत्या आठवडयात या पाणी पुरवठा लाईन्स सुरु होतील.

श्री.महंमद मुश्ताक : एखादया भागात साधारणतः किती स्टँड पोस्ट असावेत हे प्रमाणे ठरवुन सर्वसाधारण सभेकडून तो ठराव पारीत करुन घेण्यांत यावा.स्टँड पोस्टला लावलेल्या तोटयाही वारंवार चोरीस जातात.

मा.सभापती : नळांना मोटारी लावल्याने बऱ्याचशा लोकांच्या नळांना पाणी व्यवस्थित येत नाही.त्यामुळे पाणी पुरवठया संदर्भाने नेहमी ओरड होते.कार्यकारी अभियंता यांनी एक मोहीम हाती घ्यावी व नळांना मोटारी लावल्या जात असतील तर त्या जप्त करण्यांत याव्यात व अशा लोकांवर केस करण्यांत यावी.नगरसेवकांकडून प्राप्त झालेल्या पत्त्यांवर संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या विभागाकडून योग्य ती कार्यवाही केली जात आहे,याची दक्षता घ्यावी.प्रस्तावित केलेल्या कामाबाबत काही अर्थसंकल्पीय अडचणी असतील तर त्या स.नगरसेवकांच्या नजरेस आणाव्यात.

डॉ.भागवत कराड : माझ्या वॉर्डातील समतानगर भागात अत्यंत गरीब लोक राहतात.या भागास स्लम एरिया म्हणून घोषित करण्यांत यावा.

प्रकल्प संचालक : १९८४ नंतर वसलेल्या स्लमसना स्लम म्हणून डिक्लेअर करता येत नाही,असा शासनाचा निर्णय आहे.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : मागील बैठकीत प्रकल्प विभागातील शिवणकला शिक्षिका व इतर पदाबाबत प्रश्न विचरला गेला होता.त्याबाबत माहिती देण्यांत यावी.

प्रकल्प संचालक : हा प्रस्ताव मंजुर झालेला असुन प्रस्ताव शासनाकडे मंजुरीस्तव पाठविण्यासाठी अस्थापना विभागांकडे पाठविण्यात आलेला आहे.

श्री.प्रकाश निकाळजे : स्लम भागात शॉप्सना परवानगी देण्यांत येवू नये,असा प्रस्ताव मंजूर झालेला असतांनाही स्लम भागात बिफ शॉपसाठी परवाने देण्यांत येत आहेत.त्या त्या भागांतील नगरसेवकांचे मत घेतल्याशिवाय असे परवाने देण्यांत येवू नयेत.

मा.सभापती : असे शॉप्स टाकण्यांसाठी त्या त्या भागातील नागरिकांचा आक्षेप असेल तर असे बिफ शॉप्स टाकण्यांत येवू नयेत.लोटा कारंजा भागातील मार्केट पर्यंत सुरु झालेले नाही.यावर तात्काळ मार्केट सुरु करण्यांत यावे.

शहर अभियंता : लोटा कारंजा भागातील मार्केट संदर्भाने टेंडर कॉल करण्यांत येत आहेत.

**विषय क्र. ३७९/१ :**

दि.६-१-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : मागील स्थायी समिती बैठकीत क्रीडा स्पर्धांच्या पत्रिका वाटपावरुन क्रीडा अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही प्रस्तावित करण्यांबाबत सुचविण्यांत आले होते.त्यांच्याकडून झालेली चुकी व त्यांनी मागितलेली दिलगीरी पाहता त्यांना माफ करण्यांत यावे

मा.सभापती : क्रिडा अधिकारी यांनी प्रकरणांमध्ये दिलगीरी व्यक्त केलेली असल्याने त्यांच्याविरुध्द कोणतीही कार्यवाही प्रस्तावित करण्यांत येवू नये.

श्री.प्रभाकर विधाते : विद्युत विभागातील लाईनमनबाबत विचारलेल्या माहितीवर उत्तर देण्यांत यावे.

सहाय्यक आयुक्त-२ : चतुर्थश्रेणी मधील जागा अनुकंपा धर्तीवरही केल्या जातात.या संदर्भाने विचारलेल्या प्रश्नांवर आगामी स्थायी समितीत सहा.आयुक्त-२ यांनी सदर प्रश्नावरील माहिती लेखी स्वरुपात स.सदस्यांना दयावी.

डॉ.भागवत कराड : विद्युत विभागातील लाईनमन्सना कार्यालयातील किरकोळ दुरुस्तीची कामेही देण्यांत यावीत,असा निर्णय झालेला होता.त्यावर माहिती देण्यांत यावी.

उप अभियंता (विद्युत) :लाईनमन्सना दैनंदिन कामाचे वाटप व वेळेबाबत पाबंद केलेले आहे ते कार्यालयीन किरकोळ कामेही करत आहेत.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : लाईनमन्सना दैनंदिन कामाचे वाटप व वेळेबाबत पाबंद केलेले आहे ते कार्यालयातील किरकोळ कामेही करत आहेत.

अग्निशमन अधिकारी : केवळ मनपाकडेच नाही तर शासनाच्या अधिकारातील कोणत्याही अग्निशमन कार्यालयाचे रेकॉर्ड व अस्थापना हया अग्निशमन कार्यालयाचेच असल्याचे दिसून येईल.या विभागास शासनाकडून अनुदान मिळते,यासाठी हा भाग स्वंतत्ररित्या कार्यरत ठेवला आहे.त्याचबरोबर या विभागातील कर्मचाऱ्यांच्या सेवा हया अत्यावश्यक सेवा आहेत.तेव्हा त्यांच्या रजा इ.बाबी याच विभागाकडून मंजूर व्हावयास हव्यात.तथापि सब-ऑफिसर्स कडून अहवाला आल्यानंतर पुढील कार्यवाहीसाठी संचिका अस्थापना विभागाकडे पाठवली जाते.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : अग्निशमन अधिकारी सभागृहाची दिशाभूल करत आहेत.हाताखालील अधिकाऱ्यांवर वचक ठेवण्यांसाठी ते अग्निशमन विभागाची अस्थापना स्वतंत्र ठेवू इच्छितात.अग्निशमन अधिकारी यांच्या कामासंदर्भाने अनेक तक्रारी आहेत.

श्री.गौतम खरात : अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांवर योग्य नियंत्रण रहावे,यासाठीही अस्थापना स्वतंत्र असावी असे अग्निशमन अधिकारी यांचे मत असले तरी मिटींग विभागातील ड्रायव्हरची बदली अग्निशमन विभागात करण्याचे अधिकार त्यांना कसे प्राप्त झाले.

मा.सभापती : अतिरिक्त शहर अभियंता हे पुर्वी अग्निशमन दराचे नियंत्रण करत होते.त्यांनी याबाबत आपला अभिप्राय द्यावा.

अतिरिक्त शहर अभियंता : अग्निशमन दलातील कार्यपध्दती व सेवा पाहता हया विभागाची अस्थापना अग्निशमन दलाकडेच असू द्यावी.

अग्निशमन अधिकारी : ज्या वाहन चालकांची बदली करण्यांत आली तो मुळातच अग्निशमन विभागाचा वाहन चालक होता.या भागातील कर्मचारी हे ट्रेन्ड असतात,म्हणून त्याची बदली अग्निशमन दलात करण्यांत आली आहे.या विभागातील टेलीफोन ऑपरेटरने नागपूरला ट्रेनिंग घेतले आहे व वेळोवेळी प्रशासनाने त्यांना वेगवेगळया प्रशिक्षणासाठी पाठविले आहे.त्याचे प्रमोशन कमेटीकडून झालेले आहे.

श्री.प्रकाश निकाळजे : अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांसाठी बांधण्यात आलेल्या निवासस्थानांपैकी काही निवासस्थाने वाटप करण्यांत आलेली आहेत तर काही अद्याप रिक्त आहेत ती तात्काळ वाटप करण्यांत यावीत.

अग्निशमन अधिकारी : या संदर्भाने मा.आयुक्तांकडे संचिका सादर केली आहे.इमारतीचे उद्घाटन झाल्यानंतरच त्यांचे वाटप करण्यांत येणार आहे.

मा.सभापती : आयुक्तांशी चर्चा करुन क्वार्टरचे वाटप कसे करता येईल हे पाहिले जाईल.

श्री.हमीदउद्दीन ताबा : अग्निशमन अधिकाऱ्यांना देण्यांत आलेल्या प्रमोशन संदर्भाने माहिती देण्यांत येईल.

मा.सभापती : २२-१-९६ च्या बैठकीत यावर चर्चा केली जाईल.

श्री.प्रभाकर विधाते,श्री.महादेव सुर्यवंशी : मुख्य कार्यालयातील अस्थापना विभागातील कामाचा अनुभव पाहता व अग्निशमन सेवेतील कर्मचाऱ्यांची सेवा पाहता ही अस्थापना अग्निशमन विभागाकडेच राहू द्यावी.

डॉ.विजयकुमार मेहेर : हा प्रश्न काही नगरसेवकांनी प्रतिष्ठेचा बनवलेला दिसतो.अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांच्या सेवा पाहता ही अस्थापना आहे तेथेच राहू द्यावी.या विभागात काही गैर कारभार असतील तर त्या गैर कारभाराची चौकशी करण्यांत यावी.

मा.सभापती : मुख्यालयातील अस्थापना विभागाची कार्यपध्दती ही फारशी प्रसंशनीय नाही.अग्निशमन दलाची सध्याची कार्यपध्दती पुढे चालू ठेवावी.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) या बाबींचा निषेध करुन पत्रिका फाडून श्री.हमीदउद्दीन ताबासह सभात्याग करतात.

मा.सभापती : हॉटेल्समध्ये देण्यांत यावयाच्या सुविधाबाबत अग्निशमन अधिकाऱ्यांनी ज्या नोटीसा दिल्या आहेत.त्याची माहिती आगामी स्थायी समिती बैठकीत देण्यांत यावी.

श्री.प्रकाश निकाळजे : जकात वसुली व जकात नाक्यावरुन जकात फाडून जाणाऱ्या गाडयावरती योग्य प्रकारे जकात आकारण्यांत आली आहे काय याची पाहणी करण्यांबाबतचा प्रश्न मी मागील स्थायी समिती सभेत मांडला होता.जकात नाक्यावरील गैरकारभाराबाबत मी लेखी स्वरुपात तक्रार केली आहे.

जकात अधिक्षक : या प्रकरणात अधिक चौकशी करण्यांत येईल.

श्री.गौतम खरात : मागील स्थायी समिती बैठकीत अश्वासन देण्यांत आल्यानुसार आंबेडकर नगर भागातील ड्रेनेज लाईनबाबत माहिती देण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यास सांगण्यात यावे.

कार्यकारी अभियंता : आंबेडकरनगर भागातील २५०एमएम व्यासाची ड्रेनेज लाईन प्रथमतः १९९३ मध्ये टाकण्यांत आली.सप्टेंबर १९९४ मध्ये लाईन्सचा निचरा करण्यांसाठी जळगांव रोड क्रॉस करुन सिडकोच्या वाहिनीस ही ड्रेनेज लाइरन जोडण्यांत आली.ऑक्टोंबर १९९४ मध्ये या ड्रेनेज लाईनचा उपयोग या भागात संडास बांधण्यात आले.तेव्हापासून करण्यांत आला.मार्च ९३ ते

आक्टोंबर ९४ जवळपास २० महिने या लाईनचा उपयोग झाला नव्हता.जानेवारी ९५मध्ये जेव्हा संडास सुरु झाले व लाईन सुरु झाली तेव्हा पासून या लाईनच्या चोकअपचा प्रॉब्लेम सुरु झाला.जानेवारी ९५ ते मार्च ९५ या काळात ती लाईन चोकअप झाल्याने आठ वेळा तिची दुरुस्ती करण्यांत आली.ही वाहिनी ७११ मीटर लांबीची आहे,त्यातील ८७मीटर पाईप काढून ती लाईन अपसट करण्यांत आली मार्च ९५ के डिसेंबर ९५ या काळात महानगरपालिकेकडील जेटींग मशिनने साफसफाई करण्यांत आली.चोकअप काढल्यानंतरही लाईन सुरु होत नाही हे लक्षांत आल्यानंतर पूर्ण लाईनच्या लेव्हल्स घेण्यांत आल्या तेव्हा या लेव्हल्स बरोबर नसल्याचे व उतार योग्य प्रमाणात नसल्याचे निदर्शनास आले.त्यामुळे साडेतीन फुटापर्यंत खाली स्लोप देऊन लाईन परत टाकावी लागेल.

श्री.महादेव सुर्यवंशी : या लाईनवर साडेतीन फुटाचा उलटा स्लोप आहे असे कार्यकारी अभियंता यांचे म्हणणे आहे. हे काम ९३ मध्ये पूर्ण झाल्यानंतर ९४ मध्ये रोड क्रॉस करुन सिडकोच्या लाईनला ही लाईन जोडली गेली.तोपर्यंत कोणतेही चेंबर आपल्या साफसफाई कर्मचाऱ्यांकडून फोडले गेले नव्हते का हा दुसरा महत्वाचा मुद्दा आह.लाईन टाकण्यांचे काम चालू असतांना महानगरपालिकेने वेळेवर रींग व ढापे पुरवले होते का? रोड क्रॉस करण्यांपूर्वी या लाईनवर कन्व्हर्शनचे काम चालू झाले होते का पुर्वीचे मेनसोल उघडेच असल्यामुळे त्यात लोकांनी कचरा टाकला त्यामुळे लाईन चोकअप झाली पर्यायाने जेटींग मशिननेही काम होऊ शकले नाही.

मा.सभापती : कार्यकारी अभियंता यांच्या म्हणण्यानुसार १९९३ मध्ये ही लाईन टाकण्यांत आली.एखादे काम चालू असतांना ते बरोबर होत आहे अथवा नाही याची पहाणी करावयास पाहिजे.कंत्राटदाराचे देयक अदा करत असतांना त्यास दिलेले काम त्याने स्पंशिफिकेशनप्रमाणे केले आहे,याची प्रथम खात्री करावयास पाहिजे.जर कंत्राटदाराचे देयक अदा करतांना ती लाईन व्यवस्थित चालू आहे अथवा नाही,तीचा स्लोप बरोबर आहे अथवा नाही याची पाहणी केली गेली होती काय अथवा देयक पाहणी न करताच अदा करण्यांत आहे.संचिकेत या संदर्भाने काही नोंदी केल्या आहेत काय तर कंत्राटदाराचे देयक अदा करण्यांत आले.संचिकेत या संदर्भाने काही नोंदी केल्या आहेत काय जर कंत्राटदाराचे देयक अदा केले गेले असेत तर कनिष्ठ अभियंत्यास निकृष्ट काम झाले म्हणून नोटीस कशी देण्यांत येते.कनिष्ठ अभियंता या प्रकारास दोषी कसा असू शकेल.ही जबाबदारी कार्यकारी अभियंत्याची असावयास पाहिजे.

कार्यकारी अभियंता (पापू) : ही लाईन पूर्ण झाल्याबरोबर सुरु करण्यांत आली नव्हती.तथापी संबंधित अधिकाऱ्यांनी पाणी टाकून लाईनची टेस्टींग घेतली असल्याची शक्यता आहे.लाईनचे काम पूर्ण झाल्यानंतर तत्कालीन अधिकाऱ्यांनी त्या लाईनची टेस्टींग घेतली अथवा नाही हे मी नक्की सांगू शकत नाही.काम चालू असतांना प्रत्येक टप्प्यांवर टेस्टींग घेतली जात नाही.मात्र अंतिम देयक अदा करण्यांत आले याचा अर्थ ही लाईन ओ.के.होती नोटीस ही केवळ कनिष्ठ अभियंत्यासच नाही तर उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांनाही दिलेली आहे.

मा.सभापती : कनिष्ठ अभियंत्यानंतर उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी लाईन टेस्ट करावयास पाहिजे होती.एखादया कामाच्या दर्जाबाबत एकटया कनिष्ठ अभियंत्यासच जबाबदार धरता येणार नाही.एखादी लाईन टाकल्यान्नतर तिची टेस्टींग घेतली आहे,अशी संचिकेत यापुढे नोंद घेण्यांत यावी.

उप आयुक्त : एखादया कामाचे देयक अदा करतांना काम चालू असतांना त्याची टेस्टींग घेतली जाते.त्याशिवाय अंतिम देयक अदा करु नये,असा मानदंड आहे.मात्र या प्रकरणात काम झाल्यानंतर लाईनची टेस्टींग घेतली किंवा नाही हे मात्र माहित नाही.

श्री.प्रभाकर विधाते : एखादे काम चालू असतांना ते काम कशा प्रकारे होत आहे,याबाबत वेळोवेळी अहवाल द्यावयास पाहिजे.

मा.सभापती : संबंधित कार्यकारी अभियंत्याची ही जबाबदारी असते की,अंतिम देयक अदा करण्यांपूर्वी संबंधित कंत्राटदराने सर्व बाबींची पूर्तता केलेली आहे.व काम स्पेशी फिकेशन प्रमाणे झालेले आहे.कोणत्याही कामाचा खराबा झाला तर संबंधित विभागाचा विभागप्रमुख जबाबदार असावयास पाहिजे.अन्यथा सर्वसाधारण सभेत ठराव टाकावा लागेल की,एखादया कामाचा खराबा त्या त्या विभागाच्या विभाग प्रमुखांस जबाबदार धरण्यांत येईल.कारण झालेल्या कामाची त्याने पाहणी करावयासच पाहिजे.

आंबेडकरनगर भागातील ड्रेनेज लाईनचे काम ताबडतोब सुरु करण्यांत यावे.चौकशी होत राहील तोपर्यंत काम सुरु करण्यांत यावे.

दि.६-१-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८०/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.मिटमिटा येथे तळमजला व पहिला मजला बांधण्याचे कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/३४/९५/ दि. ४-११-९५ अन्वये फेर निविदा काढल्या असता,कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (२) निविदा विक्री झाल्या निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (२) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दिनांक १८-११-९५ ला उघडण्यांत आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

१) श्री.आर.एल.बारवाल १५.६% जास्त
२) श्री.शेख खमर ९.७७७% जास्त

तूलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.७७७% जास्त
दराची श्री.शेख खमर यांची निविदा आहे.सदरील दर जास्त वाटत असल्यामुळे मक्तेदारास कार्यालयीन पत्र देऊन दराचे वाटाघाटी बाबत मा.आयुक्त यांचे दालनात दिनांक ५-१-९६ ला बोलाविण्यात आले व चर्चेअंती सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.७७७% जास्त ऐवजी ७% जास्त दराने करण्यांस मा.आयुक्तांनी मंजुरी दिली,त्यास मक्तेदराने ही संमती दिली.

सबब सदरील कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% जास्त (दराचे वाटाघाटी नुसार) दराची श्री.शेख खमर यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.मिटमिटा येथे तळमजला व पहिला मजला बांधण्याचे कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% जास्त (दराचे वाटाघाटी नुसार) दराचे गुत्तेदार,श्री.शेख खमर यांचे निविदा पत्रकास तसेच सदर कासाठी येणाऱ्या ४.९५ लाखचे खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८१/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहेकी, मो.मिलींगनगर स्लम भागात मनपा शौचालयामागे दगडी गटार,अर्धगोलाकार गटार व खांडकी रस्ते करणे,दुरुस्ती करणे,कामाकरीता एकूण रक्कम रु. १,४९,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून मा.आयुकत (प्रशासक) साहेबांनी दिनांक १५-१०-९४ रोजी मंजुरी दिलेली आहे.त्या अनुषंगाने सदर कामाचे "जी-१" नमुन्यात निविदा सुचना क्र.मनपा/श अ/ ४६६/९४ दि. २५-१०-९४ अन्वये निविदा मागविण्यांत आली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन (२) कोऱ्या निविदा विकल्या गेल्या होत्या व स्विकारण्याच्या तारखेस एकूण एक (१) मोहरबंद निविदा प्राप्त झाली होती.

१) मे.नवनित कंन्स्ट्रक्शन २% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी

त्यानिविदा उपस्थित गुत्तेदरासमक्ष उघडण्यांत आली असून तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराची निविदा मे.नवनित कंन्स्ट्रक्शन यांची निविदा मे.नवनित कंन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजूर करुन सदरील गुत्तेदारास कर्यादेश क्र.मनपा/स्लम/१/४९३/९४/ दिनांक १६-१२-९४ देण्यांत आले असुन संबंधित गुत्तेदारांनी काम करण्यांस असमर्थ झाल्या कारणाने त्याची डिपॉझीट जप्त करण्यांत येवून निविदा रद्द करण्यां आली.

तसेच सदर काम भारत बांधकाम मजुरी सहकारी संस्था (श्री.गजहंस) यांचे कडून पुर्वीचे दराप्रमाणे म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराने करुन घेणे बद्दल विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.हमदउद्दीन ताबा : मजुर संस्थाना कामे देवू नयेत असे पुर्वीच ठरलेले आहे.

मा.सभापती : मजुर संस्थाना कामे देवू नयेत असे पुर्वीच ठरले असल्याने सदरचे काम मजुर संस्थकडून करवून न घेता मे.नवनित कन्स्ट्रक्शन यांच्या कडून करवून घेण्यांत यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.मिलिंदनगर स्लम भागात मनपा शौचालय मागे दगडी गटार,अर्धगोलाकार गटार व खांडकी रस्ते करणे दुरुस्ती करणे बाबतचे कामाकरीता प्राप्त झालेले एकमेव निविदा पत्रक गुत्तेदार,मे.नवनित कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराचे असून सदर काम मजुर संस्थाना कामे देवू नयेत असे पुवी्रच ठरलेले असल्याने भारत बांधकाम मजुर सहकारी संस्था यांचे कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराचे करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८२/४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,खोकडपुरा येथे कामगार कॉलनी या ठिकाणी १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे कामासाठी रुपये

१,१८,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून हा होणारा खर्च दुरुस्ती व देखभाल ९५-९६ शिर्षका अंतर्गत घेण्यांत आलेला आहे तरी उपरोक्त कामासाठीच्या रुपये १,१८,०००/- चे अंदाजपत्रकीय मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार खोकडपुरा येथे कामगार कॉलनी या ठिकाणी १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रुपये १,१८,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च दुरुस्ती व देखभाल ९५-९६ शिर्षका अंतर्गत असलेल्या तरतुदी मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८३/५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,चौसर नगर स्लम भागात १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबतचे कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रुपये १,५६,५९०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून हा होणारा खर्च दुरुस्ती व देखभाल ९५-९६ शिर्षकांतर्गत घेण्यात आलेला आहे.

तरी उपरोक्त कामासाठीच्या रुपये १,५६,५९०/- चे अंदाजात्रकास मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चौरस नगर स्लम भागात १५० मी.मी.व्यासाची एस.डब्ल्यू.जी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबतचे कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रुपये १,५६,५९०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च दुरुस्ती व देखभाल ९५-९६ शिर्षकातंर्गत असलेल्या तरतुदी मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८४/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,मोहल्ला शेरखॉंन कॉलनी व जुना बायजीपुरा भागात नविन खांडकी बसविणे व जुनी खांडकी दुरुस्त करुन काही भागात खडी रस्ते तयार करण्यांच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक रक्कम रुपये २,५३,०००/- चे तयार करण्यात आलेले आहे.सदर कामाचा खर्च देखभाल रस्ते दुरुस्ती सन १९९५-९६ या लेखा शिर्षामधुन करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र.मनपा/मुलेप/नि/२२/९५ दि.३१-८-९५ अन्वये निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण बारा (१२) निविदा पत्रके विकल्या गेल्या,आणि निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन (२) निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली.प्राप्त निविदा पत्रके दिनांक १३-९-९५ रोजी उपस्थित कंत्राटदारा समक्ष उघडण्यांत आली.त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) मे.राणा कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने . |
| २) श्री.सलीम पटेल | १०.००% जास्त दराने. |

वरील प्राप्त निविदा पैकी मे.राणा कन्स्ट्रक्शन यांच्या निविदा पत्रकाचे दर सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराने आहेत.तरी सदर कामाच्या रक्कम रु.२,५३,०००/- च्या

अंदाजपत्रकास तसेच सदर काम मे. राणा कन्स्ट्रक्शन यांचे कडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांस मान्यता मिळावी.

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मोहल्ला शेरखॉंन कॉलनी व जुना बायजीपुरा भागात नविन खांडकी बसविणे व जुनी खांडकी दुरुस्त करुन काही भागात खडी रस्ते तयार करण्याच्या कामाकरीता तयार करण्यांत आलेले रक्कम रु.२,५३,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे गुत्तेदार,मे.राणा कन्स्ट्रक्शन यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८५/७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,धूत मोटर्स ते युथ होस्टेल (अदालत रोड) लगत दगडी गटार बांधणेचे कामासाठीचे अंदाजपत्रक रक्कम रु. ५,००,०००/- यास विषय क्र.१५७/१४ दि.१८-१०-९५ नुसार मंजुरी मिळाली आहे.त्यानुसार निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/निविदा ४५/९५ दिनांक १३-१२-९५ नुसार बी-१ नमुन्यात निविदा पत्रके मागवली असता,एकूण दर भरलेल्या ३ निविदा प्राप्त झाल्या खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) बी बदर बिन सालम | २% | कमी |
| २) श्री.एस.एम.मंडोरे | ४% | जास्त |
| ३) श्री.आर.एल.बारवाल | ५% | जास्त |

वरील प्राप्त तीन निविदा पत्रका पैकी श्री.बदर बिन सालम यांची निविदा ही तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २% कमी दराची आहे.

तरी श्री.बदर बिन सालम यांचे नांवे सदरील कामास मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे धुत मोटर्स ते युथ होस्टेल (अदालत रोड) लगत दगडी गटार बांधणे बाबतचे कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराचे गुत्तेदार श्री.बदर बिन सालम यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८६/८ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,जहागिरदार कॉलनी येथे १५० व २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेचे कामासाठीच्या अंदाजपत्रक रक्कम रुपये ३,३४,७६०/- यास विषय क्र.४७/७ दिनांक २४-८-९५ नुसार मंजुरी मिळाली आहे.त्यानुसार निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/निविदा/४८/९५ दिनांक १३-१२-९५ नुसार बी-१ नमुन्यात निविदा पत्रके मागविली असता एकूण दर भरलेल्या ३ निविदा प्राप्त झाल्या,त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.शेख शरीफ | ०.२% | कमी |
| २) श्री.आर.एल.बारवाल | ३% | जास्त |
| ३) श्री.एस.एम.मंडोरे | ५% | जास्त |

वरील प्राप्त तीन निविदा पत्रका पैकी श्री.शेख शरीफ यांची निविदा ही तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.२% कमी अशी आहे.

तरी श्री.शेख शरीफ यांचे नांवे सदरील कामास मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जहागिरदार कॉलनी येथे १५० व २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेचे कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२% कमी दराचे गुत्तेदार,श्री.शेख शरीफ यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र. ३८७/९ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा.आयुक्त महानगरपालिका,औरंगाबाद यांच्या मंजुरी नुसार प्रस्ताव सादर केला आहे की,श्रीमती विद्याबाई राजपाल महानगरपालिका स्त्री स्विपर यांना क्रांतीनगर झोपडपट्टीतील सार्वजनिक संडासचे बाजुस असलेली १२x२० या आकाराची महानगरपालिकेची मोकळी जागा निव्वळ अकरा (११) महिन्यांच्या काळासाठी दरमहा रुपये १०५/- प्रमाणे स्थायी समिती ठराव क्र.५२५/२३ दि.१-३-९३ अन्वये प्रमुख अटी शर्तीनुसार भाडयाने देण्यांत आली होती.त्यानुसार जागेचा भाडेपट्टा काळ दि. ११-९-९४ रोजी संपला आहे.परत श्रीमती विद्याबाई राजपाल यांनी अर्ज देवून विनंती केली आहे की,त्यांना देण्यात आलेली जागा ३० वर्षाच्या लिजवर भाडयाने देण्यात यावी.श्रीमती विद्याबाई ॲड.प्रितमकुमार शेगांवकर व इतर ९ नागरिक रा.क्रांतीनगर यांनी आक्षेप घेतलेला आहे व जागा देण्यांचे त्वरीत रद्द करावे म्हणून विनंती केली आहे.तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार श्रीमती विद्याबाई राजपाल महारनगरपालिका स्त्री स्विपर यांना क्रंतीनगर झोपडपट्टीतील सार्वजनिक संडासचे बाजुस असलेली १२ फुट मोकळी जागा ३० वर्षाच्या लिजवर स्थायी समिती सभा ठराव क्र.५२५/२३ दिनांक १-३-९३ मधील अटी व शर्तीच्या अधिन राहून भाडयाने देण्यास सर्वानुमते मंजुरी देऊन सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८८/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिली की,लिटल फ्लॉवर स्कूल ते विद्यापीठ गेट पर्यंत रोडमध्ये दुभाजक तयार करुन लोखंडी जाही बसविणेच्या कामाकरीता सार्वजनिक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रुपये १५,०२,१००/- चे बनविण्यांत आले आहे.सदरील कामाचा खर्च शासकीय अनुदान सन १९९५-९६ साठी असणाऱ्या (१०.०० कोटी) या लेखा शिर्षकांतर्गत करण्यात येईल.

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लिटल फ्लॉवर स्कूल ते विद्यापीठ गेट पर्यंत रोडमध्ये दुभाजक तयार करुन लोखंडी जाळी बसविण्याचे कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रुपये १५,०२,१००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च शासकीय अनुदान सन १९९५-९६ साठी असणाऱ्या (१०.०० कोटी) या लेखा शिर्षकांतर्गत असलेल्या तरतुदी मधुन करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८९/११ :**

कार्यकारी अभियंता,(पाणी पुरवठा व जलनि:सारण) यांनी हिमायत बाग ते पानचक्की ५०० मी.मी.व्यासाची ६०० मी.मी.व ७०० मी.मी.व्यासाची मुख्य जलनि:सारण वाहिनी (सिव्हर-बी) टाकण्यांचे उर्वरित काम करण्यासाठी सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रु.२४,९६,०००=०० चे तयार करण्यांत आले आहे.सदरील कामाचे हयापुर्वी रक्कम रु.२०,००,०००/- मा.प्रशासक साहेबांनी दिनांक ३०-१२-९४ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली होती.परंतु सदरील कामाची निविदा वर्तमानपत्रात प्रसिध्दीसाठी दिली असता ६ (सहा) वेळेस फेर निविदा काढण्यांत आली,सदरील दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८० टक्के जास्तीचे होते.

तरी सदरील कामाचे रक्कम रु.२४,८६,०००/- चे सुधारीत अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकीच्या (इ.एन.ई.) सन १९९४-९५ च्या दरसुची नुसार तयार करण्यांत आले आहे.सदरील अंदाजपत्रक रक्कम रु. २४,८६,०००/- ला मा.आयुक्तांनी दि. ११-१-९६ मंजुरी दिलेली आहे.अंदाजपत्रकीय रक्कम रु.२०,००,०००/- ला मा.आयुक्तांनी दि.३०-१२-९४ ला मंजुरी दिलेली आहे. तरी वाढीव अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४,८६,०००/- ला मंजुरी देण्यांत यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार हिमायतबाग ते पानचक्की पर्यंत ५०० मी.मी.व्यासाची ६०० मी.मी.व्यासाची मुख्य जलि:सारण वाहिनी (सिव्हर-बी) टाकण्याचे उर्वरित काम करण्यासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु. ४,८६,०००/- चे वाढीव अंदाजपत्रकीय रक्कमेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९०/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.मसनतपुर येथील खडी व डांबर रस्त्याचे नुतनीकरण व रुंदीकरण करणे,काही खांडकी रस्त्यांचे खडी रस्त्यात रुपांतर करणे,इतर खांडकी रस्ते दुरुस्त करणे या कामाकरीता एकूण रक्कम रु. ४,००,०००/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग,औरंगाबाद यांची दरसुची १९९४-९५ प्रमाणे तयार करण्यांत आले असून मा.आयुक्त साहेबांनी दिनांक २५-१२-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सदरील कामाकरीता महानगरपालिकेचे सन १९९५-९६ अर्थसंकल्प झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत नविन खडी रस्ते या शिर्षा अंतर्गत ८०,००,०००/- तरतुद केली आहे.अंदाजपत्रक रु. ४,००,०००/- प्रशासकीय मान्यतेस्तव सादर. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.मसनतपुर येथील खडी व डांबर रस्त्यांचें नुतनीकरण व रुंदीकरण करणे,काही खांडकी रस्त्याचे खडी रस्त्यांत रुपांतर करणे इतर खांडकी रस्ते दुरुस्त करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु.४,००,०००/-चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम महानगरपालिकेचे सन १९९५-९६ अर्थसंकल्प झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत नविन खडी रस्ते या शिर्षा अंतर्गत असलेल्या ८०,००,०००/- रुपये या तरदुदी मधुन करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९१/१३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मा.संजयनगर,बायजीपुरा येथे दगडी गटार बांधणे बाबत कामा करीता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९२-९३ च्या दरसुची नुसार रु.४,२२,८४०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील

कामाचे खर्च खुल्या गटारी बांधणे रु.५०.०० लाख या शिर्षकाखाली करण्यांत येईल.सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.१५-१-९५ ला प्रशासकीय मान्यात दिली असून प्रस्तावित कामासाठी निविदा पत्रके कार्यालयीन नोटीस क्र.मनपा/लेखा/४६/९५ दि.३०-११-९५ अन्वये मागविण्यांत आले असता निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन निविदा प्राप्त झाले त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१) एलोरा कन्स्ट्रक्शन ०.७५ टक्के कमी
२) आर.एल.बारवाल ०.२ टक्के कमी

त्यानंतर दि.१०-१-९६ रोजी मा.आयुक्त यांच्या दालनात दराच्या वाटाघाटी बाबत चर्चा झाली असता एलोरा कन्स्ट्रक्शन एजंसीने अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.५० टक्के कमी दराचे काम करण्यांस संमती दर्शविली .

तरी सदर कामाकरीता सादर करण्यांत आलेले रक्कम रु.४,२२,८४०/- व सदरील एजन्सी एलोरा कन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.५० टक्के कमी दराची निविदाचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.संजयनगर,बायजीपुरा येथे दगडी गटार बांधणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु.४,२२,८४०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी प्राप्त झालेल्या निविदा पत्रकापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.५०% कमी दराने गुत्तेदान एलोरा कन्स्ट्रक्शन यांनी मा.आयुक्त यांचे दालनात दराच्या वाटाघाटी बाबत झालेल्या चर्चेअंती १.५०% कमी या दराने काम करण्यांस संमती दर्शविल्याने त्यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९२/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.मुकुंदवाडी येथे मनपा च्या उपलब्ध खुल्या जागेत प्राथमिक आरोग्य केंद्र बांधणेच्या कामासाठी रक्कम रु. ४,५०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आहे आहे.प्रस्तावित विषय मा.सर्वसाधारण सभा दि.२०-१२-९५ विषय क्र.६ अन्वये मा.सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेत होता.त्या अनुषंगाने सबब सदर कामाचे अंदाजपत्रक तयार रक्कम रु. ४,५०,०००/- चे तयार करण्यांत आले असून अंदाजपत्रकास वाढीव अर्थ तरतुद उपलब्ध करुन द्यावी या अटीवर मा.आयुक्त यांनी दि. ४-१-९६ रोजी मंजुरी दिली आहे.सदरचा खर्च विकास इमारती,शाळा व दवाखाने बांधणे या लेखा शिर्षामधून सुधारीत अंदाजपत्रकामध्ये वाढवून मिळणाऱ्या अर्थतरतुदी मधुन करण्यांत येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.मुकुंदवाडी येथे म.न.पा.च्या उपलब्ध खुल्या जागेत आरोग्य केंद्र बांधणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु.४,५०,०००/- चे अंदाजपत्रकास वाढीव अर्थतरतुद उपलब्ध करुन द्यावी या अटीवर तसेच सदरचा खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने बांधणे या लेखा शिर्षामधुन सुधारीत अंदाजपत्रकामध्ये वाढवून मिळणाऱ्या अर्थतरतुदी मधुन करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९३/१५ :**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मा.सभापती,स्थायी समिती यांनी गठीत केलेल्या समिती सदस्य यांनी प्रत्यक्ष साईटवर जावून ४६ आपदग्रस्त लोकांची स्थळ पाहणी करुन खालील प्रमाणे प्रत्येकी ५००/- रुपये आर्थिक मदत वसंतराव नाईक नगर,रेल्वेस्टेशन येथील ८ आपदग्रस्तांना देण्यांची शिफारस केलेली आहे.

१) श्रीमती मिराबाई दगडू बावस्कर रु.५००/-
२) --//-- सुमनबाई विश्वनाथ साळवे रु.५००/-
३) श्री.शेख बाबा गुलाम हुसैन रु. ५००/-
४) श्रीमती मैनाबाई बन्सी चव्हाण रु. ५००/-
५) --//-- मंडाबाई विठोबा बदामे रु. ५००/-
६) --//-- शमाबाई फकीरा राठोड रु. ५००/-
७) --//--कमलबाई लक्ष्मण चव्हाण रु. ५००/-
८) --//-- जमसतबी शेख युसूफ रु. ५००/-

वरीलप्रमाणे प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.हमीदउद्दीन ताबा : पावसातील पडझडीने घरांच्या झालेल्या हानी बाबत माझ्या वॉर्डातील काही लोकांनी आर्थिक मदत मिळण्यासाठी महापालिकेकडे अर्ज दिलेला होता त्यावर काहीच कार्यवाही झालेली नाही.

मा.सभापती : प्रत्येक वार्डात भेट देवून गरजु ५-५ लोकांना आर्थिक मदत देण्यांबाबत यापुर्वीच आदेशीत करण्यांत आले होते.प्रस्तावा बरोबरच ज्या भागातील घरांची अतिवृष्टीने हानी झालेली आहे.अशा वार्डातून प्रत्येकी ५-५ गरजूंना आर्थिक मदत देण्याबाबत मंजुरी दिली जाते.याबाबत विभागीय अधिकारी व नगररचनाकार यांनी पहाणी करुन त्वरीत प्रकरणे निकामी काढावीत.सवबंधित वॉर्डाचे नगरोवकही याची कल्पना द्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मा.सभापती ,स्थायी समिती यांनी गठीत केलेल्या समितीचे सदस्यांनी प्रत्यक्ष साईटवर जाऊन ४६ आपदग्रस्त लोकांची स्थळ पहाणी करुन खालील प्रत्येकी ५००/- रुपये आर्थिक मदत वसंतराव नाईक नगर रेल्वेस्टेशन येथील ८ आपदग्रस्तांना देण्याची शिफारस केलेली आहे.

१) श्रीमती मिराबाई दगडू बावस्कर रु.५००/-
२) --//-- सुमनबाई विश्वनाथ साळवे रु.५००/-
३) श्री.शेख बाबा गुलाम हुसैन रु. ५००/-
४) श्रीमती मैनाबाई बन्सी चव्हाण रु. ५००/-
५) --//-- मंडाबाई विठोबा बदामे रु. ५००/-
६) --//-- शमाबाई फकीरा राठोड रु. ५००/-
७) --//--कमलबाई लक्ष्मण चव्हाण रु. ५००/-
८) --//-- जमसतबी शेख युसूफ रु. ५००/-

तसेच प्रस्तावा बरोबरच ज्या भागातील घरांची अतिवृष्टीने हानी झालेली आहे अशा वार्डातून प्रत्येकी ५-५ गरजुंना आर्थिक मदत देण्याबाबत विभागीय अधिकारी व नगररचनाकार यांनी पाहणी करुन त्वरीत प्रकरणे निकामी काढावीत.संबंधित वॉर्डाचे नगर सेवकासही याची कल्पना द्यावी.सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९४/१६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालयामध्ये सिंहाच्या पिंजऱ्या समोर खंदक(पोट) बसविणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९३-९४ चे जिल्हा दरसुची नुसार रक्कम रु. २,९९,१५०/- चे तयार करण्यात आले असून त्यांस मा.आयुक्तांनी प्रत्यक्ष वाढीव तरतुद उपलब्धतेअंती काम हाती घेणे या अटीवर दि.३-१-९६ ला मंजुरी दिलेली आहे.सबब सदर कामाचे रक्कम रु.२,९९,१५०/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

सदर कामाचा खर्च प्राणी संग्रहालय विकसित करणे या लेखा शिर्षा मधुन सुधारीत अंदाजपत्रकामध्ये वाढवून दिलेल्या अर्थ तरतुदी मधुन करण्यांत येईल.तसेच केंद्रीय प्राणी संग्रहालय ॲथॉरिटी यांचे मार्फत एकूण अंदाजपत्रकाच्या ५०% रक्कम मिळणेचा प्रस्ताव सादर करण्यात येईल.

**संवाद :**

पशुधन विकास अधिकारी : वन्य प्राण्यांच्या पिंजऱ्या समोर खंदक बांधावे असे झु ॲथॉरिटीचे आदेश आहेत.यावरील ५०% रक्कम महानगरपालिकेस परत मिळते.

मा.सभापती : प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.तथापि शासनाकडून पैसा मिळविणे बाबतही कार्यवाही करण्यांत यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालयामध्ये सिंहाच्या पिंजऱ्या समोर खंदक (पोट) बनविणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु.२,९९,१५०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामाचा खर्च प्राणी संग्रहालय विकसित करणे या लेखा शिर्षामधुन सुधारीत अंदाजपत्रकामध्ये वाढवून दिलेल्या अर्थ तरतुदी मधुन करणेस व केंद्रीय प्राणी संग्रहालय ॲथॉरिटीचे प्रस्ताव सादर करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९५/१७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,मा.विभागीय आयुक्त यांच्या सुचनेप्रमाणे प्रजासत्ताक दिना निमित्त प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षी सुध्दा २६ जानेवारी निमित्त औरंगाबाद शहरातील शासकीय कार्यालयाच्या क्रिकेट संघाच्या दरम्यान मर्यादित षटकांचे क्रिकेट सामने आयोजित करण्यांत येणार आहेत.

या स्पर्धेमध्ये शहरातील १३ शासकीय महाविद्यालयाचे क्रिकेट संघ सहभागी होणार आहे.या स्पर्धेचे आयोजन महापालिका कार्यालयाकडून केले जाते.या वर्षी या स्पर्धा दि. २२-१-९६ ते २६-१-९६ या कालावधीत खेळविण्यात येणार आहे.

स्पर्धेच्या आयोजनासाठी चषक,प्रथम व द्वितिय संघास रोख बक्षिसे व इतर वैयक्तिक रोख बक्षिसे तसेच इतर आवश्यक खर्च मिळुन अंदाजे रु. २०,२५५=०० खर्च अपेक्षित आहे.

करीता उपरोक्त २०,२५५=०० (रु. विस हजार दोनशे पंचावन्न) च्या खर्चाच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

मा.उप आयुक्त-२ : मा.विभागीय आयुक्तांनी बैठकीत आदेशित केल्यानुसार स्वातंत्र्य दिन प्रजासत्ताक दिनानिमित्त अधिकारी/पदाधिकारी यांच्यात विविध खेळ ठेवावेत व याचे आयोजन महाननगरपालिकेने करावे असे ठरले होते.

मा.सभापती : या स्पर्धा विभागीय आयुक्तांनीच आयोजित करावयास पाहिजेत.ठराव स्थगित करण्यांत येतो.

**ठराव :**

सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा,असे सर्वानुमते ठरले.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९६/१८:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.शताब्दीनगर स्लम येथे दगडी पायऱ्या बांधणे व खांडकी बसविणे बाबत कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसुची नुसार रुपये २,८५,१७५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील कामाचा खर्च ५% कमकुवत घटक कल्याणकारी योजना ३५.०० लाख या शिर्षकातून करण्यांत येईल.सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.२९-१२-९५ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदर कामाकरीता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रु.२,८५,१७५/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.शताब्दीनगर स्लम येथे दगडी पायऱ्या बांधणे व खांडकी बसविणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु.२,८५,१७५/-चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च ५% कमकुवत घटक कल्याणकारी योजना ३५.०० लाख या शिर्षामधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९७/१९:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,पुंडलीक नगर,गजानन नगर,हनुमान नगर,मातोश्री नगर,हुसेन कॉलनी,न्याय नगर व दुर्गामाता कॉलनी येथे पाणी पुरवठा व्यवस्था करणे अत्यंत आवश्यक आहे.त्याबाबत सर्वसाधारण सभेमध्ये ठरावक्र.१०७/२८ नुसार मान्यता मिळाली आहे.

सदर कामावर लागणारे अत्यावश्यक साहित्य हे ए.सी.पाईप व सी.आय.डी.जॉईन्टस खरेदीसाठी परिसर अभियांत्रिकी यांचे ९४-९५ चे दरसुचीनुसार रुपये ७१,७०,३९८=०० एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.परंतु प्रादेशिक व्यवस्थापक एम.एस.आय.डी.सी.औरंगाबाद यांचे दि.४-१-९६ चे पत्रा नुसार व शासन मान्य दरसुची दि. १२ डिसेंबर,१९९५ नुसार एम.एस.एस.आय.डी. यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.७७% कमी आहे.करीता उपरोक्त साहित्य एम.एस.एस.आय.डी.सी.कडून रु.७१,७०,३९८=०० एवढयाचे वरील साहित्य खरेदी करणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार पुंडलीकनगर,गजानन नगर,हनुमान नगर,मातोश्री नगर,हुसेन कॉलनी,न्याय नगर व दुर्गामाता कॉलनी येथे पाणी पुरवठा करणेचे कामासाठी लागणारे अत्यावश्यक साहित्य हे ए.सी.पाईप व सी.आय.डी.जॉईन्टस खरेदी करणेसाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु.७१,७०,३९८=००चे अंदाजपत्रकास तसेच सदर साहित्य एम.एस.एस.आय.डी.सी.कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.७७% कमी दराने खरेदी करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**-: ऐनवेळचे विषय :-**

**विषय क्र. ३९८/२०:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,प्रारुप विकास योजना (सुधारीत) औरंगाबाद करीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २८(२) अन्वये नियोजन समितीमध्ये हयापुर्वी स्थायी समिती मधून खालील ३ सदस्यांची नियुक्ती झालेली आहे.

१)) श्री.प्रदीपकुमार जैस्वाल सभापती स्थायी समिती
२) श्री.कंवरसिंग बैनाडे सदस्य,स्थायी समिती
३) श्री.अब्दुल रशिदखान (मामू) सदस्य,स्थायी समिती

आता नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्र.टी.पी.एस.-३०९५/९५४/सीआर-६७/९५/युडी-९ दिनांक ८-१-१९९६ अन्वये खालील ४ अशासकीय सदस्यांची नियुक्ती उक्त नियोजन समितमध्ये करण्यांत आलेली आहे.

१) श्री.जी.डी.करकरे निवृत्त उप संचालक,नगररचना
२) श्री.व्ही.एस.तावडे वास्तुशास्त्र विभाग प्रमुख जे.एन.ई.सी.सिडको, नविन औरंगाबाद
३) श्री.राजीव जी.कुलकर्णी अध्यक्ष,प्रॉक्टींगसिंग आर्कीटेक्टस असोशिएशन ऑफ मराठवाडा,औरंगाबाद
४) श्री.सुभाष माणिकचंद झांबड अध्यक्ष,औरंगाबाद बिल्डर्स असोशिएशन,तापडीया टेरेस,औरंगाबाद.

उक्त शासन निर्णय मध्ये नमुद केले आहे की प्रवास भत्ता / महागाई भत्ता या व्यतिरिक्त सदर नियोजन समितीच्या अशासकीय सदस्यांकरीता प्रत्येक दिवशी प्रत्येक बैठकीकरीता २०० रुपये मानधन देण्यांसाठी आवश्यक ती तरतुद व व्यवस्था औरंगाबाद महनगरपालिकेने करावी उक्त शासन निर्णयाप्रमाणे मान्यतेस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**संवाद :**

मा.सभापती : मा.सभासदांनी मागणी केल्यानुसार नियोजन समितीवर कार्यरत महानगरपालिकेच्या सदस्यांनाही मानधन देण्यांत यावे असा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे विचारार्थ ठेवावा.२२-१-९६ पासून सदर समितीचक कामकाज सुरु होईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रारुप विकास योजना (सुधारीत) औरंगाबाद करीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २८(२) अन्वये नियोजन समितीसाठी स्थायी समितीतून तीन (३) व अशासकीय सदस्यांची (चार) ४ असे एकूण ७(सात) सदस्यांची नियुक्ती करण्यांची मंजुरी देण्यांत येते.सदस्यांची नावे खालीलप्रमाणे

१)) श्री.प्रदीपकुमार जैस्वाल सभापती स्थायी समिती
२) श्री.कंवरसिंग बैनाडे सदस्य,स्थायी समिती
३) श्री.अब्दुल रशिदखान (मामू) सदस्य,स्थायी समिती
४) श्री.जी.डी.करकरे निवृत्त उप संचालक,नगररचना
५) श्री.व्ही.एस.तावडे वास्तुशास्त्र विभाग प्रमुख जे.एन.ई.सी.सिडको, नविन औरंगाबाद
६) श्री.राजीव जी.कुलकर्णी अध्यक्ष,प्रॉक्टींगसिंग आर्कीटेक्टस असोशिएशन ऑफ मराठवाडा,औरंगाबाद
७) श्री.सुभाष माणिकचंद झांबड अध्यक्ष,औरंगाबाद बिल्डर्स असोशिएशन,तापडीया

तसेच उक्त निर्णयानुसार अशासकीय सदस्यांकरीता प्रत्येक दिवशी प्रत्येक बैठकीकरीता रुपये २००/- मानधन औरंगाबाद महानगरपालिकेने अदाई करण्यांची मंजुरी दिली जाते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९९/२१:**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की,महानगरपालिका वाचनालये व डॉ.बाबासाहेब संशोधन केंद्र यासाठी खरेदी करावयाच्या पुस्तकासाठी सुट देणाऱ्या दर पत्रकांना स्थायी समितीने दि.२२-११-९५ रोजी मंजुरीनुसार पुस्तक खरेदी करण्यांचा प्रस्ताव सादर करण्यांत येत आह.

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र रु.२ लाख
(संदर्भ ग्रंथ)
२) उर्दु वाचनालय (कैसर कॉलनी व लोटा कारंजा) रु.१,४०,०००/-
(संदर्भ ग्रंथ व इतर)
३) खडकेश्वर वाचनालय व इतर वाचनालये रु. १,६६,३५५/-

उपरोक्त प्रस्तावित पुस्तक खरेदी संबंधितानी मुदतीत व आवश्यक पुस्तके न पुरविल्यास क्रमवार असणाऱ्या दरानुसार खरेदी करण्यात येतील.दरपत्रकातील सुट देणाऱ्या दराच्या आधिन राहून पुस्तके खरेदी करण्यांचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका वाचनालय व डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र यासाठी खालीलप्रमाणे पुस्तके खरेदी करावयाचे संशोधन केंद्रास व वाचनालयास मंजुरी दिली जाते.

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र रु.२ लाख
(संदर्भ ग्रंथ)
२) उर्दु वाचनालय (कैसर कॉलनी व लोटा कारंजा) रु.१,४०,०००/-
(संदर्भ ग्रंथ व इतर)
३) खडकेश्वर वाचनालय व इतर वाचनालये रु. १,६६,३५५/-

वरीलप्रमाणे पुस्तके पुरवठा धारकांनी वेळेवर व ती पुस्तके न पुरविल्यास क्रमवार असणाऱ्या दरानुसार व सुट देणाऱ्या दरपत्रकांस आधिन राहून पुसतके खरेदी करएयाची मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४००/२२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.रमानगर येथे मनपातर्फे वाचनालय बांधणेच्या कामासाठी सार्वजनकि बांधकाम खात्याचे सन ९३-९४ चक जिल्हा दरसुची नुसार रक्कम रुपये २,८५,६००/- चक अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यांस मा.आयुक्तांनी दि. ९-१-९६ अन्वये मंजूरी दिलेली आहे.सबब सदर कामाचे रक्कम रु. २,८५,६००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर सदरचा खर्च सन ९५-९६ या आर्थिक वर्षात ५% कमकुवत घटकांसाठी कल्याणकारी योजना या लेखा शिर्षामधून करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.रमानगर येथे मनपातर्फै वाचनालय बांधकामाच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९३-९४ चे दरसुची नुसार रक्कम रु.

२,८५,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देऊन सदरचा खर्च सन ९५-९६ या आर्थि वर्षात ५% कमकुवत घटकांसाठी कल्याणकारी योजना या लेखा शिर्षा मधुन करण्यांत येईल.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०१/२३:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,प्रशासकीय इमारत टप्पा-२ बांधकामाचे मुळ अंदाजपत्रक व यानंतरचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रुपये ८७,३०,०००/- कामास स्थायी समिती ठराव क्र.२०३/२७ नुसार प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे.सदर प्रशासकीय इमारतीचे बांधकामाचे दरम्यान मा.आयुक्त व मा.सभापती यांनी वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शन व सुचनानुसार कराव्या लागणाऱ्या वाढीव व अतिरिक्त कामाकरीता सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रुपये १,०१,६५,६६९/- तयार करण्यात आले.सदरील वाढीव कामासह सुधारीत व अतिरिक्त बाबींचे अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

सुधारीत अंदाजपत्रक व वाढीव खर्चाचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | | |
|---|---|---|
| १ | जीप्सम सीलींग | १,१२,३२२=०० |
| २ | कोटा स्टोन | ८७,००२=०० |
| ३ | अल्युमिनियम खिडकी | २,०८,९००=०० |
| ४ | लाईट पॉकेट फ्रेमसह | १,०१,२५०=०० |
| ५ | आतील लस्टर पेंट | ३९,४१२=०० |
| ६ | हाफटर्न कॉक | १४,८००=०० |
| ७ | प्लॉस्टर ऑफ पॅरीस पट्टी | ८,३००=०० |
| ८ | लोखंडी फुटमॅट | १,०००=०० |
| ९ | उद्घाटन समारंभाची प्लेट | ४,५००=०० |
| १० | ढोलपुर टचवुड पॉलीश | ४३,३८७=०० |
| ११ | विभागाचे ग्रॅनाईट/अक्रोलीक | २९,०७०=०० |
| १२ | ब्रास लेटरींग | ६०,०००=०० |
| १३ | एंबलम/मानोग्राम/बोधचिन्ह | ८०,०००=०० |
| १४ | नामफलक सागवान पट्टी | २४,७५०=०० |
| १५ | वेलवेट बॉल पेपरे | २०,०५०=०० |
| १६ | देयक क्र.१ अखेरचा खर्च | ९३,३०,९२६=०० |
| | एकूण | १,०१,६५,६६९=०० |

वरीलप्रमाणे वाढीव काम व अतिरिक्त बाबी यांचे सह सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रुपये १,०९,६५,६६९=०० कामास प्रशासकीय मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रशासकीय इमारत टप्पा क्र.२ बांधकामास मा.आयुक्त व मा.सभापती स्थायी समिती यांनी वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शन व सुचनानुसार कराव्या लागणाऱ्या वाढीव व अतिरिक्त कामाकरीता प्रस्तावात अनुक्रमे ०१ ते १६ जे विविध काम दर्शविले आहे.त्यात जो वाढीव खर्च आला,१,०१,६५,६६९/- -८७,३०,०००/-=१४,३५,६६९ रुपयास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०२/२४:**

क्रीडा अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की,महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेल्या शाळांसाठी व स.नगरसेवकांच्या त्यांच्या वॉर्डात किंवा इतरत्र मागणी केल्यानुसार शालेय क्रीडा साहित्य खरेदी करावयाचे आहे.त्याकरीता एकुण रु.१,००,०००/- (एक लाख रुपये) खर्च अपेक्षीत आहे.सदरचा खर्च १९९५-९६ च्या क्रीडा साहित्य खरेदी वार्षीक अंदाजपत्रकातून तसेच स.नगरसेवकांच्या मागणी प्रमाणे त्यांच्या उपलब्ध स्वेच्छा निधीतून करण्यांत येईल.

सदरील आवश्यक शालेय क्रीडा साहित्य खरेदी करण्यांसाठी व स.नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून रुपये १,००,०००/- खर्चास १९९५-९६ च्या वर्षात मंजुरी मिळाव्या तसेच सदर साहित्य खरेदीसाठी निविदा मागविल्या असता दि.२६-१२-९५ ला एकूण (२) निविदा प्राप्त झाल्या.

१) इंटरनॅशनल स्पोर्टस आणि साईटीफीक हाऊस,औरंगाबाद.
२) चॅपींयन स्पोर्टस ब्युटीक,क्रांतीचौक,औरंगाबाद.

वरील दर मा.आयुक्तांनी मंजुर केलेले आहे.करीता प्रस्ताविक खर्चास रु. १,००,०००,/- च्या रक्कमेस व प्राप्त ठेकेदारास मंजुरी मिळणेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव दुरुस्तीकरीता तुर्त स्थगीत ठेवण्यांत येतो.

**विषय क्र. ४०३/२५:**

अतिरिक्त शहर अभियंता मनपा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,आदेशानुसार मनपाचे गरवारे क्रीडा संकुल येथे डॉर्मीटर्स (निवास व्यवस्था) इमारतीचे कामासाठी वास्तुतज्ञ श्री.राजीव कुलकर्णी यांचेकडून अंदाजपत्रक घेण्यांत आले.सदरील कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.२३,४८,५००/- रुपये असून अंदाजपत्रक प्रशासकीय तसेच तांत्रिक मान्यतेस्तव सादर.मान्यता झाल्यास सदरचा खर्च शासनाचे १० कोटी अनुदानातून क्रिडा संकुल साठी असलेल्या तरतुदीमधून करण्यांत येईल.करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपाचे गरवारे क्रीडा संकुल येथे डार्मिटर्स (निवास व्यवस्था) इमारती कामासाठी वास्तुतज्ञ श्री.राजीव कुलकर्णी यांचेकडून अंदाजपत्रकीय रक्कम रु.२३,४८,५००/- ला सर्वानुमते मंजुरी देऊन सदरचा खर्च १० कोटी अनुदानातून संकुलासाठी असलेल्या तरतुदींमधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०४/२६:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,महानगरपालिकेचे गरवारे क्रीडा संकुल येथे नवीन पॅव्हेलियन इमारतीचे अंदाजपत्रक वास्तु श्री.राजीव कुलकर्णी यांच्या कडून घेण्यात आले असून सदरील कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. १८,३९,०००/- असून सदरील कामाचे अंदाजपत्रक प्रशासकीय तसेच तांत्रिक मान्यतेस्तव सदर मान्यता झाल्यास सदरचा खर्च शासनाचे १०.०० कोटी अनुदानात क्रीडा संकुलासाठी ठेवलेल्या तरतुदीमधुन करण्यांत येईल.तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपाचे गरवारे क्रीडा संकुल येथे नवीन पव्हेलीयन इमारतीचे बांधकामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु.१८,३९,०००/-चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च शासनाचे १०.०० कोटी अनुदानात क्रीडा संकुलासाठी ठेवलेल्या

तरतुदीमधुन व सदर काम वास्तुशास्त्रज्ञ श्री.राजीव कुलकर्णी यांचेऐवजी दुसरा वास्तुशास्त्रज्ञ नेमण्यांत येऊन पूर्ण करुन घेण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०५/२७:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,उस्मानपुरा चौक व टी.व्ही.सेंटर चौक या दोन्ही चौकात स्वंयचलित वाहतूक संकेतीक बसविण्यांच्या कामासाठी अनुक्रमे रक्कम रु. ४,७१,४७५/- व रक्कम रु.३,३४,९४०/- असे एकूण रक्कम रु.८,०६,४१५/-चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील कामे करण्यांसाठी विशेष पोलीस महानिरिक्षक (वाहतूक) महाराष्ट्र राज्य यांचे पत्रक जा.क्र./विपोम/वा/बजेट/१६३९/९५ दि. १४-१२-९५ अन्वये सन १९९५-९६ या वर्षाकरीता रक्कम रु. ५.०० लाख इतके अनुदान मंजुर करण्यांत आहे आहे.परंतू या मंजुर अनुदानामधून या दोन्ही कामासाठी चौकात वाहतुक संकेतांक बसविणे शक्य होणार नाही.कारण या दोन्ही कामासाठी रक्कम रु.३,०६,४१५/- हे शासन पुढील वर्षी मंजुर करील या आशेवर तुर्त म.न.पा. फंडातून खर्च करुन ही कामे करण्यांत येतील व शासनाकडे सदर रक्कम मिळावी म्हणून पाठपुरावा करण्यांत येईल.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. ८,००६,४१५/- चे अंदाजपत्रक मंजूरीबाबतचा तसेच शासनाकडून मिळालेल्या रक्कम रु. ५.०० लाख अनुदाना व्यतिरिक्त खर्च होणाऱ्या रक्कम रु. ३,०६,४१५/- ही रक्कम तुर्त मनपा फंडातून पुढील वर्षी शासन इतके अनुदान मंजुर करील या आशेवर करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उस्मानपुरा चौक व टी.व्ही.सेंटर चौक या दोन्ही चौकात वाहतू संकेतांक बसविण्याच्या कामासाठी अनुक्रमे रक्कम रु. ४,७१,४७५/- व रक्कम रु.३,३४,९४०/- असे एकूण रक्कम रु.८,०६,४१५/ अंदाजपत्रकास व उर्वरित रक्कम रु.३,०६,४१५/- पुढील वर्षी अनुदान मंजूर करील या आशेवर प्रस्तावित काम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०६/२८:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,कांचनवाडी स्लम (अ) मध्ये रस्त्यांची दुरुस्ती करणे व खडी रस्ते तयार करणे या कामाकरीता रक्कम रु.१,५६,९००/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसुची १९९४-९५ प्रमाणे तयार करण्यात आली असून मा.आयुक्त यांनी दिनांक ६-१-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच सदरील कामाकरीता माहनगरपालिकेचे सन १९९५-९६ अर्थसंकल्प झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत नवीन खडी रस्ते या शिर्षा अंतर्गत ४५ लाखांची तरतुद आहे.

प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कांचनवाडी येथे स्लम (अ) येथे खडी रस्त्याची दुरुस्ती व रस्ता तयार करण्यासाठी सा.बां.विभाग औरंगाबाद यांचे दरसुची १९९४-९५ नुसार अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,५६,९००/- रुपयास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०७/२९:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.मोचीवाडा पदमपुरा स्लम भागात डांबरी रस्ते तयार करणे करीता रक्कम रु.१,५१,५००/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसुची १९९४-९५ प्रमाणे तयार करण्यांत आले असून मा.आयुक्त यांनी दि.१६-१-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच सदरील कामाकरीता महानगरपालिकेचे सन १९९५-९६ अर्थसंकल्प झोपडपट्टी सुधारण कार्यक्रमांतर्गत डांबरी रस्ते या शिर्षाअंतर्गत ११० लाखाची तरतुद केली आहे.

प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.मोचीवाडा पदमपुरा (स्मल) भागात डांबरी रस्ते तयार करणेसाठी १९९४-९५ सालाचे दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,२१,५००/- स सर्वानुमते मंजुरी दिली जाते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०८/३०:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,प्रियदर्शनी इंदिरानगर स्लम भागात डांबरी रस्ते तयार करणे या कामासाठी रक्कम रु.१०,१३,१००/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसुची १९९४-९५ प्रमाणे तयार करण्यांत आले असून मा.आयुक्त यांनी दि.१६-१-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच सदरील कामाकरीता महानगरपालिकेचे सन १९९५-९६ अर्थसंकल्प झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमातंर्गत डांबरी रस्ते या शिर्षाअंतर्गत ११० लाखांची तरतुद केली आहे.

प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इंदिरानगर (स्लम) भागात डांबरी रस्ते तयार करणेच्या कामासाठी सा.बां.विभाग औरंगाबाद ९४-९५ चे दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय रक्कम रु. १०,१३,१००/- स सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०९/३१:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.मसनतपुर (स्लम) येथे पूर्वेकडील नाल्याकरीता रिटेनिंग वॉल बांधणे या कामाकरीता रक्कम रु.१७,०८,७५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून मा.आयुक्तांनी दि.८-१-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच सदरील कामाकरीता महाराष्ट्र शासनाकडून विशेष अनुदान म्हणून १० कोटी आर्थिक अनुदान या रक्कमेतुन करण्याचा प्रस्तावित आहे.

करीता प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.मसनतपुर (स्लम) पुर्वेकडील नाल्याकरीता रिटेनिंग वाल बांधण्याच्या कामाकरीता अंदाजपत्रकीय रक्कम रु.१७,०८,७५०/- चे रुपयास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.सदरील काम शासनाचे विशेष अनुदान १० कोटी रुपयातून करण्यांत यावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१०/३२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.रमानगर येथे मनपा तर्फे वाचनालय बांधण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९३-९४ चे जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु.२,८५,६००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.सदरचा खर्च सन ९५-९६ या आर्थिक वर्षात ५% कमकुवत घटकांसाठी कल्याणकारी योजना या लेखा शिर्षामधून करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.रमानगर येथे महानगरपालिकेचे वतीने वाचनालयाची इमारत बांधण्याच्या कामासाठी सा.बां.विभागाचे दरसुची ९३-९४ नुसार अंदाजपत्रकीय रक्कम रु.२,८५,६००/- स सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.तसेच ९५-९६ या आर्थिक वर्षात ५% कमकुवत घटकांसाठी कल्याणकारी योजना या लेखा शिर्षामधून करण्यांत यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४११/३३:**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व जलनिःसारण) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.मकाईगेट पासून ते सिध्दार्थ गार्डनपर्यंत नविन ७०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.मुख्य जलनिःसारण वाहिनी (सिल्व्हर बी-३) टाकणेच्या कामाबाबतच्या परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन १९९२-९३ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय रक्कम रु.३५,४८,२००/- चे तयार करण्यात आले होते.सदरील कामास मा.प्रशासकांनी दि. ३-१२-९५ ला मंजुरी दिलेली होती.

परंतु सदरील कामासाठी निविदा प्रत्येक वेळेस ३० टक्के,३५ टक्के व ४० टक्के अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्तीच्या दराने प्राप्त होत आहे.सदरील अंदाजपत्रकाचे दर हे ९२-९३ चे असलेले व सध्या सन ९४-९५ चे डी.एस.आर.उपलब्ध असल्याने सदरील कामाचे नविन दरसुचीनुसार सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु.४१,४०,०००/- चे तयार करण्यात आले आहे.सदरील काम ९५-९६ च्या भांडवली कामे या शिर्षकाखाली प्रस्तावित आहे.

करीता वाढीव अंदाजपत्रकीय रक्कम रु.५,९१,८००/- (४१,४०००-३५,४८,२००/-=५,९१,८००/-) ला मा.आयुक्तांनी दि. ११-१-९६ ला मंजुरी दिलेली आहे.तरी प्रस्ताव स्थायी समितीस मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.मकाईगेट ते सिध्दार्थ गार्डन पर्यंत नवीन ७०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.मुख्य जलनिःसारण वाहिनी टाकण्याच्या कामासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन ९२-९३ चे अंदाजपत्रक असल्याने उपलब्ध डी.एस.आर.एन.९४-९५चे सुधारीत व वाढीव अंदाजपत्रकीय रक्कम रु.५,५०,९००/- रुपयास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१२/३४:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र,आमखास येथे विविध साहित्य पुरविणे व बांधकाम करणे इ.कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.१,९७,५००/- चे तयार करण्यांत आले,त्यात खालील बाबींचा समावेश करण्यांत आला आहे.१) हॉलमध्ये स्टेज लावणे.२) पुर्वेकडील माब्रल बदलणे.३) हॉलमध्ये मोनोग्राम लावणे.४)

मोठया हौदामध्ये उंच कारंजा बसविणे.५) पार्कींग करीता मुरुम टाकणे.६) नाली खोदणे व पीचींग करणे.७) लोखंडी ब्रिज बसविणे.८) उद्यानाकरीता बांधकाम करणे.९) उद्यानात व हौदाकरीता व इतर पाईप लाईन.१०) स्टेअरकेस दुरुस्ती,ग्रील इ.११) रंगरंगोटी.१२) चौकीदार निवास स्थानास रस्ता करणेस्तव भरती व खोदाई.१३) मिना करीता रेलींग बसविणे.१४) कारंजाचे उर्वरीत काम (प्रवेशद्वारा समोरील) इ.कामाचा समावेश करण्यांत आला आहे.

सदर खर्च डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र शासकीय अनुदान या तरतुदीमधून करण्यांत येणार आहे.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र आमखास येथे विविध साहित्य पुरविणे व बांधकाम करणे इ.कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,९७,५००/- प्रस्तावात विविध कामे,अनुक्रमांक १ ते १४ करुन घेण्यास मंजुरी रक्कम रु.१,९७,५००/-ला तसेच सदरील खर्च डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र शासकीय अनुदान या तरतुदीमधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१३/३५:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.संजयनगर बायजीपुरा स्लम येथे नाल्यालगत संरक्षित भिंत बांधणे बाबत कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसुचीनुसार रुपये १२,६०,३१९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील काम मा.मुख्यमंत्री यांनी घोषीत केलेली आर्थिक तरतूद रुपये १०.०० कोटी शिर्षकातून करण्यांत येईल.सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि. ११-१-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदर कामाकरीता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रु. १२,६०,३१९/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.संजयनगर बायजीपुरा (स्लम) येथे नाल्यालगत संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु.१२,६०,३१९/- चे ९४-९५ च्या दरसुचीनुसार काम करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.सदरील काम शासनाचे विशेष अनुदान रुपये १०.०० कोटीमधून करण्यात यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१४/३६:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.घाटी जयभिमनगर येथे संरक्षित भिंत बांधणेबाबत कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसुचीनुसार रुपये २,०७,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील काम मा.मुख्यमंत्री निधी रु.१०.०० कोटी या शिर्षातून करण्यांत येईल.सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि. २-१-९६ रोजी शासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रु.२,०७,०००/- यास मान्यतेचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.घाटी जयभिमनगर (स्लम) येथे संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी सा.बां.खाते यांचे दर सुचीनुसार सन ९४-९५ अंदाजपत्रकीय रक्कम

रु.२,०७,०००/-चे रुपयास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.सदरील काम शासनाचे विशेष अनुदान रु.१०.०० कोटीमधुन करण्यांत यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

"राष्ट्रगीत" संपल्यानंतर ६.४५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत /- | स्वाक्षरीत /- |
| नगर सचिव, | सभापती, |
| महानगरपालिका,औरंगाबाद. | स्थायी समिती, |
| | महानगरपालिका,औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ५-२-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.शनिवार दि.५-२-९६ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.सभापती,स्थायी समिती, श्री.प्रदीप कुमार जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभागृहात स्थायी समिती सभेस सुरुवात झाली.सभेस निम्ननिर्दिष्ट स.सभासद उपस्थित होते.तसेच महानगरपालिकेचे अधिकारीही उपस्थित होते.**

१) श्री.अब्दुल रशिदखान (मामू)
२) श्री.सुभाष कच्छवाह.
३) डॉ.भागवत कराड.
४) श्री.गौतम खरात.
५) सौ.रजनी जोशी.
६) श्री.प्रकाश निकाळजे.
७) श्री.कंवरसिंग बैनाडे.
८) कु.माया लाडवाणी.
९) श्री.विजयकुमार मेहेर.
१०) श्री.प्रभाकर विधाते.
११) सौ.पद्मा शिंदे.
१२) श्री.महादेव सुर्यवंशी.
१३) श्री.सुदाम सोनवणे.

**संवाद :**

अब्दुल रशिदखान (मामू) : महानगरपालिकेच्या शाळांना शासनाकडून इमारत भाडे मिळते.आतापावेतो शासनाकडून किती वर्षाची रक्कम इमारत भाडयापोटी मिळणे बाकी आहे.तसेच इमारतींची संख्या वाढल्यानंतर या वाढीव इमारतींच्या भाडयाचा प्रस्ताव शासनाकडे सादर झाला आहे काय याचीही माहिती देण्यांत यावी.

मा.सभापती : उप आयुक्त-२ आणि शिक्षणाधिकारी यांनी आगामी स्थायी समिती बैठकीत माहिती द्यावी.

श्री.प्रभाकर विधाते : महानगरपालिकेस स.सभागृह नेता,विरोधी पक्ष नेता यांना वारंवार पत्र व्यवहार करावा लागतो.तथापि यासाठी चांगले टंकलेखन यंत्र नाही.त्यामुळे कामात नेहमीच अडचण येते.सभागृहासाठी टंकलेखन यंत्रे खरेदी करण्यांची मंजुरी पुर्वीच मिळालेली आहे.तेव्हा सभागृह नेता विरोधी पक्ष नेता यांच्यासाठी टंकलेखन यंत्र पुरविण्यांबाबत संबंधितांना आदेश देण्यांत यावेत.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : शहरातील एखादया मालमत्तेचे विभाजन (सब-डिव्हीजन) करावयाचे असेल तर ते करण्यापुर्वीच त्या मालमत्तेवरील कराचा भरणा करुन घ्यावयास पाहिजे.अशा मालमत्तांचे सब-डीव्हीजन करतांना संबंधितांकडून विकास निधी भरण्यांस मागणी केली जाते.जर मालमत्ता जुनीच असेल तर तिच्यावर विकास निधी का आकारला जातो.जुन्या मालमत्तांचे सब-डिव्हीजन करतांना विकास निधी घेण्यांत येवू नये.

सहा.संचालक नगर रचना : एखादया मालमत्तेचे सब-डिव्हीजन करतांना संबंधितांचे विकास निधी भरावयास पाहिजे.शासनाचे या संदर्भाने असलेले नियम पुढील बैठकीत सादर करण्यांत येतील.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : महानगरपालिकेचा विकास आराखडा नेमका बनवला.महानगरपालिकेने हा विकास आराखडा बनवलेला नाही.हा प्लॅन उप संचालक नगर रचना यांनी बनवलेला नाही.हा प्लॅन उप संचालक नगर रचना यांनी बनवलेला आहे.त्यातील त्रुटीबाबत मात्र महानगरपालिकेस दोषी धरले जाते.

श्री.सुभाष कच्छवाह : आयुक्तांचे स्वीय सहाय्यक,खाजा मोईनोद्दीन यांना कार्यालयातर्फे जी वेतनश्रेणी देण्यांत आलेली आहे.ती कोणत्या नियमांच्या आधारे देण्यांत आली.तसेच एम.ए.साजेद यांच्या चौकशी प्रकरणांत पुढे काय झाले याचीही माहिती देण्यांत यावी.

मा.सभापती : आगामी समिती बैठकीत सहा.आयुक्तांनी माहिती सादर करावी.

श्री.प्रकाश निकाळजे : जिल्हा परिषदेच्या शाळा महानगरपालिकेकडे हस्तांतरित होत असतांना केवळ इमारतींच हस्तांतरीत झाल्या की,शाळे भोवतालची मोकळी जागाही महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आली याची वारंवार माहिती मागूनही ती दिली जात नाही.या मालमत्तांची महानगरपालिकेकडे नोंदही नाही.काही शाळांच्या मोकळया जागांवर त्या भागातील रहिवाशांनी अतिक्रमण केल्याचे दिसून येते.मुलांना शाळेत खेळण्यांसाठी ग्राऊडचीही आवश्यकता असते.याबाबत माहिती देण्यांत यावी.व शाळा भोवतालची जागा मनपाची असेल तर अशी अतिक्रमणे काढण्यांत यावीत व तेथे संरक्षित भिंती बांधण्यात याव्यात.

मा.सभापती : उप आयुक्त-२ यांनी पुढील स्थायी समिती बैठकीत माहिती सादर करावी.

श्री.प्रभाकर विधाते : हनुमान टेकडी भागात पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.या भागात बांधण्यात येत असलेल्या पाण्याच्या टाकीचे काम अद्याप अपूर्ण आहे.उन्हाळयात उत्पन्न होणारा पाण्याचा प्रश्न पाहता या भागात असलेली बारव स्वच्छ करण्यांत यावी.जेणेकरुन जनतेस पाणी मिळू शकेल.

श्री.प्रकाश निकाळजे : उन्हाळयात होणारी पाणी टंचाई लक्षात घेता शहरातील विहिरींचा गाळ काढण्यांत यावा अशा सुचना यापुर्वीच दिलेल्या आहेत.आतापर्यत किती काम झाले याची माहिती देण्यात यावी.

मा.सभापती : कार्यकारी अभियंता यांनी माहिती दिली आहे की,आतापर्यंत शहरातील ७ विहीरीतील गाळ काढण्यांत आलेला आहे.उन्हाळयात पाणी टंचाई होण्याची शक्यता लक्षात घेता शहरातील खाजगी मालकीच्या विहिरींसह सर्वच विहिरी साफ करण्यांबाबत आदेश देण्यांत आलेले आहेत.

श्री.कंवरसिंग बैनाडे : मनपाच्या शाळा लग्न कार्यालयासाठी दिल्या जातात.मात्र अशा कार्यानंतर शाळांची साफसफाई केल्याचे दिसून येत नाही.शाळा अशा कार्याना देण्यांसाठी काही शुल्क आकारले जाते काय? संबंधितांना शाळा सफाईबाबत आदेश देणे योग्य राहील.

मा.सभापती : मध्यंतरीच्या काळात शाळा अशा कार्यासाठी देण्यांत येऊ नयेत असे ठरले होते मात्र काही स.नगरसेवकांनीच लग्न कार्यासारख्या कार्यक्रमासाठी शाळा उपलब्ध करुन द्याव्यात अशी मागणी केली होती.कार्य संपल्यानंतर शाळेची साफसफाई करुन घ्यावयास पाहिजे.

श्री.विजयकुमार मेहेर : ज्यांना शाळा हवी असेल त्यांच्याकडून ठरावीक रक्कम डिपॉझीट स्वरुपात ठेवू घेण्यांत यावी व जर संबंधिताने साफसफाई केली नाही तर डिपॉझीट मधून पैसे काढून घेण्यांत यावेत.

श्री.सुदाम सोनवणे : सिडको-हडको भागातील शाळांना मोठे पटांगण आहे.या पटांगणावर अतिक्रमण होण्याची शक्यता आहे.तेव्हा वेळीच शाळांना संरक्षित भिंती बांधण्यात याव्यात.

डॉ.विजयकुमार मेहेर : या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.यावर कार्यवाही व्हावी.

शिक्षणाधिकारी : शाळा सुधार फंडातून अनेक शाळांमध्ये भिंतीवर चित्रे,आर्ट,चार्ट लावण्यांत आलेले आहेत.तसेच आवारात झाडे लावण्यांत आलेली आहेत,मात्र लग्नकार्यासाठी शाळा घेणारे या वास्तुंची योग्य ती काळजी घेत नाहीत.शाळेसाठी झाडांची वगैरे नासधूस करतात.तेव्हा शाळेच्या इमारती ऐवजी ग्राऊंड लग्न कार्यासाठी उपलब्ध करून देण्यांत यावे.

डॉ.विजयकुमार मेहेर : ग्राऊंड बरोबरच वधू वरांसाठी म्हणून दोन खोल्याही देण्यांत याव्यात.

सौ.रजनी जोशी : शाळेची नासधूस होणार नाही याची काळजी घेण्यांत यावी.

मा.सभापती : शक्य असेल तेथे ग्राऊंडसह दोन खोल्याही देण्यांत याव्यात व साफसफाईचे विशेष लक्ष देण्यांत यावे.

श्री.महादेव सुर्यवंशी : मनपा शाळातून जे क्रीडा शिक्षक नेमण्यांत आलेले आहेत ते कोणत्याही प्रकारचे काम करत नाही.मस्टरवर दररोज स्वाक्षऱ्याही करत नाहीत.शाळेत दिसण्याऐवजी नेहमी ते कार्यालयातच दिसतात.

शिक्षणाधिकारी : महानगरपालिकाच्या अस्थापनेवर एकूण ११ क्रीडा शिक्षक आहेत.त्यांना दोन-दोन शाळा विभागुन देण्यांत आलेल्या आहेत.क्रीडा शिक्षकांवर नियंत्रण ठेवण्यांबाबत क्रीडा अधिकाऱ्यांना सांगण्यात आलेले आहे.

श्री.प्रकाश निकाळजे : क्रीडा शिक्षकांच्या मानाने शाळा जास्त आहेत.त्यांना दोन-दोन शाळा दिल्याने ते कोणत्याही शाळेत वेळेवर जात नाहीत.त्यांना नेमून देण्यांत आलेल्या शाळांतील अंतरही दुर दुरचे आहे.

डॉ.विजयकुमार मेहेर : क्रीडा शिक्षक कमी असले तरी ज्या शिक्षकांना पी.टी.चे ज्ञान आहे.त्यांनाही या कामी देण्यांत यावे.आवश्यकता असल्यास त्यांना प्रशिक्षणासाठी पाठविण्यांत यावे.यामुळे सर्वच शाळातील विद्यार्थ्याला फायदा होईल.

मा.सभापती : उप आयुक्त-२ यांनी स्वतः याबाबत चौकशी करावी व दोषी कर्मचाऱ्यांविरुध्द कार्यवाही करावी.

श्री.प्रभाकर विधाते : माझ्या वॉर्डात नियमीतपणे साफसफाई होत नाही,त्यामुळे रोगराई वाढण्यांची शक्यता आहे.वॉर्डाच्या आकाराच्या मानाने स्वच्छता कामगारांची संख्या अत्यंत कमी आहे.

श्री.प्रकाश निकाळजे : माझ्याही वॉर्डात बरोबर साफसफाई होत नाही.कामाच्या मानाने कर्मचारी अत्यंत कमी आहेत.पूर्ण वॉर्डाच्या साफसफाईसाठी सहा कर्मचारी आहेत.त्यातील काही कर्मचारी सुट्टीवर असतात.तेव्हा दैनंदिन साफसफाई वेळेवर व्हावी यासाठी मजुर वाढवुन देण्यांत यावेत.

श्री.महादेव सुर्यवंशी : वॉर्ड क्र.५ चे अ,ब,क असे भाग करण्यांत आलेले आहेत,ब भागात १७ मजुर आहेत.४ मजूर दैनिक वेतनावरील आहेत.दोन मजूर नेहमीच गैरहजर असतात.जेष्ठता यादीप्रमाणे मजूर दैनिक वेतनावर घ्यावेत असे आदेश

असले तरी या यादीतील मजूर लवकर उपलब्ध होत नाहीत.आंबेडकर नगरांत दोन मजूर असल्याने तेथील साफसफाई व्यवस्थित होत नाहीत.आंबेडकर नगरांत दोन मजूर असल्याने तेथील साफसफाई व्यवस्थित होत नाहीत तेव्हा मजुर वाढवून देण्यांत यावेत.

डॉ.विजयकुमार मेहेर : मनपातर्फे अशातच खो-खो,कब्बडडीच्या स्पर्धा घेण्यांत आल्या होत्या,या स्पर्धासाठी आलेल्या एकूण खर्चाचा हेडवाइ्रज तपशील सभागृहास देण्यांत यावा.

मा.सभापती : साफसफाईबाबत सहा आयुक्त-२ यांनी विशेष लक्ष द्यावे.जे कामगार सतत गैरहजर रहात असतील त्यांना नोटस देवून कामावरुन कमी करण्यांत यावे.कमी केलेल्या मजुरांच्या जागी त्वरीत दुसरे मजूर देण्यांत यावेत.उप आयुक्त-२ यांनीही याबाबत स्वतः लक्ष वेतनावरील मजूर लावण्यांत यावेत.क्रीडा स्पर्धासाठी येणाऱ्या खर्चास शिक्षणाधिकारी,क्रीडा अधिकारी यांनी सभागृहापुढे ठेवावा.

डॉ.भागवत कराड : पथदिवे बसवण्यांबाबत सातत्याने मागणी केली जात असली तरी साहित्य खरेदीमुळे पथदिवे वेळेवर लावले जात नाहीत.याबाबत संबंधितांनी खुलासा करावा.

उप अभियंता (विद्युत) : फिक्चर टेंडर ओपन झालेले आहे.एखादया महिन्यात साहित्य उपलब्ध होईल.साहित्य उपलब्ध होताच काम हाती घेतले जाईल.

मा.सभापती : साहित्याची मागणी व पुरवठा लक्षांत घेता उप अभियंता,(विद्युत) यांनी तात्काळ उपाय योजना करावी अशा बाबींवर वेळीच कार्यवाही केल्यास तक्रारही राहणार नाहीत.

श्री.गौतम खरात : महानगरपालिकेकडे बऱ्याच दिवसांपासून सिमेंट उपलब्ध नाही.याचा प्रत्यक्ष परिणाम कामावर होतो व कामात दिरंगाई होते.

मा.सभापती : टेंडर पास केलेल्या कंपनीने सिमेंट पुरवठयासाठी अग्रीम स्वरुपात द्यावी अशी अट टाकल्याने त्या कंपनीने महानगरपालिकेकडे भरलेले डिपॉझिट जप्त करण्यांत आलेले आहे.अग्रीम स्वरुपात रक्कम दिली तरी वेळेवर पुरवठा होईलच याची शाश्वती देता येत नाही.या संदर्भाने दुसऱ्यांदा टेंडर कॉल करण्यात आलेले आहे.

शहर अभियंता : सिमेंट पुरवठया संदर्भाने तीन टेंडर प्राप्त झालेले आहेत.पैकी दोन पुरवठादारांनी सोबत ईएमडी भरलेली नाही.सर्वांना वाटाघाटीसाठी मा.आयुक्तांकडे बोलावण्यांत आलेले आहे.

मा.सभापती : वाटाघाटी व चर्चेसाठी संचिका प्रदिर्घ काळ पडून असतात असे लक्षांत आलेले आहे.यामुळे दैनंदिन कामे पार पाडण्यांत उशिर होतो व पर्यायाने महानगरपालिकेचे नुकसान होते.पुढील सर्व स्थायी समिती बैठकांना मा.आयुक्तांनी स्वतःच उपस्थित रहावे.

श्री.प्रभाकर विधाते : जकात विभागात काम केलेल्या कम्रचाऱ्यांना दुसऱ्या व चौथ्या शनिवारचा कामाचा मोबदला देण्यांत यावा.

**विषय क्र. ४१५/१:**

दिनांक १९-१-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : शहरातील जे मालमत्ता धारक नळांना मोटारी लावत असतील त्यांच्या विरुध्द कार्यवाही करण्यांत यावी.असा निर्णय गत स्थायी समितीत झ

ाला होता.यावर काय कार्यवाही झाली याची माहिती सभागृहात देण्यांत यावी.

उप आयुक्त : काही मोटारी जप्त करण्यांत आलेल्या आहेत.दंडात्मक कार्यवाही करुन त्या संबंधितांना परत देण्यांत आलेल्या आहेत.

मा.सभापती : केवळ दंडात्मक कार्यवाही न करता अशा मालमत्ता धारकांविरुध्द पोलीस केसेस करण्यांत याव्यात.

डॉ.विजयकुमार मेहेर : शहरातील वैध व अवैध नळ कनेक्शन्स बाबत माहिती देण्यांत यावी.प्रॉपर्टीजच्या मानाने नळ कनेक्शनची संख्या आजही कमीच वाटते.

कार्यकारी अभियंता : अवैध नळ कनेक्शन्स शोधण्याबाबतचा सर्वे हाती घेण्यात आला तेव्हा ५८३१३ नळ कनेक्शन्स रेकॉर्डवर होते.ही मोहीम चालू केल्यानंतर आज ६५६८७कनेक्शन्स रेकॉर्डवर आले.काही ठिकाणी सरकारी नळ कनेक्शन्स आहेत.अद्यापही अवैध नळ शोध मोहीम चालूच आहे.

डॉ.भागवत कराड : कट केलेले सरकारी नळ चालू करण्याबाबत गत स्थायी समिती बेठकीत आदेश देण्यांत आलेले होते.तथापि अद्यापही माझ्या वार्डातील सरकारी नळ सुरु करण्यांत आलेले नाहीत.

मा.सभापती : कट केलेले सरकारी नळ चालू करण्याबाबत गत स्थायी समिती बैठकीत आदेश देण्यात आलेले होते.आदेशाची अंमलबजावणी करण्यांत यावी.

डॉ.विजयकुमार मेहेर : सरकारी नळांना तोटया बसविण्यात याव्यात असे आदेश देण्यांत आल्यानंतर आता पावेतो किती सरकारी नळांना तोटया बसविल्या याची माहिती देण्यांत यावी.

श्री.महादेव सुर्यवंशी : वोखार्ड ते नारेगांव या भागात सी.आय.पाणी पुवरठा लाईन टाकण्याचे आदेश देण्यांत यावेत.कारण ए.सी.लाईन नेहमीच फुटते.नारेगांव भागात पाणी पुरवठा संदर्भाने चालू असलेले कामाबाबत उप अभियंत्याचे अभिनंदन करावयास पाहिजे.

मा.सभापती : वोखार्ड ते नारेगांव भागात सी.आय.पाणी पुरवठा लाईन टाकण्या संदर्भाने इस्टीमेंट तयार करण्यांत यावे

**ठराव :**

दिनांक १९-१-९६च्या स्थायी समिती बैठकीच्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ४१६/३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहेकी,मो.सादतनगर व राहुलनगर स्लम भागात नाला ट्रेनिंग काम करणे करीता रक्कम रु.२४,९४०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून मा.आयुकत यांनी दिनांक ८-१-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच सदरील कामकरीता महाराष्ट्र शासनाकडून विशेष अनुदान म्हणून १० कोटी आर्थिक अनुदान या रक्कमेतून करण्याचा प्रस्तावित आहे.

करीता प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.सादतनगर,राहुलनगर स्लम भागात नाला ट्रेनिंग कामाकरीता अंदाजपत्रकीय रक्कम रु.२४,९४,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम महाराष्ट्र शासनाकडून विशेष अनुदान रु. १०.०० कोटी रक्कमेतून करणेस्तव सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१७/३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,चिकलठाणा येथील जुने भाजी मार्केटचे शेड तोडून त्या जागेच्या तळ मजल्यावर आर.सी.सी.च्या दुकाना व पहिल्या मजल्यावर पोलिस चौकी बांधणेच्या कामासाठी श्री.भगवान देविदास घडामोडे स.नगरसेवक यांचे मागणी नुसार रक्कम रु. ५.०० लाखाचे (रु.पाच लाखाचे) अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून प्रत्यक्ष अर्थतरतूद उपलब्धतेअंती काम हाती घ्यावे या अटीवरुन मा.आयुक्तांनी दि.३-१-९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे.सबब सदर कामासाठी रक्कम रुपये ५,००,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.सदरचा खर्च व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखा शिर्षामधून प्रत्यक्ष अर्थ तरतुद उपलब्धतेअंती करण्यांत येईल.आदेशार्थ सादर.

**संवाद :**

डॉ.विजयकुमार मेहेर : वास्तविक पाहता मार्केट रेट जी एजन्सी जागा घेऊ इच्छिते त्यांनाच जागा द्यावयास पाहिजे.

मा.सभापती : या भागात पोलिस चौकीची आवश्यकता असल्याने स.नगरसेवक श्री.घडामोडे यांनी पोलीस चौकीस जागा देण्याबाबत पत्र दिले होते.त्यामुळे प्रस्तावात पोलीस चौकीचा उल्लेख आलेला आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा येथील जुने भाजी मार्केटचे शेड तोडून त्याजागेवर तळ मजल्यावर आर.सी.सी.च्या दुकाने व पहिल्या मजल्यावर पोलीस चौकी बांधणेच्या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु.५.०० लाख तसेच प्रत्यक्ष अर्थ तरतुद उपलब्धतेअंती तसेच सदरील कामाचा खर्च व्यापारी संकुलन व इतर इमारती या लेखा शिर्षकामधून प्रत्यक्ष अर्थ तरतुद उपलब्ध अंती सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१८/४:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,शहानुरवाडी येथील स्मशान भूमीमध्ये रेस्टींग शेड बांधणे,संरक्षित भिंतीची उंची वाढविणे व इतर दुरुस्ती करणेबाबत कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९४-९५ च्या दरसुची अन्वये रक्कम रु.१,८३,८५५/- चे तयार करण्यात आले.

सदर खर्च स्मशानभूमी या तरतूदीमधून करण्यांत येणार आहे.करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.शहानुरवाडी येथील स्मशान भूमीमध्ये रेस्टींग शेड बांधणे तसेच सरंक्षित भिंतीची उंची वाढविणे व इतर दुरुस्ती करणे बाबतच्या कामास अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १,८३,८५५/- तसेच सदरील काम सा.बां.खात्याचे सन ९४-९५ च्या दरसुची नुसार तसेच सदरील खर्च स्मशान भूमी या तरतूदीतुन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१९/५:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,फ्रेंडस कॉलनी,कोकणवाडी येथील मनपाच्या खुल्या जागेवर कंपाऊंड वॉल बांधण्याच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९४-९५ च्या दरसुची अन्वये रुपये २,०२,०००/- चे अंदाजपत्रक तयार

करण्यांत आले.सदरचा खर्च विकास योजना अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या तरतूदीमधून करण्यांत येणार आहे.करीता अंदाजपत्रक रक्कम रु.२,०२,०००/- च्या मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे फ्रेंडस कॉलनी,कोकणवाडी येथील मनपाच्या खुल्या जागेवर कंपाऊंड वॉल बांधण्याच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९४-९५ च्या दरसुची अन्वये रक्कम रु.२,०२,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च विकास योजना अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या तरतूदीमधून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२०/६:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,उस्मानपुरा,गजानन नगर येथील मनपाच्या खुल्या जागेवर कुंपण भिंती कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. १,०४,८५०/- चे तयार करण्यात आले आहे.सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९४-९५ च्या दरसूची अन्वये सदर खर्च विकास योजना अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या तरतुदीमधून करण्यात येणार आहे.

करीता अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,०४,८५०/- मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.उस्मानपुरा,गजानननगर येथील मनपाच्या खुल्या जागेवर कुंपण भिंतीचे बांधकाम करणेस्तव अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,०४,८५०/- तसेच सा.बां.खात्याच्या सन ९४-९५ च्या दर सुचीनुसार सदर खर्च विकास योजना अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या तरतुदीतुन करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२१/७:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,औरंगपुरा रिप्स हॉटेल आणि कुंभारवाडा भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु. ८,६५,५००/- चे तयार करण्यांत आले आहे.सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते १९९६-९७ या लेखा शिष्र्काअतंर्गत करण्यांत येईल. प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.औरंगपुरा रिप्स हॉटेल आणि कुंभारवाडा भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन ९४-९५ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रकीय रक्कम रु.८,६५,५००/- तसेच वरील खर्च भांडवली रस्ते सन ९६-९७ च्या लेखा शिर्षकाच्या अंतर्गत करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२२/८:**

अग्निशमन विभागातील दोन फायर टेंडर व एक जीप करीता नविन टायर बसविणे आवश्यक आहे.फायर टेंडरचे टायर खराब झालेले आहे.तर जीप करीता रिट्रेनिंग केलेले टायर बसविण्यांत आलेले आहे.फायर कॉलवर जातांना टायर पंक्चर होतात करीता मुख्य

अग्निशमन अधिकारी यांनी नविन टायरची मागणी केलेली आहे तसेच कचरा वाहतुकीचे दोन टिप्पर,एक टँकरचे टायर अत्यंत खराब झाल्यामुळे नविन टायर बसविणे आवश्यक आहे.

वरील वाहनासाठी आवश्यक नविन टायर खरेदीसाठी खालीलप्रमाणे खर्च येतो.

| अ.क्र. | टायर साईज | संख्या | अंदाजे खर्च |
|---|---|---|---|
| १ | ७.८x१५/८ पी.आर.टायर / टयुब | ५ नग | १७,५००=०० |
| २ | ७.५०x१६/१६पी.आर टायर /टयुब फ्लॅप | ८ नग | ४४,०००=०० |
| ३ | ९.००x२०/९६ पी.आर.(फंट) टायर टयुब/फ्लॅप | ४ नग | ३८,०००=०० |
| ४ | ९.००x२०/१६ पी.आर.(रिअर) टायर/टयुब/फ्लॅप | १४ नग | १,४७,०००=०० |

वरीलप्रमाणे एकूण (३१) नविन टायर/टयुब/फ्लॅप खरेदी करीता येणाऱ्या रु. २,४६,५००=०० च्या अंदाजपत्रकीय खर्चास मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अग्निशमन विभागातील दोन फायर टेंडर,एक जीप तसेच कचरा वाहतुकीचे दोन टिप्पर,एक टँकरचे टायर टयुब फ्लॅप खराब झाल्यामुळे नविन टायर,टयुब फ्लॅप एकूण (३१) नग खरेदी करणेस्तव अंदाजपत्रकीय रक्कम रु. २,४६,५००/- खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२३/९:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,शहरात विविध ठिकाणी रोवलेल्या पोलवर विद्युत व्यवस्थेसाठी ब्रॅकेट व कलॅम्प्स बसवावे लागतील,त्यासाठी ते खरेदी करावयाचे अंदाजपत्रक रुपये २,९२,५००/- चे सा.बां.दरसुची ९५-९६ चे दरानुसार तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च विद्युत साहित्य खरेदीचे तरतुदीतून करण्यांस प्रस्ताव मंजुरी तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा शहरात विविध ठिकाणी रोवलेल्या पोलवर विद्युत व्यवस्थेसाठी ब्रॅकेट व क्लेम्प्स बसविण्याचे कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु. २,१२,५००/- तसेच सा.बां.खात्याचे दरसुची ९५-९६ च्या तरतुदीतून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

१२.३० वाजता मा.सभापती यांनी अर्ध्या तासासाठी सभा तहकुब केल्याची घोषणा केली.

१.० वाजता सभेस पर सुरुवात झाली.

**-: ऐनवेळचे विषय :-**

**विषय क्र. ४२४/१०:**

सहाय्यक आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहेकी,श्रीमती मंगला कुर्तडीकर हया दि.२३ डिसेंबर १९८७ पासुन ठराविक वेतनावर वैद्यकीय अधिकारी या पदावर कार्यरत आहे.त्या पुर्ण वेळ स्त्री वैद्यकीय अधिकारी म्हणून काम करीत आहेत.सन १९८७ मध्ये श्रीमती मंगला कुर्तडीकर हयांची नेमणूक निवड समितीने निवड करुन केलेली आहे.त्यांना

पूर्ण वेळ स्त्री वैद्यकीय अधिकारी म्हणून नेमण्यासाठी वयाची अट शिथील करणे जरुर आहे.करीता वयाची अट शिथिल करणेस्तव व त्यांना नियमित वेतनश्रेणी रु.२०००-६०-२३०० ईबी-७५-३२००-१००-३५ दि. २३-१२-८७ पासुन देणेबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

डॉ.विजयकुमार मेहेर : नियुक्तीचे आदेश देतांना त्या पदास किती वेतनश्रेणी देणार आदी बाबींचा उल्लेख केलेला असेलच.ठराव मांडत असतांना ठरावात सर्वच बाबींचा स्पष्ट उल्लेख करावयास हवा.

श्री.गौतम खरात : वयाची अट शिथिल करता येत नाही.ठरावात सर्वच बाबींचा उल्लेख करुन ठराव आगामी सभेत ठेवण्यांत यावा.इतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीतही हाच नियम लागू होणार का?

सहा.आयुक्त-१ : श्रीमती मंगला कुर्तडीकर हया २३-१२-८७ पासून या मनपात ठराविक वेतनावर काम करत आहेत.त्यांची निवडही निवड समितीतर्फे करण्यांत आलेली आहे.त्यांना मनपाच्या अस्थापनेवर पुर्णवेळ स्त्री वैद्यकीय अधिकारी म्हणून नेमण्यांसाठी व त्यांचे वय नियत वयोमानापेक्षा जास्त असल्याने वयाची अट शिथिल करण्यांसाठी प्रस्ताव शासनांकडे पाठवावयाचा आहे.त्यासाठी हा प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे.

मा.सभापती : प्रस्ताव मांडत असतांना संबंधित अधिकाऱ्यांनी सर्व बाबींचा उल्लेख स्पष्टपणे प्रस्तावात करावयास हवा.स.सभासदांच्या भावना लक्षात घेता प्रस्ताव पुढील बैठकीत मांडण्यात यावा.याच बरोबर ऐनवेळचे सर्वच प्रस्तांवावर पुढील स्थायी समिती सभेत विचार केला जाईल.

**ठराव :**

सौ.मंगला कुर्तडीकर यांची पुर्ण वेळ स्त्री वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यांसाठी वयाची अट शिथिल करण्यांबाबत प्रस्ताव आगामी स्थायी समिती सभेत मांडण्यात यावा.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत /-
नगर सचिव,
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत /-
सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १३-२-१९९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. दि.१३-२-१९९६ रोजी दुपारी ३.०० वाजता मा.सभापती,स्थायी समिती, श्री.प्रदीप कुमार जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभागृहात स्थायी समिती सभेस सुरुवात झाली.सभेस निम्ननिर्दिष्ट स.सभासद उपस्थित होते.तसेच महानगरपालिकेचे अधिकारीही उपस्थित होते.**

१) श्री.अब्दुल रशिदखान (मामू)
२) श्री. डॉ.भागवत कराड.
३) श्री.गौतम खरात.
४) सौ.रजनी जोशी.
५) श्री.प्रकाश निकाळजे.
६) श्री.कंवरसिंग बैनाडे.
७) कु.माया लाडवाणी.
८) श्री.विजयकुमार मेहेर.
९) श्री.महादेव सुर्यवंशी.
१०) सौ.पद्मा शिंदे.
११) श्री.सुदाम सोनवणे.
१२) श्री. हमीदउद्दीन ताबा

**संवाद :**

डॉ.भागवत कराड : शहरातील पथदिवे रिपेअर करण्यांबाबत साहित्य खरेदी करण्यांत यावे.पथदिवे चालू करण्यात यावेत अशा स्वरुप आदेश मागील स्थायी समिती बैठकीतच देण्यांत आले होते.विशेषत: माझ्या वार्डातील पथदिवे आजही बंद आहेत.या संदर्भाने विद्युत विभागाने चौकशी केली असता साहित्य नसल्याचे सांगितले जाते.याबाबत उपाययोजना करणे आवश्यक आहे.

उप अभियंता (विद्युत) : साहित्य खरेदीसाठी ठराव मंजुर झालेला आहे.एजन्सी फिक्स होता साहित्य खरेदी करण्यांत येईल व कामास सुरुवात करण्यांत येईल.

श्री.सुदाम सोनवणे : माझ्या प्रभागातील वसाहतींमध्ये विद्युत दिवे बसविण्यासाठी खांब उभारण्यांत आलेले आहेत.मात्र त्यावर तारा टाकण्यांत आलेल्या नाहीत.त्यामुळे विद्युत दिवे बसवता येत नाहीत.

मा.सभापती : महानगरपालिकेतर्फे शहरातील विविध वसाहतींमध्ये विद्युत दिवे बसवण्यासाठी विद्युत मंडळाने अशा प्रकारे कोठे कोठे खांब बसविण्यांत येणार आहेत अशी विचारणा करुन त्याचा आराखडा तयार करण्याबाबत व त्यांस मंडळाची परवानगी घेण्याबाबत सुचविल्याने कामात खंड पडलेला आहे.या कार्यास विद्युत मंडळाची परवानगी देण्यात येत आहे.लौकर शहरातील हे काम पूर्ण करण्यात येईल.

श्री.गौतम खरात : गत आर्थिक वर्षात महानगरपालिका हद्दीतील झोपडपट्टयांच्या विकासासाठी किती आर्थिक तरतुद करण्यांत झाला व अर्थ संकल्पातील तरतुदीप्रमाणे पूर्ण खर्च झाला नसेल तर त्याची कारण मिमांसा याची पूर्ण माहिती देण्यांत यावी.

मा.सभापती : शहर अभियंता व उप अभियंता (स्लम) यांनी आगामी स्थायी समिती बैठकीत सदरची माहिती सादर करावी.

श्री.हमीदउद्दीन ताबा : महानगरपालिकेतर्फे ज्या शाळा चालविल्या जातात त्यातून काम करणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण जास्त आहे.काही ठिकाणी वर्ग जास्त व शिक्षक कमी आहेत यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यासावर परिणाम होतो.

मा.आयुक्त : मुळातच महानगरपालिकेकडे शिक्षक कमी आहेत.त्यांत शिक्षकांच्या बदल्या करतांना त्या करणे अथवा काही प्रमाणात बदल्या न करणे बाबत स.नगरसेवकांची विनंती लक्षात घ्यावी लागते.त्यामुळे वर्ग व शिक्षक यांचे प्रमाणे काही ठिकाणी व्यस्त आहे.लवकरच शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्यांत येत आहेत.त्यावेळी या बाबींचा प्रामुख्याने विचार केला जाईल.शिक्षक पदाच्या मुलाखतीसाठी जे उमेदवार आलेले होते त्यांना मुलाखतीत एकूण किती गुण प्राप्त झाले याची यादी नोटीस बोर्डवर लावली जाईल.

श्री.सुदाम सोनवणे : महानगरपालिकेतर्फे शहरांतील मालमत्तांवर कर आकारला जातो.नवजीवन कॉलनीतील घरांवर लावण्यांत आलेल्या मालमत्ता करावची पहाणी केली गेली तर एकाच प्रकारच्या मालमत्तांना वेगवेगळी आकारणी केलेली दिसून येईल.मालमत्ता कर आकारतांना कर्मचारी पैसे घेवून कर कमी जास्त करतात.

मा.सभापती : तक्रार योग्य असलेली मालमत्ता कराची मागणी देयके आपण उप आयुक्त-२ यांच्याकडे द्यावीत.ते प्रकरणाची स्वत: चौकशी करुन पुढील स्थायी समिती बैठकीत त्याची माहिती सादर करतील.मालमत्ता कर आकारणी बाबत बऱ्याचशा तक्रारी आहेत.यावरती मा.आयुक्तांनी उपाययोजना करावी.

मा.आयुक्त : मालमत्ता कराच्या संदर्भाने महानगरपालिकेकडे साधारणत: २०० अर्ज पडून आहेत.उप आयुक्त-२ यांनी त्यांच्या अधिपत्याखालील करमुल्य निर्धारण अधिकाऱ्यांना या अर्जाची विभागणी करुन द्यावी व प्रत्येक प्रकरणांत चौकशी करुन प्रकरणे निकाली काढावीत व त्याची माहिती स्थायी समिती बैठकीत सादर करावी.

डॉ.विजयकुमार मेहेर : शहरांत महानगरपालिकेतर्फे चालवले जाणारे आरोग्य केंद्रे व त्यातील कर्मचाऱ्यांबाबत माहितीची मागणी करुनही ही माहिती आतापर्यंत दिली गेलेली नाही.नगरसेवकांनी मागितलेली माहिती देण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यांत याव्यात.

मा.आयुक्त : सर्व अधिकाऱ्यांनी या बाबींकडे लक्ष देऊन स.नगरसेवकांनी मागितलेली माहिती तात्काळ पुरवावी अशी माहिती देण्याबाबत संचिका आयुक्तांकडे पाठविल्याची आवश्यकता नाही.विभाग प्रमुखांनी त्यांच्याच लेवलवर प्रक्रीया पुर्ण करावी.माहिती देण्यांसाठी जास्त दिवस लागणार असतील तर त्याचीही कल्पना स.नगरसेवकांना देण्यांत यावी.शक्यतो तीन-चार दिवसांचे आंत मागितलेली माहिती देण्यांत यावी.

मा.सभापती : अद्यापही सिडकोकडून महानगरपालिकेकडे काही पाणी पुरवठा लाईन्स हस्तांतरीत करण्यांत आलेल्या नाहीत.परंतू त्या भागातील लोकांना पाणी पुरवठा लाईन्स हस्तांतरीत करण्यात आलेल्या नाहीत.परंतू त्या भागातील लोकांना पाणी पुरवठा देयके पाठविली जातात.बिले देतांना त्यांची तपासणी करावयास हवी.

कार्यकारी अभियंता : हा प्रश्न सिडको एन-११ व एन-१ भागातील आहे.या भागातील आहे.या भागातील भागातील लोक महानगरपालिकेचे पाणी वापरतात.मात्र ही लाईन सिडको कडून महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेली नाही.

मा.सभापती : या भागात महानगरपालिकेने स्वतःची लाईन टाकल्यानंतरच नळ कनेक्शन्स देण्यांत आलेले आहेत.त्यामुळे तेव्हापासूनच पाणी कर आकारणी करावयास पाहिजे.सिडकोनी नळ कनेक्शन्स देतांना लाईन चालू आहे अथवा नाही याची खात्री करावयास पाहिजे होती.ज्या दिवशी प्रत्यक्षात घरांचा ताबा संबंधितांना दिला त्या दिवसापासून पाणी पट्टी वसूल करावयास पाहिजे.

मा.आयुक्त : चालू वर्षाची मागणी वसुल करण्यांत यावी.थकबाकीनंतर विचार करता येईल.

डॉ.विजयकुमार मेहेर : शहरात एकूण किती स्टँड पोस्ट आहेत याची माहिती देण्यांत यावी.

कार्यकारी अभियंता : शहरात एकूण १३४१ स्टँड पोस्ट आहेत.

श्री.प्रकाश निकाळजे : शहरात काही लोक एकत्रीत येऊन गृहनिर्माण संस्था स्थापन करतात.मात्र अशा संस्थात भूखंड घेणारे काही नागररिक बाहेरगावी राहतात.अशा संस्थातून जे घरे बांधू इच्छितात त्यांना बेटरमेंट चार्जेस आदी खर्च घेऊन त्यांना बांधकाम परवानगी देण्यांत यावी.

मा.आयुक्त : अशा प्रकारच्या काही प्रकरणांत बांधकाम परवानगी दिलेली आहे,परंतु अशा भागात काही लोकांना बांधकाम परवानगी दिलेली आहे.परंतु अशा भागात काही लोकांना बांधकाम परवानगी दिली तर ते मूलभूत सुविधांची मागणी करतात व मानवतेच्या दृष्टीकोनातून अत्यावश्यक सुविधा महानगरपालिकेस पुरवाव्याच लागतात.हे महानगरपालिकेस आर्थिक दृष्टया परवडत नाही.

**विषय क्र. ४२५/१:**

दिनांक ५-२-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.महादेव सुर्यवंशी : दि.५-२-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती बैठकीत साफसफाई बाबत प्रतिक्षा यादीतील मजूरांची दैनिक वेतनावर नेमणूक करण्यांत यावी असे आदेश देण्यांत आले होते.तथापि पुरविण्यांत आलेल्या प्रतिक्षा यादीतील मजूर लवकर उपलब्ध होत नाही.यात पुन्हा आदेश काढण्यांत विलंब होत नाही.यात पुन्हा आदेश काढण्यांत विलंब होतो व साफसफाईचे काम नियमितपणे होत नसल्याने सर्वत्र अस्वच्छता पसरलेली दिसते.

मा.आयुक्त : उप आयुक्त-२ यांना पत्र दिले आहे की,ज्या ज्या विभागात मजूरांची आवश्यकता आहे त्या ठिकाणी मजूर देण्यांत यावेत.यादीतील लोक एकदा आदेश देवून कामावर उपस्थित होत नसतील तर त्यांचे नांव यादीतून काढून टाकण्यांत यावे.यादीतील नावांबाबत काही आक्षेप आलेले आहेत.उप आयुक्त-२ यांनी या बाबींची चौकशी करावी.

डॉ.भागवत कराड : दि.५-२-९६ च्या स्थायी समिती बैठकीत सुचित केल्यानुसार महानगरपालिका शाळा इमारतींच्या भाडयाबाबत माहिती देण्यांत यावी.

शिक्षणाधिकारी : शाळा इमारतींच्या भाडयासंबंधाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यांत आलेला आहे.या संदर्भाने शासनाकडे पाठपुरावा चालू आहे.

मा.आयुक्त : हा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यांत आलेला आहे.या संदर्भाने मा.पालक मंत्र्यांशीही चर्चा झालेली आहे.अनुदान मिळविण्यासाठी पाठपुरावा करावा लागणार आहे.

मा.सभापती : शाळा इमारतींचे भाडे प्राप्त करुन घेण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यांत यावा.

**ठराव :**

दि.५-२-९६ च्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२६/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.रमानगर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र बांधणेच्या कामासाठी ठराव क्र.२१४/९ दि.४-१२-९५ अन्वये रक्कम रु. ३,६०,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे.सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/४८/९५ दिनांक १३-१२-९५ बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (२) निविदा विक्री झाल्या निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (२) निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (२) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या.त्या दिनांक १-१-९६ ला उघडण्यांत आल्या.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) श्री.शेख उमर | ९.७७% जास्त दराने |
| २) श्री.आर.एल.बारवाल | १५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.७७% जास्त दराची श्री.शेख उमर यांची निविदा आहे.दर जास्त असल्यांन मक्तेदारांत दराचे वाटाघाटी बाबत मा.आयुक्तांचे दालनांत दि.२९-१-९६ ला प्रत्यक्ष बोलावून वाटाघाटी अन्वये सदरील काम अं.प.दरापेक्षा ९.७७% जास्त ऐवजी ४% जास्त दराने करण्यांस मक्तेदाराने संमती दर्शविली व त्यांस मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली.सबब सदर कामासाठी श्री.शेख उमर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.७७% जास्त ऐवजी ४% जास्त दराची (वाटाघाटी अन्वये) निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे मो.रमानगर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र बांधणेच्या कामासाठी ठराव क्र.२१४/९ दि.४-१२-९५ अन्वये अंदाजपत्रकीय रक्कम रु.३,६०,०००/- तसेच तुलनात्मकदृष्टया व वाटाघाटी नुसार श्री.शेख उमर यांस ४% जास्त दराने काम करण्यांस सर्वानुमतं मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२७/३ :**

मो.कैलासनगर येथील प्रा.शाळेवर पहिला मजला (दोन खोल्या) बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि.१८-१०-९५ ठराव क्र.१५०/७ अन्वये रक्कम रु.२,२५,०००/- चे अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे.सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि ४८/९५ दि.१३-१२-९५ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा विक्री झाल्या.निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (२) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या.त्या दि.१-१-९६ ला उघडण्यांत आल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.आर.एल.बारवाल | १०% | जास्त दराने |
| २) श्री.एस.जी.भालेराव | ४.४७% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.४७% जास्त दराने श्री.एस.जी.भालेराव यांची निविदा आहे.सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे मा.आयुक्त साहेबांनी सदर काम अंदाजपत्रकीय दराने करण्याबाबत दि.११-१-९६ ला आदेशित केले व त्यास मक्तेदारानेही संमती दिली.सबब सदर कामासाठी श्री.एस.जी.भालेराव यांची अंदाजपत्रकीय दर निविदा मंजुरीचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.कैलासनगर येथील प्राथमिक शाळेवर नहिला मजला (दोन खोल्या) बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि. १८-१०-९५ ठराव क्र.१५०/७ अन्वये रक्कम रु.२,२५,०००/- च्या अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे.तसेच निविदा तुलनात्मकदृष्टया गुत्तेदार श्री.एस.जी.भालेराव यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास सर्वानुमते मंजुरी दिली जाते.

**विषय क्र. ४२८/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.आंबेडकर नगर स्लम भागात मुख्य दगडी गटार बांधणे व त्यावर आवश्यक ठिकाणी स्लॅब टाकणे या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खाते यांचे वर्ष ९२-९३ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.४,९९,९५०/- अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील कामाचा खर्च खुली गटार बांधणे रु.५० लाख या शिर्षाखाली करण्यांत येईल.सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.१२-१२-९५ ला प्रशासकीय मान्यता दिली असून प्रस्तावित कामासाठी निविदा पत्रके कार्यालयीन नोटीस क्र.मनपा/लेखा/नि/५०/९५ दि. १८-१२-९५ अन्वये मागविण्यांत आले असता निविदा पत्रके स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यं एकूण पाच (५) पत्रके प्राप्त झाल्या.त्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) श्री.एस.बी.इंगळे | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | २०.८६% | कमी |
| २) श्री.सैय्यद सिराजोद्दीन | --//-- | १६.९०% | कमी |
| ३) श्री.कादरी एस.क्यु. | --//-- | १४.९९९% | कमी |
| ४) मे.ट्री.स्टार कन्स्ट्रक्शन | --//-- | १०.१००% | कमी |
| ५) श्री.मो.अझहर मो.असद | --//-- | अनामत रक्कम. | |

वरील निविदापैकी श्री.एस.बी.इंगळे यांची निविदा ही तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.८६% कमी दराची आहे.तरी श्री.एस.बी.इंगळे यांचे नावे सदरील कामास मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

मो.आंबेडकर नगर स्लम भागात मुख्य दगडी गटार बांधणे त्यावर आवश्यक ठिकाणी स्लॅब टाकणे या कामासाठी सा.बां.खाते यांचे वर्ष ९२-९३ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.४,९९,९५०/- तसेच सदरील कामाचा खर्च खुली गटार बांधणे रक्कम रु.५०.०० लाख या शिर्षातून करणेस तसेच गुत्तेदार श्री.एस.बी.इंगळे यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.८६% कमी दराची असल्यामुळे सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२९/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.इटखेडा येथील समाज मंदिर बांधणेसाइी श्री.तरबिंदरसिंग धिल्लन,स.नगरसेवक यांच्या मागणीनुसार सादर कामाचे सा.बां.खात्याचे सन १९९१ चे जिल्हा दरसुची नुसार रक्कम रु.२,१०,०००/- चे अंदाजपत्रक

तयार करण्यात आले असून त्यांचे स्वेच्छा निधीतून रक्कम रु.४०,०००/- खर्च करणे बाबत लेखी पत्राने कळविले आहे.अंदाजपत्रकास मा.आयुक्तांची मंजुरी दि.३-१-९६ चे रोजी प्राप्त झाली आहे.

सबब सदर कामाचे रक्कम रु.२,१०,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.सदरचा खर्च श्री.तरविंदरसिंग धिल्लन स. नगरसेवक यांचे सन ९५-९६ चे स्वेच्छा निधीतून रक्कम रु.४०,०००/- व उर्वरीत रक्कम रु.१,७०,०००/- ५% कमकुवत घटकांसाठी कल्याणकारी योजना या लेखा शिर्षातून करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.ईटखेडा येथे समाज मंदिर बांधणेसाठी स.नगरसेवक श्री.तरविंदरसिंग धिल्लन यांच्या मागणीनुसार तसेच सदर कामाचे सा.बां.खात्याचे सन ९५-९६ दरसुची नुसार रक्कम रु.२,१०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच स.नगरसेवक श्री.तरविंदरसिंग धिल्लन यांचे स्वेच्छा निधीतून रक्कम रु. ४०,०००/- खर्च करणे बाबत लेखी दिलेले आहे.तसेच उर्वरित रक्कम रु.१,७०,०००/- ५% कमकुवत घटकांसाठी कल्याणकारी योजना या लेखा शिर्षातून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३०/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,कांचनवाडी येथील मनपा कर्मचारी यांच्या एकूण (११) निवास स्थानाची दुरुस्त करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन ९४-९५ चे जिल्हा दरसुची नुसार रक्कम रु.१,९३,४१०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून प्रत्यक्ष वाढीव तरतुद उपलब्ध झाल्याशिवाय काम हाती घेऊ नये या अटीवर मा.आयुक्तांनी दि. ११-१-९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सबब सदर कामाचे रक्कम रु.१,९३,४१०/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव सदराखाली प्रत्यक्ष तरतूद उपलब्धतेमधून करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.कांचनवाडी येथील मनपा कर्मचारी यांच्या एकूण (१२) निवासस्थानाची दुरुस्ती करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याचे सन ९४-९५ चे दरसुचीनुसार रक्कम रु. १,९३,४१०/- च्या अंदाजपत्रकास तसेच प्रत्यक्ष वाढीव तरतुद उपलब्ध झ ााल्याशिवाय काम हाती घेऊ नये या अटीवर तसेच सदरचा खर्च सुधारीत अंदाजपत्रकात इमारती व देखभाल या सदराखाली प्रत्यक्ष तरतुद उपलब्धतेमधुन करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३१/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,सिध्दार्थ गार्डन प्राणी संग्रहालय येथील मत्स्यालय करीता काचेच्या पेटया व इतर कामे करण्याकरीता स्थायी समिती बैठक दि. २१-१२-९५ अन्वये रक्कम रु.४,९५,०००/- चे अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झालेली आहे.सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र./मनपा/लेखा/नि/५०/९५ दि.२८-१२-९५ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (२) निविदा विक्री झाल्या.निविदा स्विकारणेच्या अंतीम तारखेपर्यंत फक्त एकच निविदा दर भरुन प्राप्त झाली.ती निविदा दि. १६-१-९६ ला उघडण्यांत

आली.सदरची निविदा ही श्री.आर.एल.बारवाल यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराची आहे.परंतु सदर कामाचा अ.प.दरापेक्षा ४.९९% जास्त ऐवजी अ.प.रक्कमेच्या दराचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविण्याबाबत मा.आयुक्तांनी दि. २९-१-९६ अन्वये आदेशित केले.

सबब सदर कामासाठी प्राप्त निविदा श्री.आर.एल.बारवाल यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त ऐवजी अं.प.दराची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

डॉ.भागवत कराड :महानगरपालिकेतर्फे ज्या निविदा विकल्या जातात त्यांत कंत्राटदार आपआपसात संगनमत करुन निविदा भरतात.निविदेच्या जाहिराती नजिकच्या जिल्हयातून प्रकाशित करण्यांत याव्यात.जेणेकरुन असे प्रकार कमी होतील.

डॉ.विजयकुमार मेहेर : प्रयोगात्मक तत्वावर ही बाब करुन पहावी.जे कंत्राटदार वेळेवर कामे करत नसतील त्यांना काळया यादीत टाकण्यांत यावे.

मा.आयुक्त : निविदा पत्र खरेदी करण्यापासून कोणास वंचित करता येणार नाही.मात्र जे कंत्राटदार निविदा भरु इच्छित नसतील ते जर निविदा पत्रके परत महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करू इच्छित असतील तर त्यांना त्यावर काही रिबेट देता येईल.जेणेकरुन संगणमताचे निविदा भरण्याचे प्रकार कमी होवू शकतील.

मा.सभापती : यानंतर टाऊन हॉल येथेच निविदा स्विकारल्या व उघडल्या जातील.कंत्राटदारच निविदा भरतांना रिंग करतात ही बाब सत्य आहे.मात्र टेंडर प्रकाशन हे करावेच लागेल.एकदा घेतलेले निविदा पत्र भरणे अथवा न भरणे ही त्या कंत्राटदराची वैयक्तीक बाब आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ गार्डन प्राणी संग्रहालय येथील मत्स्यालयाकरीता काचेच्या पेटया व इतर कामे करण्याकरीता स्थायी समिती बैठक दि. २१-१२-९५ अन्वये रक्कम रु.४,९५,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झालेली आहे.तसेच गुत्तेदार श्री.आर.एल.बारवाल यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराची निविदा यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३२/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,नारळीबाग येथील अंतर्गत गल्ल्यांमध्ये खांडकी बसविणे व काही भागातील रस्त्यांचे खडीकरण करणेच्या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन ९२-९३ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.३,०६,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील कामाचा खर्च सन ९५-९६ वर्षाच्या भांडवली रस्ते (रक्कम रु.२९०.०० लाख) या लेखा शिर्षका अंतर्गत करण्यांत येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र./मनपा/मुलेप/५०/९५ दि.२८-१२-९५ अन्वये निविदा पत्रके मागविली असता,निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण अठरा (१८) निविदा पत्रके विकल्या गेली आणि निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम

तारखेपर्यंत एकूण सात (७) निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली.प्राप्त निविदापत्रके दि.१६-१-९६ ला उपस्थित कंत्राटदारा समक्ष उघडण्यांत आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.सैय्यद रफिकोद्दीन | २८.२५% | कमी दराने |
| २) // मो.अजहर मो.असद | २८.००% | कमी दराने |
| ३) // सिद्दीकी एम.झेड. | २७.९९९% | कमी दराने |
| ४) // पारस कन्स्ट्रक्शन | २७.२७% | कमी दराने |
| ५) // सरवदे एस.पी. | २५.००% | कमी दराने |
| ६) // डी.सी.पंजाबी | २३.३% | कमी दराने |
| ७) // संजय पेंडसुरे | १२.२४% | कमी दराने. |

वरील प्राप्त निविदा पत्रकांपैकी तुलनात्मकदृष्टया श्री.सैय्यद रफिकोद्दीन यांच्या निविदापत्रकाचे दर सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.२५% कमी दराने आहेत.तरी सदर कामाच्या रक्कम रु.३,०६,७००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम श्री.सैय्यद रफिकोद्दीन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.२५% कमी दराने करुन घेण्यास मान्यता मिळावी.

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.नारळीबाग येथील अंतर्गत गल्ल्यांमध्ये खांडकी बसविणे व काही भागांतील रस्त्यांचे खडीकरण करणेच्या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन ९२-९३ च्या दरसुचीनुसार रक्क रु. ३,६,७००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च सन ९५-९६ वर्षाच्या भांडवली रस्ते (रक्कम रु.२९०.०० लाख) या लेखा शिर्षकातून निविदा पत्रकांपैकी तुलनात्मकदृष्टया गुत्तेदार श्री.सैय्यद रफिकोद्दीन यांच्या निविदापत्रकाचे दर सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.२५% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३३/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,मो.गुलमंडी वॉर्ड मधील रोडचे रिसरफेसिंग करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन ९४-९५ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक रक्कम रु.७,३६,२००/- चे तयार करण्यांत आले आहे.सदरील खर्च भांडवली रस्ते सन १९९५-९६ साठी असणाऱ्या (२९.०० लाख) या लेखा शिर्षकांतर्गत करण्यांत येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र./मनपा/अशअ/५७८/९५ दि. २०-१२-९५ अन्वये निविदा पत्रके मागविली असता,निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (१) निविदा दर भरुन प्राप्त झाली.प्राप्त निविदा दि. ८-१-९६ रोजी उपस्थित कंत्राटदारासमक्ष उघडण्यांत आली.त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन | ८.८९% | जास्त दराने. |

वरील प्राप्त निविदा मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.८९% जास्त दराची असल्यामुळे संबंधितांस वाटाघाटीस बोलावून वाटाघाटीअंती संबंधीताने सदर काम अंदाजपत्रकीय दराने,करण्यास सहमती दर्शविली आहे.तरी सदर कामाच्या रक्कम रु. ७,३६,२००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांस मान्यता मिळावी.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.गुलमंडी वॉर्ड मधील रोडचे रिसरफेसिंग करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याचे सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय रक्कम रु.७,३६,२००/- तसेच सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते सन ९५-९६ साठी असणाऱ्या (२९०.०० लाख) या लेखा शिर्षकांतर्गत करुन घेण्यास तसेच गुत्तेदार,श्री.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची ८.८९% जास्त दराची असल्यामुळे वाटाघाटी अंती सदर काम अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३४/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,मा.स्थायी समिती अध्यक्ष,मा.विरोधी पक्षनेता,मा.सभागृह नेता,मा.उप महापौर,मा.महापौर यांच्या दालनांत जिप्सम बोर्डाचे प्लेस सिलिंगचे काम तसेच ॲल्युमिनियम फ्रेमसह दरवाजे खिडक्या बसवुन देण्यांचे कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.३,६०,०००/- चे तयार करण्यात आलेले आहे.सदरील कामाचा खर्च भांडवली इमारती सन ९५-९६ या लेखा शिर्षाअंतर्गत करण्यांत येईल.तसेच सदरील काम तातडीचे असल्याने व मा.पदाधिकाऱ्यांची गैरसोय होत असल्याने व टेंडर प्रक्रीयेत कालापव्यव होईल.म्हणून सध्याचे प्रशासकीय इमारतीचे कंत्राटदार श्री.अन्वरखान बिसमिल्ला खान (एलोरा कन्स्ट्रक्शन) यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करण्यांसही मंजुरी मिळावी.

तरी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.मंजुरी मिळाल्यास श्री.अन्वरखान बिसमिल्लाखान (एलोरा कन्स्ट्रक्शन) यांचेकडून काम सुरु करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.स्थायी समिती अध्यक्ष,मा.विरोधी पक्षनेता,मा.सभागृह नेता,मा.उपमहापौर, ,मा.महापौर यांच्या दालनांत जिप्सम बोर्डाचे प्लेस सिलिंगचे काम तसेच ॲल्युमिनियम फ्रेमसह दरवाजे खिडक्या बसवुन देण्यांचे कामासाठी सा.बां सन ९५-९६ या लेखा शिर्षकातून करण्यांस तसेच सदरील काम तातडीचे असल्याने पदाधिकाऱ्यांची बसण्यांची गैरसोय होत असल्याने व टेंडर प्रक्रीयेत बराच कालापव्यय होईल या दृष्टीकोनातून सध्याचे प्रशासकीय इमारतीचे कंत्राटदार श्री.अन्वरखान बिसमिल्लाखान (एलोरा कन्स्ट्रक्शन) यांचेकडून मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३५/११ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे.की,शहरात ॲलापॅथीचे दवाखाने व आरोग्य केंद्र महानगरपालिकेतर्फे चालवण्यांत येतात.परंतु शहरातुन होमियोपॅथीक/युनानी दवाखाने महानगरपालिकेतर्फे चालविण्यांचा प्रस्ताव आलेला आहे.महानगरपालिकेच्या सध्या असलेल्या आरोग्य केंद्रात होमियोपॅथी/युनानी प्रत्येकी एक दवाखाना काढणे योग्य राहील,यासाठी औषधालय व वैद्य (होमियोपॅथी/युनानी) यांची नेमणूक करणे जरुरी आहे.तसेच मिरक ही जरुरी असल्याने वरील प्रकारे होमीयोपॅथीक/युनानी दवाखाना महानगरपालिकेतर्फे चालविण्यांत यावा. प्रस्तावास व खर्चास मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

डॉ.विजयकुमार मेहेर : महानगरपालिकेतर्फे चालविण्यांत येणाऱ्या दवाखान्यातून आयुर्वेदिक दवाखान्याचाही समावेश असावा.त्याचबरोबर महानगरपालिकेच्या दवाखान्यातून आयुर्वेदीक औषधोपचारही केले जातात अशा पाटया लावाव्यात जेणेकरुन जनतेसही याची माहिती होऊ शकेल.

श्री.हमीदउद्दीन ताबा : युनानी दवाखाने किती राहतील.

मा.आयुक्त : महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रातून ॲलोपॅथी बरोबरच आयुर्वेदिक औषधेही पुरविली जातील.सध्या महानगरपालिकेच्या अस्थापनेवर तीन आयुर्वेदिक डॉक्टर्स काम करत आहेत.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : युनानी डॉक्टर्सच्या जागा लवकर भरल्या जाव्यात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार महानगरपालिका क्षेत्रात ॲलोपॅथीचे दवाखाने व आरोग्य केंद्र महानगरपालिकेतर्फे चालवण्यांत येतात.परंतु महानगरपालिका क्षेत्रात होमीयोपॅथीक/युनानी दवाखाने चालविण्या करीता सध्या असलेल्या आरोग्य केंद्रात होमीयोपॅथीक/युनानी प्रत्येकी एक दवाखाना काढणे तसेच औषधालय वैद्य (होमियोपॅथीक/युनानी) यांची नेमणूक करणेस्तव तसेच मिश्रक ही जरुरी असल्याने वरील प्रकारे होमियोपॅथीक/युनानी दवाखाना महानगरपालिकेतर्फे चालविण्याच्या प्रस्तावास व खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३६/१२ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,संजयनगर,भवानीनगर,दादा कॉलनी येथे नाल्या शेजारी संरक्षित भिंत बांधणेसाठी परिसर अभियांत्रिकी विभागाकडील सन ९४-९५ चे दरपत्रकानुसार मे.शहा कन्सल्टंट हयांनी केलेल्या डिझाईनप्रमाणे रु.३८,५९,३६९/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभा ठराव क्र.१२१/११ दि.२७-१२-९५ ला मंजुरी देण्यांत आली असून हा खर्च शासकीय अनुदान ९५-९६ हया लेखा शिर्षकामधून खर्च करण्यांत येणार आहे.निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/५ दि.३०-१२-९५ अन्वये निविदा मागविण्यांत आल्या असता,एकूण १५ निविदा विकण्यांत आल्या त्यापैकी अंतीम तारखेपर्यंत दर भरलेल्या तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत.त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.राणा कन्स्ट्रक्शन कंपनी | १५% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने |
| २) श्री.आर.एल.बारवाल | ५.५५% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने |
| ३) श्री.डी.अजितसिंग | ७.७०% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने |

वरीलप्रमाणे दर भरलेल्या निविदांपैकी मे.राणा कन्स्ट्रक्शन हयांनी सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराची आहे.तरी मे.राणा कन्स्ट्रक्शन हयांची निविदा स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

कार्यकारी अभियंता : सदर संरक्षित भिंतीची लांबी ५०० मीटर आहे.उंची ३.१० मीटर (बेंसला २.३८ मीटर तर टॉपला ०.७५ मीटर) आहे.

डॉ.विजयकुमार मेहेर : शहरांतील सर्वच नाल्यांना संरक्षित भिंत बांधण्याचे काम एकत्रितरित्या हाती घेतले गेले.तर जास्त सोयीचे झाले असते.

मा.आयुक्त : स.नगरसेवकांच्या विनंती वरुन काही कामे प्राधान्याने सुरु करावी लागतात.त्यामुळे अशा कामाचे टेंडर एकत्रितपणे मागविता आले नाही.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : नाल्यास संरक्षित भिंती बांधत असतांना नाल्यात मातीचे ढिगारे पडून राहणार नाहीत याचीही काळजी घ्यावी.नाले प्लेन करण्यांत यावेत.

मा.सभापती : ठरावास मंजुरी देत असतांनाच सुचित करण्यांत येते की,कार्यकारी अभियंता,पाणी पुरवठा यांनी स्वतः कामाची पाहणी करावी.नाल्यात मातीचे ढिगारे राहणार नाहीत तसेच नाले प्लेन राहतील याची काळाजी घ्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.संजय नगर,भवानी नगर,दादा कॉलनी येथील नाल्या शेजारी संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाकडील सन ९४-९५ चे दर पत्रकानुसार मे.शहा कन्स्लटंट हयांनी केलेल्या डिझाईनप्रमाणे रक्कम रु.३८,५९,३६९/- च्या अंदाजपत्रकास सर्व साधारण सभा ठराव क्र.१२१/११ दि.२७-१२-९५ ला मंजुरी दिली असून हा खर्च शासकीय अनुदान ९५-९६ च्या लेखा शिर्षकामधुन खर्च करण्यांस तसेच मे.राणा कन्स्ट्रक्शन कंपनी यंची १५% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराची असल्यामुळे सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३७/१३ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.गांधीनगर ते फकीरवाडी पुलापर्यंत नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.७,५०,०००/- च्या कामाकरीता परिसर अभियांत्रिकी विभागाच्या दरसुची ९४-९५ नुसार स्थायी समितीच्या ठराव क्र.३२७/२३ दिनांक २८-१२-९५ ला मंजुर झाल्याप्रमाणे निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/५२/९५ दि.३०-१२-९५ अन्वये बी-१ निविदा मागविल्या असता,निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकमण १६ (१६) निविदा विकण्यांत आल्या,त्यांपैकी निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण चार (४) निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशील खालील प्रमाणे सदरील खर्च विशेष शासकीय अनुदान १९९५-९६ हया लेखा शिर्षामधून प्रस्तावित आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.शेख शरीफ | २२% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने. |
| २) श्री.अब्दुल सलाम | १८% | --//-- |
| ३) मे.राणा कन्स्ट्रक्शन | १८% | --//-- |
| ४) श्री.सय्यद सिराजुद्दीन | १६.५०% | --//-- |

वरील प्रमाणे तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२% कमी दराची श्री.शेख शरीफ यांची निविदा आहे.प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.गांधीनगर ते फकीरवाडी पुलापर्यंत नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ७,५०,०००/- कामाकरीता परिसर अभियांत्रिकी विभागाच्या दरसुची ९४-९५ नुसार स्थायी समितीच्या ठराव क्र.३२७/२३ दि. २८-१२-९५ ला मंजुर झाल्याप्रमाणे गुत्तेदार,श्री.शेख शरीफ यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२% कमी दराची असुन सदरील खर्च विशेष शासकीय अनुदान ९५-९६ हया लेखा शिर्षकामधून करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३८/१४ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण हयांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.कटकटगेट येथे एस.टी.कॉलनीजवळ नाल्यास संरक्षित भिंत बांधण्याच्या कामाकरीता परिसर अभियांत्रिकी विभागाच्या सन १९९४-९५ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक रक्कम

रु.५,०५,०००/- तयार करण्यांत आले असून,सदरील काम शासकीय अनुदान ९५-९६ या लेखा शिर्षामधून करण्यांत येईल.

सदरील कामासाठी स्थायी समितीची ठराव क्र.३२४/४०दिनांक २८-१२-९५ ला मान्यता झालेली आहे.त्या अनुषंगाने या कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/५२/९५ दि. ३०-१२-९५ अन्वये बी-१ निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (३) निविदा पत्रके प्राप्त झाल्या.

प्राप्त निविदा पत्रके दिनांक १८-१-९६ ला उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.एस.ए.सिद्दीकी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% | कमी दराने. |
| २) श्री.एम.ए.नवाब | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% | कमी दराने. |
| ३) श्री.मन्नानखॉंन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६% | जास्तीच्या दराने. |

वरील प्राप्त निविदापैकी श्री.एम.ए.सिद्दीकी यांच्या निविदापत्रकाचे दर सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २ टक्के कमी दराने आहेत.तरी सदरचे काम श्री.एम.ए.सिद्दीकी ठेकेदार यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्ष्ज्ञा २% कमी दराने करुन घेण्यांस मान्यता द्यावी.

तरी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.कटकटगेट येथे एस.टी.कॉलनी जवळ नाल्यास संरक्षित भिंत बांधण्याच्या कामाकरीता परिसर अभियांत्रिकी विभागाच्या सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय रक्कम रु.५,०५,०००/- च्या तसेच सदरील काम शासकीय अनुदान ९५-९६ या लेखा शिर्षामधून करण्यांस तसेच सदरील कामासाठी स्थायी समितीचा ठराव क्र.३२४/२० दिनांक २८-१२-९५ ला मान्यता झालेली आहे.सदरील काम गुत्तेदार,श्री.एम.ए.सिद्दीकी यांची सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २ टक्के कमी दराचा असल्यामुळे गुत्तेदार,श्री.एम.ए.सिद्दीकी यांचेकडून करुन घेण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३९/१५ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,दशमेशनगर,जयनगर येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधण्याच्याकामासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९४-९५ च्या दरसुचीनुसार झालेल्या सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र.१२०/९० अन्वये मंजुर झाल्याप्रमाणे निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/निविदा/५२/९५ दि.३०-१२-९५ अन्वये बी-१ निविदा मागविण्यात आल्या.निविदा विक्रीच्या अंमित तारखेपर्यंत एकूण १६ निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत दर भरलेल्या ६ (सहा) निविदा प्राप्त झाल्या.प्राप्त निविदा दि. १८-१-९६ रोजी उघडण्यांत आल्या त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) श्री.के.एस.गुरु अँड कं. | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | २.६% | कमी दराने |
| २) श्री.एम.व्ही.कृष्णाराव | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | १३.९५% | कमी दराने |
| ३) श्री.आर.एल.बारवाल | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | १७.१७% | --//-- |
| ४) श्री.डी.अजितसिंग | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | २१.१९% | --//-- |
| ५) मे. राणा कस्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | २२% | --//-- |
| ६) मे.शमा कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | २१.१% | --//-- |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२% कमी दराची मे.राणा कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.सदरील काम विशेष शासकीय अनुदान ९५-९६ शिर्षकामधून प्रस्तावित आहे.

तरी निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.दशमेशनगर,जयनगर येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाच्या दरसुचीनुसार रु.३५,००,०००/- (रु.पस्तीस लाख) च्या अंदाजपत्रकास दि. २७-१२-९५ रोजी सर्वसाधारण सभेत ठराव क्र.१२०/१० अन्वये मंजुर झाल्याप्रमाणे तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय २२% कमी दराची मे.राणा कन्स्ट्रक्शन यांची निविदा तसेच सदरील काम विशेष शासकीय अनुदान ९५-९६ शिर्षकामधून करणेस्तव व सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ४४०/१६ :**

उद्यान अधिक्षक यांनी प्रस्ताव सादर केला की,झाडाच्या संरक्षणाकरीता वृक्ष प्राधिकरण समितीमध्ये ठरल्याप्रमाणे १००० ट्री गार्ड (वृक्ष संरक्षक पिंजरे) खरेदी करण्यांकरीता रु.४,०२,०००/- चे अंदाजपत्रक तयार करून वृत्तपत्रात प्रसिध्दी देवून फेर निविदा मागविण्यांत आल्या असता एकूण चार (४) निविदा प्राप्त झाल्या.त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १) वर्षा मेटल वर्क्स | रु. ३५९=०० प्रति टन |
| २) औरंगाबाद फेब्रकेशन | रु. ३५९=०० प्रति टन |
| ३) एम.एस.एस.आय.डी.सी. | रु. ३७७=०० प्रति टन |
| ४) पॉप्युलर इंजिनिअरिंग | रु. ३८५=०० प्रति टन |

वरीलपैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दराचे दरपत्रक मे.वर्षा मेटल वर्क्स यांचे असून मा.आयुक्त यांचेशी झालेल्या चर्चेनुसार रूपये ३५०=०० प्रति नग याप्रमाणे ट्री गार्ड पुरवठा करण्याचे मान्य केले आहे.सदर दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.००% कमी दराचे आहे.यासाठी येणाऱ्या वरील खर्चास व दरास मंजुरीकरीता प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये झाडाच्या संरक्षणाकरिता १००० ट्री गार्ड (वृक्ष संरक्षक पिंजरे) खरेदी करणेस्तव ४,०२,०००/- रुपयाच्या अंदाजपत्रकास तसेच तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दराने दरपत्रक वर्षा मेटल वर्क्स यांचे असून वाटाघाटीनुसार ३५०/- रुपये प्रति नग याप्रमाणे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.५०% कमी दराने साठी येणाऱ्या खर्चास व दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**-: ऐनवेळचे विषय :-**

**विषय क्र. ४४१/१७ :**

न.भु.क्र.११६०२/पै.मधुन जाणारी व लगतच्या परिसरात विशेषतः एन-१० मधील पोलीस विभागाचे निवासस्थाना करीता पाणी पुरवठा करण्यासाठी टाकावयाचे पाईप लाईन करीता हया न.भु.क्र.११६०२ मधुन जाणाऱ्या २४ मीटर विकास योजना रस्त्यांने बाधित होणाऱ्या जांगेपैकी १.०० मीटर रुंदीची जागा संपादित करणे आवश्यक आहे.

कामाची गरज व परिसर अभियांत्रिकी विभागा मार्फत करण्यांत येणारे सदर पाईप लाईनचे काम सुरु केल्या नंतर संबंधिताने आक्षेप घेतल्याने सादर काम थांबविले होते. ते अर्धवट झालेले काम पुर्ण करण्याचे दृष्टीने नंतर संबंधितांच्या संमतीने हया न.भु.क्र.११६०२ मधुन जाणाऱ्या पाईप लाईन करीता हव्या असलेल्या जागेचा खाजगी वाटाघाटीने भुसंपादन करण्याचे कार्यवाहीतंर्गत दिनांक १२-१०-१९९५ ला आगाऊ ताबा घेण्यात आला.संपादित करण्यांत आलेले क्षेत्र १२२०=२२० चौ.मी.एवढे असून त्याचे मुल्यांकनाधारे किंमत रुपये १,२५,७५०/- एवढी होते.प्रस्ताव मान्यतेनंतर संबंधिता कडून आगाऊ ताबा घेतलेल्या हया क्षेत्राचे नोंदणीकृत दस्त ऐवजाने हस्तांतर करुन घेण्यांत येईल त्यासाठीच्या खर्चाची ५०% रक्कम संबंधित खर्च करेल तर ५०% रक्कम महानगरपालिका खर्च करेल.नोंदणीकृत दस्तऐवजाने जमिनीचे हस्तांतर झाले नंतर संबंधितास मोबदल्याची रक्कम देण्यांत येईल.करीता प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

न.भु.क्र.११६०२/पै.मधुन जाणारी व लगतच्या परिसरात विशेषतः एन-१० मधील पोलीस विभागाचे निवासस्थाना करीता पाणी पुरवठा करण्यासाठी टाकावयाचे पाईप लाईन करीता हया न.भु.क्र.११६०२ मधुन जाणाऱ्या २४ मीटर विकास रस्त्याचे बाधित होणाऱ्या जागेपैकी १.०० मीटर रुंदीची जागा संपादित करणे आवश्यक असल्याने व सदर काम सुरु केले असता संबंधिताने सदर जागेबाबत वाटाघाटी अंती १२२०=२२० चौ.मी.एवढे क्षेत्र संपादित करण्यांत आले असून त्याची मुल्यांकनाधारे किंमत रु. १,२५,७५०/- रक्कमेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.संबंधिता कडून आगाऊ ताबा घेतलेल्या हया क्षेत्रांचे नोंदणीकृत दस्तऐवज करणेसाठी ५०% रक्कम संबंधिताने खर्च करावी व ५०% रक्कम महानगरपालिकेने खर्च करुन नोंदणीकृत दस्तऐवजाने जमीनीचे हस्तांतर झालेनंतर संबंधितास मोबदल्याची रक्कम अदाई करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४२/१८ :**

सहाय्यक आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहेकी,श्रीमती मंगला कुर्तडीकर हया दि.२३ डिसेंबर १९८७ पासुन ठराविक वेतनावर वैद्यकीय अधिकारी या पदावर कार्यरत आहे.त्या पुर्ण वेळ स्त्री वैद्यकीय अधिकारी म्हणून काम करीत आहेत.सन १९८७ मध्ये श्रीमती मंगला कुर्तडीकर हयांची नेमणूक निवड समितीने निवड करुन केलेली आहे.

त्यांना पूर्ण वेळ स्त्री वैद्यकीय अधिकारी म्हणून नेमण्यासाठी वयाची अट शिथील करणे जरुर आहे.करीता वयाची अट शिथिल करणेस्तव व त्यांना नियमित वेतनश्रेणी रु.२०००-६०-२३०० ईबी-७५-३२००-१००-३५ दि. २३-१२-८७ पासुन देणेबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

डॉ.विजयकुमार मेहेर : मुळात अशा प्रकारचा ठराव मांडता येतो का? डॉ.कुर्तडीकर या १९८७ मध्ये महापालिका सेवेत आल्या तेव्हा त्यांचे वय काय होते? त्यांनी ही वेतनश्रेणी दिल्यानंतर थकबाकीही दिली जाणार आहे काय? त्या महापालिकेत १९८७ मध्ये आल्या तर आता पर्यंत हा प्रस्ताव का मांडण्यात आला नाही.

श्री.गौतम खरात : महानगरपालिकेत इतर कर्मचाऱ्यांबाबत जर असा प्रश्न उपस्थित झाला तर त्यावरही असाच निर्णय घेतला जाणार काय?

मा.आयुक्त : डॉ.मंगला कुर्तडीकर यांचा जन्म दिनांक १५-७-४७ आहे.त्या मागील ७-८ वर्षा पासून महानगरपालिका अस्थापनेवर ठराविक वेतनावर काम करत आहेत.त्यांना जर कायम स्वरुपी आदेश मिळाले तर इतरही फायदे व सेवा निवृत्ती नंतर पेंशन मिळू शकेल.हा प्रस्ताव मंजुर झाल्यानंतरच त्यावर एपुढील कार्यवाही करण्यांत येईल.या प्रकरणाचा मानवतेच्या दृष्टीकोनातून सहानुभूतीपुर्व विचार करावयास पाहिजे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीमती मंगला कुर्तडीकर हया दि.२३ डिसेंबर १९८७ पासुन ठराविक वेतनावर पुर्ण वेळ स्त्री वैद्यकीय अधिकारी म्हणून काम करीत असून हयांची नेमणूक निवड समितीने निवड करुन केलेली असल्याने व त्यांना पुर्ण वेळ स्त्री वैद्यकीय अधिकारी म्हणून नेमण्यासाठी वयाची अट शिथील करणेस व त्यांना नियमित वेतनश्रेणी रु.२०००-६०-२३०० ईबी-७५-३२००-१००-३५०० दिनांक २३-१२-८७ पासुन देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४३/१९ :**

(लिजवर भाडेतत्वावर जागा देण्यासंबधी एकत्रित प्रस्ताव.)

औरंगाबाद शहरातील विविध संस्थानी/व्यक्तींनी महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या मंजुर रेखांकनामधील नियमानुसार सोडलेल्या खुल्या जागा/महानगरपालिकेच्या मालकीच्या/नाल्यांच्या जागांची सदर जागा विकसित करणेसाठी मागणी केलेली आहे,त्यांची मागणी विचारात घेऊन त्यांना त्या जागा देण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यांत येत आहे.

मागणी केलेल्या संस्था/व्यक्तींचे नाव जागेचा तपशिल,क्षेत्र,भाडे इत्यादींची सविस्तर माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | संस्था/व्यक्ती | जागेचे स्थळ व क्षेत्र | भाडेप्रती वर्ष | कालावधी |
|---|---|---|---|---|
| अ) | औरंगाबाद महिला ज्युदो असोशिएशन,औरंगाबाद यांनी ज्युदोचे वर्ग चालविणे,ज्युदोच्या स्पर्धा घेणे,मुलेव तरुणांमध्ये ज्युडोची आवड निर्माण करणे इ.व्यायाम स्वरुप खुल्या जागेसंबंधातील वापरा करीता मागीतलेली आहे | ज्योतीनगर मंजुर रेखांकनातील न.भु.क्र.१६०४७ या खुल्या जागेच्या ३८४२.० चौ.मी.क्षेत्र पैकी वि नि नि १३-२-१३ नुसार २००.०चौ.मी. | रुपये १२६००.० | ३० वर्षे |
| ब) | स.स.श्री.गजानन बारवाल वार्ड क्र.६६ यांनी त्या वॉर्डाचे संपर्क कार्यालयाचे करीता जागा मागणी केलेली आहे. | स.न.४४८ मो.उस्मानपुरा येथील न भु क्र/ १४४९०/३ व १४४१३/१०२ या मिळकती लगतच्या नाल्या मधील जागेपैकी क्षेत्र ११४.१० चौ.मी. | रुपये ८२१५.०० | ५ वर्षे (नगरसेवक वार्ड क्र.६६ च्या पदाचे कालावधी करीता.) |
| क) | मराठवाडा ॲक्सीडेंट ॲंड बर्नस रिसर्च सेंटर,औरंगाबाद | स.न.१७ मालजीपुरा येथील नभुक्र.२०५९२ | रुपये ४५३०००.० | ३० वर्षे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | यांनी हॉस्पीटल करीता जागा मागणी केलेली आहे. | लगतच्या महापालिकेच्या मालकीची नाल्याची जागा पै.क्षेत्र २९४०.० चौ.मी. | | |
| ड) | जागेच्या वापरासंबंधाने सामाजिक व सांस्कृतिक वापरा करीत मागणी केलेली आहे. | नविन समर्थ नगर येथील नभुक्र.२०५९९/४८ व ४९ या मंजुर रेखांकनातील न.भु.क्र.२०५९२/४९/१११३ चौ.मी.खुल्या जागेपैकी १११.३ चौ.मी.जागा | रुपये १७१४०.० | ३० वर्षे |
| इ) | औरंगाबाद जिल्हा रायफल असोशिएशन,औरंगाबाद यांनी खुल्या जागेची मागणी रायफल व पिस्टल शुटींगच्या प्रशिक्षणा करीता केलेली आहे. | स.नं.६०,मो.गारखेडा येथील आदित्यनगर या मंजुर रेखांकनातील ४८९०.० चौ.मी.क्षेत्राचे खुल्या जागेपैकी २००.०० चौ.मी. | रुपये १०५००.० | ३० वर्षे |

उपरोक्त संस्था/व्यक्तींनी त्यांनी मागणी केलेल्या जागा वेगवेगळया वापरासाठी हव्या असल्याने त्या संदर्भाने त्या त्या प्रकरणी वेगवेगळया अटी व शर्ती राहतील.

यापैकी औरंगाबाद जिल्हा रायफल असोशिएशन औरंगाबाद यांनी मागणी केलेल्या जागेबाबत त्या रेखांकनातील (आदित्यनगर) समस्त रहिवाशांनी आक्षेप अर्ज देऊन सदर रेखांकनातील खुली जागा देण्यांबाबत हरकत घेतली असून व विरोध दर्शविलेला आहे.तसेच त्या संस्थेने मागणी केलेली संदर्भाधिन जागा निसर्ग मित्र मंडळास व योग विद्याधाम,औरंगाबाद या संस्थानीही सदर जागा विकसित करण्यासाठी मागितलेली आहे.या जागेबाबत घेतलेला आक्षेप व इतर दोन संस्थाची जागा मागणीची विनंती विचारात घेऊन सदर संस्थेस जागा द्यावी किंवा कसे याबाबत प्रथम निर्णय व्हावा लागेल.

**संवाद :**

श्री.रशिदखान (मामू) : कोणत्याही नगरसेवकास अशा प्रकारची मागणी करता येत नाही,मग बारवाल यांच्या नावाने ठरावयास नको होता.

डॉ.विजयकुमार मेहेर : एखादया नगर सेवकाने त्याच्या कार्यालयासाठी जागा मागणे गैर नाही,मात्र यात दाखविण्यांत आलेली लिजची मुदत कमी करणे शक्य आहे काय हे पडताळून पहावे.अशा जागा देत असतांना सल्लागार मंडळावर महानगरपालिकेस ठेवण्याबाबत संबंधितांना सुचना देण्यात याव्यात.

श्री.प्रकाश निकाळजे : अशा जागा देण्यापेक्षा महानगरपालिकेनेच अशा जागांवर शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधावेत.

मा.आयुक्त : औरंगाबाद रायफल्सचा प्रस्ताव विड्रॉ झालेला आहे.ही जागा नेचर लव्हर्स सोसायटीस देण्यात येत आहे.

मा.सभापती : श्री.बारवाल यांचा ठरावात उल्लेख आलेला आहे.मात्र या संदर्भाने सहाय्यक संचालक,नगररचना यांना पत्र देण्यात आलेले आहे,त्या त्या भागातील जनतेची मंजुरी असेल तर ओपन स्पेस मधील जागा अशा प्रकारच्या जागा एखादया संस्थेस सामाजिक उपक्रम चालविण्यासाठी देता येऊ शकतात,मात्र अशा जागा देतांना संबंधितांनी त्या भागातील परिसराचा विकासही करावयास हवा.या जागा ओपन स्पेस असल्याने महानगरपालिका अशा जागांवर शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधू शकणार नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील विविध संस्था/व्यक्तींनी महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या मंजुरा रेखांकना मधील नियमानुसार सोडलेल्या खुल्या जागा/महानगरपालिकेच्या मालकीच्या/नाल्याच्या आगांची सदर जागा विकसित करणेची मागणी केल्यानुसार प्रस्तावात नमुद केलेल्या अनुक्रमे अ,क व ड मध्ये नमूद केलेल्या संस्थांनी मागणी केलेल्या जागा सदर संस्थाना विकसित करणेसाठी विधी सल्लागार यांनी मंजुर केलेल्या इतर अटी व शर्ती संबंधाने करनाम्याची पुर्तता करुन घेऊन भाडयाने देण्यास व तसेच श्री.गजानन बारवाल यांचे नांव प्रस्तावातुन वगळुन सहाय्यक संचालक,नगररचना यांना देण्यांत आलेल्या पत्रा नुसार नावात बदल करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.औरंगाबाद जिल्हा रायफल असोशिएशन,औरंगाबाद यांचा प्रस्ताव रद्द करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४४/२० :**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,नविन प्रशासकीय इमारती मधील मुख्य सभागृह,स्थायी समिती सभागृह,मा.उपमहापौरांचे दालन व इतर पदाधिकाऱ्यांचे दालनांत "६ एम.एम.ॲक्रोलिक" कारपेट टाकणे आहे.

सदरील बाबीसाठी स्थानिक वर्तमान पत्रातून पाहिरात देण्यांत आली होती व निविदा मागविण्यात आल्या.प्राप्त निविदा दर सर्वात कमी मे.सजावट हॅडलुम यांचे रु.४३=७५प्रति स्क्वे.फुट प्रमाणे प्राप्त झाले.

वरील दर्शविण्यांत आलेल्या दालनात कारपेट टाकणेसाठी खर्च रुपये १.० लाखाचे वर जात असलेने प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नविन प्रशासकीय इमारत मधील मुख्य सभागृह,स्थायी समिती सभागृह,मा.उप महापौरांचे दालन इतर पदाधिकाऱ्यांचे दालनात "६ एम.एम.ॲक्रोलिक" कारपेट टाकणेसाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी मे.सजावट हॅडलुम यांचे ४३=७५ प्रति स्क्वे.फुट या दराने निविदा दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४५/२१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,विद्युत भांडार विभाग करीता टयुब,टयुब स्टार्टर व टयुब होल्डर खरेदी करण्यासाठी स्थायी समिती विषय क्रमांक ३६४/२३ दिनांक ६-१-९६ अन्वये रक्कम रु.१,१६,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे.

त्यानुसार सदर कामाकरीता निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण पाच कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली.प्राप्त निविदा पत्रके दिनांक १-२-९६ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | साहित्याचे नांव | एजन्सीचे नांव | | |
|---|---|---|---|---|
| | | मे.मेहता ट्रेडर्स | मे.पगारीया ट्रेडर्स | मे.सत्य इलेक्टीकल्स |
| | | (प्रती नग) | (प्रति नग) | (प्रति नग) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | ४० वॅट टयुब | ३९=९० | ३९=०७ | ३९=०० |
| २ | टयुब स्टार्टर | ८=२५ | ८=०८ | ८=०० |
| ३ | टयुब होल्डर | १०=१० | १०=१० | १०=०० |

वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे तिनही ॲटम करीता मे.सत्य इलेक्ट्रीकल्स यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहेत.

तरी मे.सत्य इलेक्ट्रीकल्स यांच्या कडून तक्त्यात दर्शविल्या दरा प्रमाणे साहित्य खरेदीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विद्युत भांडार विभाग करीता टयुब,टयुब स्टार्टस व टयुब होल्डर खरेदी करणेसाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व वरील तक्त्यात दर्शविल्या दराप्रमाणे साहित्य खरेदी करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४६/२२ :**

औरंगाबाद महानगरपालिकेस रुपये ८२.५० लाखाचे सिमेंट खरेदी करणे करीताचा ठराव दि.१८-११-९५ रोजीच्या सर्वसाधारण सभेत विषय क्र.४ अन्वये चर्चा होऊन मंजुर करण्यांत आला त्यावेळी महानगरपालिका भांडारात फक्त २०९ गोणी सिमेंट शिल्लक असल्याने मा.आयुक्तांची दि.१८-११-९५ लाच तात्काळ निविदा काढण्याची परवानगी घेऊन दिनांक २२-११-९५ ला वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द केली तेव्हा चार निविदा विकल्या गेल्या व त्या ७-१२-९५ रोजी स्विकारण्यांत येऊन त्याच दिवशी उघडण्यात आल्या त्यांचे दर खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) सी.सी.आय. | रु.२४४६-२५/- | प्रतिटन |
| २) व्ही.अे.ट्रेडिंग | रु.२६००/- | प्रतिटन |
| ३) धारा सिमेंट | रु. २७००/- | प्रतिटन |
| ४) माणिकगड सिमेंट | २८००/- | प्रतिटन |

तुलनात्मकदृष्टया कमी दर सी सी आय कंपनीचे होते त्याहून कमी दराने पुरवठा करण्यांस तयार आहात का अशी विचारणा करणेस्तव मा.आयुक्त यांनी दि.११-१२-९५ रोजी आदेशित केले असता,दिनांक १३-१२-९५ रोजी चर्चेसाठी बोलावले.सी.सी.आय यांनी चर्चा करुन दि.१४-१२-९५ रोजी पत्राने दर कमी करण्यांस असमर्थता दर्शविली.त्याचप्रमाणे त्यांनी दिलेल्या दरास दि.२१-१२-९५रोजी स्थायी समितीस मंजुरी मिळाली त्याचप्रमाणे त्यांना करारनामा करणेस्तव कळवले असता,पत्रव्यवहार करुन सी सी आय कंपनीने एकदा ९०% बील हे तीन दिवसांत व उर्वरित १०% सात दिवसांत सिमेंट पुरवठा केल्या नंतर असे कळवले त्यास कार्यालयाने मंजुरी दिल्यानंतर पुन्हा पत्राने सी.सी.आय.कंपनीने ९०% ॲडव्हान्स पेमेंट दिले तरच पुरवठा करू नसता नाही असे पत्र पाठविले त्याचे दर हे दि. ३१-१२-९५ पर्यंतच बंधनकारक होते.परंतु त्यांनी पत्र व्यवहारात नाहक वेळ घालवल्यामुळे व दिलेल्या अटी प्रमाणे पुरवठा न केल्याने दि.१३-१-९६ रोजी मा.आयुक्तांनी निविदे सोबत सी.सी.आय.कंपनीने भरलेली बयाना रक्कम जप्त केली व तसे सी.सी.आय.कंपनीस कळविले आहे.तद्‌नंतरच लगेच फेर निविदा (दुसरी वेळ) दिनांक १९-१-९६ च्यावर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली,त्याप्रमाणे दि.२५-१-९६ रोजी तीन निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे

१) सी.सी.आय. रु. २९६०/- प्रति मे.टन १४८/- प्रति गोणी
२) रुबी ट्रेडर्स रु. ३१८८/- प्रति मे.टन १५९.४० प्रति गोणी
३) सी.टी.पारीख रु.३२१०/- प्रति मे.टन १६०.५० प्रति गोणी

तसेच वरील तीन निविदे पैकी फक्त रुबी ट्रेडर्सने निविदे सोबत अनामत रक्कम भरलेली नाही.वरील पैकी सर्वात कमी दर सी.सी.आय.कंपनीचे असून (रु.१४८/- प्रती गोणी) त्यांनी अनामत रक्कम भरलेली नाही.त्या करीता मा.आयुक्तांनी दिनांक १-२-९६ रोजी चर्चेसाठी बोलवावे असे आदेशित केले.रुबी ट्रेडर्स हे चर्चेसाठी बोलवावे असे दि.३१-१-९६ प्रमाणे ठरले.दि.७-२-९६ रोजी सी.सी.आय.कंपनीशी मा.आयुक्तांनी चर्चा केली असता त्यांनी रु. १४८/- प्रति गोणी दिलेल्या दरात सिमेंट पुरवठा करण्यास तयार असल्याचे सांगितले कार्यादेश दिल्यानंतर एफ.एस.डी.भरण्यांस असल्याचे सांगितले.

तसेच सी.सी.आय.ने दि.८-२-९६ रोजी बयाना रक्कम भरली.जी निविदे सोबत भरणे आवश्यक होते.

दि.८-२-९६ रोजीच मे.रुबी ट्रेडर्स यांनी सी.सी.आय.कंपनीचे दरात म्णजेच रु. १४८/- प्रति गोणी प्रमाणे देण्यास तयार असल्याचे पत्र दिले आहे,तसेच पेमेंट मिळाल्यास त्यांच्या अटी खालील प्रमाणे.

१) ॲडव्हान्स पेमेंट दिल्यास रु.१.५०/- प्रति गोणी सुट
२) सिमेंट पुरवठा केल्यानंतर बील दिल्यानंतर तीन दिवसाचे आत पेमेंट केल्यास रु.१/- प्रति गोणी सुट देण्यांत येईल.
३) दहा दिवसांत पेमेंट न केल्यास २४% प्रति वर्ष प्रमाणे व्याज आकारण्यात येईल.करीता कोणाकडून सिमेंट घ्यावे या करीता आदेशास्तव सादर.

**संवाद :**

मा.आयुक्त : यात दोन मुख्य कंपन्या आहेत एक सी.सी.आय. व दुसरी ए.सी.सी.म्हणजे रुबी कंपनीचा मुळ रेट होता रु.१५९/- प्रति गोणी याच कंपनीने टेंडर सोबत ईएमडी भरलेली नव्हती त्यावेळी सी.सी.आय कंपनीने इएमडी भरलेली नसल्याने रुबी ट्रेडर्स यांचे रेट कमी करण्यास तयार नव्हते सी.सी.आय मात्र १४८/- रुपये प्रमाणे सिमेंट पुरवठा करण्यास तयार होती.महापालिकेचे हित लक्षात घेता सी.सी.आय कंपनीने इएमडी भरलेले नसले तरी त्यांना पुरवठा आदेश देण्याचे निश्‍चित झाले असता रुबी ट्रेडर्स यांनी पत्र दिले की,ते ही रुपये १४८/- प्रति गोणी प्रमाणे सिमेंट पुरवठा करण्यास तयार आहेत.रुबी ट्रेडर्स यांनी आक्षेप घेतला की टेंडर सोबत सी सी आय कंपनीने इएमडी भरलेले नाही त्यामुळे टेंडर नामंजुर व्हावे.आज सी सी आय १४७/- प्रति गोणी प्रमाणे सिमेंट पुरवठा करण्यास तयार आहे.

डॉ.विजयकुमार मेहेर : टेंडर भरतांनाच इएमडीचे पैसे स्विकारण्यात यावेत.

मुख्य लेखा परिक्षक मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीप्रमाणे इएमडी दुसऱ्या टेंडरसाठी वापरता येत नाही.

मा.आयुक्त : सी.सी.आय.शासकीय कंपनी असली तरी त्यांनी टेंडर भरतांनाच त्यात ही शासकीय कंपनी असल्याने त्यास इएमडी भरण्याची आवश्चयकता नाही असे कळवावयास हावे होते.टेंडर उघडल्या नंतर त्यावर विचार करता येत नाही.यासाठीच पुर्वी सी.सी.आय.कंपनीचे रुपये ८२,०००/-/ईएमडी जप्त झालेले आहे.

मा.सभापती : शहर अभियंता यांनी रुबी ट्रेडर्स यांच्याशी परत वाटाघाटी कराव्यात व सी सी आय रु. १४७/- प्रति गोणी प्रमाणे सिमेंट पुरवठा करण्यास तयार असेल तर रुबी ट्रेडर्स यांच्या कडून सिमेंट खरेदी करण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या नुसार रु.८२.५० लाखाचे सिमेंट मे.रुबी ट्रेडर्स यांच्याकडून रु.१४८/- प्रति गोणी दराने खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी दिली जाते तथपि रुबी ट्रेडर्स यांना परत एकदा वाटाघाटीसाठी बोलावण्यात यावे व रुपये १४७/- प्रति गोणी प्रमाणे सिमेंट खरेदी करण्याचा प्रयत्न करण्यात यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४७/२३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,आंबेडकर नगर येथे १९९२-९२ मध्ये २५० मी.मी.जलनिःसारण वाहीनी टाकण्यांत आलेली आहे व हे काम मार्च ९३ मध्ये पुर्ण करण्यांत आलेले आहे.सदर जलनिःसारण वाहीनी सुमारे २० महिने वापरात नव्हती. तेव्हा ड्रेनेज लाईन सुरु झाली त्यावेळी लाईन चोकअप होत होती.बऱ्याच वेळा चोकअप काढण्यांत आले अनेक वेळा जेटींग व व्युक्रम एम्टीअर याने साफ करण्यांत आले व आवश्यक ती दुरुस्तीचे काम केले परंतु सदर जलनिःसारण वाहीनी नेहमी चोकअप होण्याचे कारण शोधले असता या ड्रेनेज लाईनला विरुध्द दिशेने उतार असल्यामुळे ड्रेनेज लाईन तुंबल्यामुळे प्रकार घडत असल्याने या भागातील जलनिःसारण वाहीनी योग्य उतार देवून नव्याने टाकण्याचा प्रस्तावित करण्यात आले असता सदर प्रकरणांत संबंधित कनिष्ठ /शाखा अभियंता /व उप अभियंता यांचे कडून कामात निष्काळजीपणा झाल्यामुळे त्यांचेकडून याचा खर्च वसुल करण्याबाबत मा.आयुक्तांनी आदेशित केल्याने सुधारीत अंदाजपत्रक रु.३,२५,२९०=०० तयार करण्यांत आले असून संबंधित शाखा अभियंता व उप अभियंता यांच्या कडून वरील रक्कम वसुल करणे बाबत मा.आयुक्तांनी दि.८-२-९६ रोजी आदेशित केल्याप्रमाणे प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.तसेच सदर काम करुन घेण्यासाठी रु.३,२५,२९०=०० चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

कार्यकारी अभियंता : या लाईनचे काम मार्च ९३ मध्ये पुर्ण करण्यांत आले ऑक्टोंबर,९४ मध्ये ही लाईन सुरु झाली त्यावेळी लाईन चोकअप होण्याचे प्रकार वाढत गेले.प्रयत्न करुनही ही लाईन सुरु होवू शकली नाही.त्यानंतर हया लाईनच्या लेव्हल्स घेतल्या गेल्या तेव्हा लक्षात आले की,लाईनच्या लेव्हल्स घेतल्या गेल्या तेव्हा लक्षात आले की,लाईनच्या लेव्हल बरोबर नसल्याने पाण्याचा निचरा बरोबर हात नाही.

मा.सभापती : लाईन लेव्हल पाहण्यापुर्वी तेथे काही करण्यांत आले होते काय?

कार्यकारी अभियंता : आंबेडकर नगर मध्ये कन्व्हर्शनचे काम करुन संडासाचे कनेक्शन्स या लाईनला जोडण्यात आले.तेव्हा पासुन चोकअपचे प्रमाण वाढलेले आहे.एखादे काम चालू असतांना त्या कामावर कनिष्ट अभियंत्याची पुर्णपणे निगरानी असते काम चालू असतांना उप अभियंता वारंवार कामाची पाहणी कार्यकारी अभियंता यांच्या कडून केली जाते.व नंतर देयके अंतिमतः अदा केली जातात.

मा.सभापती : कामाच्या दोषा बाबत एखादया कनिष्ट अभियंत्यास जबाबदार पकडता येणार नाही.देयके अदा करण्यापुर्वी संबंधित कार्यकारी अभियंता यांनी कामाची पहाणी करावयास पाहिजे.त्याशिवाय देयके अदा केली जाऊ शकत नाहीत.कनिष्ट अभियंता दैनंदिन कामाची पाहणी करावयास पाहिजे त्याशिवाय देयके अदा केली जाऊ शकत नाहीत.कनिष्ट अभियंता दैनंदिन कामाची पाहणी करत असला तरी उप अभियंता कार्यकारी अभियंता हे जबाबदारीतून मुक्त होवू शकत नाही.

मा.आयुक्त : काम संपल्यानंतर देयक अंतिमतः अदा करत असतांना काम सोशिफिकेशन प्रमाणे झालेले आहे असे प्रमाणपत्र शेवटी कार्यकारी अभियंता यांच्याच स्वाक्षरीने जात असते.काम चालू असतांनाच ५ ते १० टक्के पाहणीत वेगवेगळया ठिकाणच्या लेव्हल्स घेतल्या गेल्या असत्या तर त्याच वेळी फॉल्ट लक्षात आला असता.कामाची पाहणी केली जात नाही ही सत्य बाब आहे.

श्री.कंवरसिंग बैनाडे : आंबेडकर नगर भागात लाईन टाकली तेव्हा पासून या भागातील लोक परेशान आहेत.

श्री.गौतम खरात : हे काम होत असतांना शासनाचे दोन अधिकारी महापालिकेत येऊन गेले अशा कामाबाबत शासनाचे काही टेक्नीकल डायरेक्शन्स आहेत का? जे अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर कार्यवाही करण्यांत यावी.

कार्यकारी अभियंता : हे काम होत असतांना कनिष्ठ अभियंता,श्री.विटेकर,उप अभियंता श्री.रोडे व कार्यकारी अभियंता,श्री.राजभोज हे कार्यरत होते.दैनंदिन कामावर कनिष्ट अभियंत्याची पाहणी असते.शंभर टक्के पाहणी संबंधित विभागाचे उप अभियंता करतात तर पाच टक्के पाहणी कार्यकारी अभियंता यांच्या कडून केली जाते.

मा.सभापती : अशा प्रकारच्या चुकांसाठी व कनिष्ट अभियंत्यास जबाबदार धरता येणार नाही तो कामाची पाहणी करत असला तरी उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी वेळोवेळी कामाची पाहणी करुन आपले अभिप्राय नोंदवावयास हवेत.तक्रारी आल्या नंतर ताबडतोब कामाची पाहणी करावयास हवी होती.मात्र वेळीच त्यांची दखल घेतली गेली नाही.

मा.आयुक्त : कनिष्ट अभियंता,उप अभियंता,कार्यकारी यांनी कामाची पाहणी कशा प्रकारे कराव व देयकी कशी अदा करावीत याबाबत काही गाईड लाईन्स असल्या तरी महापालिका स्वत:चे नियम तयार करु शकते.अतिम देयक अदा करण्यापुर्वी कार्यकारी अभियंता यांनी कामाची पाहणी करावयास पाहीजे.

श्री.महादेव सुर्यवंशी : आंबेडकर नगरमध्ये १९९१-९२ मध्ये ही लाईन टाकण्यात आली.लाईन टाकल्या नंतर रोड क्रासचे काम वेळेवर झाले नाही.कन्व्हर्शनचे काम ९३ मध्ये चालु झाले.जेव्हा ही लाईन टाकण्यात आली त्या वेळी १५० मेनहोल या लाईनवर होते आज तेथे ८०० मेनहोल आहेत.कन्व्हर्शनचे काम करत असतानाच रोड क्रासचे लाईन टाकावयास पाहिजे होती.रोड क्रॉसिंगचे काम झालेले नसतांनाही साफसफाई कामगारांनी मेन होलमध्ये गटारीचे पाणी त्यात सोडले.यामुळक लाईन चोकअप झाली.सर्व प्रकारचे प्रयत्न करुनही हे चोकअप निघू शकले नाही या पुर्ण लाईनचे काम दोन भागात झालेले असल्याने नेमक्या कोणत्या लाईनच्या लेव्हल बरोबर नाहीत याचा कोठेही उल्लेख नाही.रोड क्रॉसिंगचे काम वेळीच झाले असते तर हा प्रश्नच

उद्‌भवला नसता,इतर विभागातून आलेले अधिकारी बरोबर काम करत नाहीत त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होते.

मा.आयुक्त : आंबेडकर नगर मधील ड्रेनेज लाईनला बरोबर लेव्हल नाहीत हा मुख्य मुद्दा आहे त्यावेळी काम करणाऱ्या तीन पैकी दोन अधिकारी आज महापालिकेत कार्यरत नाहीत ते परत त्यांच्या मुळ खात्याकडे प्रत्यावर्तित झालेले आहेत,या संदर्भाने सदस्य सचिव,जलनि:सारण मंडळ यांच्याशी पत्र व्यवहार चालू आहे.दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कार्यवाही केली जाईल.किमान यापुढे तरी असे घडू नये याची जबाबदारी घ्यावयास पाहिजे.अधिकाऱ्यांनीही वेळोवेळी कामाची पाहणी केली गेली तर प्रश्न उद्‌भवत नाहीत.उद्‌भवलेल्या प्रश्नावर वेळीच कार्यवाही करता येते.

मा.सभापती : ठरावास मंजुरी देत असतांनाच सूचना करण्यात येते की,संबंधित उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्या कडुन पैसा वसुल करण्यांत यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आंबेडकर नगर येथे २५० मी.मी. जलनि:सारण वाहिनी टाकणेचे कामासाठी, तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.३,२५,२९०=०० चे सुधारीत अंदाजपत्रकास तसेच पुर्वी करण्यांत आलेल्या कामात दोषी अधिकाऱ्या विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यांत आलेल्या कामात दोषी अधिकाऱ्या विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४८/२४ :**

सचिव,स्वच्छता समिती यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दिनांक ९-२-१९९६ रोजी स्वच्छता समितीची बैठक स्वच्छता समितीचे अध्यक्ष मा.गिरजाराम हाळनोर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

यामध्ये पुणे,मुंबई,कलकत्ता या शहरामध्ये शहरातील जमा होणाऱ्या कचऱ्या पासून विज निर्मिती करणे बाबत प्रायोजित तत्वावर सुरवात करण्यांत आलेली आहे.त्या कामाची माहिती घेणे करीता स्वच्छता समितीच्या सदस्यांना वरील ठिकाणी जाणे करीता अंदाजे रुपये २०,०००/- खर्च अपेक्षित आहे.प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि.९-२-१९९६ रोजी स्वच्छता समितीच्या संपन्न झालेल्या बैठकीत स्वच्छता समितीचे अध्यक्ष मा.गिरजाराम हाळनोर व इतर सदस्यांना कचऱ्या पासुन विज निर्मिती करणे बाबतच्या कामाची माहिती घेणे करीता पुणे व मुंबई या ठिकाणी जाणे करीता अंदाजे रु.२०,०००/- चे खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४९/२५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,श्री.श्यामसुदंर त्रिंबकराव देशपांडे लिपिक नगर परिषद वैजापुर यांना औरंगाबाद महानगरपालिकेकडे वेतन श्रेणी रु.९५०-१५००/- या वेतनश्रेणीतील महानगरपालिकेमध्ये सेवा वर्ग सुरु करुन घेण्यात यावी.त्यांची सेवा वर्ग झाल्या नंतर त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे नियमा अंतर्गत अटी व शर्ती लागे होतील.सेवा वर्ग करतांना त्यांना खालील बाबींची पुर्तता करावी लागेल.

१) नगर परिषद वैजापुरमध्ये झालेल्या सेवे बद्दल निवृत्ती वेतन अंशदानाची रक्कम मनपा फंडामध्ये स्वतः भरणा करण्याकरीता रु. १०/- च्या बाँडपेपरवर प्रतिज्ञा पत्र तयार करुन द्यावे.
२) नगर परिषद वैजापुर येथून कार्यमुक्त होतांना सेवा पुस्तकामध्ये व एल.पी.सी.मध्ये निवृत्ती वेतन अंशदान स्वतः भरणार असल्याबद्दल नोंद करुन घ्याव्यात.
३) महानगरपालिकेमध्ये रुजू होते वेळी निवृत्ती वेतन अंशदानाची रक्कम महानगरपालिका फंडामध्ये जमा करण्यांत यावी.
४) महानगरपालिकेमध्ये कामावर रुजू होतांना नगर परिषद वैजापुर यांचे कडून कार्यमुक्त झाल्याचे प्रमाणपत्र व तत्संबंधीचे सर्व कागदपत्रे महानगरपालिकेकडे कर्ग करावीत.
५) महानगरपालिकेकडे ते ज्या तारखेपासुन त्यांची सेवा जेष्ठता ग्राहय धरली जाईल.त्याबद्दल लेखी शपथपत्र रु. १०/- च्या बाँडपेपरवर द्यावे.
६) महानगरपालिकेमध्ये त्यांची सेवा वर्ग झाल्या नंतर परिषद वैजापुर मध्ये त्यांना मिळणाऱ्या वेतनास (मुळ) संरक्षण दिले जाईल.त्यानुसार त्यांची वेतन निश्चिती रु. ९५०-१५०० च्या वेतन श्रेणीत करण्यांत येईल.

उपरोक्त अटीप्रमाणे श्री.श्यामसुंदर त्रिंबकराव देशपांडे यांची सेवा औरंगाबाद महानगरपालिके मध्ये वर्ग करुन घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

डॉ.विजयकुमार मेहेर : इतर खात्याकडून कर्मचाऱ्यांच्या सेवा हस्तांतरीत करण्याची गरज का भासावी.महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांच्या सेवाही इतर महानगरपालिकांकडे हस्तांतरीत करण्यात याव्यात असा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यांत यावा.

मा.सभापती : महापौर परिषदेत अशा प्रकारचा प्रस्ताव चर्चीला गेला आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.श्यामसुंदर त्रिबंकराव देशपांडे लिपीक,नगर परिषद वैजापुर यांना औरंगाबाद महानगरपालिकाकडे वेतनश्रेणी रुपये ९५०-१५०० या वेतन श्रेणीत महानगरपालिका मध्ये सेवा वर्ग करुन घेण्यात येते.त्यांची सेवा वर्ग झाल्यानंतर त्यांना मुंबई,प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे नियमांअंतर्गत अटी व शर्ती लागू होतील.प्रस्तावात दर्शविलेल्या अटी व शर्ती प्रमाणे श्री.श्यामसुंदर त्रिंबकराव देशपांडे यांची सेवा औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये वर्ग करुन सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५०/२६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.पहाडसिंगपुरा,स्लम येथील पुर्नडांबरीकरण करणेबाबत कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसुची नुसार रु. २२४२०१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील कामाचे खर्च पुर्नडांबरीकरण रु.१००.०० लाख या शिर्षकातून करण्यांत येईल.सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दिनांक ९-२-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदर कामाकरीता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रकास रु.२२४२०१ यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.पहाडसिंगपुरा स्लम येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु.२२४२०१/- चे अंदाजपत्रकास तसेच

सदर कामाचा खर्च पुर्नडांबरीकरण रु.१००.०० लाख या शिर्शकातून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५१/२७ :**

मा.सभापती यांनी प्रस्तावित केले की,सन १९९३ मध्ये तत्कालिन स्थायी समितीचे सभापती ॲड.इगबालसिंग गिल यांनी लोकनियुक्त सदस्यांचा कालावधी संपण्यापुर्वी म्हणजेच एप्रिल/मे १९९३ मध्ये महापालिकेतील तत्कालिन सर्व ६० सन्माननीय सदस्यांना घडयाळांचे वाटप करण्यांत आले होते.सदरील घडयाळांची खरेदी मे.विपुल असोशिएट,सराफा रोड,औरंगाबाद यांचेकडून करण्यांत आलेली होती.परंतु काही अपरिहार्य कारणामुळे संबंधिताचे घडयाळाचे देयक अदा करण्याबाबतचा ठराव स्थायी समितीमध्ये घेता आला नाही व तत्पुर्वी लोकनियुक्त सदस्यांचा कालावधी संपुष्टात आल्यामुळे संबंधिताचे देयक रक्कम रु.१,३५,८९०/- अदा करण्यांत आलेले नाही.त्या अनुषंगाने संबंधिताने त्यांचे पत्र दि.११-१-९६ अन्वये पत्र व देयक देऊन देयक अदाई बाबत विनंती केलेली आहे.तसेच त्यासोबत ॲड.इगबालसिंग गिल,माजी सभापती स्थायी समिती यांनीही संबंधितांचे देयक अदाई करणे बाबतचा ठराव स्थायी समितीमध्ये घेण्याबाबत विनंती केलेली आहे.तसेच मा.श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय,विरोधी पक्षनेता यांनीही दि.१०-१-९६ रोजी पत्र देऊन संबंधिताचे देयक अदाई बाबत विनंती केलेली आहे तरी मे.विपुल असोशिएट्स यांचे रक्कम रु.१,३५,८९०/- (एक लाख पस्तीस हजार आठशे नव्वद रुपयें) अदा करणे बाबत मंजुरी देण्यात येते.प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९३ मध्ये तत्कालीन स्थायी समितीचे सभापती,ॲड.इगबालसिंग गिल यांनी लोकनियुक्त सदस्यांचा कालावधी संपण्यापुर्वी म्हणजेच एप्रिल/मे,१९९३ मध्ये महापालिकेतील तत्कालीन सर्व ६० स.सदस्यांना घडयाळांचे वाटप करण्यात आले होते.सदरील घडयाळे रक्कम रु.१,३५,८९०/- (एक लाख पस्तीस हजार आठशे नव्वद रुपयें) मे. विपुल असोशिएट,सराफा रोड,औरंगाबाद यांचे कडून खरेदी करण्यांत आलेली असल्यामुळे रक्कम रु.१,३५,८९०/- चे खर्चास तसेच सदर रक्कम मे.विपुल असोशिएट्स यांना अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

"राष्ट्रगीतानंतर ५.१५ वाजता कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

स्वाक्षरीत /-
नगर सचिव,
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत /-
सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**अर्थसंकल्पीय स्थायी समिती इतिवृत्त.**

**दिनांक.१९-२-९६ रोजी मा.सभापती,स्थायी समिती, श्री.प्रदीप कुमार जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिका,औरंगाबादच्या सन १९९५-९६ सुधारीत अंदाजपत्रकावर विचार विनिमय करण्यांसाठी अर्थसंकल्पीय स्थायी समिती सभेचे आयोजन करण्यांत आले होते.सभेस दुपारी ३.०० वाजता सुरुवात झाली.सभेस निम्ननिर्दिष्ट स.सभासद उपस्थित होते.तसेच मनपा/विभाग/शाखा प्रमुखही उपस्थित होते**

१) श्री.अब्दुल रशिदखान (मामू)
२) श्री.सुभाष कच्छवाह.
3) श्री.महादेव सुर्यवंशी.
४) श्री.प्रभाकर विधाते.
५) श्री.हमीदउद्दीन ताबा.
६) श्री.विजयकुमार मेहेर.
७) श्री.भागवत कराड.
८) श्री.प्रकाश निकाळजे.
९) कु.माया लाडवाणी.
१०) सौ.पद्मा शिंदे.
११) सौ.रजनी जोशी.
१२) श्री.गौतम खरात.
१३) श्री.सुदाम सोनवणे.
१४) श्री.कंवरसिंग बैनाडे.

सभेत सर्वप्रथम मा.आयुक्त,श्रीके.बी.भोगे यांनी महानगरपालिका औरंगाबादचे १९९५-९६ चे सुधारीत अंदाजपत्र व १९९६-९७ चे मुळ अंदाजपत्रक मा.सभापती,स्थायी समिती,श्री.प्रदिपकुमार जैस्वाल यांना सादर केले.याच प्रसंगी स्थायी समिती सभासदांचे पुष्प देवून सत्कार करण्यांत आला मा.आयुक्तांनी सदरच्या अर्थसंकल्पावर आपले मनोगत व्यक्त केले.

मा.सभापती : मा.आयुक्तांनी स्थायी समितीस १९९५-९६ चे सुधारीत अर्थसंकल्प व १९९६-९७ चे मुळ अंदाजपत्रक सादर केलेले आहे.यावर प्रशासनाच्या वतीने मा.आयुक्तांनी आपले मनोगतही व्यक्त केलेले आहे.ते हा अर्थसंकल्प मंजुर करण्यांच्या संदर्भाने चर्चा केल्यास त्यावर सर्वमताने निर्णय घेता येईल.

**विषय क्र. ४५२/१ :**

सन,१९९६-९७ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर विचार करणे बाबत.

**संवाद :**

मा.सभापती : मा.आयुक्तांनी स्थायी समितीस १९९५-९६ चे सुधारीत अर्थसंकल्प व १९९६-९७ चे मुळ अंदाजपत्रक सादर केलेले आहे.यावर प्रशासनाच्या वतीने मा.आयुक्तांनी आपले मनोगतही व्यक्त केलेले आहे.ते हा अर्थसंकल्प मंजुर करण्यांच्या संदर्भाने चर्चा केल्यास त्यावर सर्वमताने निर्णय घेता येईल.

## (१) जकात कर

डॉ.विजयकुमार मेहेर : शेतीचा व्यवसाय हा तोटयात चालणारा व्यवसाय आहे.शेतकऱ्याची आजची परिस्थिती पाहता अन्नधान्य व तेलबिया यावरती जकात आकारण्यात येऊ नये.शेतकऱ्यांऐवजी व्यापाऱ्यांकडून जकात वसूल करण्यांत यावी.

डॉ.भागवत कराड : शेतकऱ्यांकडून येणाऱ्या मालावरती ठरावीक वजनापर्यंत जकातील सुट देण्यांत यावी.

श्री.प्रभाकर विधाते,श्री.प्रकाश निकाळजे : यावर्षी कमी पडलेल्या पावसामुळे अन्नधान्यही बरोबर आलेले नाही.यावर जकात आकारल्यास अन्नधान्याचे भाव वाढू शकतात.

श्री.गौतम खरात : महाराष्ट्रात सध्या अवर्षणग्रस्त परिस्थिती आहे.गहू,ज्वारी या नित्य वापरातील बाबी वगळता तांदळा सारख्या मालावर जकात आकारण्यांत हरकत नसावी.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : अशा प्रकारे जकात आकारल्यास त्याचा भार प्रत्यक्षरित्या शेतावर पडेल.याऐवजी व्यापाऱ्या कडून जकात कर वसूल करण्यात यावी.

श्री.महादेव सुर्यवंशी : बाजार भाव हे नेहमीच अस्थिर असतात ही बाब लक्षात घेता,जकात नेमक्या कोणत्या भावावर आकारली जाईल याचाही प्रथम खुलासा व्हावयास हवा.अन्यथा जकात आकारणी व भाव यावरुन अनेक प्रश्न नंतर निर्माण होऊ शकतात.

श्री.सुदाम सोनवणे : शेतकऱ्याकडून येणारा माल साधारणतः बेलगाडीतून आणला जातो तेव्हा बैलगाडीतून येणाऱ्या मालावरती जकात माफ करण्यांत यावी अन्य साधनांनी येणाऱ्या मालावरती जकात आकारण्यांत यावी.

सौ.रजनी जोशी : तंबाखु ही सर्वसाधारणपणे चैनीची बाब आहे.तेव्हा त्यावर जास्त जकात आकारण्यांस हरकत नसावी.तसेच मद्य व बियर तयार करण्यांसाठी येणाऱ्या कच्चा माल व स्पिरीट यावरही जकात पाठविण्यांत हरकत नसावी.

मा.सभापती : स.सभसदांच्या भावना लक्षांत घेता प्रशासनातर्फे जकात कराच्या संदर्भाने सादर करण्यात आलेला प्रस्ताव खालील प्रमाणे सर्वानुमते मंजुर करण्यांत येतो.

| अ.क्र. | वस्तुंचे भाव | प्रंचलीत दर | सर्वानुमते मंजुर करण्यात येत असलेले दर. |
|---|---|---|---|
| १) | सर्व प्रकारचे लाकूड | रु.१५ प्र.टन | किंमतीच्या २% |
| २) | अन्नधान्य व तेलबीया | रु.५ प्रति टन | रु.१० प्र.टन |
| ३) | तांदुळ | रु.५ प्रति टन | किंमतीच्या १ टक्का |
| ४) | तंबाखु | रु.५ प्र.टन | किंमतीच्या २ टक्के |
| ५) | कपास | रु.१५प्र.टन | रु.२० प्र.टन |
| ६) | शुध्द घी | रु.१० प्र.क्विंटल | किंमतीच्या १ टक्का |
| ७) | रासायनिक खते | रु.२ प्र.टन | किंमतीच्या ५ टक्के |
| ८) | मद्य,बियर तयार करण्यासाठी लागणारा सर्व प्रकारचा कच्चा माल आणि स्पिरीट व अल्कोहल | ५% | ७% |
| ९) | सर्व प्रकारचे खनिज तेल,पेट्रोल, डिझेल,लुब्रिकंटस,ऑईल, इंधन | ०.५% | १% |

| | | | |
|---|---|---|---|
| १०) | सर्व प्रकारचे लोखंड आणि स्टील चॅनेल,बार,सळया प्लेट इ. | १.५०% | २% |
| ११) | सर्व प्रकारचे लोखंडी आणि स्टील स्क्रॅप मटेरीयल | रु.२० प्र.टन | किंमतीच्या १% |
| १२) | सर्व प्रकारचे मशनरी पार्टस,इलेक्ट्रीक गुठस,इलेक्ट्रीक मशनरी टूल्स,वॉशिंग मशिन,फ्रिज,कुलर,एअर कंडीशनर,लिफ्ट मटेरियल. | २% | २.५०% |
| १३) | सर्व प्रकारचे दुचाकी तीनचाकी चारचाकी स्वयंचलीत वाहने आणि त्याचे सुटे भाग | १% | १.५०% |
| १४) | औषधे व बी-बीयाणे | --- | --- |
| १५) | कापड | १.२५% | २% |

शेतीसाठी वापरण्यांत येणारी औषधी व बी-बीयानांवरती महाराष्ट्रात कोठेही जकात आकारली जात नाही.तेव्हा बी-बीयाणे व शेतीसाठी वापरली जाणारी औषध जकात करापासून सर्वानुमते मुक्त केली जातात.

**(अ) ट्रान्झीट फी मध्ये वाढ करणे.**

मा.सभापती : शहरात प्रवेश करणाऱ्या आणि शहरा बाहेर जाणाऱ्या वाहनांवरती प्रशासनातर्फे सादर करण्यात आलेल्या ट्रान्झीट फी वाढीचा प्रस्ताव रु.२० ऐवजी रु.१५ प्रति वाहन या दराने सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**(ब) शहरात वापरल्या जाणाऱ्या विद्युतवर जकात कर लावणे.**

मा.सभापती : महानगरपालिका हद्दीत वापरल्या जाणाऱ्या विद्युतवरती २% दराने जकात आकारण्याबाबत प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यांत येतो.

**(२) मालमता कर**

मा.आयुक्त : मालमत्ता कराच्या मागणीच्या मानाने वसुलीचे प्रमाण अत्यल्प आहे.कर वसुलीचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना जर प्रोत्साहनपर बक्षिसे दिली गेली तर वसुलीत लक्षणीय वाढ होईल.हा उद्देश समोर ठेवून सदरचा प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे.

मा.सभापती : कर वसुलीचे प्रमाण पाहता प्रसाना तर्फे निर्धारित वेळेच्या आत मालमत्ता कराच्या पुर्ण रक्कमेचा भरणा करणाऱ्या नागरिकांना देण्यांत यावयाच्या सवलतींचा प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येतो तथापी कराच्या वसुलीचे प्रमाण पाहता ६०% ऐवजी ५०% पेक्षा अधिक कराची वसुली करणाऱ्या कर निरिक्षकांस त्यापेक्षा अधिकच्या वसुलीच्या रकमेच्या १% एवढी रक्कम प्रोत्साहन रुपाने बक्षिस म्हणून देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**(३) पाणी पट्टी**

श्री.महादेव सुर्यवंशी : शहरामध्ये विशेषतः नारेगांव सारख्या भागात होणारा अपुरा पाण्याचा पुरवठा पाहता प्रस्तावित दरवाढ रद्द करण्यांत यावी.

डॉ.विजयकुमार मेहेर : पाणी पुरवठयात महानगरपालिकेस होणारा तोटा पाहता पाणी पट्टीत वाढ होणे अपरिहार्य आहे.अन्यथा हा तोटा दरवर्षी वाढतच जाईल.तथापि ७०० ऐवजी घरगुती वापरासाठी रु.६०० पाणी पट्टी आकारण्यांत यावी.

श्री.प्रकाश निकाळजे : पाणी पुरवठयाबाबत सर्व शहरवासीयांसाठी एकच पाणी पट्टी न लावता तीत वर्गवारी करण्यांत यावी.ज्या भागात भूखंडाचे भाव जास्त आहेत त्या भागासाठी जास्त पाणी पट्टी आकारण्यांत यावी व ज्या भागात झ ोपडपट्टया असतील त्या भागासाठी घरगुती वापरासाठी कमी प्रमाणात पाणी पट्टी आकारण्यात यावी.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : अशी वर्गवारी करणे बरोबर होणार नाही.गरीबांसाठी महानगरपालिकेने स्टॅन्ड पोस्टची व्यवस्था केलेली आहेच.

सौ.रजनी जोशी : सिडको-हडको भागास होणारा पाणी पुरवठा लक्षांत घेता ही दरवाढ रद्द करण्यांत यावी.

डॉ.विजयकुमार मेहेर : प्रशासनाने घरगुती वापरासाठी रु.२०० ची वाढ तर औद्योगिक वापरासाठी रु.१००० ने वाढ दर्शविलेली आहे.

डॉ.भागवत कराड : रु.१०० एवढी करावी.

मा.आयुक्त : जे हॉटेल मालक हॉटेलसाठी महानगरपालिकेच्या पाण्याचा स्वतंत्र नळ घेऊन वापर करतात त्यांच्याकडून कमर्शियल रेटने पाणी पट्टी वसुल केली जाणे संयुक्तीक होईल.तसेच जे मेडीकल प्रॅक्टीशनर्स हॉस्पीटल चालवतात व त्यासाठी पाण्याचा वापर करतात.त्यांच्याकडूनही कमर्शियल रेटने पाणी पट्टी वसुल करणे संयुक्तीक होईल.

मा.सभापती : सर्व सभासदांच्या भावना लक्षात घेता पाणी पट्टी वाढीवा प्रशासनातर्फे आलेला प्रस्ताव खालील प्रमाणे मंजुर करण्यांत येतो.घरगुती वापराकरीता लाण्यांत आलेला प्रचलित दर रु. १००० ऐवजी रु.७०० ने वाढ करण्यांत यावी.

**(४) स्टार हॉटेल्स /रेस्टॉरन्टस ग्रेड-१ आणि ग्रेड-२ हॉटेल्स/रेस्टॉरंटस बार वर विशेष विकास कर लावणे बाबत.**

मा.सभापती : औरंगाबाद शहराचा विकास व वाढ पाहता शहरातील हॉटेल्सचे ग्रेडेशन करण्यांत यावे व स्टार हॉटेल्स कडून ५% दराने तर ग्रेड-१ हॉटेल्सकडून ३% दराने व ग्रेड-२ हॉटेल्सकडून १% दराने विशेष विकास कर वसुल करण्याबाबत सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.या संदर्भाने स्वतंत्र नियमावली तयार करण्यांत येऊन त्यास सर्वसामान्य सभेची मान्यता घेण्यांत यावी.

**(५) विद्युत मंडळाचे रस्त्यावरील/मनपा खुल्या जागेवरील पोल आणि डी.पी.भाडे आकारणी करणे बाबत.**

मा.सभापती : विद्युत महामंडळ विजेचा व्यापार करते व त्यासाठी ग्राहकांकडून आवश्यक ते चार्जेसही घेते.अशा परिस्थितीत महानगरपालिकेने त्यांच्याकडून पोल व डी.पी.बाबत कर वसुल करावयास पाहिजे अशी सर्व सभासदांची भावना आहे.तथापी प्रशासनातर्फे रस्त्यांवरील तसेच महानगरपालिकेच्या खुल्याजागेवरील पोलवर प्रत्येकी प्रतिमहा रु.५ दराने भाडे आकारणी ऐवजी रु.१० प्रत्येकी प्रतिमहा भाडे वसुल करण्यांबाबत सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.तसेच रस्त्यावर किंवा महानगरपालिकेचे खुल्या जागेवरील डी.पी.वर प्रतिमहा रु. २०/- ऐवजी रु. ५०/- प्रतिमहा प्रति डी.पी.भाडे वसुल करण्यांबाबत सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(६) मार्केट बांधकामाकरीता मिळणाऱ्या डिपॉझीटचे उत्पन्न.**

मा.सभापती : प्रशासकीय प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(७) सिडको क्षेत्रातील अनधिकृत वसाहतींमध्ये पाणी पुरवठा योजनेपोटी मिळणारे उत्पन्न.**

मा.सभापती : सिडको क्षेत्रातील अनधिकृत वसाहतींमध्ये पाणी पुरवठा योजने संदर्भाने प्रशासनातर्फे सादर करण्यांत आलेला प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येतो.

## (८) उत्पन्नाची इतर साधणे

**(अ) दुकान भाडे**

मा.सभापती : दुकान भाडयात एकदम २५% वाढ करणे संयुक्तीक होणार नाही.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : एकदम भाडेवाढ करण्यांत येऊ नये.यामुळे कोर्ट प्रकरणेही वाढण्यांची शक्यता नाकारता येत नाही.

मा.सभापती : नाथ सुपर मार्केट मधील दुकांनासाठी भाडयात २५% ऐवजी १०% वाए करण्यांत व इतर दुकानांना ३% भाडे वाढ करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

६.१५ वाजता एक दिवसासाठी सभा तहकुब करण्यांत येत असल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

राष्ट्रगीताने सभेची सांगता झाली.

दिनांक १९-२-१९९६ रोजी तहकुब झालेली अर्थसंकल्पीय स्थायी समिकती बैठक दि.२०-२-१९९६रोजी दुपारी ३.०० वाजता स्थायी समिती सभागृहात मा.सभापती,स्थायी समिती श्री.प्रदिपकुमार जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली सुरु झाली सभेस स.सभासद तसेच महानगरपालिका विभाग/शाळा प्रमुख उपस्थित होते.

**(ब) उत्पन्नाची इतर साधने**

**(क) मत्सालय**

मा.सभापती : प्रशासनातर्फे,मस्त्यालय पाहण्याकरीता लहानमुलांकरीता रु.१=०० आणि मोठयांकरीता रु.२ प्रवेश फि आकारण्याबाबतचा प्रस्तावावरील सर्व स.सभासदांचे विचार लक्षात घेता सदरच्या प्रस्तावात बदल करुन लहान मुलांसाठी ५० पैसे व मोठया करीता रु.१=०० या प्रमाणे सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**(ड) सिध्दार्थ उद्यान विकसित करणे**

अब्दुल रशिदखान (मामू) : मोठया प्रमाणात भाडेवाढ केली तर कमी लोकांचा ओघ उद्यानात राहील.तेव्हा एकदम भाडेवाढ करण्यांत येवू नये.

मा.सभापती : सिध्दार्थ उद्यानास भेट देणाऱ्या नागरिकांना मोठयासाठी प्रत्येकी रु. १=००एवढया रकमेची फी आकारण्यांबाबत तसेच ७ वर्षाखालील मुलांना फी न घेण्यांबाबत,सहलीसाठी येणाऱ्या मुलांना फी मध्ये ५०% सुट देण्याबाबत तर महानगरपालिका शाळांतील मुलांना प्राणी संग्रहालयासोबतच सिध्दार्थ उद्यान पाहण्यासाठी फी न आकारण्याबाबतच्या ठरावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

मा.सभापती : शासकीय अदुदाना संदर्भाने सादर करण्यांत आलेला प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**(१) प्रशासकीय खर्च**

प्रशासनातर्फे सादर करण्यांत आलेला ठराव,आर्थिक तरतुदीच्या २३% एवढी रक्कम सर्व प्रकारच्या प्रशासकीय बाबींवर १९९६-९७ या आर्थिक वर्षात खर्च करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**कर्मचारी/अधिकाऱ्या करीता प्रशिक्षण आणि विभागीय परिक्षा**

प्रशासनातर्फे कर्मचारी/अधिकारी यांच्याकरिता १९९६-९७ या आर्थिक वर्षात प्रस्तावित करण्यांत आलेल्या विभागीय परीक्षा आयोजित करण्यासाठी तसेच यासाठी येणाऱ्या रु. २=०० लाखाच्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(२) पाणी पुरवठा**

१९९६-९७ च्या अंदाजपत्रकास प्रशासनातर्फे पाणी पुरवठयाकरीता करण्यांत आलेल्या तरतुदीस रु. १९ कोटीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.तद्वतच प्रस्तावित कामे हाती घेण्यांसाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**(३) भूमिगत जलनि:सारण व्यवस्था**

श्री.महादेव सुर्यवंशी : नारेगांव,मसनतपुर या सारख्या भागात टाकण्यांत आलेल्या जलनि:सारण वसहीन्या पाहता पाणी ऑक्सीडेशन पॉडपर्यंत पाण्याची शक्यता कमीच वाटते.जलनि:सारण वाहिन्या टाकत असततांना त्यांना उतार वगैरे बरोबर दिलेला आहे या बाबींची खातरजमा काम करत असतांना करावयास पाहिजे.

कार्यकारी अभियंता : नारेगांव येथील मेन सिवरेजचे काम झालेले आहे.ब्रीजवाडी नारेगांव यामध्ये काही विटीभट्ट्यांसाठी वापरतात यामुळेही लाईनवर परिणाम होतो.

मा.आयुक्त : ऑक्सीडेशन पॉडमध्ये येणारे पाणी शुध्द करून ते परत वापरात आणले जाईल व मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांना विकाऊ दिले जाईल तसेच यातील गाळापासुन खतही तयार करण्यांची योजना आहे.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : शहरात नहरे अंबरीद्वारेही पाणी पुरवठा होतो.मात्र काही ठिकाणी विटभट्टी मालकांनाही नहर फोडल्याने त्यातील बरेचशे पाणी विटभट्ट्यांसाठी वापरले जाते.अशा लोकांविरुध्द पोलीस कंप्लेंट करावयास पाहिजे.

मा.सभापती : जे लोक पाण्याची चोरी करत असतील त्यांच्या विरुध्द पोलीस तक्रार करण्यात यावी.१९९६-९७ च्या प्रस्तावित करण्यांत आलेली तरतुद रु. २ कोटी ऐवजी रु.१.५० कोटी करण्यात येते.

शहरातील जुन्या व कमी आकाराच्या जलनि:सारण वाहिन्या काढून त्याऐवजी नवीन मोठया आकाराच्या जलनि:सारण वाहिन्या टाकण्यांकरीता अर्थसंकल्पात करण्यांत आलेल्या रु.७५ लक्षाच्या तरतुदीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

शहरात अजुनही जलनि:सारण वाहिन्यांच्या देखभालीसाइी सादर करण्यांत आलेल्या अर्थसंकल्प रु. २५ लक्षच्या तरतुदीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.याच बरोबर अनेक विभागातील कामे एकाच कंत्राटदारास न देता ती विभागुन देण्यांत यावीत.जेणेकरुन कंत्राटदारही वेळेवर कामे करु शकतील.

मुख्य जलनि:सारण वाहिन्याचे बांधकामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रु.१ कोटी ५० लक्षच्या तरतुदीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**(४) खुल्या गटारींची दुरुस्ती करणे आणि नविन खुल्या गटारी बांधणे.**

मा.सभापती : शहरातील खुल्या गटारींची दुरुस्ती करणे व नव्या खुल्या गटारी बांधण्यासाठी १९९६-९७ या वर्षासाठी तयार करण्यात आलेल्या रु.१ कोटीच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**(५) सुलभ शौचालय आणि स्त्री-पुरुषांकरीता मुताऱ्या बांधणे.**

डॉ.विजयकुमार मेहेर : सिडको सारख्या भागात विशेषतः आंबेडकर रोड हा मुख्य रहदारीचा रस्ता आहे.या भागात अशा प्रकारची योजना शहर सौंदर्यीकरणात भरच पडेल.

मा.आयुक्त : ही योजना पेमेंट बेसीसवर चालविण्यांत येणार आहे.स्थानिक रहिवाशी अशा गोष्टी लवकर ॲक्सेप्ट करणार नाहीत.याठिकाणी कायमस्वरुपी व्यवस्था करण्यांचा विचार केला जाईल.यासाठी या ठिकाणी एक स्वच्छता रक्षकाची कायम नेमणूक करण्यांत येईल.

डॉ.विजयकुमार मेहेर : या निर्णयाबाबत मी आयुक्तांचे अभिनंदन करतो.

श्री.महादेव सुर्यवंशी : आंबेडकर नगर मध्ये दोन शौचालये आहेत.परंतु ते बरोबर चालत नाहीत.या भागातील नागरिकांना शौचालये बांधण्यासाठी महानगरपालिकेने पूर्ण खर्च द्यावा.

मा.सभापती : आंबेडकर नगर रहिवांसीयासाठी दोन शौचालये बांधलेली आहेत.एखादया वसाहतीसाठीच अशा प्रकारे पूर्ण रक्कम देता येणार नाही.त्या भागातील नगरसेवकांनीही लोकाचे प्रबोधन करावे ज्यामुळे हा प्रश्न सुटू शकेल.

अर्थसंकल्पात दर्शविण्यांत आल्या प्रमाणे औरंगपुरा,रेल्वेस्टेशन,सिध्दार्थ गार्डन जवळील नाल्यावर सुलभ शौचालय बांधण्यासाठी १९९६-९७ या वर्षात येणाऱ्या रु.३५ लाखाच्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.तद्वतच शहरात विविध ठिकाणी स्त्री/पुरुषांसाठी मुताऱ्या बांधण्यासाठी सादर करण्यांत आलेल्या रु.१० लक्षच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

## (६) गाजर गवत निर्मुलन आणि नाले स्वच्छता मोहिम

शहरातील रस्त्याच्या बाजूने तसेच महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर वाढणारे गाजर गवत काढण्यासाठी अंदाजपत्रक बनवण्यात आलेल्या रु.५ लक्षच्या तरतुदीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

पावसाळयापुर्वी मोठया गटारींची व नाल्यांची स्व्च्छता करण्यांकरीता अर्थसंकल्पात दर्शविण्यांत आलेली तरतुद रुपये ५ लक्षला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

## (७) शहरातील कचरा उचलण्यांचे काम अधिक योग्य प्रकारे करणे.

### कचरा कुंडया खरेदी करणे.

डॉ.विजयकुमार मेहेर : सिमेंटच्या कचरा कुंडया खरेदी करण्यांत येऊ नयेत.त्याऐवजी पक्क्या स्वरुपात कचऱ्या कुंडया बनवुन घेण्यांत याव्यात.

मा.सभापती : बऱ्याचशा ठिकाणी कचऱ्या कुंडयावरती विविध पक्षांचे झेंडे लावण्यांत आलेले आहेत.संबंधित वॉर्डातील नगरसेवकांनी असे झेंडे स्वतः काढुन टाकण्यांबाबत पुढाकार घ्यावा.याउपरही जे पक्ष आपले झेंडे लावण्यांसाठी महानगरपालिकेच्या कचरा कुंडयांचा वापर करतील त्याच्या विरुध्द पोलीस कार्यवाही करण्यांत यावी.

डॉ.विजयकुमार मेहेर : मा.सभापतींच्या या निर्णयाचे मी सर्वांच्या वतीने अभिनंदन करतो.

मा.सभापती : १९९६-९७ वर्षात नविन ४०० कचरा कुंडया विकत घेण्यांकरीता रुपये ३ लाखाच्या अंदाजपत्रकीय तरतुदीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

### (ब) कचरा वाहतुकीकरीता नविन ट्रक विकत घेणे.

१९९६-९७ या वर्षात ५ ट्रक कचरा वाहतुकीसाठी खरेदी करण्यांसाठी रुपये २५ लाखांच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

### (क) कचरा वाहतुकीकरीता सायकल रिक्षा गाडीचा उपयोग करणे.

मा.सभापती : बऱ्याचशा अरुंद गल्लीबोळातून कचरा उचलण्यासाठी ट्रक अथवा ट्रॅक्टर जाऊ शकत नाही.अशा गल्ली बोळातील कचरा उचलण्यासाठी प्रायोगीक तत्वावर रिक्षांचा उपयोग करण्यासाठी अर्थसंकल्पातील तरतूद रुपये ३ लक्ष ऐवजी रु.५ लक्ष करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.अशा वाहनास सायकल रिक्षा गाडी न संबोधता रिक्षागाडी असे संबोधावे.

**(ड) कचऱ्यापासुन कंपोस्ट खत तयार करणे.**

कचऱ्यांपासून कंपोस्ट खत तयार करण्यांसाठी अंदाजपत्रकात करण्यांत आलेल्या तरतुदीस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**(इ) शहरातील सार्वजनिक संडास आणि मुताऱ्यांची स्वच्छता करणे.**

उपरोक्त विषयासाठी अंदाजपत्रकात करण्यंत आलेली तरतूद रु.१२ लक्षला सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(ई) नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड अंतर्गत रस्ते बांधणे.**

नारंगांव ट्रेचिंग ग्राऊंड अंतर्गत रसते बांधण्यासाठी अंदाजपत्रकास बनविण्यांत आलेल्या तरतूद रु.१५ लक्षला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**(८) इमारती बांधणे.**

मा.सभापती : औरंगाबाद शहराचा विकास पाहता औरंगाबाद महानगरपालिकेचे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी एक मोठे रुग्णालय असावे अशी सर्वच स.नगरसेवकांची इच्छा आहे.ही बाब लक्षात घेता अर्थसंकल्पात इमारत बांधकामासाठी सन १९९६-९७ च्या अर्थसंकल्पात इमारत बांधकामासाठी प्रस्तावित करण्यांत आलेली तरतूद रु.८.५० कोटी ऐवजी रु.९.५० कोटी करण्यांत येते.या वाढीव तरतुदीतील रु.१ कोटीचा खर्च फक्त मध्यवर्ती रुग्णालय बांधण्यासाठीच करण्यात या इमारतीसाठी शहराच्या मध्यवर्ती रुग्णालय बांधण्यासाठीच करण्यांत या इमारतीसाठी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी ८-१० एकर जागा संपादीत करण्यात यावी.

श्री.गौतम खरात : अशा उपक्रमासाठी राज्य तसेच केंद्र शासनाकडूनही अनुदान प्राप्त होऊ शकते तेही मिळविण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

मा.सभापती : केंद्र तथा राज्य शासनाकडून अशा प्रकारची मदत मिळविण्यांचा सर्व स्तरावरती प्रयत्न केला जाईल.

डॉ.भागवत कराड : मध्यवर्ती रुग्णालय काढावयाचे असेल तर शहराच्या इतर भागात छोटे छोटे हॉस्पीटल बांधण्यात येऊ नयेत.

**(अ) शाळांच्या इमारती**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शहरातील विविध भागांमध्ये इमारती बांधण्यासाठीच्या रक्कम रु.१६० लक्षच्या अर्थसंकल्पातील तरतुदीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**(ब) मनपा शाळाच्या परिसरात चौकीदारांसाठी निवासस्थाने बांधणे.**

अंदाजपत्रकातील प्रस्तावित कामासाठी येणाऱ्या खर्च रु.१० लक्ष रक्कमेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(क) नविन हॉस्पिटल बांधणे.**

नेहरु नगर,सिल्क मिल कॉलनी येथे २०बेडेड हॉस्पिटल बांधण्यासाठी यावयाच्या इमारत बांधकामावरील अंदाजीत खर्च रक्कम रु.५० लक्षला सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(ड) नविन वाचनालय इमारती बांधणे.**

१९९६-९७ च्या अंदाजपत्रकातील या शिर्षकाखालील तरतुद रु.४५ लक्षला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**(ई) स्मशान भुमी विकास कार्यक्रम**

मा.सभापती : स.सभासदांनी मागणी केल्यानुसार शहरात काही ठिकाणी विद्युत दाहिनी बसविण्याबाबत विचार करण्यांत यावा,तसेच ज्या स्मशान भुमींमध्ये मृतांचे दहन केले जाते अशा स्मशान भुमींचा आकार लक्षात घेता जागेचा आकार ठरवून देण्याबाबत काही नियम बनविण्यांत यावेत व तसे फलकही स्मशान भुमीमध्ये लावण्यात यावेत.

**(ई) कर्मचाऱ्यांकरीता निवारे बांधणे.**

प्रस्तावित कामावरील रु. १५ लक्षच्या तरतुदीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(फ) डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र (दुसरा टप्पा)**

प्रस्तावित कामासाठी अर्थसंकल्पात ठेवण्यांत आलेली रक्कम रु.२५ लक्षला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**(ल) समाज मंदिर/वाचनालय/मंगल कार्यालय/शादीखाना इमारती बांधणे.**

मा.सभापती : शहरात मनपातर्फे विविध ठिकाणी समाज मंदिरे बांधलेली आहेत.तथापि या समाज मंदिराचा होत असलेला वापर पाहता यापुढे समाज मंदिरे बांधण्यात येवू नयेत.या ऐवजी त्या भागातील नागरिकांसाठी वाचनालये,अभ्यासिका,शिवणकला केंद्र बांधण्यात यावे.

प्रस्तावित कामासाठी करण्यांत आलेली तरतुद रक्कम रु.२५ लक्षला सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तथापि समाज मंदिर हा शब्द प्रस्तावातून वगळण्यात यावा.

**(व) व्यापारी संकुल बांधकाम**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार व्यापारी संकुले बांधण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते व व्यापारी संकुलाचे बांधकाम डिपॉझिट बेसिसवर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(९) प्रशासकीय इमारत टप्पा ३ चे बांधकाम**

प्रशासकीय इमारत ३ चे बांधकाम हाती घेण्यास व या बांधकामासाठी १९९६-९७ मध्ये रक्कम रु.६० लक्षच्या तरतुदीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**(१०) भूसंपादन**

१९९६-९७ या वर्षात भूसंपादनासाठी अर्थसंकल्पात करण्यांत आलेल्या रक्कम रु.३ कोटींच्या अंदाजपत्रकासाठी शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानापैकी २ कोओी या कामासाठी खर्च करण्यास व मनपा फंडातून रु.१ कोटी या कामासाठी खर्च करण्यास व मनपा फंडातून रु.१ कोटी खच्र करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(११) १९९६-९७ वर्षात प्रस्तावित विशेष प्रकल्प**

**(अ) तारांगण**

मा.सभापती : तरांगणासाठी अर्थसंकल्पात करण्यांत आलेली तरतुद रक्कम रु.१ कोटी ऐवजी रु.७० लाख करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(ब) कायम स्वरुपी विज्ञान केंद्र बांधणे**

औरंगाबाद शहरात कायमस्वरुपी विज्ञान केंद्र बांधण्याच्या दृष्टीकोनातून अंदाज पत्रक १९९६-९७ मध्ये करण्यांत आलेल्या रु.६० लक्षच्या तरतुदीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(क) रोप वे तयार करणे**

रोप वे करीता अर्थसंकल्पातील रु.१ कोटीच्या तरतूदी ऐवजी या उपक्रमासाठी रु.७० लाख सर्वानुमते मंजुर करण्यात येतात.

**(ड) म्युझियम बांधणे**

शहरात म्युझियम बांधण्यासाठी रु.३० लक्षच्या अंदाजपत्रकातील खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**(१२) साठा खरेदी**

मा.सभापती : साठा खरेदी करत असतांना प्रत्येक तीन चार महिन्यातील कामाचा आढावा घेऊन संबंधित विभाग प्रमुखाने आगाऊ मागणी नोंदवावी जेणेकरुन साहित्या अभावी दैनंदिन कामे बंद पडणार नाहीत.

साठा खरेदीसाठी १९९६-९७ वर्षासाठी अंदाजपत्रकात करण्यांत आलेली तरतुद रु.१७० लक्षला सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(१३) रस्ते**

शहरातील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याकरीता अर्थसंकल्पात करण्यांत आलेल्या रु.४ कोटीच्या अंदाजपत्रकास,खडी रस्ते तयार करण्याकरीता तयार करण्यांत आलेल्या रु.४० लक्षच्या अंदाजपत्रकास व खांडकी पेव्हींग करण्यासाठीच्या रु.२० लक्षच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.तद्वतच मनपात समाविष्ट झालेल्या १८ खेडयातील रस्ते तयार करण्याकरीता अंदाजपत्रकीय तरतूद रु.१ कोटीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

अशा प्रकारे शहराच्या सर्व भागातील रस्त्यांकरीता एकूण रु.७ कोटींच्या अंदाजपत्रकीय तरतुदीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**(ब) रस्ते दुभाजक तयार करून त्याचे सौंदर्यीकरण करणे**

शहरातील सर्व महत्वाच्या रस्त्यांवर दुभाजक टाकुन त्यांचे सौंदर्यीकरण करण्याकरीता अर्थसंकल्पातील रु.१.५० कोटीच्या तरतुदी व हा खर्च शासनाकडून मिळणाऱ्या रु.१० कोटीच्या अनुदानातून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(१४) रेल्वे फुट ब्रीज**

हमालवाडा येथील रेल्वे फुट ब्रीज बांधण्याकरीता अर्थसंकल्पातील रु.७० लक्षच्या तरतुदीस व ही रक्कम रेल्वे खात्यास अदा करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(१५) शिक्षण**

**(अ) गणवेष वितरण**

डॉ.विजयकुमार मेहेर : नगरसेवक स्वेच्छा निधिची रक्कम अपुरीच आहे.शिवाय प्रसंगी नगरसेवकांना त्यांच्या मनाविरुध्द तीचा विनीयोग करावा लागतो.तेव्हा गणवेष खरेदीसाठी नगरसेवक स्वेच्छा निधिचा वापर करण्यांत येऊ नये.

मा.सभापती : गणवेष खरेदीसाठी नगरसेवकांच्या स्वेच्छा निधिचा वापर न करता १०० टक्के खर्च मनपाने करावा.

मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना पुरविण्यांत यावयाच्या गणवेषासाठी येणारा खर्च रु.३० लक्ष महापालिकेने करावा यासाठी नगरसेवक स्वेच्छा निधिचा वापर करण्यात येऊ नये असा सर्वानुमते ठरविण्यांत येते.

**(ब) डयुअल डेस्क पुरविणे**

इयत्ता ५ वी ते ७ वी च्या मनपा शाळांतील विद्यार्थ्यांना डयुअल डेस्क पुरविण्याबाबत अंदाजपत्रकीय तरतुदीत सुधारणा करण्यांत येवुन ती १० लक्ष करण्यांत येते.

**(क) आसनपट्टया**

मनपा शाळांमध्ये बसवण्यासाठी आसनपट्टया खरेदी करण्याकरीता १९९६-९७ या अर्थसंकल्पात करण्यांत आलेली तरतूद रक्कम रु.२ लक्षला सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(ड) पुस्तके आणि शैक्षणिक साहित्य खरेदी / निर्मिती**

या शिर्षकातंर्गत करण्यांत यावयाच्या खर्चासाठी अर्थसंकल्पीय तरतूद रु. ११ लक्ष सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(इ) शिष्यवृत्ती**

डॉ.भागवत कराड : मनपा शाळातील मुलांना भरीव शिष्यवृत्ती देता यावी यासाठी नगर सेवकांचाही सहभाग असावा ही संकल्पना लक्षात घेता प्रत्येक नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून ठराविक रक्कम फक्त डिपॉझीट स्वरुपात बँकेत ठेवण्यांत यावी व येणारे व्याज या कामी वापरण्यात यावे.

मा.सभापती : या संदर्भाने मा.आयुक्तांनी प्रस्ताव ठेवावा.२५० ऐवजी मनपा शाळातील ३०० विद्यार्थ्यांना रु.४०० प्रतिवर्ष प्रमाणे शिष्यवृत्ती देण्यांत यावी यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु.१ लाख वाढवून रु.१ लाख २० हजार करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**सावित्रीबाई फुले योजना**

मा.सभापती : मनपाच्या शाळांमधुन आर्थिकदृष्टया कमकुवत घटकातील मुले/मुली मोठया प्रमाणात शिक्षण घेतात.त्यांच्या शाळा गळतीचे प्रमाण थांबविण्यासाठी त्यांना काही सवलती देण्याबाबत सर्व स.नगरसेवकांच्या भावना पाहता मनपा शाळा ातून शिक्षण घेणाऱ्या ४ हजार ५०० मुलींना सावित्रीबाई फुले योजने अंतर्गत शैक्षणिक साहित्य मुफत पुरविण्यात यावे.सावित्रीबाई फुले योजने अंतर्गत रु.५ लक्षची करण्यात आलेली तरतूद वाढवून ती ६ लक्ष करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

सावित्रीबाई फुले योजने अंतर्गत मनपा अधिकारी संघटना सभासदांनी प्रतिमाह रु.५०/- यांच्या वेतनातून देण्याबाबत संमती पत्र दिलेले आहे.याबाबत मनपा अधिकारी संघटना सभासदांचे अभिनंदन करावयास पाहिजे याचबरोबर सामाजिक उपक्रम या नात्याने जे नगर सेवक स्वतःच्या मानधनातून १००/- प्रतिमाह देऊ इच्छितात त्यांनी प्रशासकनाकडे लेखी पत्र दयावे.

**(ई) स्नेह संमेलन**

महानगरपालिकांच्या केंद्रीय शाळांमधून स्नेह संमेलना सारखा उपक्रम राबविण्यासाठी अर्थसंकल्पात करण्यांत आलेली तरतूद रु.३ लक्ष सर्वानुमते मंजुर करण्यांत येते.

**(फ) माध्यमिक शाळा सुरु करणे**

१९९६-९७ मध्ये माध्यमिक शाळा सुरु करण्याच्या दृष्टीने अर्थसंकल्पात करण्यांत आलेली तरतूद रक्कम रु.१० लक्ष सर्वानुमते मंजुर करण्यात येते.

**(१६) वाचनालयासाठी पुस्तके खरेदी**

शहरात विविध भागात सुरु असलेल्या वाचनालयाकरीता आवश्यक पुस्तके खरेदी करण्याकरीता अर्थसंकल्पात करण्यांत आलेल्या रक्कम रु.१० लाखाच्या तरतुदीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.तद्वतच बन्सीलाल नगर आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर तरतूद रु.५ लाखास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(१७) अभ्यासिका सुरु करणे**

शहरात दहा नविन अभ्यासिका सुरु करण्याकरीता करण्यांत आलेल्या रक्कम रु. १० लाखाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(१८) गरवारे क्रिडा संकुल दुसऱ्या टप्प्याचे बांधकाम सुरु करणे बाबत.**

क्रीडा संकुलाच्या दुसऱ्या टप्प्याचे बांधकाम करणे त्यात खेळाडूकरीता निवास व्यवस्था आणि ॲर्थोक्सिकरीता मिनी पॅव्हलियन बांधणे यासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या रक्कम रु.४० लक्ष खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(१९) क्रिडा स्पर्धा आयोजित करणे**

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : प्रस्तावित क्रिडा स्पर्धाबरोबरच व्हालीबॉल,फुटबॉल,हॉकी या सारख्या स्पर्धाही राज्य पातळीवर घेण्यात याव्यात.

मा.सभापती : प्रस्तावित स्पर्धाबरोबरच व्हालीबॉल,फुटबॉल,हॉकी या स्पर्धाही आयोजीत करण्यांत यावे.या स्पर्धांना "महापौर चषक" स्पर्धा असे संबोधण्यात यावे.क्रीडा स्पर्धासाठी ठेवण्यांत आलेली अर्थसंकल्पीय तरतूद वाढवून ती रु.२० लाख करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**जिल्हा क्रिडा संघटनांना आर्थिक सहाय्य देणे.**

डॉ.भागवत कराड : क्रीडा संघटनांना पैसे रुपाने मदत न देता ती वस्तु रुपाने देण्यांत यावी जेणेकरुन निधीचा विनियोग योग्य प्रमाणे हाऊ शकेल.

डॉ.विजयकुमार मेहेर : जिल्हा क्रिडा संघटना यातील जिल्हा हा शब्द वगळून क्रिडा संघटना या राज्य पातळीवरतीच काम करतात त्यामुळे जिल्हा या शब्दामुळे त्यांना आर्थिक मदती पासून वंचित रहावे लागेल.

मा.सभापती : क्रिडा संघटनांना मदत देण्यासाठी करण्यांत आलेल्या रु.२ लाखाच्या तरतुदीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(२०) दुध नगरी स्थापन करणे**

डॉ.विजयकुमार मेहेर : शहराचा विस्तार लक्षात घेता एकाच भागात दुध नगरी स्थापन्या ऐवजी शहराच्या चार दिशांना दुध नगरी स्थापन्यात यावी जेणे करुन नागरिकांची सोय होईल व ते या उपक्रमात सहभागी होतील.

मा.सभापती : प्रस्तावित दुध नगरी स्थापन करण्यासाठी अर्थसंकल्पात करण्यांत आलेल्या रु. २० लाखाच्या तरतुदीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(२१) विद्युत**

स्टीट लाईटवरील विद्युत दिव्यांची व्यवस्था करण्यांकरीता व त्या करीता लागणाऱ्या टयुब लाईट्स सोडीयम व्हेपर लाईट्स आदि साहित्याचया खरेदी करीता १९९६-९७ च्या अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या रु.३० लाखाच्या तरतुदीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(२२) पुर नियंत्रण कामे**

शहरातून वाहणाऱ्या महत्वाच्या नाल्यांना रिटेनिंग वॉल बांधण्यासाठी सन १९९६-९७ च्या अर्थसंकल्पात मनपाच्या नियमित उत्पन्नातून ५० लाखाचा खच्र करण्यास व रु.१ कोटीचा खर्च शासनाकडून मिळणाऱ्या रु.१० कोटीच्या विशेष अनुदानातून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**(२३) आरोग्य**

मनपा आरोग्य केंद्रे तसेच व हॉस्पिटलसाठी शास्त्रीय उपकरणे खरेदी करण्यासाठी प्रस्तावित करण्यांत आलेल्या रक्कम रु.२० लाखास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच नियमित स्वरुपाची औषधी विकत घेण्यासाठी प्रस्तावित करण्यांत आलेल्या खर्च रु. २० लाखास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

ॲन्टीरॅबीज इंजेक्शन खरेदी करण्याकरीता अर्थसंकल्पात दर्शविण्यात आलेल्या औषध खरेदी समितीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**युनानी आणि होमियोपॅथी दवाखाना सुरु करणे.**

आयुर्वेद,होमियोपॅथिक आणि युनानी औषधे खरेदी करण्याकरीता आणि होमियोपॅथि आणि युनानी दवाखाने सुरु करण्याकरीता अर्थसंकल्पीय तरतूद रु.५ लाखास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**फिरता दवाखाना सुरु करणे**

ज्या झोपडपट्टी भागात आरोग्य केंद्र नाहीत अशा भागाकरीता एक फिरता दवाखाना सुरु करण्याबाबत व यासाठी एक ॲम्ब्युलन्स खरेदी करण्याबाबत अर्थसंकल्पीय तरतूद रु.१० लक्षास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(२४) झोपडपट्टी विकास कार्यक्रम**

अधिकृत झोपडपट्टयांमध्ये मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी अर्थसंकल्पात करण्यांत आलेल्या रु.७ कोटीच्या तरतूदीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(२५) विद्युत बील**

पाणी पुरवठा तसेच शहरातील रस्त्यांवरील विद्युत दिवे,कार्यालयातील दिवे इत्यादीकरीता येणाऱ्या वीज बिलाच्या अदायगीसाठी अर्थसंकल्पातील तरतूद रु.८.५० कोटीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(२६) अग्निशमन दल**

अग्निशमन दलाचे आधुनिकीकरण करण्यासाठी ॲम्ब्युलन्स वगळता इतर रु.६४ लाखाचे साहित्य खरेदी करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(२७) यांत्रिकी विभाग**

**वाहन खरेदी**

प्रस्तावित वाहन खरेदीसाठी करण्यांत आलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीस रु.६० लाखास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**वाहनाची देखभाल आणि व्यवस्थापन**

वाहनांची देखभाल आणि व्यवस्थापन यासाठी तसेच इश्युरन्स इत्यादी कार्यासाठी अर्थसंकल्पात करण्यांत आलेली रु.५५ लक्षची तरतूद सर्वानुमते मंजर करण्यांत येते.

**(२८) नविन बगिचे विकसित करणे**

शहरात ठिकठिकाणी बगिचे विकसित करण्याबाबत येणाऱ्या रु.१ कोटीच्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.तसेच हा खर्च शासनाकडून मिळणाऱ्या विशेष अनुदानातून करण्यांस मंजुरी देण्यांत येते.तसेच हा खर्च शासनाकडून मिळणाऱ्या विशेष अनुदानातून करण्यांस मंजुरी देण्यांत येते.

**(२९) शहर सौंदर्यीकरण**

शहर सौंदर्यीकरणा अंतर्गत हाती घेण्यात यावयाच्या कामांना व त्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चाबाबत अर्थ संकल्पात दर्शविण्यात आलेल्या रु.१ कोटीच्या तरतुदीस व ही कामे शासकीय अनुदानातून हाती घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**(३०) अपंग मुलांच्या शाळांना आर्थिक मदत देणे आणि अपंगांचे पुनर्वसन करण्यांकरीता विशेष कार्यक्रम राबविणे.**

डॉ.विजयकुमार मेहेर : उच्च पदस्थ अधिकारी/पदाधिकारी यांच्या मार्गदशनाखाली ज्या संस्था चालविल्या जातात अशाच संस्थांना अनुदान देण्यांत यावे.तसेच या संस्था चालू आहेत याची प्रशासनातर्फे खात्री करण्यांत यावी.

मा.सभापती : ज्या संस्थांना मदत करावयाची अशा संस्थांच्या लेखा परिक्षणाची पाहणी करण्यांत यावी.तसेच संस्थेने रजिस्ट्रेशन अद्यावत आहे याचीही खातरजमा करण्यांत यावी.या संदर्भाने प्रशासनाने स्वतंत्र नियमावली बनवावी.१९९६-९७ च्या अर्थसंकल्पात दर्शविल्यानुसार खाजगी संस्थाकडून अपंगाकरीता चालविल्या जाणाऱ्या शाळांना

महानगरपालिकेतर्फे विशेष आर्थिक मदत देण्यांबाबतच्या रुपये ५ लाखाच्या तरतूदीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**(३१) प्राणी संग्रहालय अद्यावत करणे**

प्राणी संग्रहालय अद्यावत करण्यांसाठी १९९६-९७ च्या अर्थसंकल्पात करण्यांत आलेल्या रुपये १० लाखाच्या तरतुदीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(३२) पुतळे बसविणे**

शहरात पुतळे बसविण्यांसाठी अर्थसंकल्पात करण्यांत आलेल्या रक्कम रु.१० लाखाच्या तरतुदीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(३३) सभासद स्वेच्छा निधी आणि मानधन**

श्री.महादेव सुर्यवंशी : नगरसेवक स्वेच्छा निधी रक्कम पाहता ती अत्यंत अपुरी वाटते.अनेक तातडीचे कामे अपुऱ्या निधीमुळे हाती घेता येत नाही.तेव्हा नगरसेवक स्वेच्छा निधीत वाढ करण्यांत यावी.

डॉ.भागवत कराड : स्वेच्छा निधीतुन नेमकी कोणती कामे हाती घ्यावीत याची नियमावली बनविण्यांत यावी.

मा.आयुक्त : या निधीस स्वेच्छा निधी न संबोधता नगरसेवक स्थानिक विकास निधी असे संबोधावे जास्त संयुक्तीक राहील.

मा.सभापती : सभासदांच्या भावना लक्षात घेता व सभासदांना विकास विषयक कार्ये चांगल्या रितीने पार पाडता यावीत यासाठी नगरसेवक स्वेच्छा निधी व मानधनासाठी अर्थसंकल्पात करण्यांत आलेली तरतूद वाढवुन ती रुपये १.२३ कोटी करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(३४) घर बांधणी खरेदी अग्रीम**

महानगरपालिका कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या घर बांधणी खरेदी तसेच वाहन खरेदीसाठी अर्थसंकल्पात दर्शविण्यांत आलेली तरतूद रु.१५ लक्ष वाढवुन रु.५० लक्ष करण्यांस तसेच या रकमेतील रुपये ३० लक्ष घर बांधणी खरेदीसाठी तर उर्वरित रु.२० लक्ष वाहन खरेदीसाठी खर्च करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.तद्वतच सण अग्रीम करीता करण्यांत आलेल्या रु.२० लाखाच्या तरतुदीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(३५) कर्जाची परतफेड**

महानगरपालिकेने विविध उपक्रम राबविण्यासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यांसाठी १९९६-९७ च्या अर्थसंकल्पात करण्यांत आलेल्या रक्कम रु.२.०० कोटीच्या तरतुदीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(३६) सिटी सर्वे योजना**

महापालिका हद्दीतील ज्या मालमत्तांचा सर्वे झालेला नाही अशा मालमत्ताचा सर्वे करण्यासाठी येणाऱ्या रुपये ५० लाखाच्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**(३७) माहिती पुस्तीका तयार करुन प्रसिध्द करणे.**

औरंगाबाद शहराबाबतची सविस्तर आणि अद्यावत माहिती प्रसिध्द करण्यांसाठी व हा उपक्रम राबविण्यांसाइी प्रशासनातर्फे सादर करण्यात आलेल्या रक्कम रु.१ लाखाच्या अर्थसंकल्पास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**(३८) शहरी गरीबांसाठी नागरी मुलभूत योजना**

शहरी गरीबांसाठी नागरी मुलभूत सेवा योजने अंतर्गत हाती घ्यावयाच्या विविध उपक्रमावरती येणाऱ्या खर्चास तसेच मनपातर्फे अर्थसंकल्पात करण्यांत आलेल्या रक्कम रु.४ लाखाच्या तरतूदीस नेहरु रोजगार योजनेच्या अंमलबजावणीसाठी करण्यांत आलेल्या रुपये

६ लाखाच्या शिल्लक तरतुदीस कमकुवत घटक कल्याण निधीतून (५%) रुपये ३ लक्ष समाज कार्यासाठी राखुन ठेवण्यांत आलेल्या निधीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

मा.सभापती : सन्माननीय सभासदांनी मागणी केल्यानुसार महापौर परिषदेप्रमाणेच औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने राष्ट्रीय पातळीवरील महापालीका पदाधिकाऱ्यांच्या परिषदेचे आयोजन करण्यांत यावे तसेच महापौर निधी उभारण्यांबाबत प्रशासनातर्फे प्रयत्न करण्यांत यावेत.

## *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

### सन १९९५-९६

### सुधारीत अंदाजपत्रक

| अ.क्र. | जमा बाजू | | | खर्च बाजू | आकडे (हजारात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रारंभी शिल्लक | १३४ | "अ" | सर्वसामान्य प्रशासन | २८६६७ |
| अ) | महानगरपालिका कर | ३७७१३४ | "ब" | सार्वजनिक आरोग्य व सुखसोयी | २३२५६ |
| ब) | विशिष्ट कायद्यान्वये येणारी वसुली | २०५०१ | "ब" | | |
| क) | कराच्या व्यतिरिक्त मनपाच्या मिळकती व अधिकारापासुन मिळणारे उत्पन्न | १००९२ | "क" | सार्वजनिक सुरक्षा विभाग | १०३६९२ |
| ड) | देणग्या व अनुदाने | १५७११२ | "ड" | लोकशिक्षण | ४४९४३ |
| इ) | संकीर्ण | २१३८२ | "इ" | संकीर्ण | २१६८८ |
| ह) | अग्रीम वसुली | ५८६५ | ह | अग्रिम | ७९५० |
| | | | | | २३०१९६ |
| | | | | भांडवली कामावरील खर्च | |
| | | | १) | झोपडपट्टी सुधारणा | १९००० |
| | | | २) | रस्ते बांधणी | २२००० |
| | | | ३) | इमारती बांधणे | ४१६५५ |
| | | | ४) | इतर भांडवली कामे | ६२८६९ |
| | "क" अंदाजपत्रक | | | "क" अंदाजपत्रकीयखर्च | |
| १) | पाणी पुरवठा | ४९१७३ | १) | पाणी पुरवठा(महसुली खर्च) | ८१५९० |
| २) | जलनिःसारण | ३९३९ | २) | जलनिःसारण( महसुली खर्च) | १२४२० |
| | | ५३११२ | | | ९४०१० |
| | | | १) | भांडवली खर्च पाणी पुरवठा व जलनिःसारण | ३१७०० |
| | एकूण जमा | ६४५४११ | | विशेष शासकीय अनुदानातून करावयाची कामे | |
| | दुबेरजी जमा | ३६५८५ | | | |
| | एकूण जमा | ६८१९९६ | | | |
| | | | १ | मुळ अंदाजपत्रकातील | २३२०० |
| | | | २) | पाणी पुरवठा व जलनिःसारण | १८८५७ |
| | | | | | ४२०५७ |
| | | | | एकूण खर्च | ५४३४८७ |
| | | | | वर्षाअखेर शिल्लक | १०१९२४ |
| | | | | एकूण जमा | ६४५४११ |
| | | | | दुबेरजी खर्च. | - ३६५८५ |

**मुळ अंदाजपत्रक सन १९९६-९७**

| अ.क्र. | जमा बाजू | | | खर्च बाजू | आकडे हजारात |
|---|---|---|---|---|---|
| १) | प्रारंभी शिल्लक | १०१९२४ | "अ" | सर्वसामान्य प्रशासन | ३३७४५ |
| "अ" | महानगरपालिका करापासुन उत्पन्न | ५७०५५० | "ब" | सार्वजनिक आरोग्य व सुखसोयी | ३१०४५ |
| "ब" | विशिष्ट कायद्यान्वये येणारी वसुली | २३६५५ | "क" | सार्वजनिक सुरक्षा | १२६८२२ |
| "क" | कराच्या व्यतिरिक्त मनपाच्या मिळकती व अधिकारापासून मिळणारे उत्पन्न | ११७८० | "ड" | लोकशिक्षण | ५५०७० |
| | | | "इ" | संकीर्ण | २७६६० |
| | | | | अग्रीम | ८३०० |
| "ड" | देणग्या व अनुदाने | ५३३८० | | | २८२६४२ |
| "ई" | संकीर्ण | २०४७० | | | |
| "ह" | अग्रीम वसुली | ३०९५ | | भांडवली कामावरील खर्च | |
| | | ७८४८५४ | १) | झोपडपट्टी सुधारणा | ४०३०० |
| | | | २) | रस्ते बांधणी | ४६००० |
| | | | ३) | इतर इमारत बांधणी | ६८३०० |
| | | | ४) | इतर भांडवली कामे | १५५८०० |
| | | | | | ३१०४०० |
| १) | पाणी पुरवठा | ५५८०० | | "क" अंदाजपत्रकावरील खर्च | |
| २) | जलनिःसारण | ३५०० | १) | पाणी पुरवठा (महसुली खर्च) | १२२८१० |
| | | ५९३०० | २) | जलनिःसारण(महसुली खर्च) | १९७०५ |
| | | | | | १४२५१५ |
| | जमा | ८४४१५४ | | पाणी पुरवठा व जलनिःसारण | १०६००० |
| | दुबेरजी जमा | ४८००० | | खर्च | ८४१५५७ |
| | एकूण जमा | ८९२१५४ | | वर्षअखेर शिल्लक | २५९७ |
| | | | | दुबेरजी खर्च | ४८००० |
| | | | | एकूण खर्च | ८९२१५४ |

प्रस्तावात दर्शविल्यानुसार प्रशासनातर्फे सभागृहासमोर सादर करण्यांत आलेल्या सन १९९५-९६ च्या सुधारीत अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच प्रशासनातर्फे १९९६-९७ वर्षाकरीता सभागृहासमोर सादर करण्यांत आलेल्या अर्थसंकल्पात उपरोक्त नुसार सन १९९५-९६ च्यासुधारीत व सन १९९६-९७ च्या मुळ अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते व सर्वसाधारण सभेकडे मान्यतेस्तव शिफारस करण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीतानंतर सायंकाळी ६.५० वाजता सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

स्वाक्षरीत /-
नगर सचिव,
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत /-
सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २९-२-१९९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.दि.२९-२-१९९६ रोजी दुपारी ३.०० वाजता मा.सभापती,स्थायी समिती, श्री.प्रदीप कुमार जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभागृहात स्थायी समिती सभेस सुरुवात झाली.सभेस निम्ननिर्दिष्ट स.सभासद उपस्थित होते.तसेच महानगरपालिकेचे अधिकारीही उपस्थित होते.**

१) श्री.अब्दुल रशिदखान (मामू)
२) श्री.गौतम खरात.
३) सौ.रजनी जोशी.
४) श्री.प्रकाश निकाळजे.
५) श्री.कंवरसिंग बैनाडे.
६) कु.माया लाडवाणी.
७) श्री.विजयकुमार मेहेर.
८) श्री.प्रभाकर विधाते.
९) श्री.महादेव सुर्यवंशी.
१०) सौ.पद्मा शिंदे.
११) श्री.सुदाम सोनवणे.
१२) श्री.हमीदउद्दीन ताबा

**संवाद :**

मा.सभापती : महानगरपालिकेतर्फे शहरात विविध ठिकाणी स्टँड पोस्ट उभारुन जनतेसाठी पाण्याची सोय उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे.यापैकी काही स्टँड पोस्ट कट करण्यांत आले होते ते पुर्ववत सुरु करण्याबाबत मागील स्थायी समिती बेठकीत सुचना देण्यांत आलेल्या असतांनाही असे स्टँड पोस्ट सुरु करुन अहवाल स्थायी समितीस पाठवावा.

उप अभियंता (पापू) : सध्या शहरात अनधिकृत नळ कनेक्शन शोध मोहिम राबविण्यांत येत आहे.याच बरोबर कट करण्यांत आलेले स्टँड पोस्ट पुर्ववत सुरु करण्यांत येत आहेत.

श्री.हमीदउद्दीन ताबा : उस्मानपुरा स्मशान भूमीच्या बाजूची जागा आरक्षीत करण्यांत आलेली आहे.मात्र या जागेवर मोठया प्रमाणावर अनधिकृत बांधकाम केले जात आहे.

प्रशासकीय अधिकारी : हे काम एखादया वर्षापुर्वीचे असावे.मी स्वतःच जागेची स्थळ पाहणी केलेली आहे.

श्री.गौतम खरात : शहरात अनेक ठिकाणी अनधिकृत कामे चालू आहेत.या कामावर नियंत्रण ठेवण्यांसाठी व अशा प्रकारची कामे रोकण्यांसाठी एक समिती स्थापन करण्यांत यावी.

श्री.हमीदउद्दीन ताबा : अशी कामे रोकण्यासाठी प्रथम इमारत निरीक्षकांच्या बदल्या करण्यात याव्यात.लोक प्रथम अनधिकृत वसाहती उभारतात व नंतर मूलभूत सुविधा पुरविण्यांसाठी महानगरपालिकेवर दबाव आणतात.

मा.सभापती : केवळ इमारत निरिक्षकांच्या बदल्या करुनच प्रश्न सुटणार नाही.प्रशासकीय अधिकारी चांगल्या प्रकारे काम करत आहेत.तथापि एखादा इमारत निरिक्षक अनधिकृत कामास प्रोत्साहन देतांना दिसून आला तर स.सभासदांनी तशी नांवानिशी तक्रार करावी म्हणजे संबंधिताविरुध्द योग्य ती कार्यवाही करता येऊ शकेल.प्रशासकीय अधिकाऱ्यांनीही अशा प्रकरणात स्वत: लक्ष घालावे.

श्री.प्रकाश निकाळजे : टाऊन हॉलच्या मागील बाजूच्या मनपाच्या जागेवर अतिक्रमण होत आहे.तसेच टाऊन हॉल समोरील एका अनधिकृत इमारतीवरील न्यायालयाचा स्टे उठलेला आहे.तरीही ती पाडण्याची कार्यवाही करण्यांत का येत नाही.

विधी सल्लागार : जो पर्यंत स्टे ऑर्डर कार्यालयात प्राप्त होत नाही.तोपर्यंत नेमका कोणत्या कामासाठी स्टे आलेला आहे.याची कार्यालयासही कल्पना येऊ शकत नाही.मात्र अशी प्रकरणे कार्यालयात प्राप्त होताच न्यायालयात आवश्यक ती सर्व कागदपत्रे सादर करुन स्टे उठवण्यांबाबत प्रयत्न केला जातो.न्यायालयीन कामे पार पाडण्यांसाठी या विभागात पुरेसा कर्मचारी नसल्याने त्याचा कामावर परिणाम होतो.तेव्हा या विभागाची पुर्नरचना करण्यांत यावी.

मा.सभापती : न्यायालयापुढे महानगरपालिकेचे म्हणणे पाहिजे असे प्रभावी रित्या मांडले जात नाही.निराला बाजार समोरील अतिक्रमणे हटविण्यांबाबत न्यायालयाचा स्टे उठलेला असतांनाही प्रकरणांत पुढील कार्यवाही केली जात नाही.विधी सल्लागार यांनी त्यांच्या विभागातील अडचणीबाबत लेखी स्वरुपात निवेदन सादर करावे.

श्री.गौतम खरात : अनिधकृत  कामे रोखण्यासाठी विविध विभागीय कार्यालयातून कार्यरत विभागीय अधिकारी व इन्स्पेक्टर्सनांही सुचना देण्यांत याव्यात.

विधी सल्लागार : कंपाऊंडींग फीस लावण्याचे अधिकार प्लॅंनिंग कमेटीस आहेत.कलम १५२ प्रमाणे आयुक्त असे अधिकार इतर अधिकाऱ्यांनाही प्रदान करु शकतात.

सहा.संचालक : प्रशासकांच्या काळात कंपाऊंडींग फीस लावण्यांच्या संदर्भाने महानगरपालिकेने काही गाईडलाईन्स बनवल्या होत्या त्या आधारे कंपाडफंडींग फीस बाबत निर्णय घेतेले जातात.

मा.सभापती : लोक नियुक्त मंडळ आल्यानंतर हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मांडवयास पाहीले हाता तो मांडला गेला नाही.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : जालना रस्त्यावर एका इमारतीस बांधकामाबाबत स्टे असतांनाही हया इमारतीचे काम चालू आहे.ही बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणावयास पाहीजे.

मा.सभापती : प्रकरणात १४ मार्च रोजी सुनावणी होणार असली तरी काम चालू असतांना अशा कामाचे फोटो काढावेत व सर्व पुरावे न्यायालयासमोर सादर करावेत जेणेकरुन न्यायालयातही याच बरोबर विकास आराखडयातील आरक्षीत जागांवर कोणी बांधकाम करत असेल व खरेदी विक्रीचे व्यवहार केले जात असतील तर त्यांच विरुध्द कार्यवाही केली जाईल अशा स्वरुपाचे निवेदन वृत्तपत्रातून प्रसिध्द करण्यांत यावे.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : मुंबई,पुणे सारख्या शहरात मनपाची न्यायालयीन प्रकरणे सोडविण्यांसाठी स्वतंत्र न्यायालय आहे.त्याच धर्तीवर औरंगाबाद मानपासाठी

न्यायालय स्थापन करण्यांत यावी अथवा एकाच न्यायाधिशांकडे मनपाची सर्व प्रकरणे चालविण्याबाबत सेशन जज्ज यांना विनंती करण्यांत यावी.

मा.सभापती : श्री.रशिदखान (मामू) यांनी मांडलेली सुचना योग्यच आहे.याबाबत सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.करंट अकाऊंट फॅसिलीटी सुरु करण्याबाबत मागील स्थायी समिती बेठकीत सुचना देण्यांत आलेल्या होत्या.जकात अधिक्षकांनी याबाबत निवेदन करावे.

जकात अधिक्षक : काही कंपन्यांनी अर्ज सादर केले आहेत की,मनपाने करंट अकाऊंट संबंधाने लावलेले रेट जास्तीचे वाटतात ते कमी करण्यात यावेत.

मा.सभापती : मुख्य लेखा परिक्षक लेखाधिकारी जकात अधिक्षक यांनी एकत्रित्या काम करुन करंट अकाऊंट फॅसिलीटी संदर्भाने परत प्रयत्न करावेत.या संदर्भाने अटी व शर्ती ठेवत असतांनाच व्यवहार्य बाबींचाही विचार करावा.एखादया कंपनीने,वृत्तपत्र समुहाने विनंती केली असल्यास त्यांच्या वर्षभराचा टर्न ओव्हर पाहून करंट अकाऊंटची रक्कम नक्की करण्यांत यावी.आठ दिवसांचे आत कार्यवाही करुन अहवाल स्थायी समितीस पाठवावा.

चिकलठाणा औद्योगिक वसाहतीतील बऱ्याचशा कंपन्यांची जकाती संदर्भाने तक्रार आहे.कच्च्या मालावर जकात कर आकारला जात नाही.याची जकात अधिक्षकांनी खात्री करावी.अशा मालांवर लेबर चार्जेसवर १० टक्के या प्रमाणात जकात आकारावी तसेच "आर" फॉर्म चालू करण्यांबाबत सर्वसाधारण सभेकडे प्रस्ताव पाठवावा.

श्री.हमीदउद्दीन ताबा : सिटी चौक पोलीस स्टेशन मागील भागातील रस्ता रुंदीकरणा अंतर्गत काही घरे पाडलेली आहेत.मात्र अशा घरांचा मलबा रस्त्यांवरच पडून आहे तर काही घरांचा मलबा रस्त्यांवरच पडून आहे तर काही घरांचा अद्यापही ताबा घेतला गेलेला नाही ही कार्यवाही त्वरेने करण्यांत यावी.

मा.सभापती : रस्त्यांवरील माती तात्काळ उचलून घेण्यांत यावी.उर्वरीत घरांची जागा संपादीत करण्यांबाबत तात्काळ कार्यवाही करण्यांत यावी.

मनापातर्फे शहरातील विविध चौकांचे सौंदर्यीकरण करण्यांत आलेले आहे.मात्र अशा चौकातून / रस्त्यांवर विविध पक्षांचे झेंडे,बॅनर्स,पोस्टर्स लावण्यांत आलेले दिसुन येतात.यामुळे सार्वजनिक मालमत्तेची नासधुस होते.संबंधीत पक्षाच्या/संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना प्रथम अशा झ ेंडे,बॅनर्स,पोस्टर्स काढून घेण्याबाबत सुचना देण्यांत याव्यात व याउपरही त्यांनी कार्यवाही न केल्यास त्यांच्याविरुध्द कार्यवाही करण्यांत यावी.याकामी संबंधित प्रभागातील नगरसेवकांनाही प्रशासनास सहकार्य करावे.

श्री.प्रकाश निकाळजे : काही बिल्डर्स झोपडपट्टी भागातील जागा/घरे विकत घेतात व जादा दराने विकतात त्यामुळे मालमत्ता विकणाऱ्या व्यक्ती पुन्हा इतरत्र अनधिकृत वसाहती वसवतात.तेव्हा अशा मालमत्ताचे नामांतर करण्यांत येऊ नये.

मा.सभापती : सुचना योग्य असली तरी कायदयाच्या चौकटीत राहून आपण अशी बंधने नागरीकांवर चालू शकणार नाही.तथापी विधी सल्लागार यांनी याबाबत प्रशासनातर्फे कायदयाच्या चौकटीत राहून काय कार्यवाही करता येऊ शकेल याबाबत विचार करतात.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : अशा प्रकरणात संबंधित वॉर्डातील नगरसेवकांचे पत्र घेण्यांत यावें व नंतरच खरेदी/विक्री,नामांतर प्रकरणात कार्यवाही करण्यांत यावी.

श्री.हमीदउद्दीन ताबा : विद्युत विभागातील लाईनमन्सनी दुपारी कार्यालयातील कामे पार पाडवीत असे आदेशीत केलेले असतांनाही ते दुपारी कार्यालयात थांबत नाहीत.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : कोणत्या दिवशी कोणत्या विभागातील विद्युतची कामे केली जाणार आहेत याचा लेखी फलक विद्युत विभागात लावण्यांत यावा.

मा.सभापती : स.सभासदांच्या मागणीप्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी. याच बरोबर स्थायी समिती बेठकीस सर्व अधिकारी उपस्थित राहतील याची उप आयुक्तांनी खात्री बाळगावी.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : झुणका भाकर केंद्रासाठी फुटपाथवर अथवा टॉयलेटच्या बाजूस जागा देण्यांत येऊ नये.शहरात काही ठिकाणी अश उपक्रमासाठी जागा देण्यांत आलेली आहे.

श्री.प्रकाश निकाळजे : अशा स्टॉल्सवर झुणका भाकर शिवाय इतर पदार्थ विकण्यांसाठी मंजुरी देण्यांत येऊ नये.

मा.सभापती : झुणका भाकर ही योजना शासनानेच सुरु केलेली आहे.अशा उपक्रमांसाठी जागा देतांना ती फुटपाथवर दिली जाणार नाही याची संबंधित अधिकाऱ्यांनी काळजी घ्यावी.

श्री.गौतम खरात : नगरसेवक स्वेच्छा निधीतून सुशिक्षित बेरोजगारांना प्रशिक्षण देण्यांसाठी निधीचा वापर करता येऊ शकेल अशी दुरुस्ती स्वेच्छा निधी वापर नियमावलीत करण्यांत यावी

भिमनगर भावसिंगपुरा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा आहे.त्यास संरक्षणात्मक कठडा बांधण्यात यावा व त्याचे सुशोभिकरण करण्यांत यावे.

मा.सभापती : संबंधित विभाग प्रमुखाने एक विशेष बाब म्हणून कार्यवाही करावी.

उप अभियंता,अभियंता यांच्या संदर्भाने शासनाने नुकताच पारित केलेल्या शासकीय निर्णयावरती अंमलबजावणी करण्यांच्या संदर्भाने शासनाने नुकाताचे पारित केलेल्या शासकीय निर्णयावरती अंमलबजावणी करण्यांच्या संदर्भाने आगामी सभेत प्रस्ताव ठेवण्यांत यावा.

स. नगरसेवक श्री.गौतम खरात यांनी सुचना मांडल्यानुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटरच्या कामात दिरंगाई होऊ नये.कंत्राटदार दर कमी करण्यांस तयार नसेल तर छत्रपती शिवाजी महाराज म्युझीयमबाबत आलेल्या दराने काम करण्यांस कंत्राटदार तयार असेल तर त्या दराने काम करुन घ्यावे.

**विषय क्र. ४५३/१:**

दिनांक १३-२-१९९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तास मंजुरी देणे तसेच दिनांक १९-२-९६ रोजी संपन्न झालेल्या अर्थसंकल्पीय सभेच्या इतिवृत्तास मंजुरी देणे.

**संवाद :**

श्री.गौतम खरात : दिनांक १३-२-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेत सुचित केल्याप्रमाणे झोपडपट्टयांच्या विकासाबाबतच्या अर्थसंकल्पीय तरतूदी व खर्चा बाबतचा तपशील देण्यांत यावा.स्लम विभागातील कामे जाणीव पुर्वक केली जात नाहीत.

शहर अभियंता : स्लम विभागासाठी रुपये ४४०/- लाखाची आर्थिक तरतुद करण्यांत आली होती.डिसेंबर ९५ अखेर रुपये १६६ लाख खर्च झालेला असून मार्च ९६ पर्यंत १५० लाख खर्च होणार आहे विविध स्लममध्ये ५० कामे चालू आहेत.

सौ रजनी जोशी : श्री.तायडे मनपात १-३-९० ते १२-१०-९५ पर्यंत दैनिक वेतनावर काम करत होते.मनपाने बनविलेल्या सिनियरिटीप्रमाणे श्री.तायडे यांच्यानंतर लोकांना कामावर घेतले आहे.तेव्हा श्री.तायडे यांनाही कामावर घेण्यांत यावे.

मा.सभापती : सहाय्यक आयुक्त-२ यांनी याबाबत उचित कार्यवाही व्हावी.

श्री.महादेव सुर्यवंशी : स्लम विभागाची कामे पार पाडण्यासाठी उप अभियंता (स्लम-३) ची नेमणूक करण्यांत आलेली आहे.तथापी त्यांच्याकडे पुरेसा कर्मचारी देण्यांत आलेला नाही.त्यामुळे त्यांना कामे पार पाडता येत नाहीत.

मा.सभापती : स्लम-३ विभागासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग सहा.आयुक्तांनी उपलब्ध करुन द्यावा आवश्यकतेप्रमाणे दैनिक वेतनावर कर्मचारी नेमण्यांत यावेत.

झोपडपट्टी भागांतील कामे व्यवस्थितरित्या पार पाडली जावीत यासाठी एक स्वतंत्र कार्यकारी अभियंता पद भरण्यांत यावे.

मा.सभापती : स्टफींग पॅटर्न संदर्भाने आयुक्तांनी एका समितीचे गठण केलेले आहे.या समितीवर काम करण्यांसाठी विरोधी पक्षनेत्यांनी अद्याप एका स.सदस्यांचे नांव सुचविलेले नाही तेही त्यंनी तात्काळ सुचवावे.

**ठराव :**

दिनांक १३-२-९६ रोजी संपन्न झ्झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तास व दि.१९-२-१९९६ रोजी संपन्न झालेल्या अर्थसंकल्पीय बैठकीच्या इतिवृत्तास १९९५-९६ चे सुधारीत अंदाजपत्रक व १९९६-९७ चे मुळे अंदाजपत्रकासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५४/२:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,सिल्लेखाना चौक ते मोंढा रोड पर्यंतच्या रस्त्यांवरील मध्य दुभाजकाची उंची वाढविण्यांच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.३,१६,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्रमांक २४२/१३ दिनांक २८-१२-९५ अन्वये मंजुरी मिळाली आहे.कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/५०/९५ दि.२८-१२-९५ नुसार निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सात (७) निविदा पत्रके विकल्या गेली पैकी निविदापत्रक स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सात(७) निविदापत्रके विकल्या गेली पैकी निविदा पत्रके स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन(२) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली प्राप्त निविदापत्रके दि. १६-१-९६ ला उपस्थित कंत्राटदारासमक्ष उघडण्यांत आली.त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) श्री.सलीम पटेल | अंदाजपत्रकीय दराने |
| २) मे.टी.स्टार कंन्स्ट्रक्शन | ४% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराने श्री.सलीम पटेल यांच्या निविदापत्रकाचे दर असून श्री. सलीम पटेल यांची अंदाजपत्रकीय निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सिल्लेखाना चौक ते मोंढा रोड पर्यंतच्या रस्त्यावरील दुभाजकाची उंची पाठविण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदा पत्रकापैकी

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराने काम करण्यांस तयार असलेल्या श्री.सलीम पटेल यांच्या निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५५/३:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,धावणी मोहल्ला,किराण चावडी,अंगंरीबाग प्रभागांअंतर्गत खांडकी दुरुस्त करणे आणि एक फरशी (शहाबाद) बसविण्यांच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.२,८३,६००/- चे तयार आले आहे.सदरील कामाचा खर्च देखभाल दुरुस्ती सन १९९६-९७ या लेखा शिर्षकामधुन करण्यांत येईल.

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार धावणी मोहल्ला,किराणा चावडी,अंगुरीबाग प्रभागातील अंतर्गत खांडकी दुरुस्त करणे आणि एक फरशी (शहाबाद) बसवण्यांच्या कामासाठी बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार बनविण्यांत आलेल्या रक्कम रु.२,८३,६००/- च्या अंदाजपत्रकास व सदरील काम रस्ते देखभाल व दुरुस्ती सन १९९६-९७ या लेखाशिर्षकामधून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५६/४:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,सिटी क्लब समोरील वाहतुक बेटालगत फुटपाथ बनविणे व लोखंडी जाळी बसविण्यांच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९४-९५ चे अंदाजपत्रक रक्कम रु.३,९४,९८०/- चे तयार करण्यांत आले आहे.सदरील कामाचा खर्च महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या १०.०० कोटी या अनुदानातून करण्यांत येईल.प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/५६/९६ दि. १५-१-९६ अन्वये निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन (३) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली.प्राप्त निविदापत्रके दि.१-२-९६ ला उपस्थित कंत्राटदारांसमक्ष उघडण्यांत आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) श्री.सलीम पटेल | अंदाजपत्रकीय दराने |
| २) श्री.कुलवंतसिंग | ५ % जास्त दराने |
| ३) श्री.ओ.एस.शमा | ७% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी श्री.सलीम पटेल यांच्या निविदा पत्रकाचे दर सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराने आहे.तरी श्री.सलीम पटेल यांच्या अंदाजपत्रकीय दराने असणाऱ्या निविदापत्रीकेस व निविदा धारकास मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सिटी क्लब समोरील वाहतुक बेटालगत फुटपाथ बनविणे व लोखंडी जाळी बसविण्यांच्या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन १९९४-९५ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रकीय रक्कम रु.३,९४,९८०/- ला व हे काम महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या १० कोटी रुपये अनुदानातुन करण्यांस तसेच प्राप्त निविदा पत्रकापैकी श्री.सलीम

पटेल यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने व सर्वात कमी असल्याने उक्त कामास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५७/५:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,गारखेडा सुतगिरणी ते सिडको हद्दीपर्यंत रस्त्यांचे विद्युतीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. ७,३७,३५०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.२१५/१० दिनांक ४-१२-९५ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.त्यानुसार सदरील कामा करीता निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त चार निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दिनांक ८/९/९६ रोजी उघडण्यांत आली.त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) मे.कॅपको एजन्सीज | २.३२ टक्के कमी दराने |
| २) मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकीय दराने |
| ३) मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स | १.०० टक्का कमी दराने |
| ४) मे.सुरेश इलेक्ट्रीकल्स | २.०० टक्के जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.कॅपको एजन्सीज यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.३२% कमी आहेत.

तरी मे.कॅपके एजन्सीज यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.३२ टक्के कमी दर मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार गारखेडा,सुतगिरणी ते सिडको हद्दीपर्यंतच्या रस्त्याचे विद्युतीकरण करण्याच्या रु. ७,३७,३५०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.२१५/१० दि.४-१२-९५ अन्वये मंजुरी देण्यांत आल्यानुसार व प्राप्त निविदापपैकी मे.कॅपको एजन्सीज यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.३२ टक्के कमी असल्याने मे.कॅपको एजन्सीज यांच्याकडून काम करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५८/६:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,रेल्वेस्टेशन समोरील रस्त्यांच्या मध्य दुभाजकात सोडीयम व्हेपरचे दिवे लावून विद्युतीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,१९,२५७/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.२९३/६४ दि. २१-१२-९५ अन्वये मंजुरी प्रापत झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण अकरा (११) कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदपत्रके स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन (३) निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दि.१६-९-९६ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) मे.बी.जे.इलेक्ट्रीक कं. | १.०० टक्के कमी दराने |
| २) मे.प्रगत इलेक्ट्रीक | १.२० टक्के जास्त दराने |
| ३) मे.ओमिक्रॉन इंजिनियर्स | ५.०० टक्के जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकांपैकी मे.बी.जे.इलेक्ट्रीक कं.यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०० कमी आहेत.

तरी मे.बी.जे.इलेक्ट्रीक कं.यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०० टक्के कमी दर मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार रेल्वेस्टेशन समोरील रस्त्यांच्या मध्य दुभाजकात सोडीयम व्हेपरचे दिवे लावून विद्युतीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,१९,२५७/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.२९३/६४ दि.२१-१२-९५ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे.

सदरील कामाकरीता प्राप्त निविदापैकी मे.बी.जे.इलेक्ट्रीक कं.यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १ टक्का कमी असल्याने सदरचे काम मे.बी.जे.इलेक्ट्रीक कं.यांचेकडून करुन घेण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५९/७:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ते लिटल फ्लॉवर स्कुल या रस्त्यांचे विद्युतीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.६,१९,५८०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.२१८/१३ दिनांक ४-१२-९५ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण चौदा (१४) कोरी निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त पांच निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली.प्राप्त निविदापत्रके दि.८-१-९६ रोजी उघडण्यांत आली.त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) मे.सुरेश इलेक्ट्रीकल्स | २.०० टक्के जास्त दराने |
| २) मे.विश्वनाथ इलेक्ट्रकल्स | ३.०० टक्के जास्त दराने |
| ३) मे.कॅपको एजन्सीज | १.०६ टक्के कमी दराने |
| ४) मे.प्रगत इलेक्ट्रकल्स | २.११ टक्के कमी दराने |
| ५) मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स | १.०० टक्के कमी दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकांपैकी मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.११ टक्के कमी आहेत.

तरी मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.११ टक्के कमी दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार डॉ.बाबासाहेब आंबेडक्र मराठवाडा विद्यापीठ ते लिटल फ्लॉवर स्कुल या रस्त्यांच्या विद्युतीकरणांच्या रक्कम रु.६,१९,५८०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.२१८/१३ दिनांक ४-१२-९५ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे.प्राप्त निविदांपैकी मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स यांचे दर तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.११ टक्के कमी असल्याने मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स यांच्याकडून सदरचे काम करवून घेण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६०/८:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,हॉटेल अमतप्रीत ते चेतनानगर या रस्त्यांचे विद्युतीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.६,४१,४५०/-

च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. २१६/११ दि.४-१२-९५ अन्वये मंजुरी प्राप्त झ ाालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण पंधरा कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विताीच्या अंतीम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन(३) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली.प्राप्त निविदापत्रके दि.८-१-९६ रोजी उघडण्यांत आली.त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) मे.सुरेश इलेक्ट्रीकल्स अंदाजपत्रकीय दराने
२) मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स १.०० टक्के कमी दराने
३) मे.सत्यम वायर्स १.९० टक्के कमी दराने

वरील प्राप्त निविदांपैकी मे.सत्यम वायर्स यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.९० टक्के कमी आहेत.

तरी मे.सत्यम वायर्स यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.९०टक्के कमी दर मंजुरीबाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार हॉटेल अमतप्रीत ते चेतनानगर या रस्त्यांच्या विद्युतीकरणाच्या रुपये ६,४१,४५०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.२१६-११ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे.प्राप्त निविदांपैकी मे.सत्यम वायर्स यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.९० टक्के कमी असल्याने मे.सत्यम वायर्स यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६१/९:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,बस स्टॅन्ड ते जलतरण तलाव पर्यंतच्या रस्त्यांचे विद्युतीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,५३,५९२/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.३३३/२९ दि.२८-१२-९५ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सोळा (१६) कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त चार (४) निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली.त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) मे.विश्वनाथ इलेक्ट्रीकल्स १.०० टक्का कमी दराने
२) मे. लुना इलेक्ट्रीकल्स २.०० टक्के कमी दराने
३) मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स १.०० टक्का कमी दराने
४) मे.इगल इलेक्ट्रीकल्स २.८९ टक्के कमी दराने

वरील प्राप्त निविदापत्रकांपैकी मे.इगल इलेक्ट्रीकल्स यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.८९ टक्के कमी आहेत.

तरी मे.इगल इलेक्ट्रीकल्स यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.८९ टक्के कमी दर मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचाराथ्र तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविण्यांत आल्यानुसार बसस्टॅन्ड ते जलतरण तलाव पर्यंतच्या रस्त्यांच्या विद्युतीकरणांच्या रक्कम रु.२,६३,५९२/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय

क्र.३३३/२९ दि.२८-१२-९५ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे.प्राप्त निविदांपैकी मे.इगल इलेक्ट्रीकल्स यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.८९ टक्के कमी असल्याने सदरचे काम मे.इगल इलेक्ट्रीकल्स यांच्याकडून करुन घेण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६२/१०:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,शहरातील विविध चाौकात ३ सेट व ४ सेट सोडीयम व्हेपर फिटींग लावण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.८,०९,०९०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.२१७/१२ दि. ४-१२-९५ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असता,निविदापत्रके विक्रीच्याअंतिम तारखेपर्यंत एकूण तेरा(१३) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त चार (४) निविदा पत्रके दर भरून प्राप्त झाली.प्राप्त निविदापत्रके दि.८-१-९६ रोजी उघडण्यांत आली.त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) मे.सुरेश इलेक्ट्रीकल्स | १.०० टक्के कमी दराने |
| २) मे.प्रगत इलेक्ट्रकल्स | अंदाजपत्रकीय दराने |
| ३) मे.लुना इलेक्ट्रीकल्स | १.०० टक्के कमी दराने |
| ४) मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स | २.५० टक्के कमी दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकांपैकी मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स यांच्या निविदापत्रकाचे दर तूलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.५० टक्के कमी आहेत.

तरी मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स यांचे अंदाजपत्रकरय दरापेक्षा २.५० टक्के कमी दर मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शहरातील विविध चौकात ३ सेट व ४ सेट सोडीयम व्हेपर फिटींग लावण्यांच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.८,०९,०९०/- अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.२१७/१२ दि.४-१२-९५ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे.सदर कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.५० टक्के कमी मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स यांची निविदा असल्याने मे. आदित्य इलेक्ट्रीकल्स यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६३/११:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,कटकटगेट ते सिडको रोड पर्यंतच्या रस्त्याचे विद्युतीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.८,०५,३७०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. २३३/४ दि.२१-१२-९५ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण पंधरा (१५) कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त सहा (६) निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली

.प्राप्त निविदा पत्रके दि.१६-१-९६ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) मे.ओमिक्रॉन इंजिनियर्स | १.४० टक्के कमी दराने |
| २) मे.कॅपको एजन्सीज | ०.६० टक्के जास्त दराने |
| ३) मे.बी.जे.इलेक्ट्रीक कं. | ५.०० टक्के जास्त दराने |
| ४) मे.नागला इलेक्ट्रीकल्स | २.०० टक्के जास्त दराने |
| ५) मे.विश्वनाथ इलेक्ट्रीकल्स कं. | १.०० टक्के कमी दराने |
| ६) मे.लुना इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकीय दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकांपैकी मे.ओमिक्रॉन इंजिनियर्स यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.४० टक्के कमी आहेत.

तरी मे.ओमिक्रॉन इंजिनियर्स यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.४०% कमी दर मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचाराथ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार कटकटगेट ते सिडको पर्यंतच्या रस्त्याचे विद्युतीकरण करण्याच्या कामास रक्कम रु. ८,०५,३७०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.२३३/४ दि. २१-१२-९५ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे.प्राप्त निविदापत्रकांपैकी मे.ओमिकॉन इंजिनियर्स यांची निविदा तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.४० टक्के कमी असल्याने त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६४/१२:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,मिलकॉर्नर ते लिटल फ्लॉवर स्कुल या रस्त्याचे विद्युतीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.४,४८,३०९/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.३११/८ दिनांक २८-१२-९५ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असता,निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण पंधरा (१५) कोरी निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त चार (४) निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली.प्राप्त निविदापत्रके दि. १८-१-९६ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) मे.लुना इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकीय दराने. |
| २) मे.ओमिक्रॉन इंजिनियर्स | १.०० टक्के जास्त दराने |
| ३) मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स | २.०० टक्के कमी दराने |
| ४) मे.कॅपको एजन्सीज | अंदाजपत्रकीय दराने. |

वरील प्राप्त निविदापत्रकांपैकी मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.०० टक्के कमी आहेत.

तरी मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.००% कमी दर मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मिलकॉर्नर ते लिटल फ्लॉवर स्कुल या रस्त्यांच्या विद्युतीकरणासाठी रक्कम रु.४,४८,३०९/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क.३१०/८ दि.२८-१२-९५ अन्वये मजुरी देण्यांत आलेली आहे.सदर कामासाठी प्राप्त झालेल्या निविदा पत्रककांपैकी मे.आदित्या इलेक्ट्रल्स यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात

कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.०० टक्के कमी असल्याने त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधनिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६५/१३:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,रोषनगेट ते चेलीपुरा या रस्त्याचे विद्युतीकरण करणे या कामासाठी तयार करसयात आलेल्या रक्कम रु. ६,१९,५८०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.२१९/१४ दिनांक ४-१२-९५ अन्वये मंजुरी प्राप्त झ ाली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण चौदा (१४) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त चार (४) निविदा पत्रके दर भरुन प्रापत निविदा पत्रके दि. ८-१-९६ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) मे.सत्यम वायर्स | १.९० टक्के कमी दराने. |
| २) मे.प्रगत इलेक्ट्रकल्स | अंदाजपत्रकीय दराने. |
| ३) मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स | १.०० टक्के कमी दराने. |
| ४) मे.लुना इलेक्ट्रीकल्स | १.०० टक्के कमी दराने. |

वरील प्राप्त निविदापत्रकांपैकी मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.५०% कमी आहे.

तरी मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.५०% कमी दर मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार रोषनगेट ते चेलीपुरा या रस्त्याच्या विद्युतीकरणाचा रक्कम रु.६,१९,५८०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.२१९/१४ दि.४-१२-९५ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे.प्राप्त निविदापैकी मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.५१ टक्के कमी असल्याने त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६६/१४:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,हॉलिडे कॅम्प ते नागसेननगर या रस्त्यांचे विद्युतीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत रक्कम रु.२,७६,५४०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.२८६/५७ दि.२१-१२-९५ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विकीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण चौदा (१४) कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन (३) निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झ ाली,प्राप्त निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन (३) निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली प्राप्त निविदा पत्रके दि.१६-१-९६ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) मे.ओमिक्रॉन इंजिनियर्स | ५.०० टक्के कमी/जास्त दराने |

२) मे.बी.जे.इलेक्ट्रीकल्स कं. १.०० टक्के कमी दराने
३) मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स १.२ टक्के जास्त दराने

वरील प्राप्त निविदापत्रकांपैकी मे.बी.जे.इलेक्ट्रीकल्स कं. यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०० टक्के कमी आहेत.

तरी मे.बी.जे.इलेक्ट्रीकल्स कं.यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% कमी दर मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार हॉलिडे कॅम्प ते नागसेननगर या रस्त्यांच्या विद्युतीकरणाचा रक्कम रु.२७६,५४०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.२८६/५७ दि.२१-१२-९५ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे.प्राप्त निविदांपैकी मे.बी.जे.इलेक्ट्रीकल्स कं.यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा १ टक्के कमी असल्याने त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६७/१५:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,रेल्वेस्टेशन ते इटखेडा या रस्त्यावर सोडीयम व्हेपर दिवे लाऊन विद्युतीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१२,७७,८५५/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.२८९/६० दि.२१-१२-९५ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदा पत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त पाच (५) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली.प्राप्त निविदपत्रके दि.१६-१-९६ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) मे.सुरेश इलेक्ट्रीकल्स १.०० टक्के जास्त दराने.
२) मे.सत्यम वायर्स अंदाजपत्रकीय दराने.
३) मे.प्रगत इलेक्ट्रकल्स १.११ टक्के कमी दराने.
४) मे.बी.जे.इलेक्ट्रीक कं. ५.०० टक्के जास्त दराने.
५) मे.विश्वनाथ इलेक्ट्रीक कं. ०.५० टक्के जास्त दराने.

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.११% कमी आहेत.

तरी मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.११% कमी दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

स्थायी समिती विषय क्र.२८९/६० दि.२१-१२-९५ अन्वये रेल्वेस्टेशन ते इटखेडा या रस्त्यावर सोडीयम व्हेपर दिवे लावून विद्युतीकरण करण्यांच्या रक्कम रु. १२,७७,८५५/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत आले ली आहे.प्रस्तावात दर्शविल्यानुसार प्राप्त निविदा पैकी मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.११ टक्के कमी असल्याने त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६८/१६:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,पन्नालालनगर ते पीरबाजार रोड या रस्त्यांवर सोडीयम व्हेपर दिवे लावून विद्युतीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. ७,८३,११४/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. २९०/६१ दिनांक २१-१२-९५ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण पंधरा (१५) कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत फकत चार (४) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली.प्राप्त निविदापत्रके दिनांक १६-१-९६ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) मे.ओमिक्रॉन इंजिनियर्स | १.०० टक्के जास्त दराने |
| २) मे.कॅपको एजन्सीज | १.०३ टक्के कमी दराने |
| ३) मे.प्रगत इलेक्ट्रकल्स | दर नमूद केले नाही. |
| ४) मे.विश्वनाथ इलेक्ट्रीक कं. | अंदाजपत्रकीय दराने. |

वरील प्राप्त निविदा पत्रकांपैकी मे.कॅपको एजंन्सीज यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मक्दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.०३% कमी आहेत.

तरी मे. कॅपको एजन्सीज यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.०३% कमी दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार पन्नालालनगर ते पीरबाजार रस्त्यावर सोडीयम व्हेपर दिवे लावून विद्युतीकरण करण्यांच्या रक्कम रु.७,८३,११४/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. २९०/६१ दि.२१-१२-९५ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे.प्राप्त निविदापत्रकांपैकी कॅपको एजन्सीज यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.०३ टक्के कमी असल्याने त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६९/१७:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,गजानन महाराज मंदिर ते सिडको हद्छीपर्यंत रस्त्यांचे विद्युतीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.८,२१,८७२=०० च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.२९१/६२ दिनांक २१-१२-९५ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदपत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सोळा (१६) कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन (३) निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली.प्राप्त निविदा पत्रके दि. १६-१-९६ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) मे.लुना इलेक्ट्रीकल्स | २.५० टक्के कमी दराने |
| २) मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स | ८.०० टक्के जास्त दराने |
| ३) मे.ओमिक्रॉन इंजिनियर्स | ८.०० टक्के जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकांपैकी मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.५० टक्के कमी दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार गजानन महाराज मंदिर ते सिडको हद्दीपर्यंतच्या रस्त्याच्या विद्युतीकरणासाठी रक्क्म रु.८,२१,८७२/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.२९१/६२ दि.२१-१२-९५ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे.प्राप्त निविदापैकी मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.५० टक्के कमी असल्याने त्यांच्या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७०/१८:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,गुलमंडी ते औरंगपुरा या रस्त्यांवर सोडीयम व्हेपरचे दिवे लावुन विद्युतीकरण करण्यांच्या कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,६५,९३४/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. २८५/५६ दि.२१-१२-९५ अन्वये स्थायी समितीची मंजुरी मिळालेली आहे.

सदर कामाकरीता निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तेरा (१३) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त चार (४) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झ ाली.प्राप्त निविदापत्रके दि.१६-१-९६ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स | १५.००% | जास्त दराने |
| २) मे.बी.जे.इलेक्ट्रीक कं. | १५.००% | जास्त दराने |
| ३) मे.ओमिक्रॉन इंजिनियर्स | २०.००% | जास्त दराने |
| ४) मे.लुना इलेक्ट्रीकल्स | ८.००% | जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकांपैकी मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.८०% जास्त या दरापेक्षा कमी दर करण्यांस तयारी दर्शविली नाही व निविदापत्रकात नमुद केलेल्या दरावर ठाम राहिले.करीता मा.आयुक्त यांनी सदर कामाच्या फेर निविदा मागवाव्यात व त्याच प्रमाणे सदर प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ ठेवावा असे सुचविले.

तरी सदर प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार गुलमंडी ते औरंगपुरा या रस्त्यावर सोडीयम व्हेपर दिवे लावून विद्युतीकरण करण्यांच्या रक्कम रु.२,६५,२३४/- च्या अंदाजपत्रकास विषय क्र.२८५/५६ दि.२१-१२-९५ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे.प्राप्त दर पत्रकापैकी व वाटाघाटीअंती मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांनी सदर काम ८.८० टक्के जास्त दराने काम करण्यांची संमती दर्शविली असली तरी संबंधित एजन्सीज परत वाटाघाटीस बोलावून ते ६ टक्के जास्त दराने काम करण्यांस तयार असतील तर त्यांच्याकडून काम करवून घेण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.अन्यथा टेंडर रिकॉल करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७१/१९:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,शहरात वेगवेगळया वस्तीत रोवण्यांत आलेल्या विद्युत खांबांवर टयुब फिक्चर बसविण्यासाठी टयुब फिक्चर खरेदी करण्यांकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.८,२५,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय २९४/६५ दि.२१-१२-९५ अन्वये स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे.सदरील साहित्य खरेदी करण्यासाठी फिलिप्स क्रॉप्टन व बजाज कंपनीच्या अधिकृत विक्रेत्या कडून दरपत्रके मागविण्यांत आली असता दरपत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त चार दरपत्रके दर भरुन प्राप्त झाली.प्राप्त निविदा पत्रके दि.१६-१-९६ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | टयुब,फिक्चरसाठी प्राप्त झालेले दर. |
|---|---|---|
| १ | मे.मेहता ट्रेडर्स | रक्कम रु.८६५=४६ प्रति फिटींग (बजाज मेक) |
| २ | मे.पगारिया इंटरप्रायझेस | रक्कम रु.८४६=०० प्रति फिटींग(बजाज किंवा क्रॉम्प्टन मेक) |

| | | |
|---|---|---|
| ३ | मे.सत्य इलेक्ट्रीकल्स | अ) रक्कम रु.८५१=००<br>ब) रक्कम रु.६२५=०० प्रति फिटींग सा.बां.खात्याच्या मंजुर यादी नुसार रक्कम रु.८४८=०० प्रति फिटींग) |

कार्यालयाने फक्त फिलीप्स,क्रॉम्प्टन व बजाज कंपनीच्या फिटींग करीता दरपत्रके मागविली होती,परंतु वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे मे.सत्य इलेक्ट्रीकल्स यांनी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या मंजुर यादी नुसार सदरील फिटींग रक्कम रु.६२५/- प्रति नग या दराने पुरविण्यासाठी दर नमुद केले आहेत.निविदा सुचना व निविदापत्रके यामध्ये फक्त फिलीप्स,क्रॉम्प्टन व बजाज कंपनीच्या फिटींगसाठी व दर नमुद करावेत असा स्पष्ट उल्लेख असतांना मे.सत्य इलेक्ट्रीकल्स यांनी वरील प्रमाणे दर नमुद केले आहेत.ते विचारात न घेता तसेच मे.सत्य इलेक्ट्रीकल्स यांनी दुसरेही दर म्हणजे रक्कम रु. ८५१/- प्रति फिटींग असे दिलेले आहेत,त्याचप्रमाणे मे.जायको इंटरप्रायजेस यांनीही रक्कम रु.८४८=०० प्राप्त फिटींग असा दर नमुद केला आहे परंतु कोणत्या कंपनीच्या फिटींग पुरविणार आहेत याचा स्पष्ट उल्लेख केलेला नाही तर ते वरील दराने फिलीप्स,क्रॉम्प्टन व बजाज या कंपनीचे फिटींग पुरविणार असे गृहीत धरुन तुलनात्मक तक्ता तयार केला असता वरील प्राप्त दर पत्रका मध्ये मे.पगारिया इंटरप्रायजेस यांचे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे रक्कम रु. ८४६=०० प्रति फिटींग (बजाज किंवा क्रॉम्प्टन मेक) असे आहेत.

मागील वर्षी याच फिटींग खरेदी करण्यांसाठी रक्कम रु.५१९/- प्रति फिटींग असा दर प्राप्त झाला आहे,म्हणजेच मागील वर्षाचा दर आणि या वर्षीचे प्राप्त दर या दोन दरात जवळ जवळ ६०% इतकी वाढ दिसून येते.सदरील प्राप्त दर जास्त वाटत असल्याने मे.पगारिया इंटरप्रायजेस यांना दराचे वाटाघाटीस्तव बोलावले असता वाटाघाटी अंती त्यांनी सदरील फिटींग रक्कम रु.८४६/- प्रति फिटींग या दराऐवजी रक्कम रु.८४१/- प्रति फिटींग या दराने पुरविण्यांची तयारी दर्शविली आहे.या दरापेक्षा आणखी दर कमी करण्यांस ते तयार नाहीत.

मे. पगारिया इंटरप्रायझेस हे सदर साहित्यासाठी कोणत्या दराने जकात भरीत आहे याचीही चौकशी केली असता ते रक्कम रु.७७०/- (विना टुयब) प्रति फिटींग या दराने जकात भरत आहेत असे उप अभियंता (विद्युत) यांनी चौकशी करुन संचिकेत नमुद केले आहे व आपण टयुब सहित फिटींग मागविल्या असल्याने त्यांनी रक्कम रु.८४१/- असा दर कमी करुन दिलेला आहे.

मे.पगारिया इंटरप्रायजेस यांच्या कडून रक्कम रु.८४१/- प्रति फिटींग या दराने खरेदी करावयाचे झाल्यास १५०० फिटींग करीता रक्कम रु.१२,६१,५००/- इतका खर्च लागणार आहे.

मा.आयुक्त यांनी सदर प्रकरणी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ ठेवावा असे सुचित केले आहे.

त्यानुसार वरील प्रकरणी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शहरात वेगवेगळया वस्तीत रोवण्यांत आलेल्या विद्युत खांबावर टयुब फिक्चर बसविण्यांसाठी टयुब फिक्चर खरेदी करण्यांकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.८,२५,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत आलेली आहे.प्राप्त झालेल्या निविदपैकी मे.पगारिया इंटरप्रायजेस यांनी रु.८४१/- प्रति फिटींग दराने फिटींग पुरविण्याची तयारी दर्शविली असली तरी त्यांना परत वाटाघाटीसाठी बोलावण्यांत यावे व ते

रु.८३५/- या दराने फिटींग पुरविण्यांस तयार असतील तर १५०० फिटींग्ज खरेदी करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते,अन्यथा टेंडर रिकॉल करण्यांत येते.

सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७२/२०:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,कटकटगेट ते रविंद्र नगर या रस्त्याचे विद्युतीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,४५,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्रमांक २९५/९६ दि.२१-१२-९५ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण अकरा (११) कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त चार (४) निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली.प्राप्त निविदा पत्रके दि.१६-१-९६ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) मे. लुना इलेक्ट्रीकल्स | २.५० टक्के कमी दराने |
| २) मे. ओमिक्रॉन इंजिनियर्स | ९.५० टक्के कमी दराने |
| ३) मे.बी.जे.इलेक्ट्रीक कं. | ५.०० टक्के जास्त दराने |
| ४) मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स | ०.०० जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी मे.लुना इलेक्ट्रीक यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.५०% कमी आहेत.

तरी मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.५० टक्के कमी दर मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

स्थायी समिती विषय क्र. २९५/९६ दि.२१-१२-९५ अन्वये कटकटगेट ते रविंद्र नगर या रस्त्याच्या विद्युतीकरणास रक्कम रु.२,४५,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत आलेली आहे.प्राप्त निविदा पैकी मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.५०% कमी असल्याने सर्वानुमते मंजुर करण्यांत येतात.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७३/२१:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,चिकलठाणा औद्योगिक वसाहती मध्ये म.रा.वि.मं.च्या पोलवर सोडीयम फिटींग लावणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रु.१९,६३,५००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.२९२/६३ दि.२१-१२-९५ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामा करीता निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण चौदा (१४) कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन (३) निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली.प्राप्त निविदा पत्रके दि.१६-१-९६ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) मे.कॅपको एजन्सीज | १.०० टक्के कमी दराने. |
| २) मे.सुरेश इलेक्ट्रीकल्स | १.५० टक्के कमी दराने. |

३) मे.रॉयल इलेक्ट्रीकल्स ०.३० टक्के कमी दराने.

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी मे.सुरेश इलेक्ट्रीकल्स यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.५० टक्के कमी आहेत.

तरी मे.सुरेश इलेक्ट्रीकल्स यांचे अंदापजपत्रकीय दरापेक्षा १.५० टक्के कमी दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

स्थायी समिती विषय क्र.२९२/६३ दि.२१-१२-९५ अन्वये चिकलठाणा औद्योगिक वसाहतीत विद्युत मंडळाच्या पोलवर सोडीयम सोडीयम व्हेपरचं फिटींग लावण्याच्या कामासाठी तयार केलेल्या रक्कम रु.१९-६३-५००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी दिलेली आहे.प्राप्त दरपत्रकास मंजुरी दिलेली आहे.तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.५०% कमी दर मे.सुरेश इलेक्ट्रीकल्स यांचे असल्याने व दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७४/२२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,दि.२८-१२-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीत विषय क्र.३३४/३० अन्वये मंजुर करण्यात आलेल्या ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती व्हावी ही विनंती.

सभागृहाने अंदाजपत्रकास मंजुरी दिली असली तरी सदर काम सुरु करण्यापुर्वी उक्त कामाचा खर्च म्हाडा कडून प्राप्त करुन घेण्यांत यावा,असा ठराव मंजुर झाला आहे.यामध्ये अंदाजपत्रकास मंजुरी झाल्यानंतर रितसर निविदा लावण्यांत आल्या,वरील जागेवर सांभाव्य अतिक्रमण विचारात घेता,काम तातडीचे सुरु करावे असे वाटते व याचा खर्च म्हाडा कडुन वेळोवेळी पत्र देवून मागविण्यांची कार्यवाही करण्यांत येईल.तुर्त हा खर्च महानगरपालिकेच्या तरतुदीमधून करावा लागेल.मान्यता झाल्यास काम सुरु करण्यांत येईल.करीता दुरुस्तीचा प्रस्ताव सादर.

**ठराव :**

दि.२८-१२-९५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीतील विषय क्र. ३३४/३० मध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते."प्रस्तावात दर्शविलेले हे काम महापालिका फंडातून सुरु करण्यांत यावे .याकामासाठी म्हाडाकडून रक्कम मिळविण्याबाबत पाठपुरावा करण्यांत यावा." वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७५/२३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,पीरबाजार येथील नियोजित आठवडी बाजार करीता गाळया लगत रिटेनिंग वॉल बांधणे,नाल्यावर स्लॅब टाकणे,जागेचे सपाटीकरण करणे या कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस स्थायी समिती दि.६-१-९६ विषय क्र.३८९/८ नुसार मंजुरी मिळालेली आहे.सदर कामाचे बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यां करीता शहरातील दै.लोकमत,आलमगिर टाईम्स उर्दु या वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द केले,त्या अनुषंगाने विक्रीच्या तारखेपर्यंत कोरे निविदा एकूण तीस(३०) विकले गेले व स्विकारण्याच्या तारखेस दर भरुन सिलबंद पाकीटात एकूण चार (४) निविदा प्राप्त झाल्या सदरील निविदा लेखाधिकारी यांच्या दालनात उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यांत आले.त्यांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.एस.क्यु.कादरी | २८.९९९% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| २) श्री.राजासिंग | १६.६१% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| ३) श्री.आर.एल.बारवाल | ७% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| ४) श्री.मनजितसिंग | ५.२५% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |

सदरील निविदा पत्रकात सर्वात कमी तुलनात्मकदृष्टया श्री.एस.क्यु.कादरी,गुत्तेदार यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.९९९% कमी दराचे दर आहे.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

स्थायी समिती विषय क्र.३८९/८ दि.६-१-९६ अन्वये पीरबाजार येथील नियोजित आठवडी बाजारा करीता गाळया लगत रिटेनिंग वॉल बांधणे,नाल्यावर स्लॅब टाकणे,जागेचे सपाटीकरण करणे या कामाच्या रु.४,२४,७५०/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत आलेली होती.तथापी सदरच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदेचे दर पाहता फेरनिविदा मागविण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७६/२४:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,चिंतामणी कॉलनी (स्वामी विवेकानंद कॉलनी) येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर तार कुंपन करणे बाबत कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची अन्वये रक्कम रु.१,२८,९५०/- चे तयार करण्यांत आले आहे.सदर खर्च विकास योजना अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या तरतुदी मधून करण्यांत येणार आहेत. करता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे चिंतामणी कॉलनी (स्वामी विवेकानंद कॉलनी) तील महापालिकेच्या खुल्या जागेवर तार कुंपन करणे बाबत सा.बां.खात्याच्या ९५-९६ च्या दरसुची अन्वये बनविण्यांत आलेल्या रु.१,२८,९५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७७/२५:**

शहर अभियंता यांनी प्रस्तावात सादर केला आहे की,मो.भिमनगर,भावसिंगपुरा स्लम येथे नविन शहाबाद फरशी बसविणे बाबत कामाकरीता सा.बां.खाते यांच्या वर्ष ९४-९५ च्या दरसुची नुसार रु.३,४४,२६७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे.सदरील काम नविन खांडकी बसविणे रु.३५.०० लाख या शिर्षकातून करण्यांत येईल.सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.१५-९-९५ ला प्रशासकीय मान्यता दिली असून प्रस्तावित कामासाठी निविदापत्रके मागविण्यांत आले असता अंतिम तारखेपर्यंत एकूण दाने निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.सरवदे एस.पी. | १५% | कमी |
| २) श्री.बी.बी. खंडागळे | १७.१५% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.२५% कमी दराची निविदा श्री.बी.बी.खंडागळे यांची आहे,परंतु संबंधितांने निविदेसोबत १% ई.एम.डी.जोडली नसल्यामुळे दुसऱ्या क्रमांकाचे ठेकेदार श्री.एस.पी.सरवदे यांची

अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराची निविदेस मा.आयुक्त साहेबांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदर कामाकरीता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रु.३,४४,२६७/- व सदरील कामाची एजन्सी श्री.एस.पी.सरवदे यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराची निविदेच्या प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

मो.भिमनगर,भावसिंगपुरा स्लम येथे नविन शहाबाद फरशी बसविण्यासाठी सा.बां.खात्याच्या वर्ष ९४-९५ च्या दरसुची नुसार र.रु.३,४४,२६७/- च्या अंदाजपत्रकावर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराची श्री.सरवदे एस.पी.यांची निविदा सर्वानुमते मंजुर करण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७८/२६:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.कटकटगेट स्लम येथे डांबरीकरण करणे बाबत कामाकरीता सा.बां.खाते यांच्या वर्ष सन ९४-९५ च्या दरसुची नुसार रु.६,२५,७४३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील काम डांबरीकरण करणे रु.११०.०० लाख या शिर्षकातून करण्यांत येईल.

सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.१३-२-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदर कामाकरीता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रु.६,२५,७४३/-यास मान्यतेचा प्रस्ताव मंजुरी तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार कटकटगेट स्लम भागात डांबरीकरण करण्यासाठी सा.बां.खात्याच्या ९४-९५ च्या दरसुची नुसार बनविण्यांत आलेल्या रु.६,२५,७४३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७९/२७:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,साईट क्र.२ आमखास मैदान येथील तलावास पिचिंग करणे व तलावातील गाळ काढणे,आर.सी.सी.बेंचेस बसविणे कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची अन्वये रक्कम रु.१,६०,४००/- चे तयार करण्यांत आले आहे.त्यास मा.आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.सदर खर्च शासकीय अनुदान ९५-९६ च्या १० कोटी या तरतुदी मधुन करण्यांत येणार आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार साईट क्र.२ आमखास मैदान येथील तलावास पिचिंग करणे,तलावातील गाह काढणे,आर.सी.सी.बेंचेस बसविणे या कामासाठी सा.बां.खात्याच्या ९५-९६ च्या दरसुची अन्वये बनविण्यांत आलेल्या रु.१,६०,४००/- च्या अंदाजपत्रकास व ही रक्कम १०.०० कोटीच्या शासकीय अनुदानातून खर्च करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८०/२८:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.किराडपुरा स्लम येथे नाला ट्रेनिंग वॉल बांधणे बाबत कामाकरीता सा.बां.खाते यांच्या वर्ष सन ९४-९५ च्या दरसुची नुसार रु. १९,२३,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे.सदरील काम मा.मुख्यमंत्री महोदयांनी घोषीत केलेल्या आर्थिक मदत रु.१०.०० कोटी या लेखा शिर्षकातून करण्यांत येईल.सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.२१-१२-९५ ला प्रशासकीय मान्यता दिली असून प्रस्तावित कामासाठी निविदा पत्रके मागविण्यांत आली असता अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.सैय्यद सिराजउद्दीन | ८.७० % | कमी |
| २) कुलवंतसिंग | २०% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा श्री.सैय्यद सिराजुद्दीन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.७०% कमी दराची निविदेस मा.आयुक्तांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदर कामा करीता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रु.१९,२३०००/- व सदरील कामाची एजन्सी श्री.सैय्यद सिराजुद्दीन यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.७०% कमी दराची निविदेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

मौजे किराडपुरा स्लम येथे नाला ट्रेनिंग वॉल बांधण्यासाठी सा.बां.खात्याच्या ९४-९५ च्या दरसुची अन्वये बनविण्यांत आलेले रु.१९,२३०००/- च्या अंदाजपत्रकावर आलेल्या निविदा पैकी श्री.सैय्यद सिराजउद्दीन यांची निविदा तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे ८.७०% कमी दराची असल्याने तीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.सदर काम १०.०० कोटीच्या अनुदानातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ४८१/२९:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.रोजेबाग स्लम येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे बाबत कामाकरीता सा.बां.खाते यांच्या वर्ष ९४-९५ च्या दरसुची नुसार रु.३,९२,२११/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.१२-२-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रक्कम रु.३,९२,२११/- यास मान्यतेचा प्रस्ताव मंजुरी तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.रोजेबाग स्लम मधील रस्त्यांचे डांबरीकरण करण्यासाठी सा.बां.खात्याच्या ९४-९५ च्या दरसुची अन्वये बनविण्यांत आलेल्या रु.३,९२,२११/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८२/३०:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.प्रज्ञानगर स्लम येथील रस्त्यांचे पुनर्डांबरीकरणे करणे बाबत कामाकरीता सा.बां.खाते यांच्या वर्ष ९४-९५ च्या दरसुची नुसार रु.१,४९,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील काम

पुर्नडांबरीकरण रु.१००.०० लाख या शिर्षकातुन करण्यांत येईल.सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.१३-२-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदर कामा करीता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रक्कम रु.१,४९,५००/- यांस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.प्रज्ञानगर स्लम मधील रस्त्यांचे पुर्नडांबरीकरण करण्यासाठी सा.बां.खात्याच्या सन ९४-९५ दरसुचीनुसार बनविण्यांत आलेल्या रक्कम रु.१,४९,५००/-च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८३/३१:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,शहानुरवाडी येथील स.नं.१२ आरक्षण नं२६७ या ठिकाणी परदेशी धोबी समाजाकरीता धोबीघाट बांधणे बाबत अंदाजपत्रकीय रक्कम रुपयास स्थायी समिती विषय क्र.३४६/५ दि.६-१-९६ द्वारे मंजुरी अन्वये सदर कामाचे बी-१ नमुन्यात निविदा मागविण्या करीता शहरातील दै.लोकमत,दैनिक अजिंठा,दै.आलमगिर टाईम्स उर्दू वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यांत आले,त्या अनुषंगाने विक्रीच्या तारखेपर्यंत कोरे निविदा एकूण (१८) अठरा विकले गेले.व स्विकारण्याच्या तारखेपर्यंत कर भरून सिलबंद पाकीटात एकच (१) निविदा प्राप्त झाली.सदरील निविदा लेखाधिकारी यांच्या दालनात उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यांत आले त्यात दिलेले दर पुढीलप्रमाणे आहे.

१) श्री.एस.एम.मंडोरे ५% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराचे

तरी आलेले दर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शहानुरवाडी येथील सर्व्हे नं. १२ आरक्षण नं.२६७ या ठिकाणी धोबीघाट बांधण्याबाबत रु.३,८०,०००/- च्या अंदाजपत्रकीय खर्चास स्थायी स मिती सभेतील विषय क्र.३४६/५ दि.६-१-९६ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे.प्राप्त झालेली श्र्श्री.एस.एम.मंडोरे यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी असल्याने त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८४/३२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.भिमनगर,भावसिंगपुरा स्लम येथील रस्त्यांचे पुर्नडांबरीकरण करणेबाबत कामाकरीता सा.बां.खाते यांच्या ९४-९५ च्या दरसुची नुसार रुपये ११,३६,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील काम पुर्नडांबरीकरणे रु.१००.०० या शिर्षकातून करण्यांत येईल.

सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि. १२-२-९६ ला प्रशासकी मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रु.११,३६,२००/- यांस मान्यतेचा प्रस्ताव मंजुरी तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार भिमनगर,भावसिंगपुरा स्लम मध्ये रस्त्यांचे पुर्नडांबरीकरण व डांबरीकरण करण्यांसाठी सा.बां.खात्याच्या ९४-९५ च्या दरसुचीनुसार बनविण्यांत आलेल्या रु.११,३६,३००/- अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ४८५/३३:**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मछलीखडक,कुंभारवाडा येथील ड्रेनेज लाईन अप्रुटींग करणे व ४५०/३००/२५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे या कामसाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु.४,८१,२५०/ चे बनविण्यात आलेले असून सदरील कामासाठी होणारा खर्च हा "दुरुस्ती व देखभाल" या शिर्षकातंर्गत करण्यांत येणार आहे.

तरी सदरील प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मछलीखडक,कुंभारवाडा येथील ड्रेनेज लाईन अप्रुट करणे व ४५०/३००/२५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेसाठी बनविण्यांत आलेल्या रक्कम रु. ४,८१,२५०/- च्या अंदाजपत्रकास व हा खर्च दुरुस्ती व देखभाल या शिर्षाअंतर्गत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८६/३४:**

मालमत्ता अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,नाथ सुपर मार्केट येथील तिसऱ्या मजल्यावरील जागा कौटुंबिक न्यायालयास भाडयांनी दिली होती.ती जागा त्यांच्यातर्फे रिकामी करण्यांत आली आहे.करीता सहा.आयुक्त,अन्न व औषध प्रशासन,औरंगाबाद यांनी सदरील जागा प्रयोग शाळेसाठी भाडे पटटयांनी देण्यांत यावी,म्हणून विनंती केली आहे.महानगरपालिकेतर्फे सहा.आयुक्त अन्न व औषध प्रशासन औरंगाबाद यांना कळविण्यांत आले होते की,जागा भाडेपटटयांनी देण्याबाबत प्रस्ताव स्थायी समिती व सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यांत येऊन भाडे व अटी शर्तीबाबत जो निर्णय घेण्यांत येईल.तो त्यांना बंधनकारक राहिल व त्यानुसार त्यांना जागा भाडयाने देण्यांची कार्यवाही करण्यांत येईल. सदरील पत्रकाच्या उत्तरी आयुक्त अन्न आणि प्रशासन,महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी अर्ध शासकीय पत्रक देऊन विनंती केली आहे की,सरकारी प्रयोजनार्थ घेण्यांत येणाऱ्या इमारतीचे भाडे महाराष्ट्र आकस्मीक खर्च नियम १९९६ ५ चा हनयम १४७ नुसार कार्यकारी अभियंताने प्रमाणित करणे अनिवार्य आहे.याच इमारतीतील दुसरा मजला या प्रशासनाच्या सहा.आयुक्तांच्या कार्यालयासाठी कार्यकारी अभियंताच्या भाडे प्रमाणपत्राप्रमाणे भाडयाने देण्यांत आला आहे.तरी नाथ मार्केटचा तिसरा मजला विभागीय औषध नियंत्रण प्रयोगशाळेसाठी कार्यकारी अभियंता निश्चित करुन देईल.त्या दराने भाडेतत्वावर शासनास देण्यांस मनपा तयार आहे.अशा आशयाचे संमतीपत्र दिल्यास सदरचा तिसरा मजला ताब्यात घेण्यांबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविणे शक्य होईल.मनपामधील नगर रचना विभागातर्फे सदरील जागेचे भाडे रु.७५/- प्रति चौ.मी.महिना (मालमत्ता कर सोडून) आकारणी केली आहे.

तरी आयुक्त,अन्न व औषध प्रशासन,मुंबई यांनी वरील प्रमाणे केलेल्या खुलासानुसार कार्यकारी अभियंता ठरवून देईल त्या दराने भाडे तत्वावर जागा दयावी किंवा मनपातील नगर रचना विभागानी ठरवुन दिलेले दरानुसार जागा भाडयानी दयावी.याबाबत निर्णयास्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार नाथ सुपर मार्केट मधील तिसऱ्या मजल्यावरील जागा सहा.आयुक्त,अन्न व औषधी प्रशासन यांना प्रयोगशाळेसाठी सा.बां.विभागाच्या दराप्रमाणे भाडे

पटटयाने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.जागा भाडयाने देण्याबाबतचे संमतीपत्र संबंधित विभागास पाठविण्यात यावे.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८७/३५:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,शहरातील विविध ठिकाणाच्या एकूण (९) उद्यान विकसित करावयाचे रक्कम रु.५८.१५ लाख रुपयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले.यास दि.६-१-९६ रोजी लेखाधिकारी यांच्या दालनात उपस्थित गुत्तेदरांसमक्ष उघडण्यांत आले.त्यात दिलेले दराचे तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | कोरी निविदा विक्री | स्विकारण्यांच्या तारखेपर्यंत प्राप्त झालेले निविदा |
|---|---|---|---|
| १) | गारखेडा मनपाच्या (शास्त्रीनगर) उद्यान विकसीत करणे | १३ | १) डी.सी.पंजाबी-०.०१% कमी दराची<br>२) कुलवंतसिंग-७% जास्त दराची<br>३) एस.एच.असोशिएटस-११% जास्त दराचे.<br>४) |
| २) | जयविश्वभारती कॉलनी उद्यान विकसित करणे | ९ | १) राजासिंग-०.७५% कमी दराने |
| ३) | जवाहर कॉलनी मनपा | १० | १) उपकेंद्र केलेले-१% कमी दराचे<br>२) कुलवंतसिंग-८% जास्त दराचे. |
| ४) | विद्यानगर मनपाच्या जागेवर उद्यान विकसित करणे. | ९ | १) शेख शरीफ-०.२०% कमी दराने.<br>२) एस.एच.असोशिएटस-११.२०% जास्त<br>३) कुलवुतसिंग-२६% जासत दराने |
| ५) | राजनगर मनपाच्या खुल्या जागेवर उद्यान विकसित करणे. | १३ | १) अ.सत्तारखान-४% जास्त दराने |
| ६) | ज्योतीनगर मनपाच्या खुल्या जागेवर उद्यान विकसित करणे. | ९ | स.जमीर-२% जास्त दराने. |
| ७) | मजनुहिल पश्चिम बाजूस मनपाचे उद्यान विकसित करणे. | १२ | १) सुपर कन्स्ट्रक्शन अंदाजपत्रक दराने.<br>२) कुलवंतसिंग-५%जास्त दराने. |

आलेले सर्व निविदाचे दर मंजुरीस्तव मा.आयुक्तांकडे सादर करण्यांत आले.त्यावर मा.आयुक्त यांनी सर्व गुत्तेदार यांच्या दराच्या वाटाघाटीसाठी बोलवावे या अनुषंगाने सर्व गुत्तेदार उपस्थित झाले.दि.२-२-९६ रोजी मा.आयुक्त यांचे दालनात उपस्थित गुत्तेदाराशी चर्चा झाली.चर्चा अंती वरील सर्व निविदा धारकांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराने काम करण्यांचे कबुल केले.त्यास मा.आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे.

करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.हमीदउद्दीन ताबा : मोतीवाला हॉल समोर बरीच मोठी रिकामी जागा आहे त्याठिकाणी उद्यान बांधण्यात यावे.

श्री.महादेव सुर्यवंशी : नारेगांव भागात उद्यान बांधण्यांबाबत यापुर्वीच प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे.तथापि प्रस्तावित उद्यानाच्या जागेबदल करण्यांबाबत शहर

अभियंता यांच्याशी चर्चा झालेली आहे.सदर प्रस्तावात मंजुरी देत असतांना याचा विचार करण्यांत यावा.

मा.सभापती : शहरात विविध वसाहतींमध्ये मनपाच्या जागा आहेत.जागा आहेत त्यामधून उद्याने विकसीत करण्याबाबत यापुर्वीच आदेशित करण्यांत आले आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शहरातील विविध ठिकाणाच्या ९ उद्याने विकसीत करण्याबाबत रु.५८.९५ लाखाच्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.३५२/१ दि. ६-१-९६ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे.प्रस्तावित विषयांत दर्शविण्यांत आलेल्या भागामध्ये उद्याने विकसीत करण्यांसाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराने काम करण्यास सर्वानुमते मंजुरी
देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

नारेगांव भागात उद्यान विकसीत करण्याबाबत सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ४८८/३६:**

मालमत्ता अधिकारी मा.आयुक्त यांचे मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करीत आहे की,श्री.किशोर बाबुलाल तुळशीबागवाले स.सदस्य यांनी मागणी केल्याप्रमाणे के.लखन पहेलवान व्यायाम शाळेस जाधवमंडी येथील न.भु.क्र.७९७९ व ७९७७ या शाळेसाठी असलेल्या आरक्षण क्र.५५ मधील बांधलेल्या शाळेच्या इमारतीपुर्वेकडील उरलेल्या जागेतील ३०x६० या आकाराची जागा लिज द्यावयाची आहे.

सहा.संचालक नगर रचना यांनी या जागेसाठी वार्षीक भाडे रक्कम रु.१०,०३७/- निश्चित केलेले आहे.

सदरची ठिकाणची ३०x६०आकाराची जागा कै.लखन पहेलवान व्यायाम शाळेत सहा.संचालक नगररचना यांनी ठरवुन दिलेल्या वार्षीक लिज भाडयाने देणे बाबत लीज कालावधी ठरविणेबाबत विचार होणेस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : लखन पहेलवान हे एक चांगले सामाजिक कार्यकर्ते होते.शहरातील तरुणांमध्ये त्यांनी व्यायामाची आवड उत्पन्न केली होती.

प्रस्तावातील व्यायाम शाळेतील मध्ये येणाऱ्या नागरिकांना शुल्क आकारले जाणार नाही.ही बाब लक्षांत घेतली जाता प्रस्तावातील भाडे कमी करण्यांत यावेत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार कै.लखन पहेलवान व्यायाम शाळेस जाधवमंडी येथील न.भु.क्र.७९७९ व ७९७७ या शाळेसाठी आरक्षित असलेल्या आरक्षण क्र.५५ मधील बांधलेल्या शाळेच्या इमारतीच्या पुर्वेकडील उरलेल्या जागेतील ३० फुट x ६० फुट आकाराची जागा रु.१००/- प्रतिमहा या दराने ३० वर्षासाठी भाडे तत्वांवर देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८९/३७:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,गजानन महाराज ते सिडको हद्दीपर्यंत १०० फुट रुंद रस्त्याचे रुंदीकरण करणे आणि दुभाजक टाकणेच्या कामासाठी सन १९९४-९५ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.१४,१७,२१४=००

चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास मा.आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे.सदरील कामाचा खर्च शासकीय अनुदान १९९५-९६ रक्कम रु.१०.०० कोटी तरतुदीमधुन प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ३१ कोटी निविदा पत्रके विकल्या गेली. १ निविदापत्रके दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.कुलवंतसिंग २०.१०% कमी दराने.
२) श्री.एम.व्ही.कृष्णाराव १८.९५% कमी दराने.
३) मे.एस.एच.असोशिएट १८.८१% कमी दराने.
४) श्री.डी.अजितसिंग १६.१३% कमी दराने
५) मे.बसरा कन्स्ट्रक्शन १.००% कमी दराने

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.१०% कमी दराने कुलवंतसिंग यांचे निविदा आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१४,१७,२१४/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम श्री.कुलवंतसिंग यांच्या कडून २०.१०% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार गजानन महाराज ते सिडको हद्दीपर्यंतच्या १०० फुट रुंद रस्त्यांचे रुंदीकरण करणे,पुलाचे रुंदीकरण करणे,दुभाजक टाकणेच्या कामासाठी ९४-९५ च्या सा.बां.खात्याच्या डी.एस.आर.दराने रु.१४,१७,२१४/- च्या अंदाजपत्रकानुसार प्राप्त झालेल्या निविदापैकी श्री.कुलवंतसिंग यांची निविदा २०.१०% कमी दराची असल्याने तीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.तथापी प्रस्तावातील कामे पार पाडत असतांना कामाची प्रत चांगली राखली जाईल याची संबंधित प्रमुखाने दक्षता घ्यावी.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९०/३८:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,सिल्कमील कॉलनी येथे आर.सी.सी.हयुम पाईप कल्व्हर्ट बांधण्याचे कामाचे सन १९९३-९४ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने रक्करु. ५,७४,४००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास मा.आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे.सदरील कामाचा खर्च शासकीय अनुदान १९९५-९६ रक्कम रु.१०.०० कोटी तरतुदीमधुन प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण २१ निविदापत्रके विक्री झाल्या व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदापत्रके दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

१) श्री.पारस कन्स्ट्रक्शन अंदाजपत्रकीय दराने
२) श्री.एस.एम.मंडोरे ८.००% जास्त दराने
३) श्री.अब्दुल सत्ताखान ७.००% जास्त दराने

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हे श्री.पारस कन्स्ट्रक्शन यांचे होते.मा.आयुक्त यांनी संबंधितास बोलावून सदरील दर २% कमी करण्यास सांगितले त्यास संबंधित कन्स्ट्रक्शन यांनी संमती दाखविली आहे.

तरी सदर कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ५,७४,४००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम श्री.पारस कन्स्ट्रक्शन यांच्याकडून २% कमी दराने करुन घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्कमील कॉलनी येथे आर.सी.सी.हयुम पाईप कल्व्हर्ट बांधण्यासाठी ९३-९४ च्या सा. बां.खात्याच्या डी.एस.आर.दराने ५,७४,४००/- चे अंदाजपत्रकानुसार प्राप्त झालेल्या निविदांपैकी श्री.पारस कन्स्ट्रक्शन यांना अ.प.दरापेक्षा २% कमी काम करण्यांस संमती दर्शविल्याने त्यांची निविदा सर्वानुमते मंजुर करण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९१/३९:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,श्री.गजानन महाराज मंदिर ते पीरबाजार पर्यंतच्या रस्त्यांवर दुभाजक टाकणेच्या कामासाठी सन १९९४-९५ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने रक्क्म रु. ८,२६,०००/- चे आंजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा.आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे.सदरील कामाचा खर्च शासकीय अनुदान १९९५-९६ चे रक्कम रु.१०.०० कोटीच्या तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण चौदा कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदापत्रके दर भरलेल्या प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) श्री.डी.सी.पंजाबी | ०.०१% कमी दराने |
| २) श्री.एस.एम.मंडोरे | ६.००% जास्त दराने |
| ३) श्री.आर.एल.बारवाल | ८.९९% जास्त दराने |

तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०१% कमी दराने श्री.डी.सी.पंजाबी यांची निविदा आहे.तरी सदर कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.८,२६,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम श्री.डी.सी.पंजाबी यांच्याकउून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावित दर्शविल्याप्रमाणे गजानन महाराज मंदिर ते पीरबाजार पर्यंतच्या दुभाजक टाकण्यासाठी ९४-९५ च्या सा.बां.खात्याच्या दराप्रमाणे बनविण्यांत आलेल्या रु.८,२६,०००/- च्या अंदाजपत्रकान्वये प्राप्त झालेल्या निविदापैकी श्री.डी.सी.पंजाबी यांची अ.प.दरापेक्षा १% कमी दराची निविदा सर्वानुमते मंजुर करण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.सदरचा खर्च १० कोटीच्या शासकीय अनुदानातून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ४९२/४०:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौक दुभाजकांचे सौंदर्यीकरण करणेच्या कामासाठी सन १९९४-९५ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.५,६९,६१०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले

असुन त्यास मा.आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे.सदरील कामाचा खर्च शासकीय अनुदान १९९५-९६ रक्कम रु.१०.०० कोटी तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण आठ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यत एकूण दोन निविदापत्रके दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.आर.एल.बारवाल ७.७७% कमी दराने
२) श्री.एस.एच.असोशिएटस ७.१% कमी दराने

तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.७७% कमी दराने श्री.आर.एल.बारवाल यांची निविदा आहे.

तरी सदर कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.५,६९,६१०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम श्री.आर.एल.बारवाल यांच्याकडून ७.७७% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौक दुभाजकाचे सौंदर्यीकरण करणसाठी ९४-९५ च्या दरसुची नुसार ५,६९,६१०/- च्या अंदाजपत्रकान्वये प्राप्त झालेल्या निविदापैकी श्री.आर.एल.बारवाल यांचे दर ७.७७% कमी असल्याने स्विकृतीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९३/४१:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मिलकॉर्नर ते बसस्टँड रस्त्यावरील मध्य दुभाजकाची उंची वाढविणे व रेलिंग बसविणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.५,५०,३२०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.१३५/६ दि.२८-१२-९५ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सात कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त दोन (२) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झ ााली.प्राप्त निविदापत्रके दि.१६-१-९६ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.अब्दुल सलाम अंदाजपत्रकीय दराने
२) श्री.एस.एम.मंडोरे ५.००% कमी दराने

वरील प्राप्त निविदापत्रकांपैकी श्री.अब्दुल सलाम यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनातमक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरा एवढे आहे.

तरी श्री अब्दुल सलाम यांचे अंदाजपत्रकीय दराएवढे दर मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मिलकॉर्नर ते बसस्टँड रस्त्यांवरील दुभाजकांची उंची वाढविण्यासाठी व रेलिंग बसविण्याच्या साठीच्या रु.५,५०,३२०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.१३५/६ दि.२८-१२-९५ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे.

प्राप्त निविदांपैकी श्री.अब्दुल सलाम यांचे दर तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दराएवढे असल्याने त्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वेधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९४/४२:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रसताव दिला की,मिलकॉर्नर ते औरंगपुरा या रस्त्यांवरील दुभाजकांची उंची वाढविण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.३,०२,९८०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.२४०/११ दि. २८-१२-९५ या वर्षासाठी शासनाकडून मिळणाऱ्या रक्कम रु.१०.०० कोटीच्या अनुदानातून करण्यांत येईल.

सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदा पत्रके विक्रीचया अंतिम तारखेपर्यंत एकूण सात कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापेकी फक्त दोन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली.प्राप्त निविदापत्रके दि.१६-१-९६ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.सलीम पटेल ६.९०% कमी दराने

२) श्री.आर.बी.चव्हाण १०.९५% कमी दराने

वरील प्राप्त निविदपत्रकांपैकी श्री.आर.बी.चव्हाण यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.९५% कमी आहेत.परंतु श्री.आर.बी.चव्हाण यांना निविदापत्रकासोबत १% इसाऱ्याची रक्कम जमा केली नाही.म्हणून त्यांची निविदा विचारात न घेता द्वितीय क्रमांकाचे कमी दर असलेले श्री.सलीम पटेल यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.९०% कमी दराची निविदा विचारात घेऊन सदरील काम श्री.सलीम पटेल यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.९०% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार ,मिलकॉर्नर ते औरंगपुरा या रस्त्यांवरील दुभाजकांची उंची वाढविण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.३,०२,९८०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.२४०/११ दि. २८-१२-९५ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे.सदर कामासाठी प्राप्त निविदांपैकी श्री.सलीम पटेल यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.९०% कमी असल्यानं स्विकृतीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९५/४३:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,गारखेडा ते टिळकनगर या ८० फुट विकास रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम करण्यांच्या कामासाठी सन ९४-९५ चे सा.बा.खात्याच्या डि.एस.आर.दराने श्रक्कम रु.२५,९३,९६४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास मा.आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.सदरील कामाचा खर्च शासकीय अनुदान ९५-९६ रक्कम रु.१०.०० कोटी तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण पाच निविदापत्रके विकल्या गेली व निविदा कामे स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण चा निविदापत्रके दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्यांचा तुलजनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

१) श्री.खाजा मोईनोद्दीन २३.१५% कमी दराने

२) श्री.देवेंद्रसिंग जग्गी २२.००% कमी दराने
३) श्री.मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन १८.९०% कमी दराने
४) श्री.डी.अजितसिंग १७.९९% कमी दराने

तुलनातमक दृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.९५% कमी दराने श्री.खाजा मोईनोद्दीन यांची निविदा आहे.

तरी सदर कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२५,९३,९६४/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम श्री खाजा मोईनोद्दीन यांच्याकडून २३.९५% दराने करुन घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा ते टिळकनगर या ८० फुट विकास रस्त्यांचे डांबरीकरणाच्या कामासाठी प्राप्त निविदाचे दर पाहता निविदा रिकॉल करण्याबाबत सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ४९६/४४:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,टाऊन हॉल ते अंजली सिनेमा या रस्त्यावर सोडीयम व्हेपरचे दिवे लावुन विद्युतीकरण करण्यांच्या कामसाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.४,४७,७६५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील खर्च रक्कम रु.४,४७,७६५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील खर्च महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या रक्क्म रु. १०.०० कोटी अनुदानामधून करण्यांत येईल.

तरी रक्कम रु.४,४७,७६५/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टाऊन हॉल ते अंजली सिनेमा या रस्त्यांवर सोडीयम व्हेपर दिवे लावण्यांसाठी सा.बां.खात्याच्या १९९५-९६ च्या दरसुचीनुसार बनविण्यांत आलेल्या रक्कम रु.४,४७,७६५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९७/४५:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.ढोरपूरा येथील अस्तितवात असलेली तळ मजल्याची इमारत सोडून त्या जागेवर प्राथमिक शाळेसाठी पुन्हा तळमजला व पहिला मजला बांधणेच्या कामासाठी रक्कम रु.४,६७,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यांस मा.आयुक्त यांनी दि.१२-२-९६ रोजी मंजुरी दिलेली आहे.सबब सदर कामाचे रक्कम रु.४,६७,५००/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.प्रस्तुत इमारत सुमारे २८वर्षापुर्वीची जुनी इमारत आहे.

प्रस्तावित कामाचा खर्च सन ९६-९७ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधून करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार ढोरपुरा येथील अस्तित्वात असलेली तळमजल्याची इमारत सोडून त्या जागेवर प्राथमिक शाळेसाठी पुन्हा तळमजला व पहिला मजला बांधण्याच्या कामासाठी बनविण्यांत आलेल्या रु.४,६७,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९८/४६:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव व सादर आहे की,मो.राहुलनगर स्लम भागात अर्धगोलाकार आर.सी.सी.सरफेस गटार बांधणे कामाकरीता एकूण रु.६,९३,०००/- चे अंदाजपत्रक सा.बां.विभाग औरंगाबाद यांची दरसुची ९३-९४ अनुसार तयार करण्यात आले असून मा.आयुक्त यांनी दि.६-२-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सदरील काम महानगरपालिका अर्थसंकल्प खुली गटार या शिर्षकातंर्गत रुपये ५०,००,०००/- लाखाची तरतुद करण्यांत आलेली आहे.

करीता मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार राहुलनगर स्लम भागात अर्धगोलाकार आर.सी.सी.सरफेश गटार बांधणेच्या कामासाठी सा.बा.खात्याच्या दरसुचीनुसार बनविण्यांत आलेल्या रु.६,९३,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९९/४७:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,सिध्दार्थ उद्यान येथे मिनी थिएटर बांधण्याच्या कामासाठी (१) ठराव क्र.२१५ दि.३१-३-९५ अन्वये रक्कम रु.४,२०,०००/- चे अंदाजपत्रकीय रक्कमेस मंजुरी प्राप्त झालेली आहे.तसेच (२) ठराव क्र.३३१ दि.२८-४-९५ ला निविदेस मंजुरी प्राप्त झालेली आहे.विषय क्र.१७ दि.२८-९-९५ अन्वये सुधारित अंदाजपत्रक रक्कम रु.४,६०,०००/- ला तसेच काम करणाऱ्या एजन्सीला मान्यता प्राप्त झालेली आहे.परंतु सदर हॉलसाठी सिलींगचे कामात आणखी वाढ झाल्यामुळे रक्कम रु.१८,३८०/- ची वाढ झाली आहे.सबब सदर काम मुळ काम करणारी एजन्सीकडून मंजुर दराप्रमाणे करुन घेण्यांचा प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सिध्दार्थ उद्यान येथे मिनी थिएटर बांधण्याच्या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु.४,२०,०००/- ला स्थायी समिती विषय क्र.२१५ दि.३१-३-९५ अन्वये तर सुधारीत अंदाजपत्रक रु.४,६०,०००/- ला स्थायी समिती विषय क्र. १७ दि.२८-९-९५ अन्वये मंजुरी मिळालेली आहे.हॉलसाठी सिलींगच्या कामात वाढ झाल्याने रु.१८,३८०/- च्या वाढीव तरतुदीस सर्वानुमे मंजुरी देण्यांत येते.तसेच सदर काम मुळ एजन्सीकडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५००/४८:**

गरवारे स्टेडीयम चिकलठाणा व क्रिकेट ग्राऊंडसाठी जलवाहिनी टाकण्यांच्या अंदाजपत्रक रक्कम रु.१,८५,९८०/- चे तयार करण्यांत आले असून त्यास ७-१२-९५ ला मंजुरी मिळालेली होती.त्यानुसार बी-१ निविदा मागविण्यांत आल्या आणि सिलबंद निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेला एकूण ३ निविदा विकण्यांत आल्या आणि सिलबंद निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेला एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या.त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.एस.चंद्रपाल | ७.२% | कमी दराने |
| २) श्री.सय्यद फैजल हक्क | १५.०५% | कमी दराने |
| ३) श्री.संदेश कवडे | ०३.००% | कमी दराने |

उपरोक्त प्राप्त झालेल्या तीन निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा तुलनात्मक तक्त्यानुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.०५% कमी दराची निविदा श्री.सय्यद फैजल हक्क यांची आहे.तरी प्रस्ताव कार्यवाही व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार गरवारे स्टेडीयम चिकलठाणा व क्रिकेट ग्राऊंडसाठी जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रु.१,८५,९८०/- नुसार प्राप्त झालेल्या निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा श्री.सय्यद फैजल हक्क यांची १४.०५ टक्के कमी दराची असल्याने तीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०१/४९:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,सिध्दार्थ जलतरण तलावाचे पार्टीशन मा.सभापती व मा.आयुक्त यांचे आदेशानुसार तातडीने दुरुस्त करावयाचे असुन त्यासाठी रु.७२,४००/- खर्च येणार आहे.सदरील काम हे तातडीने करणे अत्यंत आवश्यक असल्याने सदरील कामात अनुभवी कॉन्टॅक्टर श्री.शेख मसुद यांचेकडून अंदापजत्रकीय दराने करुन घेण्याचे मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सिध्दार्थ जलतरण तलावाचे पार्टीशन दुरुस्तीसाठी येणाऱ्या रुपये ७२,४००/- च्या खर्चास व हे काम शेख मसुद यांचें कडून करुन घेण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०२/५०:**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की,डॉ.शांताराम काळे ते मुथीयान कॉर्नर या रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम मंजुर असून त्याची अंदाजपत्रकीय रक्कम रु.२,१८,५५५/- इतकी आहे.त्यानंतर मा.आयुक्तांचे आदेश नुसार मुथीयान कॉर्नर चौकाचा त्वरीत विकास करण्याचे दृष्टीने सदरील कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेत वाढ होवून सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु.४,१२,२८२/- चे आहे.तरी सुधारीत अंदाजपत्रकास व सदरील काम हे मुळ मंजुर निविदेच्या दराचे संबंधित कॉन्ट्रॅक्टरकडून करुन घेण्यांचे मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार डॉ.शांताराम काळे ते मुथीयाना कॉर्नर या रस्त्याचे डांबरीकरणाचे कामासाठी रुपये २,१८,५५०/- चे अंदाजपत्रक मंजुर करण्यांत आले आहे.तथापी मुथीयाना कॉर्नर चौकाचा विकासाच्या कामामुळे अंदाजपत्रकीय रक्कमेत वाढ होवून सादर करण्यांत आलेल्या रु.४,१२,२८२/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.तसेच सदरील काम मुळ मंजुर निविदेच्या दराने संबंधित गुत्तेदाराकडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०३/५१:**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की,महानगरपालिकेतर्फे गरवारे पॉलिस्टर लि.औरंगाबाद यांच्या सहाय्याने एम.आय.डी.सी.चिकलठाणा येथें क्रिडा संकुलाचे काम चालु आहे.सदरील कामातील पव्हेलयीन इमारतीचे कामाचे मुळ अंदाजपत्रक ३५,०२,१००/- रुपये होते.त्यानंतर सदरील कामात मा.आयुक्त यांचे सुचनेनुसार बदल व

सुधारणा करण्यांत आल्या त्यात पव्हेलीयन इमारतीची लांबी वाढविण्यांत आली,तसे कार्यालयाने इमारतीचे भागात एक मजला वाढविण्यांत आला तसेच मुळ पव्हेलीयन इमारतीवरील स्लॅब जास्त उंचीवर असल्याने तो रद्द करुन त्या जागी फक्त स्टील ट्रसेस व सिमेंट पत्रे ठेवण्यांत आले.तसेच सुरक्षा रक्षक केबीन व वॉचमन क्वार्टर सध्या संर्कीत वगळण्यात आले,त्यानुसार सदरील कामात झालेल्या बदलामुळे सुधारीत अंदाजपत्रक व नविन अतिरिक्त बाबी मिळुन सदरील इमारतीस एकूण ४५,८०,०००/- रु.खर्च लागणार आहे.या प्रकरणात गरवारे उद्योग समुहाकडून ४० लाख रुपये खर्च लागणार आहे.

तरी सुधारीत अंदाजपत्रकातील बाब निविदेच्या दराने व अतिरिक्त बाबी अंदाजपत्रकीय दराने संबंधीत कॉन्ट्रॅक्टर मे.एस.गुस.यांच्या कडून करुन घेण्यांचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गरवारं पॉलिस्टर लि.यांचे सहाय्याने एम.आय.डी.सी.चिकलठाणा येथील क्रीडा संकुलाच्या कामातील वाढीव कामांना तसेच सुधारीत अंदाजपत्रकातील बाबी निविदेच्या दराने अतिरिक्त बाबी अंदाजपत्रकीय दराने संबंधित गुत्तेदार मे.के.एस.गुस यांच्याकडून करुन घेण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०५/५३:**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की,जालना रोड ते सुतगिरणी या १०० फुट विकास रस्त्याचे काम सन ९०-९१ चे शासकीय अनुदानातून प्रस्तावित होते.मुळ अंदाजपत्रकात या रस्त्याचे दुतर्फा झालेल्या रुंदीकरणावर ५० मी.मी.जाडीचे मॅकेडम व संपूर्ण रस्त्यांवर २० मी.मी.जाडीचे मिक्स सील सरफेस (डांबरीकरण) प्रस्तावित होते,सदरील कामाचे मुळ अंदाजपत्रक रुपये ३७,६१,०००/- रुपये होते.त्यापैकी आतापर्यंत ९,६३,६८७/- रुपये खर्च झालेला आहे.

सदरील रस्त्यावर आतापर्यंत टेलीफोनची कामे व ड्रेनेजची कामे सुरु होती त्यामुळे उर्वरित डांबरीकरण पूर्ण करण्यांत आले नाही.मा.आयुक्त यांचे समवेत झालेल्या चर्चेनुसार सध्या विमानतळ विस्तारीकरणाचे कामामुळे चिकलठाणा ते बीड रांग रोड हा रस्ता सध्या बंद करण्यात आला असल्याने या रस्त्यावरुन बरीच वाहतुक वाढली आहे.सदरील रस्त्यावरील वाढलेली वाहतुक बघता विमान डांबरी रस्त्यावर सुध्दा ५० मी.मी.जाडीचा मॅकेडम घेणे आवश्यक आहे.त्यामुळे रस्ता मजबुत होवून रस्त्यांचे काम चांगल्या प्रकारे करता येईल.करीता सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यानुसार अंदाजपत्रकीय रक्कम रु.५१,४०,०७२/- आहे.करीता सुधारीत अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.मान्यता झाल्यास सदरील कामाचा मुळ खर्च सन ९०-९१ चे शासकीय अनुदानातुन व वाढीव खर्च सन ९५-९६ चे १० कोटी रुपयातुन करण्यांत येईल.करीता प्रस्ताव स्थायी समितीचे विचारार्थ सादर. मान्यता झाल्यास सदरील काम मुळ निविदेचे कॉन्ट्रॅक्टर श्री.एम.एस.जग्गी यांचेकडून निविदेच्या दराने ०.२५% कमी करुन घेण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार जालना रोड ते सुत गिरणी या १०० फुट विकास रस्त्यांवर ५० मी.मी.जाडीचा मॅकेडम करण्यांसाठी बनवण्यांत आलेल्या रुपये ५०,४०,०७२/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास तसेच कामाचा मुळ खर्च ९०-९१ च्या शासकीय अनुदानातून व वाढीव खर्च ९५-९६ च्या १० कोटी रुपयापासुन करण्यांस तसेच सदरील काम मुळ निविदेचे

कॉन्ट्रॅक्टर श्री.एस.एस.जग्गी यांच्या कडून ०.२५% टक्के कमी दराने करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०६/५४:**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की,मा.नगरसेवक श्री.विठ्ठल जाधव यांनी रुणवाल ले आऊट ते पुंडलीकनगर या रस्त्याचे रुंदीकरणाचे काम त्यांचे स्वेच्छा निधीतून प्रस्तावित केले आहे.सदरील कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.२४,८१०/- असुन सदरील काम हे सिडको नोटीफाईड क्षेत्रातील असल्याने काम करणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरील काम हे स्वेच्छा निधीमधील असल्याने मान्यता झाल्यास उपलब्ध कॉन्ट्रॅक्टरकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांत येईल.करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की,मा.नगरसेवक श्री.विठ्ठल जाधव नगरसेवक यांच्या स्वेच्छा निधीतून करण्यांसाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२४,८१०/- च्या अंदाजपत्रकास अंदाजपत्रकीय दराने उपलब्ध कॉन्ट्रॅक्टरकडून करुन घेण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०७/५५:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,मो.नारळीबाग,संतोषीनगर,नारायणनगर,धनमंडी आणि जुना बाजार भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.६,७७,५००/- चे तयार करण्यांत आले आहे.सदरील कामाचा खर्च रस्ते देखभाल दुरुस्ती सन ९६-९७ या लेखा शिर्षकामधून करण्यांत येईल.प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार ,मो.नारळीबाग,संतोषीनगर,नारायणनगर,धनमंडी आणि जुना बाजार भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार बनविण्यांत आलेल्या रु.६,७७,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०८/५६:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,मो.समर्थनगर,नेहरु प्लेस दरम्यान फुट ब्रिज बांधणेच्या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.१,२५,२००/- चे तयार करण्यांत आले आहे.सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते सन १९९६-९७ या लेखा शिर्षकामधून करण्यांत येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

मो.समर्थनगर,नेहरु प्लेस दरम्यान फुट ब्रिज बांधणेच्या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुची नुसार बनविण्यांत आलेल्या रु.१,२५,२००/- च्या अंदाजपत्रकास व सदरचा खर्च ९६-९७ च्या अंदाजपत्रकातील भांडवली रस्ते यांतून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.,

**विषय क्र. ५०९/५७:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,सिडको एन-६ येथील स्मशान भूमीमध्ये सुधरणा व डागडुजी करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम सन १९९५-९६ च्या सा.बां.खात्याच्या दरसुची अन्वये मंजुरी दिली आहे.सदर खर्च "स्मशानभूमी " या तरततुदीमधून करण्यांत येणार आहे.करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सिडको एन-६ स्मशान भूमीमध्ये सुधारणा व डागडुजी करण्यासाठी सा.बां.खात्याच्या ९५-९६ च्या दरसुची अन्वये बनविण्यात आलेल्या रु.२,८७,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१०/५८:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.आंबेडकर नगर येथे एकूण अंदाजे २९०० मी.लांबीची ३०० मी.मी.व्यासाची प्रिकास्ट आर.सी.सी.गटार सिमेंटमधील विट कामासह बांधणेच्या कामाकरीता अंदाजपत्रक रूपये १२,५०,०००/- सा.बां.विभाग औरंगाबाद यांची दरसुची सन १९९४-९५ प्रमाणे तयार करण्यांत आले असून मा.आयुक्तांनी दि.१७-२-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तसेच सदरील कामाकरीता मनपाच्या सन १९९५-९६ च्या अर्थसंकल्पात खुली गटार या शिर्षात रुपये ५०,००,०००/- ची तरतुद करण्यांत आली आहे.करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार आंबेडकरनगर येथे एकूण अंदाजे २९०० मी.लांबीची ३०० मी.मी.व्यासाची प्रीकास्ट आर.सी.सी.गटार सिमेंटमधील विटकामासह बांधण्याच्या कामासाठी सन ९४-९५ च्या सा.बां.विभागाच्या दरसुची अन्वये बनविण्यांत आलेल्या रु.१२,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५११/५९:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.गांधीनगर,खोकडपुरा स्लम येथे शहाबाद फरशी बसविणेबाबत व गटार दुरुस्त करणे व खडी रस्ता तयार करणे करीता सा.बां.खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसुचीनुसार रु. ३,३६,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील काम ५% कमकुवत घटक योजना रु.४५ लाख याशिर्षकातून करण्यांत येईल.सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि.१५-२-९५ ला मान्यता दिलेली आहे.तरी सदर कामाकरीता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रु.३,३६,०००/- ला मान्यतेकरीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार गांधीन्गार,खोकडपुरा स्लम येथे शहाबाद फरशी बसविणे बाबत व गटार दुरुस्त करणे व खडी रस्ता तयार करणेबाबत सा.बां.विभागाच्या ९४-९५ च्या दरसुची नुसार तयार करण्यांत आलेल्या रु.३,३६,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१२/६०:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.इंदिरानगर बायजीपुरा येथे अर्धगोलाकार गटार बांधणे बाबतच्या कामाकरीता सा.बां.खातेच्या सन १९९४-९५ च्या दरसुचीनुसार रुपये ४,६१,६२१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील काम खुल्या गटारी बांधणे रु.५० लाख या शिर्षकातून करण्यात येईल.सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि.३-१-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली असून प्रस्तावित कामासाठी निविदपत्रके मागविण्यांत आली असता अंतिम तारखेपर्यंत दोन निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १) आर.एल.बारवाल | ०.०१% | कमी |
| २) श्री.कुलवंतसिंग | ४% | कमी |

तुलनात्मकदृष्टया अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची निविदा श्री.आर.एल.बारवाल यांची आहे.तरी अंदाजपत्रक रक्कम रु.४,६१,६२१/- व सदरील कामासाठी श्री.आर.एल.बारवाल यांच्या अंदाजपत्रक दरापेक्षा ०.०१% कमी दराची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार इंदिरानगर बायजीपुरा येथे अर्धगोलाकार गटार बांधण्याच्या सां.बां.विभागाच्या ९४-९५ च्या दरसुचीनुसार बनविण्यांत आलेल्या रु.४,६१,६२१/- च्या अंदाजपत्रकान्वये प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया व अंदाजपत्रकीय दरापेक्षा श्री.आर.एल.बारवाल यांची निविदा ०.०१% कमी दराची असल्याने तीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१३/६१:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,मो.मसनतपूर येथील पुर्वेकडील नाल्याकरीता पुर नियंत्रण भिंत बांधण्याचे कामाकरीता अंदाजपत्रकीय रक्कम रु.१७,०८,७५०/- तयार करण्यांत आले होते व त्यास मा.आयुक्तांनी दि.८-१-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून दि.१९-१-९६ अन्वये स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.सदरील कामासाठी निविदा सुचना क्र.मनपा लेखा/नि/५८/९६ दि.१४-१-९६ अन्वये स्थानिक वर्तमानपत्रात विस्तृत प्रसिध्दी देवून निविदा मागविण्यांत आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकूण निविदा प्राप्त झाल्या.त्या खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) श्री. अब्दुल सलाम | अंदाजपत्रकीय दराने |
| २) श्री.कुलवंतसिंग | ५.९% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दराची श्री.अब्दुल सलाम यांची निविदा आहे.सदरील काम महाराष्ट्र शासनाने मंजुर केलेल्या १०कोटी अनुदानातून करण्यांत येईल.करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मसनतपुर येथील पुर्वेकडील नाल्याकरीता पुर नियंत्रण भिंत बांधण्याच्या रु.१७,०८,७५०/- च्या अंदाजपत्रकीय दराची असल्याने तीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१४/६२:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,मजनुहिल ते लेबर कॉलनी या रस्त्यावरील मध्ये दुभाजकाची उंची वाढविण्याच्या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१३,८८,०४६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले

होते.त्यास स्थायी समिती ठराव क्र.२४४/१५ दि.२८-१२-९५ अन्वये मंजुरी देण्यांत आली असता,कार्यालयीन निविदा सुचना क्र./मनपा/लेखा/नि/५०/९५ दि.२८-१२-९५ अन्वये निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १४ निविदा विकल्या गेल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदा दर भरुन प्राप्त झ ााली.प्राप्त निविदापत्रके दिनांक १६-१-९६ ला उपस्थित कंत्राटदारासमक्ष उघडण्यांत आल्या.त्या खालीलप्रमाणे

१) श्री.सलीम पटेल अंदाजपत्रकीय दराने
२) श्री.एस.एम.मंडोरे ३% जास्त दराने
३) श्री.आर.एल.बारवाल ५% जास्त दराने

वरील प्राप्त पत्रकांपैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री.सलीम पटेल यांची निविदा आहे.मा.आयुक्तांशी दि.९-२-९६ रोजी वाटाघाटीअंती सदरील काम श्री.सलीम पटेल यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

स्थायी समिती विषय क्र.२४४/१५ दि.२८-१२-९५ अन्वये मजनुहिल ते लेबर कॉलनी या रस्त्यावरील मध्य दुभाजकाची उंची वाढविण्यांच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या ९४-९५ च्या दरसुची अन्वये रुपये १३,८८,०४६/- च्या अंदाजपत्रकावरती मागविण्यांत आलेल्या निविदा पैकी श्री.सलीम पटेल यांनी वाटाघाटीअंती सदरचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १ टक्का कमी दराने संमती दर्शविल्याने तीस सवा्रनुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१५/६३:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,सिव्हील हॉस्पीटल ते रंगीन गेट या रस्त्यावरील मध्य दुभाजकाची उंची वाढविणे व रेलींग बसविणेच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.९,४५,०७३/- चे अंदाजपत्रकास ठराव क्र.२४३ दि.२८-१२९५ अन्वये निविदापत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या तारखेपर्यंत चौदा निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली ती दि.१६-१-९६ ला उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे

१) श्री.शेख शरीफ ०.१०% कमी
२) श्री.सलीम पटेल ८% जास्त दराने
३) श्री.एस.एम.मंडोरे १०% जास्त दराने

वरील प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराने श्री.शेख शरीफ यांच्या निविदापत्रकाचे दर होते.मा.आयुक्तांसोबत दि.९-२-९६ च्या वाटाघाटीअंती सदरील काम श्री.शेख शरीफ अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराने करुन देण्यांस तयार आहोत.

तरी शेख शरीफ यांचंकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराने करुन घेणेबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सिव्हील हॉस्पीटल ते रंगीन गेट या रस्त्यावरील मध्य दुभाजकाची उंची वाढविण्याच्या सा.बां.खात्याच्या ९४-९५ च्या दरसुची अन्वये बनविण्यांत आलेल्या रु.९,४५,०७३/- च्या कामास स्थायी समितीस प्राप्त झालेल्या रुपये ९,४५,०७३/-

च्या कामास स्थायी समिती ठराव क्र.२४३ दि.२८-१२-९५ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे.सदरील कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी व वाटाघाटी अंती श्री.शेख शरीफ यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा एक टक्का कमी दर मान्य केल्याने निविदा स्विकृतीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१६/६४:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.चिकलठाणा येथे आठवडी बाजाराकरीता उपलब्ध जागेत ओढे तयार करणे,पाण्याचे हौद तयार करणे,खडी रस्ते तयार करणेचे कामासाठी सर्वसाधारण सभा दि.२०-१०-९५ ठराव क्र.५७/५४ अन्वये रक्कम रु. १०,००,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरी मिळालेली आहे.तसेच स्थायी समिती सभा दि.२८-१२-९५ अन्वये तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री.एस.एम.मंडोरे यांचे निविदा दरास मंजुरी प्राप्त झाली आहे.कार्यालयीन आदेश क्र.७२ दि.२९-१-९६ अन्वये गुत्तेदारास कार्यादेश दिले असुन सदरील काम गतीचे चालू आहे.काम चालू असतांना मा.आयुक्त यांनी वेळोवेळी पहाणी केली आहे व या विभागाचे स. नगरसेवक व विभागातील नागरिकांच्या मागणीनुसार तसेच आठवडी बाजाराकरीता नियोजित ओटयाची संख्या कमी पडणार असल्यामुळे ओटयाच्या संख्येमध्ये वाढ करण्यांचे तसेच मटन व बिफ मार्केटच्या ओटयाच्या संरक्षित भिंत बांधण्याचे सुचना प्रत्यक्ष स्थळावर मा.आयुक्तांनी दिल्या संरक्षित भिंतीच्या प्रयोजनामुळे सर्व साधारण माणसाला मटन व बिफ नजरेस पडणार नाही.तसेच मुख्य रस्त्यांवरुन आठवडी बाजारात प्रवेश करतांना रस्ता तयार करण्यांचे व पाईपचे प्रयोजन मुळ अंदाजपत्रकात समाविष्ट नव्हते.तसेच ओटयावर शहाबादी फरशी लावण्याचे मुळ अंदाजपत्रकात समाविष्ट होते.परंतु बाजारातून व मंडयातून फरशा काढून नेण्याचे प्रकार घडतात या कारणाकरीता व ओटयाचा पृष्ठभाग दणकट असावा या दोन्ही कारणाकरीता फरशी ऐवजी क्रॉंकीट करण्याचे सुचना दिल्यानुसार व इतर काही बाबी करणे आवश्यक असल्यामुळे सुधारीत अ.पत्रक (अतिरिक्त बाबीच्या रकमेसहित) रक्कम रु.१८,०८,१८७/- चे तयार करण्यांत आले असून मुळ अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १२५% निविदेतील प्राप्त दरानुसार व १२५% च्या वरील काम सन ९५-९६ च्या चालू दरसुचीनुसार काम चालु असलेल्या मक्तेदारामार्फत करुन घेणेचा प्रस्ताव विभागाने सादर केला असता लेखाधिकारी-१ यांनी रक्कम रु.८,०८,१८७/- चे वाढीव काम असल्यामुळे विना निविदा करणे लेखा परिक्षणाच्या दृष्टीने योग्य नाही असे मत दिले.

परंतु सध्या मार्केटची अत्यंत आवश्यकता असल्यामुळे व आठवडी बाजारापासून ओटयापासून मनपाच्या आर्थिक बाजूत भर पडणार असल्यामुळे व काळाची स्थिती पाहता मा.आयुक्त महोदयांनी सदरील प्रस्तावित काम चालू ठेवून सदरील सुधारीत अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर सादर करण्याचे व वाढीव कामासहित सर्व कामे दि.१ मे १९९६ पर्यंत पूर्ण करण्यांची सुचना दि.२३-२-९६ रोजी दिल्या.सबब सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु.१८,०८,१८७/-अंदाजपत्रक तसेच सदरचे काम मुळ काम करणारी एजन्सी श्री.एम.एम.मंडोरे यांचेकडून मूळ अ.प.रक्कमेच्या १२५% निविदेतील मंजुर दराप्रमाणे व बाकी रक्कमेचे काम सन ९५-९६ च्या चालू दरसूचीनुसार करून घेण्यांचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

सदरचा खर्च आठवडी बाजार विकसीत करणे या लेखा शिर्षामध्ये सन ९५-९६ च्या अर्थ संकल्पीय तरतुदीमधून १०,००,०००/- पर्यंत करण्यांत येईल व सन ९६-९७च्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून शिल्लक खर्च करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार चिकलठाणा आठवडी बाजाराकरीता प्रस्तावात दर्शविलेली कामे पार पाडण्यांसाठी तयार करण्यांत आलेल्या सुधारीत अंदाजपत्रक रु.१८,०८,१८७/- ला तसेच सदरचे काम मुळ कम करणारी एजन्सी श्री.एस.एम.मंडोरे यांचेकडून मुळ अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १२५% निविदेतील मंजुर दराप्रमाणे व बाकी रक्कमेचे काम सन ९५-९६ च्या चालू अर्थसंकल्पीय तरतुदीतून शिल्लक खर्च करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१७/६५:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.रेल्वेस्टेशन झोन नं.६चे आवारात मनपा वर्ग-३ कर्मचाऱ्यांसाठी संरक्षित भिंतीसह निवासस्थान बांधणेच्या कामासाठी रक्कम रु.१,९०,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास मा.आयुक्तांनी दि.१४-२-९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे.सबब सदर कामाचे रक्कम रु.१,९०,५००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार रेल्वेस्टेशन झोन नं. ६ च्या आवारातील वर्ग-३ कर्मचाऱ्यांसाठी संरक्षित भिंतीसह निवासस्थान बांधण्याच्या कामासाठी बनविण्यांत आलेल्या रुपये १,९०,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१८/६६:**

लेखाधिकारी-१ यांनी प्रस्ताव सादर केला की,स.सदस्यांना सन ९६-९७ च्या अंदाजपत्रकासोबत मा.आयुक्तांचे दालनांत चर्चा झाल्यानुसार ब्रिफकेस खरेदी बाबतचा प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे.यास्तव व्ही.आय.पी.चे स्थानिक मुख्य वितरक मे.प्रकाश स्टोअर्स यांचेमार्फत दर व बॅगाचे नमुने मागविले ते खालीलप्रमाणे

| | मुळ किंमत | डिस्कांऊंट दर |
|---|---|---|
| १) व्ही.आय.पी.ब्रिफकेस | ५८५/- | ४६८/- |
| | | (दर रु.४५०/- पावेतो कमी करता येईल.) |
| २) ओडीसी ब्रिफकेस | १५००/- | १२००/- प्रतिनग |
| ३) प्रशासनातर्फे रुपये | ४६८/-<br>४५०/- | किंमतीची बॅग खरेदी करण्यास्तव |

शिफारस करण्यांत येते.सदरील ब्रिफकेस एक विशेष बाब म्हणून द्यावयाची असून त्यास्तव अंदाजपत्रकात तरतुद करण्यांत आलेली नाही.करीता रुपये ४६८/- / ४५०/- किंमतीची बॅग खरेदी करण्यांस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.तथापी मा.महापौर,उपमहापौर व इतर स.सदस्य यांनी मा.महापौरांच्या दालनात रुपये १२००/- ची बॅग खरेदी करावी म्हणून पसंती दर्शविली आहे.करीता विचारार्थ.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार स.सदस्यांना ९६-९७ च्या अंदाजपत्रकासोबत एक छोटा ब्रिफकेस देण्यासाठी मा.महापौर,उपमहापौर,सभागृह नेता,विरोधी पक्षनेता,सभापती,स्थायी समिती स.सदस्य ठरवतील ती बॅग स. सदस्यांना देण्यांत व त्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१९/६७:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.बौध्दनगर स्लम येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणेबाबत कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसुचीनुसार रु.४९,६८,००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील काम नविन डांबरीकरण करणे रुपये ११०.०० लाख या शिर्षकातून करण्यांत येईल.सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दिनांक १३-१२-९५ ला शासकीय मान्यता दिली असून प्रस्तावित कामासाठी निविदापत्रके मागविण्यांत आली असता अंतिम तारखेपर्यंत एकूण एक निविदा प्राप्त झाली.

१) आदिनाथ कन्स्ट्रक्शन ९.५६% जास्त

त्यानंतर दिनांक २८-२-९६ रोजी मा.आयुक्त साहेबांच्या दालनात दराच्या वाटाघाटीबाबत चर्चा झाली असता ठेकेदाराने सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराने करण्यांस संमती दर्शविली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रु.४,९६,०००/- व कामाची एजन्सी श्री.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दरानी निविदेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार बौध्दनगर स्लम मधील रस्त्यांचे डांबरीकरण करण्यांच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या ९४-९५ च्या दरसुची अन्वये बनवण्यांत आलेल्या रुपये ४,९८,८००/- च्या अंदाजपत्रकीय कामासाठी प्राप्त निविदांपैकी वाटाघाटीअंती श्री.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांना अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४ टक्के जास्तीने काम करण्यांची संमती दर्शविल्याने त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२०/६८:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.आसिफिया कॉलनी स्लम येथील रस्त्यांचे पुर्नडांबरीकरण करणेबाबत कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसुचीनुसार रु.३,८७,५२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील काम पुर्नडांबरीकरण करणे रु.१००.०० लाख या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.२०-१२-९५ नुसार प्रशासकीय मान्यता दिली असून प्रस्तावित कामासाठी निविदा पत्रके मागविण्यांत आली असता अंतिम तारखेपर्यंत एकूण एक निविदा प्राप्त झाली.

१) आदिनाथ कन्स्ट्रक्शन ९.९९%

त्यानंतर दि.२८-२-९६ रोजी मा.आयुक्त यांच्या दालनात दराच्या वाटाघाटीबाबत चर्चा झाली असता ठेकेदराने सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराने करण्यांस संमती दर्शविली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रु.३,८७,५९५/- व कामाची एजन्सी श्री.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराची निविदेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार आसिफिया कॉलनी स्ल्ममधील रस्त्यांचे पुर्नडांबरीकरण सा.बां.खात्याच्या ९४-९५ च्या दरसुची अन्वये बनविण्यांत आलेल्या रु.३,८७,५९५/- च्या कामासाठी बोलावण्यात आलेल्या निविदापैकी आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची वाटाघाटीअंती

९.९९% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४ टक्के जास्त दराने काम करण्यांची संमती दर्शविल्याने तीस मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२१/६९:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.मोगलपुरा स्लम येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणेबाबत कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसुचीनुसार रु.२,७७,५२०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील काम डांबरीकरण करणे रुपये १००.०० लाख या शिर्षकातून करण्यांत येईल.

सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.१७-११-९५ ला प्रशासकीय मान्यता दिली असून प्रस्तावित कामासाठी निविदा पत्रके मागविण्यांत आली असता अंतिम तारखेपर्यंत एकूण एक निविदा प्राप्त झाली.

१) आदिनाथ कन्स्ट्रक्शन १०.६१% जास्त

त्यानंतर दि.२८-२-९६ रोजी मा.आयुक्त साहेबांच्या दालनात दराच्या वाटाघाटीबाबत चर्चा झाली असता ठेकेदराने सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४ टक्के जास्त दराने करण्यांस संमती दर्शविली आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रकीय रुपये २,७७,५२०/- व कामाची एजन्सी श्री.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४ % जास्त दराची निविदेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मोगलपुरा स्लम रस्त्यांचे डांबरीकरण व पुर्नडांबरीकरण करण्यांच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या ९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेल्या रु.२,७७,५२०/- च्या कामासाठी प्राप्त निविदेस मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.६१% जास्त ऐवजी ४% जास्त दराने काम करण्यांची संमती दर्शविल्याने तीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२२/७०:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.जरीपुरा,बापुनगर येथील रस्त्यांचे डांबरीकरण व पुर्नडांबरीकरण करणेबाबत कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्यावर्ष १९९४-९५ च्या दरसुचीनुसार रु.७,४४,२१०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील काम डांबरीकरण करणे रु.१००.०० लाख या शिर्षकातून करण्यांत येईल.सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.२१-१२-९५ ला प्रशासकीय मान्यता दिली असून प्रस्तावित कामासाठी निविदापत्रके मागविली असता अंतिम तारखेपर्यंत एकूण एक निविदा प्राप्त झाली.

१) आदिनाथ कन्स्ट्रक्शन १०.९१% जास्त

त्यानंतर दि. २८-२-९६ रोजी मा.आयुक्त यांच्या दालनात दराच्या वाटाघाटीबाबत चर्चा झाली असता ठेकेदाराने सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराने करण्यांस प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार जरीपुरा,बापुनगर येथील रस्त्यांचे डांबरीकरण व पुर्नडांबरीकरण करण्यांच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या ९४-९५ च्या दरसुचीनुसार बनवण्यांत आलेल्या रु.७,४४,२१०/- च्या अंदाजपत्रकीय कामासाठी प्राप्त निविदामध्ये मे.आदिनाथ

कन्स्ट्रक्शन यांनी वाटाघाटीअंती सदरचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्तीने करण्यांस संमती दर्शविल्याने तीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२३/७१:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.हर्सुल गांव येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे बाबत कामाकरीता सा.बां.खाते यांच्या वर्ष ९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.३,००,४००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील काम शासकीय अनुदान ९२-९३ रु.५.१० कोटीच्या शिर्षकातून करण्यांत येईल.सदरील अंदाजपत्रकास मा.प्रशासक यांची दि.११-१-९४ ला प्रशासकीय मान्यता दिली असुन प्रस्तावित कामाचे फेर निविदा मागविण्यांत आले असता अंतिम तारखेपर्यंत एकूण एक निविदा प्राप्त झाली आहे.

१) आदिनाथ कन्स्ट्रक्शन १०.७१% जास्त

त्यानंतर दि.२८-२-९६ रोजी मा.आयुक्त साहेबांच्या दालनात दराच्या वाटाघाटी बाबत चर्चा झाली असता ठेकेदराने सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराने करण्यांस संमती दर्शविली आहे.

तरी सदर कामाकरीता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रु.३,००,४००/- व कामाची एजन्सी श्री.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराची निविदेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार हर्सुल गांव येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या ९४-९५ च्या दरसुचीनुसार बनवण्यात आलेल्या रक्कम रु.३,००,४००/- च्या अंदाजपत्रकीय कामासाठी प्राप्त निविदेतील मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांनी सदरचे काम वाटाघाटीअंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराने करण्यांस संमती दर्शविल्याने निविदा स्विकृतीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२४/७२:**

अतिरिक्त शहर अभियंता यांचेकडून आलेल्या प्रस्तावानुसार मो.फकीरवाडी येथे श्रीकृष्ण मंदिर असून सदर मंदिराकडे जाण्यास सुमारे १५ फुट रुंद रस्त्याची आवश्यकता असल्याचे तेथील नागरिकांनी विनंती केल्यावरुन न.भू.क्र.५३६३ पैकी मिळकतधारक श्री.आदिनाथ त्रिबंक तांदळे यांचे ताब्यात असलेली जमीन पी.आर.कार्ड नुसार ३.५ मीटर २३.०० मीटर मंदिराकडे जाण्यासाठी रस्त्याकरीता देण्यांस संमती दिल्यावरुन सदर जागेचे मुल्यांकन रु.३,१०,८१०/- (रु.तीन लाख दहा हजार आठशे दहा फक्त) इतकी निश्चित केली आहे.आणि सदर जागेचा नोंदीणीकृत दस्तावज (रजिस्ट्री) करुन घेणे साठी रु.४६,८२२/- इतका खर्च येतो.त्यापैकी ५०% खर्च अदा करण्यास संमती दिलेली आहे.परंतु सदर रक्कम मोबदल्याच्या रक्कमेतून वळती करुन घ्यावी अशी विनंती केली आहे.तसेच ५०% खर्च महानगरपालिका करणार आहे.

तरी हितसंबधित मोबदल्याची रक्कम रजिस्ट्री खर्च ५०% वजा करता रु.२,८७,३९९/- (रु.दोन लाख सत्त्यांऐंशी हजार तीनशे नव्व्यान्नव) देणेसाठी रजिस्टर खर्च करणेसाठी रक्कम रु.४६,८२२/- (रु.शेहचाळीस हजार आठशे बावीस फक्त) अग्रीम म्हणून श्री.डी.डी.काळेले,शाखा अभियंता यांना देणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार फकीरवाडी येथे श्रीकृष्ण मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी श्री.जगन्नाथ त्रिंबक तांदळे यांच्या मालकीची जागा (न.भु.क्र.५६६३ इतकी) पी.आर.कार्ड नुसार ३.५ मीटर x २३.०० मीटर संपादन करण्यासाठी निश्चित करण्यांत आलेल्या रु.३,१०,८१०/- च्या मुल्यांकनास आणि सदर जागेचा नोंदणीकृत दस्तऐवज करण्यासाठी येणाऱ्या खर्चास रु.४६,८२२/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.पैकी हितसंबधितांस मोबदल्याची व रजिस्ट्री खर्च ५०% वजा करता रु.२,८७,३९९/- देण्यांस व रजिस्ट्रीसाठी येणारा खर्च ४६,८२२/- अग्रीम म्हणून श्री.डी.डी.काळेले शाखा अभियंता यांना देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२५/७३:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,निराला बाजार ते नागेश्वरवाडीच्या रस्त्याचे विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,३४,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.३६३/२२ दिनांक ६-१-९६अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सतरा कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त सहा निविदापत्रके भरुन प्राप्त निविदा पत्रके दि.१-२-९६ रोजी उघडण्यांत आली.त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स | २.५१% | जास्त दराने |
| २) मे.ओमिक्रॉन इंजिनिअर्स | ३.००% | जास्त दराने |
| ३) मे.विश्वनाथ इलेक्ट्रीकल्स कं. | ४.००% | --//-- |
| ४) मे.आदित्य इलेक्ट्रकल्स | १.००% | कमी दराने |
| ५) मे.विटा इलेक्ट्रकल्स | १.५०% | जास्त दराने |
| ६) मे.सुमी इलेक्ट्रीकल्स | ५.००% | --//-- |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.आदित्य इलेक्ट्रीकल्सच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% कमी आहेत.सदर दर जास्त वाटत असल्याने मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स यांना सदर कामाचे दराबाबत वाटाघाटीस्तव बोलावले असता वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स हे सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% कमी ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.००% कमी दराने करण्यांस तयार आहेत.

तरी मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.००% कमी या दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार निराला बाजार ते नागेश्वरवाडी रस्त्यांच्या विद्युतीकरणासाठी तयार करण्यात आलेल्या रु.३,३४,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.३६३/२२ दि.६-१-९६ अन्वये मंजुरी दिल्यानुसार प्राप्त निविदांपैकी मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स यांनी सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराने स्विकृती दर्शविल्यानुसार दर स्विकृतीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२६/७४:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,गजानन महाराज मंदिर ते महाराणा प्रताप चौक या रस्त्याचे विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.८,१८,०५०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.३६७/२६ दि.६-१-९६ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदपत्रके मागविण्यांत आली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण अठरा कोरी निविदापत्रके विकल्या गेली.अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त पांचा निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली.प्राप्त निविदा पत्रके दि.१-२-९६ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.कॅपको एजन्सीज | ३.००% | जास्त दराने |
| २) मे.सत्यम वायर्स | ७.००% | जास्त दराने |
| ३) मे.लुना इलेक्ट्रीकल्स | १.८०% | कमी दराने |
| ४) मे.बिटा इलेक्ट्रीकल्स | ६.००% | जास्त दराने |
| ५) मे.बी.जे.इलेक्ट्रीकल्स कं. | २.००% | जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकांपैकी मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांना सदर कामाचे दराबाबत वाटाघाटीस्तव बोलावले असता वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे मे. लुना इलेक्ट्रीकल्स हे सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.८०% कमी ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.००% कमी या दराने करण्यास तयार आहेत.

तरी मे.लुना इलेक्ट्रकल्स यांना सदर कामाचे दराबाबत वाटाघाटीस्तव बोलावले असता वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स यांनी वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे मे.लुना इलेक्ट्रीकल्स हे सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.८०% कमी ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.००% कमी या दराने करण्यास तयार आहेत.

तरी मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी या दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार गजानन महाराज मंदिर ते महाराणा प्रताप चौक रस्त्याच्या विद्युतीकरणासाठी तयार करण्यांत आलेल्या रु.८,१८,०५०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.३६७/२६ दि.६-१-९६ पैकी मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांनी वाटाघाटीअंती सदरचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.००% कमी दराने करण्यांस संमती दर्शविल्यानुसार त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२७/७५:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,शहानुरमियाँ दर्गा ते गादिया विहार या रस्त्याचे विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.५,४५,६५९/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.३६५/२४ दि.६-१-९६ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सहा कोरी निविदापत्रके विकल्या गेली व अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त पांच निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली.प्राप्त निविदापत्रके दि.१-२-९६ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स | २.००% | जास्त दराने |
| २) मे.सत्यम वायर्स | १.५०% | जास्त दराने |

३) मे.सुमी इलेक्ट्रीकल्स ५.००% जास्त दराने
४) मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स १.००% कमी दराने
५) मे.ओमिक्रॉन इंजिनियर्स २.१०% जास्त दराने

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.प्रगत इलेक्ट्रीकल्सच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% आहेत.परंतु सदर दर जास्त वाटत असल्याने मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स यांना सदर कामाचे दराबाबत वाटाघाटीस्तव बोलावले असता वाटाघाटी अंती सदरचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी या दराने करण्यास तयार आहेत.

तरी मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी या दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शहानुरमियाँ दर्गा ते गादीया विहार रस्त्याचे विद्युतीकरणाच्या रु.५,४५,६५९/- च्या कामास स्थायी समिती विषय क्र.३६५/२४ दि.६-१-९६ मंजुरी दिल्यानुसार प्राप्त निविदापैकी मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स यांनी वाटाघाटीअंती सदरचे काम अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा २.००% कमी दराने करण्याची तयारी दर्शविल्याने त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२८/७६:**

मो.सिल्क मिल कॉलनी येथे बहुउद्देशिय सांस्कृतिक हॉल बांधणेच्या कामासाठी रक्कम रु.१६,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सध्य अर्थतरतूद उपलब्ध नसल्यामुळे वाढीव तरतुद उपलब्ध होईल याअटीवर मा.आयुक्तांनी दि.२६-१२-९५ रोजी मंजुरी दिलेली आहे.सदर हॉल,शादीखाना,मंगल कार्यालय व सांस्कृतिक सभागृह करीता उपलब्ध होईल व भाडयापोटी येणाऱ्या रक्कमेतून मनपाच्या आर्थिक बाजूवर भर पडेल.

सबब सदर कामाचे रक्कम रु.१६,००,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.सदरचा खर्च सन ९६-९७ मध्ये भांडवली इमारती या लेखा शिर्षामधून करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सिल्क मिल कॉलनी बहुउद्देशिय सांस्कृतिक हॉल बांधण्याच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रु.१६,००,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च ९६-९७ मध्ये भांडवली इमारत या लेखा शिर्षामधून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२९/७७:**

मालमत्ता अधिकारी यांनी मा.आयुक्त,मनपा,औरंगाबाद यांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करीत आहे की,पाहिल्या मजल्यावरील दुकाने भाडयाने देण्यासाठी सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र.४/३ दि.२४-५-९२ अन्वये भाडे धोरण शिथील करण्यात आले असून त्याचे दर प्रति चौ.मी.५०/- व पोट माळयासाठी २५/- प्रति चौ.मी.या प्रमाणे भाडे दर निश्चित करण्यांत आलेले होते.तसेच सदरील भाडे दरापेक्षा अधिक भाडे देवू करणाऱ्यास दुकाने भाडयाने दिली जातील.या ठरावान्वये ठरविलेले धोरणानुसार भाडयाने देण्यासाठी निविदा

मागविण्यात आल्या होत्या.परंतु निविदा प्राप्त झाल्या नाहीत.तथापि सर्व साधारण सभा ठराव क्र.११४/१४ दि.१८-३-९३ अन्वये मागील दुकाने भाडयाने देण्याबाबत मा.आयुक्त यांना गाळे किती दराने भाडयाने दयावयाचे याचा निर्णय घेण्याचा अधिकार देण्यात आला आहे.त्या अनुषंगाने प्रशासकीय काळात दुकानासाठी निविदा मागविण्यात आले असता मागील बाजूच्या दुकानासाठी प्रति चौ.मी.प्रतिमहा २५/- व पोटमाळयासाठी प्रति चौ.मी.प्रतिमहा १०/- प्रमाणे दोन दुकानासाठी निविदा प्राप्त झाल्या होत्या व त्यानुसार दोन दुकाना भाडयाने देण्यात आल्या होत्या.तरी आता श्री.सतिश ज्ञानदेव पठारे यांनी नाथ मार्केट येथील पहिल्या मजल्या वरील मागील बाजूची दुकान क्र.७ मिळण्या करीता अर्ज दिला असून दुकानाचे भाडे प्रति चौ.मी.प्रतिमहा रु.२५/- व पोट माळयासाठी प्रति चौ.मी.प्रतिमहा रु.१०/- प्रमाणे भाडे देण्यांत येईल व नियमानुसार अनामत रक्कम भरणा करण्यांस तयार आहे.तरी वरील दुकान भाडयाने देण्याबाबत प्रस्ताव मान्यतेसतव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार नाथ मार्केट येथील पहिल्या मजल्यावरील मागील बाजूची दुकान क्र.७ प्रति चौ.मी.प्रतिमहा रु.२५/- व पोटमाळयासाठी प्रति चौ.मी.प्रतिमहा रु.१० प्रमाणे भाडयाने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.नियमानुसार अनामत रक्कमेचा भरणा करुन घेण्यांत यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३०/७८:**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.संजयनगर येथे ३०० मी.मी.व्यासाची जलनि:सारण वाहीनी टाकणे व परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुचीनुसार ९२-९३ च्या दराप्रमाणे तयार करण्यांत आले आहे.सदरील खर्च हा भांडवली कामाची तरतुद सन ९६-९७ मधून प्रस्तावित आहे.अंदाजपत्रकीय रक्कम रु.३,७१,०००/-

सदरील भागात सर्व ड्रेनेज उघडयावर वहात आहे,तसेच डबके साचून घाण निर्माण झाली आहे.सर्वत्र दुर्गंधी सुटली आहे.भविष्यात नागरिकांच्या आरोग्यास दुष्परिणाम होण्याची शक्यता आहे.सदरील कामाची निविदा काढून काम सुरु करणे योग्य वाटते.सन ९६-९७ मध्ये खर्च करता येईल.सदरील प्रस्तावास मा.आयुक्त यांनी दि.१४-२-९६ ला मंजुरी दिली आहे.

तरी सदरील प्रस्ताव स्थायी समितीकडे विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार संजयनगर येथे ३०० मी.मी.व्यासाची जलनि:सारण वाहिनी टाकण्यासाठी परि अभि.विभागाच्या ९२-९३ च्या दरसुची अन्वये बनविण्यात आलेल्या रक्कम रु.३,७१,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३१/७९:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,बीड डायव्हर्शन ते सातारा मनपा हद्दीपर्यंतचा रस्ता हा जिल्हा परिषदेकडून हस्तांतर झालेला नाही.परंतु येथील नागरिकांच्या मागणीनुसार सदरील रस्ता हा मनपा हद्दीत येत असल्याने तसेच सातारा येथील खंडोबा यात्रेचे महत्व लक्षात घेता सदर रस्ता रुंद करुन त्यावर डांबरीकरण करण्याचे मा.सभापती,स्थायी समिती यांनी सुचित केल्याने सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.५,०५,४१०/- चे तयार करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु.५,०५,४१०/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार बीड डायव्हर्शन ते सातारा मनपा हद्दीपर्यंतच्या रस्ता रुंदीकरण व डांबरीकरणाच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रक्कम रु.५,०५,४१०/-ला सदरील खर्च ९६-९७ च्या रस्ते देखभाल व दुरुस्ती शिर्षकातून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३२/८०:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,संग्रहालयाची (म्युझियम) इमारत बांधण्याच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२५,००,०००/- अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.३६०/१९ दि.१९-१-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असता निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली.प्राप्त निविदापत्रके दि.१-२-९६ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.एलोरा कन्स्ट्रक्शन कं. | ९.००% | जास्त दराने |
| २) श्री.अब्दुल सलाम | २१.००% | जास्त दराने |
| ३) श्री.बी.ए.काल्डा | २९.००% | जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.एलोरा कन्स्ट्रक्शन कं.यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.००% जास्त आहेत.परंतु सदरील दर जास्त वाटत असल्याने मे.एलोरा कन्स्ट्रक्शन कं.यांना सदरील कामाचे दराबाबत वाटाघाटीस्तव बोलावले असता वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे मे.एलोरा कन्स्ट्रक्शन कं.हे सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.००% या दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.००% जास्त या दराने करण्यास तयार आहे.

तरी ते.एलोरा कन्स्ट्रक्शन कं.यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त या दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार संग्रहालयाची (म्युझियमची) इमारत बांधण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.३६०/१९ दि.१९-१-९६ अन्वये मंजुरी देण्यात आल्यानुसार प्राप्त निविदापैकी वाटाघाटीअंती मे.एलोरा कन्स्ट्रक्शन कं.यांनी सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.००% जास्त दराने करण्यांस संमती दर्शविल्यानुसार त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३३/८१:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,उस्मानपुरा ते रेल्वेस्टेशन या रस्त्याच्या मधोमध सोडीयम व्हेपरचे दिवे लावून विद्युतीकरण करण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.६,०३४१३/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.३६२/२१ दि.६-१-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सतरा कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके

स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त पांच निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली.प्राप्त निविदापत्रके दि.१-२-९६ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.लुना इलेक्ट्रीकल्स | ९.८०% | जास्त दराने |
| २) मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स | १४.९५ | --//-- |
| ३) मे.सुरेश इलेक्ट्रीकल्स | १२.०० | --//-- |
| ४) मे.बी.जे.इलेक्ट्रीकल्स | १५.०० | --//-- |
| ५) मे.बिटा इलेक्ट्रीकल्स | १५.०० | --//-- |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.८०% जास्त आहेत.परंतु सदरील दर जास्त वाटत असल्याने मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांना सदरील कामाचे दराबाबत वाटाघाटीस्तव बोलावले असता वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे मे.लुना इलेक्ट्रीकल्स सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.८०% जास्त या दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.००% जास्त या दराने करण्यास तयार आहेत.

तरी सदरील काम मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.००% जास्त दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार उस्मानपुरा ते रेल्वेस्टेशन रस्त्याच्या मधोमध सोडीयम व्हेपरचे दिवे लावून विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी बनवण्यात आलेल्या रुपये ६,०३,४१३/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.३६२/२१ दि.६-१-९६अन्वये मंजुरी दिल्या नुसार प्राप्त निविदापैकी मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा वाटाघाटीअंती ३.००% जास्त दराने करण्यांस संमती दर्शविल्याने त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३४/८२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.नेहरुनगर कटकटगेट परिसरात २० खाटांचे आरोग्य केंद्र बांधणेचे कामासाठी सर्वसाधारण सभा ठराव ११६/६ दि.२०-१२-९५ अन्वये रक्कम रु.२५,००,०००/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे.सदरील काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/५८/९६ दि.२४-१-९६ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (३) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या.त्या दि.६-२-९६ ला उघडण्यांत आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.एलोरा कन्स्ट्रक्शन कं. | ९.५% | जास्त |
| २) श्री.एस.एम.मंडोरे | १२.५% | --//-- |
| ३) श्री.आर.एल.बारवाल | १५% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.५% जास्त दरात मे.एलोरा कन्स्ट्रक्शन कं.यांची निविदा आहे.दर जास्त वाटत असल्यामुळे मा.आयुक्तांचे दालनात दराचे वाटाघाटीस्तव पत्र देवून मा.आयुक्तांसमोर दराचे वाटाघाटी घेऊन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.५% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराने करण्यांस मा.आयुक्तांनी दि.२९-२-९६ अन्वये मंजुरी दिली व त्या मक्तेदारानेही लेखी संमती दिली.सबब सदर कामाची तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.५%

जास्त ऐवजी दराचे वाटाघाटी अन्वये ५% जास्त दराची मे.एलोरा कन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

सर्वसाधारण सभा ठराव क्र.११६/६ दि.२०-१२-९५ अन्वये नेहरुनगर कटकटगेट परिसरात २० खाटांचे आरोग्य केंद्र बांधण्यासाठी मंजुर केलेल्या रु.२५,००,०००/- च्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.५% जास्त ऐवजी ५% जास्त दराने क.यांनी सदरचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.५% जास्त ऐवजी ५% जास्त दराने करण्यांस संमती दर्शविल्याने त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३५/८३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,क्रांतीनगर स्लम भागात अर्धगोलाकार गटार बांधणेच्या कामाकरीता अंदाजपत्रक रक्कम रु.११,९८,१००/- चे अंदाजपत्रक सा.बां.विभाग औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यांत आले असता मा.आयुक्त यांनी दि.२९-२-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच सदरील कामाकरीता महानगरपालिकेचे सन ९५-९६ अर्थसंकल्प "झोपडपट्टी-सुधारणा कार्यक्रम" अंतर्गत खुली गटार या शिर्षकांअंतर्गत रु.५०,००,०००/- लाखाची तरतुद आहे. तरी प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

क्रांतीनगर स्लम भागात अर्धगोलाकार गटार बांधण्यासाठी सा.बां.विभागाच्या ९५-९६ च्या दरसुची अन्वये बनविण्यांत आलेल्या रु.११,९८,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**संवाद :**

मा.सभापती : संभाव्य आचार संहिता पाहता ज्या प्रस्तावांचे एजन्सीज होण्याची वाट न पाहता अंमलबजावणीस्तव हाती घेण्यांत यावेत.

स्वाक्षरीत /-
नगर सचिव,
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत /-
सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ८-३-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. दि.८-३-१९९६ रोजी दुपारी ३.०० वाजता मा.सभापती श्री.प्रदीप कुमार जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभागृहात स्थायी समिती सभेस सुरुवात झाली.सभेस निम्ननिर्दिष्ट स.सभासद उपस्थित होते.तसेच महानगरपालिकेचे अधिकारीही उपस्थित होते.**

१) श्री.अब्दुल रशिदखान (मामू)
२) श्री.डॉ.कराड भागवत.
३) श्री.गौतम खरात.
४) सौ.रजनी जोशी
५) श्री.प्रकाश निकाळजे.
६) श्री.कंवरसिंग बैनाडे.
७) महंमद मुश्ताक अहेमद
८) कु.माया लाडवाणी.
९) श्री.प्रभाकर विधाते.
१०) श्री.महादेव सुर्यवंशी.
११) सौ.पद्मा शिंदे.
१२) श्री.हमदीउद्दीन ताबा.

**संवाद :**

हमीदउद्दीन ताबा : मजुर सहकारी संस्थांना मानपाची कामे देण्यांत येऊ नयेत,अशा प्रकारचा ठराव स्थायी समितीत मंजुर झालेला आहे.यात एक मजूर सहकारी संस्था न्यायालयात गेलेली आहे,यामुळे सदरचे काम पूर्ण होण्यात अनेक अडथळे येणार नाहीत व त्यामुळे काम वेळेवर होणार नाही.

मा.सभापती : मजुर सहकारी संस्थांना कामे देण्याबाबत शासनाचे आदेश असले तरी ते मनपावर बंधनकारक नाहीत.तसा ठरावही स्थायी समितीने मंजुर केलेला आहे.न्यायालयीन कार्यवाहीबाबत विधी सल्लागार यांनी पुढील उपाय योजना करुन स्थगनादेश रद्द करण्याबाबत न्यायालयास विनंती करावी.

विधी सल्लागार : सदर प्रकरणात टेंडर उघडण्या संबंधाने न्यायालयाने स्थगनादेश दिलेला आहे.न्यायालयासमोर मनपाची बाजू मांडून स्थगनादेश उठवण्याबाबत प्रयत्न केले जातील.

श्री.हमीदउद्दीन ताबा : महानगरपालिकेतर्फे शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्याबाबत मुलाखती घेण्यांत आल्या होत्या.या मुलाखतीसाठी जिल्हा परिषदेतील काही शिक्षकही आले होते अशा काही शिक्षकांनी परिषद सेवाचा राजीनामा दिलेला आहे मात्र त्यांची मनपात नियुक्ती होईल का?

मा.आयुक्त : अशातच शिक्षकांच्या मुलाखतीचा निकाल वृत्तपत्रातून जाहिर करण्यांत आलेला आहे.नियुक्तीचे पत्र हाती पडण्यापूर्वी कोणी आपल्या सध्याच्या नोकरीचा राजीनामा देत असेल तर त्यास मनपा काहीही करु शकत नाही.जिल्हा परिषदेतील कार्यरत शिक्षकांना मनपा सेवेत घेतले जाणार नाही असे वृत्तपत्रातील तळटीपेत लिहिलेले आहे.

श्री.हमीदउद्दीन ताबा : कर्मचाऱ्यांना सेवेतून निलंबित केल्यानंतर चौकशी किती दिवसांत पूर्ण होऊन पुर्ववत कामावर घ्यावयास पाहिजे याचा खुलासा व्हावा.

मा.आयुक्त : निलंबन ही शिक्षा होऊ शकत नाही.साधारणतः निलंबनापासून सहा महिन्याच्या आंत चौकशी व्हावयास पाहिजे सहा महिन्यात चौकशी पूर्ण झ ााली नाही तर निलंबित कर्मचाऱ्यांवर लावण्यात आलेले आरोप पाहून त्यास चौकशीतील निर्णयाच्या अधिन राहून कामावार घेतले जाते.

श्री.हमीदउद्दीन ताबा : श्री.जयवळ यांनी त्यांच्यावर लावण्यांत आलेले आरोप व चौकशीतील निर्णयामुळे आत्मदहनाचा अर्ज कार्यालयाकडे दिलेला आहे.त्यांच्यावरील आरोपांची पुन्हा चौकशी करण्यांत यावी.

श्री.प्रभाकर विधाते : श्री.जयवळ यांना स्वत:चे गोपनिय अहवाल काळात ते मनपात नोकरीस नव्हते तर त्या काळात ते जिल्हा परिषदेत कार्यरत होते.

श्री.महंमद मुश्ताक : प्रकरणात पुन्हा चौकशी करण्यांत यावी.

मा.आयुक्त : श्री.जयवळ यांच्यावर ठेवण्यात आलेले आरोप पुर्णतः बरोबर आहेत आगामी स्थायी समिती बैठकीत प्रकरणांची पूर्ण माहिती ठेवण्यांत येईल.

डॉ.भागवत कराड : निपक्षपातपणे चौकशी व्हावी या दृष्टीकोनातून एखाद्या सेवानिवृत्त मॅजीस्ट्रेटची नियुक्ती करण्यांत यावी.

मा.सभापती : चौकशी मुदतीच्या आत व्हावयासच पाहिजे.प्रकरणात मा.आयुक्तांनी स्वतः लक्ष घालुन योग्य तो निर्णय घ्यावा व स्थायी समितीस माहिती सादर करावी.

श्री.प्रकाश निकाळजे : सिंधी कॉलनी,मोंढा नाका येथे फुटपाथवर बऱ्याच दुकानदरांनी अतिक्रमण केलेले आहे.त्यामुळे रोड अरुंद झालेला आहे.वेळीच अशी अतिक्रमण काढली नाहीत तर नंतर भविष्यात मनपासच त्रास होतो. प्रकरणात त्वरीत कार्यवाही करण्यांत यावी.

मा.सभापती : स.सभासदांनी अशा प्रकरणात संबंधित विभाग प्रमुखास पत्र पाठवावे म्हणजे त्यांना पुढील कार्यवाही करता येईल.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : महानगरपालिका शहरात विविध ठिकाणी ज्या जागा राखुन ठेवलेल्या त्या त्या करणासाठी वापरल्या जाव्यात.त्यांचा उद्देश बदलून इतर कामासाठी वापरण्यात येऊ नयेत.

श्री.प्रकाश निकाळजे : झोपडपट्टीतील रस्ते बनवतांना ज्या जागा संपादन कराव्या लागतात.त्या जागा संपादन केल्यानंतर रस्ते बनवत असतांना रस्त्यांत बाधीत होणाऱ्या भिंती इ.मनपाने बांधून घ्याव्यात.कारण झोपडपट्टयातून अनेक गरीब नागरिक राहतात.मनपाने भिंती बांधुन दिल्यास रस्त्यांवरही अतिक्रमण होणार नाही.

श्री.गौतम खरात : झोपडपट्टयातून राहणाऱ्या गरीबांना घरा संदर्भाने मनपाने अशा प्रकारे भिंती बांधुन दयाव्यात,यामुळे मनपाच्या योजनाही लवकर राबविल्या जातील.

मा.आयुक्त : अशा प्रकारे निर्णय घेतांना सर्वच बाजूंचा विचार करावयास पाहिजे.निर्णय शहरातील सर्वच झोपडपट्टयांना लागु होईल.तसेच जर जागा त्याच मालकाच्या नावे नसेल तर अशा जागेचा मोबदला कोणास देणार यावरुनही अनेक वाद उत्पन्न होऊ शकतात.

मा.सभापती : हा विषय स्थायी समितीच्या अधिकार कक्षेतील नसल्याने व धोरणात्मक निर्णय असल्याने स.सभासदांनी सर्वसाधारण सभेसमोर प्रश्न मांडावा.सर्वसाधारण सभाच यावर निर्णय घेऊ शकेल.

**विषय क्र. ५३६/१:**

दिनांक २९-२-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : दि.२९-२-९६ च्या स्थायी समिती बैठकीत मनपासाठी स्वतंत्र न्यायाधीश असावे अशा आशयाची चर्चा झाली होती.प्रकरणांत पुढे काय कार्यवाही झाली याची माहिती देण्यांत यावी.

मा.सभापती : महानगरपालिकेच्या केसेस एकाच न्यायाधिशापुढे चालवाव्यात या संदर्भाने सर्व समावेशक अशी टिप्पणी विधी सल्लागार यांनी तयार करावी.त्या अनुषंगाने मा.सेशन जज्ज यांना भेटून मनपाची बाजू त्यांच्या समोर मांडता येईल.जागे संदर्भाने गत स्थायी समिती बैठकीत चर्चा झाली होती.मा.सभापती स्थळ पहाणी करणार होते.फुटपाथवर अशा कोणत्याही उपक्रमासाठी जागा देण्यांत येऊ नये.तसेच जागा देतांना त्यांच्या आजुबाजूस मुत्री वगैरे नाही याचीही रचनाकारांचा अभिप्राय घेण्यांत यावा.

मा.आयुक्त : फुटपाथवर कोणत्याही उपक्रमासाठी जागा देऊ नयेत असे शासनाचे आदेश आहेत.सदर प्रकरण नगररचना विभागाकडे गेले असते तर त्यांना निगेटीव्ह अभिप्राय दिले असते.तथापी शासनाचा झुणका भाकर हा उपक्रम स्तुत्य असल्याने रेल्वे स्टेशन भागात जागा देण्यांत आली.

श्री.महादेव सुर्यवंशी : स्लम विभागासाठी पुरेसा स्टाफ देण्यांत यावा अशी सुचना मागील स्थायी समिती बैठकीत देण्यांत आली होती.अद्यापही या विभागास स्टाफ देण्यात आलेला नाही.

श्री.गौतम खरात : स्लम विभागातील कामे गतीने व्हावीत यासाठी एक स्वतंत्र कार्याकारी अभियंत्याची नेमणूक करण्यांत यावी.यावर्षी स्लम विभागासाठी अर्थसंकल्पात मोठी तरतूद करण्यांत आलेली आहे.ही रक्कम खर्च व्हावी व स्लम विभागाचा विकास व्हावा या दृष्टीकोनातून हे पद भरण्यांत यावे.

श्री.हमीदउद्दीन ताबा,श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : स्लम विभाग स्वतंत्र करण्यांत यावा व या विभागासाठी स्वतंत्र कार्यकारी अभियंता नेमण्यात यावा.

श्री.महंमद मुश्ताक : रु.२.५कोटीपेक्षा जास्त टर्नओव्हर असेल तर अशा विभागाचे सब डिव्हीजन करता येते.त्यानुसार कार्यवाही करण्यांत यावी.

मा.आयुक्त : स्लम विभागासाठी देण्यात यावयाच्या स्टाफ संदर्भाने सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव ठेवला जाईल.

मा.सभापती : आयुक्तांनी स्वतः प्रकरणात लक्ष घालुन स्लम विभागासाठी स्वतंत्र कार्यकारी अभियंता नेमता येऊ शकतो काय याबाबत स्वतः निर्णय घ्यावा,ही बाब प्रशासकीय असल्याने स्थायी समिती त्यात निर्णय घेऊ शकणार नाही.

श्री.प्रकाश निकाळजे : दि.२९-२-९६ च्या स्थायी समितीत प्रस्ताव क्र.४७५/२३ मधील प्रस्तावित काम २९ टक्के कमी दराचे असल्याने फेर निविदा मागविण्याबाबत आदेशीत झालेले आहे.प्रस्तावात दर्शविलेल्या जागेवर आजही बरीचशी अतिक्रमणे झालेली आहेत.फेरनिविदा मागविल्या तर त्यात होणारा कालापव्य टाळता यावा तसेच या भागात अतिक्रमाणे वाढण्याची शक्यता आहे,तेव्हा प्रस्तावावर फेर विचार व्हावा.

मा.सभापती : सदरचे काम २९ टक्के कमी रेटचे असल्याने कंत्राटदार कामाची क्वॉलीटी चांगली ठेवेल याची खात्री देता येत नाही.तथापी या भागात अतिक्रमणे वाढु

नयेत ही बाब विचारात घेता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३(३) नुसार मा.आयुक्तांनी आपल्या अधिकारात काम करुन घ्यावे.

श्री.गौतम खरात : दि.२९-२-९६ च्या स्थायी समिती बैठकीतील इतिवृत्त पृष्ठ क्र.४मध्ये भिमनगर,भावसिंगपुरा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयाऐवजी "जयभिमनगर" अशी दुरुस्ती करण्यांत यावी.

मा.सभापती : दुरुस्तीस मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

दि.२९-२-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तास खालील दुरुस्त्यासह मंजुरी देण्यांत येते.

१) प्रस्ताव क्र.४७५/२३ मधील पीरबाजार येथील नियोजीत आठवडी बाजाराकरीता गाळयाबाबत रिटेनिंग वॉल बांधण्यासाठी फेर निविदा न मागविता मुंबई प्रांतिक महारनगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३(३) मधील अधिकाराचा वापर करून मा.आयुक्तांनी आपल्या अधिकारात सदर काम करवुन घ्यावे.

२) "भिमनगर,भावसिंगपुरा" येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयास संरक्षीत कठडा बांधण्यात यावा अशी दुरुस्ती करण्यांत यावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३७/२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.गाडेनगर स्लम भागात शहाबाद फरशी रस्ते तयार करणे या कामाकरीता रक्कम रु.४,०३,०००/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसुची १९९४-९५ प्रमाणे तयार करण्यांत आले असुन मा.आयुक्तांनी दि.१६-११-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून सदरील कामाचा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प १९९५-९६ च्या खांडकी रस्ते हया शिर्षकाखाली ३५,००,०००/- लाखाची तरतुद मधून खर्च हाईल.

प्रस्तावित कामासाठी निविदापत्रके कार्यालयीन नोटीस क्र.मनपा/लेखा/नि/५६/९६ दिनांक ११-१-९६ अन्वये मागविण्यात आली असता निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) मे.एलोरा कन्स्ट्रक्शन ५ टक्के अंदाजपत्रकीय दराने

२) मे.श्री.स्टार कन्स्ट्रक्शन १० टक्के अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त

वरील निविदांपैकी मे.एलोरा कन्स्ट्रक्शन यांची निविदा तुलनात्मकदृष्टया कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५ टक्के जास्त दराची आहे.मान्यतेसाठी मा.आयुक्त यांचेकडे सादर केली असता त्यांना अंदाजपत्रकीय दराप्रमाणे मान्य करणेकरीता ठेकेदारास विचारणा करणेबद्दल आदेशीत केल्याप्रमाणे ठेकेदार यांनी सदरील काम अंदाजपत्रकीय दराप्रमाणे करणेबद्दल संमती दर्शविली आहे.

करीता सदरील कामे मे.एलोरा कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेणेकरीता मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार गाडेनगर स्लम भागात शहाबाद फरशी बसविण्यासाठी १९९४-९५ च्या सा.बां.खात्याच्या दरसुचीअन्वये बनविण्यांत आलेल्या रुपये ४,०३,३०००/-

च्या अंदाजपत्रकीय कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे.एलोरा कन्स्ट्रक्शन कंपनीसस अंदाजपत्रकीय दराने काम देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३८/३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.कटकटगेट वार्ड क्र.३३ येथील मनपाच्या मोकळया जागेवर फंक्शन हॉल बांधणेच्या कामासाठी रक्कम रु.५,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास मा.आयुक्तांनी दि.१४-२-९६ ला मंजुरी दिलेली आहे.सबब कामाचे रक्कम रु.५,००,०००/- (पाच लाख रुपयांचे) अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च सन ९६-९७ या आर्थिक वर्षाकरीता ठेवण्यांत आलेल्या अर्थ तरतूदीमधून करण्याचे प्रस्तावित आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.कटकटगेट वार्ड क्र.३३ येथील मनपाच्या मोकळया जागेवर फंक्शन हॉल बांधण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रुपये ५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३९/४:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.जिन्सी येथील प्राथमिक शाळेवर पहिला मजला बांधणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.७,७३,३७०/- चे तयार केले असून त्यास अंदाजपत्रकाला मंजुरी घ्या,टेंडर काढा,परंतु काम नविन आर्थिक वर्षात सुरवात करावे या अटीवरर मा.आयुक्तांनी दि.२४-१-९६ ला मंजुरी दिलेली आहे.सबब सदर कामाचे रक्कम रु.७,७३,३७०/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च सन १९९६-९७ या आर्थिक वर्षासाठी ठेवण्यात आलेल्या अर्थ तरतुदीमधून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार जिन्सी येथील प्राथमिक शाळेवर पहिला मजला बांधण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रुपये ७,७३,३७०/- च्या अंदाजपत्रकास व सदरचे काम १९९६-९७ च्या आर्थिक तरतुदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४०/५:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,दिल्ली गेट येथील वर्ग २ ते ४ कर्मचारी मनपा एकूण (२२) निवासस्थानाची एकत्रीत दुरुस्ती करण्याचे कामासाठी रक्कम रु.२,२५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून मा.आयुक्तांनी दि.१६-२-९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे.सबब सदर कामाचे रक्कम रु.२,२५,०००/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

प्रस्तावित कामांमध्ये २२ निवासस्थानाच्या खालीलप्रमाणे दुरुस्त्या आहेत.

१) आतुन व बाहेरुन रंगरंगोटी
२) नादुरुस्त प्लारींग दुरुस्त करणे
३) इमारतीच्या अंतर्गत पाणी पुरवठा जलनि:सारण दुरुस्ती करणे.
४) काही निवासस्थानातील वाटर प्रुफींग करून गळती थांबविणे.

५) काही निवासस्थानातील किचन ओटे दुरुस्ती करणे.
६) इमारतीतील स्वच्छतागृह दुरुस्त्या.
७) किरकोळ प्लॉस्टरींग,बांधकाम दुरुस्त्या,दरवाजे,खिडक्या,जाळया इत्यादी दुरुस्त्या.
सदरचा खर्च ९६-९७ या आर्थिक वर्षाकरीता देण्यांत आलेल्या अर्थतरतुदीमधून करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार दिल्लीगेट येथील वर्ग १ ते ४ अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निवासस्थांनांची दुरुस्ती करण्यासाठी रुपये २,२५,०००/- च्या अंदाजपत्रकास प्रस्तावित कामे करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४१/६:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.गरमपाणी (औरंगाबाद मीलच्या मागे) येथे समाजमंदिर बांधण्याच्या कामासाठी रक्कम रु.१,४०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास मा.आयुक्तांनी दि.३-१-९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सदर कामाचे रक्कम रु.१,४०,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.सदरचा खर्च ५% कमकुवत घटकांसाठी कल्याणकारी योजना या लेखाशिर्षामधून सन ९५-९६ या वर्षात सुधारीत अंदाजपत्रकामध्ये वाढवुन दिलेल्या अर्थ तरतुदीमधुन करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.गरमपाणी येथे समाज मदिर बांधण्याच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रुपये १,४०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४२/७:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,मा.आयुक्त साहेबांच्या दालनातील ऑफीस टेबल,जनरल असेम्ब्ली हॉलमधील स्टेज वरील टेबल आणि लेखा विभागातील कपाटाचे काम करुन घेणेसाठी स्थानिक फर्निचरचे काम करणाऱ्या ठेकेदराकडून कोटेशन मागविले असता सर्वात कमी दराचे कोटेशन श्री.सुपर फर्निचर यांचे असुन ते सदरील काम अंदाजपत्रक रक्कम रु.१,०२,६८०/- एवढया रकमेत करुन घ्यावयास तयार आहेत.सदरील कामाचा खर्च भांडवली इमारती १९९५-९६ या लेखा शिर्षकांतर्गत करण्यांत येईल.

तरी सदरील कामासाठीच्या अंदाजपत्रकाचे रक्कम रु.१,०२,६८०/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेस्तव व सदरील काम श्री.सुपर फर्निचर यांचेकडून करुन घेणेबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मा.आयुक्त यांच्या दालनातील आफफीस अेबल,जनरल असेम्ब्ली हॉलमधील स्टेजवरील टेबल आणि लेखा विभागातील कपाटाचे काम करुन घेण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या रुपये १,०२,६८०/- च्या अंदाजपत्रकास हे काम श्री.सुपर फर्निचार यांच्याकडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४३/८:**

मा.आयुक्त महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,अग्निशमन दलासाठी जुने फायर टेंडर्स,(१) एमसीए-२१२५-मॉनेटर बसविणे (२) एमएच-२० अे-२५९४ च्या फायरेक्स पंप बसविणे,(३) एमएच-२० अे-२०५२-फायरेक्स मॉनीटर बसविणे यासाठी फायरेक्स कंपनीच्या डिलर कडून कोटेशन मागविले आहेत.त्यासाठी एकूण खर्च रु.२,६५,२००/- रुपये दोन लाख पासष्ट हजार दोनशे फक्त येणार आहेत.त्यासाठी मनपास फायर टेंडर्स,नागपूर येथे पाठवावे लागणार आहेत,तसेच ५०% ॲडव्हान्स द्यावा लागणार आहे. करीता मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार अग्निशमन दलासाठी जुने फायर टेंडर्स,१) एमसीए २१२५ वर मॉनीटर बसविणे.२) एमएच २० अे-२५२४ वर फायरेक्स पंप बसविणे.३) एमएच २० अे २०५२ वर फायरेक्स मॉनीटर बसवणे यासाठी तयार करण्यात आलेल्या रुपये २,६५,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.या कामासाठी फायरेक्स कंपनीस ५०% ॲडव्हान्स देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४४/९:**

औरंगाबाद जिल्हा रायफल असोशिएशन,औरंगाबाद यांनी मो.बायजीपुरा येथील न.भू.क्र.१२३६९ च्या रेखांकनातील (मोतीवाला नगर) दोन खुल्या जागेपैकर एक खुली जागा (१५.०० मी.विकास योजना वस्त्याचे उत्तरेकडील क्षेत्र ३४.००x६७.०० एवढे आहे.) रायफल व पिस्टल शुटींगच्या प्रशिक्षणाकरीता मागणी केलेली आहे.याबाबत पोलीस आयुक्त,औरंगाबाद यांनी नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे.सदर जागा हया संस्थेस फायरिंग रेंज वगळता उर्वरित जागेत उद्यान विकसित करावे या अटीसह नेहमीच्या अटीस पात्र राहून देण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यांत येत आहे.

सदर जागेवर विकास नियंत्रण नियमावली १३.३.१.३ मधील तरतुदीनुसार खुल्या जागेच्या १०% अथवा जास्तीत जास्त २००.०० चौ.मी.बांधकाम करता येते.तेवढे क्षेत्र संबंधितास भाडेपट्टयावर देण्यासंबंधाने जागेचे भाडे रु.१८,४८०/- प्रतिवर्ष निश्चित केलेले आहे.

जागा द्यावयाची मागणी मान्य असल्यास सदर जागेकरीता बांधण्यात असलेल्या कुंपन भिंतीचा खर्च आजच्या दराने संबंधितांकडून घेण्यासह इतर अटीस व शर्ती संबंधाने करारनामाची पुर्तता करून त्या अटीस व शर्तीस पात्र राहून संबंधितांना ३० वर्षाचे कालावधी करीता जागा हस्तांतर करण्याची रितसर कार्यवाही करण्यांत येईल.करीता प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार बायजीपुरा येथील न.भू.क्र.१२३६९ च्या मंजूर रेखांकनातील (मोतीवाला नगर) दोन खुल्या जागांपैकी एक खुली जागा (१५.०० मी.विकास योजना रस्त्याचे उत्तरेकडील जीचे क्षेत्र ३४.००x ३७.०० एवढे आहे.)

औरंगाबाद जिल्हा रायफल असोशिएशन,औरंगाबाद यांना प्रस्तावात दर्शविलेल्या अटी व शर्तीच्या आधिन राहून ३० वर्षाच्या कालावधीकरीता रु.१८,४८०/- प्रतिवर्ष या दराने लिजवर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४५/१०:**

लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की,सन १९९६-९७ या आर्थिक वर्षासाठी मनपा विभागीय कार्यालयात ड्रेनेज चोक-अप कामासाठी ड्रेनेज बांबू खरेदीस्तव निविदा मागविण्यांत आल्या होत्या.

या कार्यालयात फक्त एक निविदा प्राप्त झाली,प्राप्त निविदाचे मे.नॅशनल बांबू सेंटर यांची रु.४/- प्रति रनिंग मीटरचे दर प्राप्त झाले.त्यासाठी त्यांनी पावती क्र.०६४६७५ दि.७-२-९६ अन्वये रक्कम रु.३०००/- ची अनामत जमा केली आहे.

सन ९५-९६ या वर्षाचे दर रु.३.७५/- प्रति रनिंग मीटरचे होते.त्या अनुषंगाने दराबाबत वाटाघाटी होवून,अंतिम दर रु.३.९० प्रति रनिंग मीटर प्रमाणे संबंधिताने देण्याचे मान्य केले.

करीता प्रस्ताव मे.नॅशनल बांबू सेंटर यांचे ड्रेनेज बांबू प्रति रनिंग मीटरचे रुपये ३.९० प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्ताव दर्शविल्यानुसार मे.नॅशनल बांबू सेंटर यांचेकडून रु.३.९० रनिंग मीटर प्रमाणे बांबू खरेदी करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ५४६/११:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,वीर सावरकर चौक समर्थनगर येथील चौकात स्वातंत्रवीर सावरकर यांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्याच्या कामाकरीता अंदाजपत्रक रक्कम रु.५,००,०००/- चे तयार करण्यांत आलेले आहे.सदरील कामाचा खर्च पुतळे खरेदी व देखभाल (सन ९६-९७) या लेखा शिर्षकामधून करण्यांत येईल.

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार वीर सावरकर यौक समर्थनगर येथे वीर सावरकरांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्यासाठी तयार करण्यांत आलेले आहे.सदरील कामाचा खर्च पुतळे खरेदी व देखभाल (सन ९६-९७) या लेखा शिर्षकामधून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४७/१२:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,महानगरपालिका प्रशासकीय इमारत टप्पा-२ साठी एअर कुलींगची व्यवस्था करण्यांत आलेले आहे.सदरील कामाचा खर्च भांडवली इमारती सन ९५-९६ या लेखा शिर्षकामधून करण्यांत येईल.सदरील कामासाठी निविदा सुचना ना.क्र./मनपा/लेखा/ नि/६४८/९५ दि.१२-१२-९५ अन्वये निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण चार (४) निविदापत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण चार (४) निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली.प्राप्त निविदा पत्रके दिनांक १-१-९६ ला उपस्थित कंत्राटदारांसमक्ष उघडण्यात आली.त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.एअर कुलर इंजिनिअर्स | ४.७१% | जास्त दराने |
| २) मे.लुना इलेक्ट्रीकल्स | ५.००% | --//-- |
| ३) मे.सत्यम वायर्स | १२.९% | --//-- |
| ४) श्री.सलीम पटेल | १५.००% | --//-- |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.७१% जास्त दराने मे.कुल इंजिनिअर्स यांच्या निविदापत्रकातील दर होते.

त्यांना वाटाघाटीस बोलावले असता वाटाघाटी अंती सदरील दर कमी करुन संबंधित कंत्राटदार मे.एअर कुल इंजिनिअर्स हे सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.००% जास्त दराने करुन देण्यास तयार आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.८,०४,५००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळणे बाबत व सदर काम मे.एअर कुल इंजिनिअर्स यांचे कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.००% जास्त दराने करुन घेणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार प्रशासकीय इमारत टप्पा-२ साठी उअर कुलींग व्यवस्था करण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.८,०४,५००/- च्या अंदाजपत्रकासाठी प्राप्त निविदापैकी वाटाघाटी अंती मे.एअर कुलर इंजिनिअर्स यांनी सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.००% जास्त दराने करण्याची तयारी दर्शविल्याने त्यांच्या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४८/१३:**

मालमत्ता अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,संत एकनाथ रंग मंदिर येथील महानगरपालिकेच्या मालकीची कॅन्टीन चालविण्यासाठी प्रति वर्षी निविदा पध्दतीने देण्यांत येत असते.तथापी अर्जदार श्री.गणेश शैट्टी यांनी मागणी केल्यानुसार खाली अटी शर्तीनुसार भाडयाने देण्यासाठी विचारार्थ सादर.

१) ज्या दिवशी कार्यालयाकडून कळविले जाईल त्या दिवसापासून तीन वर्षासाठी कॅन्टीन चालविण्यासाठी करारावर दिला जाईल.संपूर्ण वर्षाचे भाडे हे दोन हप्त्यात राहिल.तसेच अनामत रक्कम रु.५०००/- भरणा करावे लागेल.अनामत रक्कमेवर व्याज मिळणार नाही.कार्यालयाने खालीलप्रमाणे भाडे प्रत्येक वर्षी १०% मुळ भाडयात वाढ करण्यांत येऊन खालीलप्रमाणे आकारण्यांत येईल.

| अ.क्र. | वर्ष | भाडे | १०% वाढ एकूण १०%वाढ १प्रतिमहा |
|---|---|---|---|
| १) | सन १९९५-९६ | ३३००/- | चालू भाडे |
| २) | १९९६-९७ | ३३००/- | ३३० = ३६३० प्रतिमहा |
| ३) | १९९७-९८ | ३६३०/- | ३६३ = ३९९३ --//-- |
| ४) | १९९८-९९ | ४०००/- | ४०० = ४४०० --//-- |

२) संत एकनाथ रंगमंदिर येथे ज्या वेळी कार्यक्रम असले त्याच दिवशी कार्यक्रम एक तास अगोदर पासून कॅन्टींन चालविता येईल.

३) करार काळात कोणासही कॅन्टीन चालविण्याचा अधिकार हस्तांतरीत करता येणार नाही.त्याचे कार्यक्षेत्र हे फक्त कॅन्टीन पुरते मर्यादित राहिल.

४) कॅन्टीनचे इमारतीचे जागेच व इतर संबंधितास जवाबदार धरण्यांत येईल व नुकसान भरपाई वसुल करण्याचा अधिकार कार्यालयास राहील.

५) कन्टीनमध्ये फक्त शाकाहरी अल्पोपहार,चहा,कॉफी,थंडपेये,आईसक्रीम इ.पदार्थ ठेवणे बंधनकारक राहील.मांसाहरी पदार्थ व मद्य ठेवता येणार नाही व खानावळ चालवता येणार नाही.

६) कॅन्टीनची साफसफाई,स्वच्छता राखणे हे अर्जदारास बंधनकारक राहिल.
७) कॅन्टीनचे लाईटबील अर्जदाराने कॅन्टीन भाडे सोडून स्वखर्चाने भरावे लागेल.
८) सदरील करार हा तीन वर्षाकरीता असुन पुढील तीन वर्षासाठी निविदा नुसार विचार केला जाईल व त्याचे भाडे जास्त असेल त्यांना पुढील तीन वर्षाच्या करारावर देण्यांत येईल.

तरी वरील अटी-शर्ती नुसार प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार संत एकनाथ रंग मंदिर येथील महानगरपालिकेच्या मालकीची कॅन्टीन प्रस्तावात दर्शविलेल्या अटी व शर्तीच्या आधिन राहून श्री.गणेश शेट्टी यांना भाडयाने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४९/१४:**

जकात अधिक्षक प्रस्ताव सादर करीत आहे की,महानगरपालिकेच्या जकात विभागाने जकात वसुली करणेसाठी वेळोवेळी उतरवून घेतलेले (अनलोड) मालाचे डाग संबंधितांनी सोडवून न घेतल्यामुळे जकात गोडावूनमध्ये दिर्घकाळापासून पडून आहे.सदरचे डाग सोडवून घेण्यासाठी संबंधित वाहतुक कंपन्यांना कळविण्यात आले होते.तसेच स्थानिक वृत्तपत्रात जाहिर नोटीस प्रसिध्द करुन मालाचे डाग सोडवून घेणे संबंधित डाग धारकांना आवाहन करण्यात आले होते.मात्र सदरहु डाग सोडवून घेण्यासाठी संबंधितांकडून जकात कराचे व गोडावून भाडयाचे संभाव्य उत्पन्न अडकुन पडलेले आहे.या मालाची लिलावाद्वारे विक्री करुन मिळणारे उत्पन्न या मालापासून मिळणार असलेल्या जकात कराचे व गोडावून भाडयाच्या सांभाव्य उत्पन्ना पोटी महानगरपालिका फंडात जमा करुन घेणे बाबतचा प्रस्ताव आहे.

अशा प्रलंबित विविध मालाचे डागांची संख्या (७७०) आहे व त्यात सन १९९४ पासुनचे मालाचे डाग समाविष्ट आहे.या मालाचे डागात प्रामुख्याने विद्युत,इलेक्ट्रीकल्स,ॲटोपार्ट,मशिनरी पार्ट,हार्डवेअर,सॅनिटरी वेअर,कपडा ऑप्टीकल,सायन्टीफीक गुडस,भांडी,घडयाळ जाहिरात मटेरियल,फकिंग मटेरियल,प्लॅस्टीक गुडस इत्यादी प्रकारचा माल समाविष्ट आहे.

या मालाची कार्यालयाचे संबंधित तांत्रिक विभागा मार्फत किंमत मुल्यांकित करुन घेतलेली आहे.त्याचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) विद्युत साहित्य | उप अभियंता (विद्युत) यांनी मुल्यांकित<br>३,१२,३५०/-<br>करुन दिलेली किंमत |
| २) इलेक्ट्रॉनिक्स | --//--<br>२,८३,९००/- |
| ३) मोटार पार्ट मशिनरी,<br>हार्डवेअर | सहा.अभियंता (यांत्रिकी)<br>१,७३,२७०/-<br>यांनी मुल्यांकित करुन<br>दिलेली किंमत |
| ४) सॅनिटरी गुडस्,कलर | उप अभियंता(बां.-१) यांनी मुल्यांकित<br>१,०९,८९७/-<br>करुन दिलेली किंमत |

या व्यतिरिक्त खालील प्रकारच्या मालाची किंमत जकात अधिक्षक यांनी मुल्यांकित केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| ५)कपडा,चष्माघर, सायन्टीफिक गुडस्,भांडी, वॉलपिस घडयाळ. | जकात अधिक्षक यांनी मुल्यांकित केलेली किंमत | ४८,२५०/- |
| ६) जाहिरात मटेरियल वापर | --//-- | ९,८००/ |
| केलेले स्टेशनरी पॅकींग मटेरियल, जुने टायर टयुब. | | |
| ८) प्लॉस्टिक रोल,प्लॉस्टिक गुडस्,खाली ड्रम,स्टेशनरी | --//-- | ३२,०००/- |

वरील सर्व मालाची मुल्यांकित केलेली एकत्रित किंमत रक्कम रु.९,६९,४६७/- येते.अ.क्र.१ ते ४ च्या किंमती संबंधित तांत्रिक विभागाने मार्केट दराने मुल्यांकित केलेल्या आहेत.मात्र सदरचा माल दिर्घकाळापासून पडून असल्यामुळे त्यांचे वापर क्षमतेबाबत हमी देता येणार नाही.या मालाचा मा.आयुक्त ठरवतील त्या अटीवर व शर्तीवर जाहिर लिलाव करणेस मंजुरी मिळणेस्तव.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार जकात विभागात पडून असलेले विद्युत इलेक्ट्रॉनिक्स ऑटो पार्ट,मशिनरी पार्ट,हार्डवेअर सॅनिटरी वेअर,कपडा,ऑप्टीकल्स,सायन्टीफिक गुडस्,भांडी,घडयाळ आदी माल आयुक्त ठरवतील त्या अटी व शर्तीनुसार जाहिर लिलाव करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५०/१५:**

मा.आयुक्त यांनी अग्निशमन विभागासाठी सन १९९५-९६ या वर्षी अग्निशमन साहित्य होज पाईप्स खरेदी रु.७,८२,२७५/- करावयाची आहे.त्यासाठी आर्थिक तरतूद रु.१२.०० लाख ठेवण्यांत आली आहे.

जाहिर निविदा नुसार १) इंडस्ट्रीयल सेल्स कॉर्पोरेशन २) इन्शाट्रेडिंग कंपनी यांनी दर भरलेले होते.त्यानुसार इन्शा ट्रेनडिंग यांचे दरात इस्टीमेंट दराप्रमाणे देण्यांस मा.आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

तरी सदरील प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार अग्निशमन विभागासाठी अग्निशमन साहित्य,होज पाईप्स खरेदी करण्याच्या रु.७,८२,२७५/- च्या अंदाजपत्रकावरती मे.इन्शा ट्रेडींग कंपनी यांनी इस्टीमेंट दराने साहित्य पुरविण्याची तयारी दर्शविल्याने मे.इन्श ट्रेडिंग कंपनी यांच्या कडून साहित्य खरेदीस (इस्टीमेंट रेटने) सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५१/१६:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.प्रियदर्शनी इंदिरानगर स्लम भागात डांबरी रस्ते तयार करणे या कामाकरीता रक्कम रु.१०,१३,१००/- चं अंदाजपत्रक सा.बां.विभाग औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यात आले असून

मा.आयुक्त यांनी दि.११-१-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.तसेच सदरील कामाकरीता महानगरपालिकेचे अर्थसंकल्प १९९५-९६ झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमा अंतर्गत डांबरी रस्ते या शिर्षा अंतर्गत १०० लाखांचे तरतुदीमधुन खर्च करण्यांत येईल.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदा पत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या कामाकरीता अंतिम तारखेपर्यंत एकूण एक कोरी निविदा विकल्या गेली व स्विकारण्याच्या तारखेपर्यंत एकच मोहर बंद निविदा प्राप्त झाली ती निविदापत्रक दि.६-२-९६ रोजी उघडण्यांत आली असता त्यांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

१) मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन ७.९१% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त

वरील प्राप्त झालेले दर योग्य वाटले नसल्यामुळे मा.आयुक्तांचे आदेशानुसार संबंधित ठेकेदारास पत्र देवुन वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले असता वाटाघाटीनंतर अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.५% जास्त मान्य झाले आहे.

तरी सदरील काम मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचे कडून ७.११% जास्त ऐवजी २.५% जास्त अंदाजपत्रकीय दरापेक्षा या दराने करुन घेण्याबाबत विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार प्रियदर्शनी इंदिरानगर या स्लम भागात डांबरी रस्ते तयार करण्याच्या कामाकरीता सा.बां.विभागाच्या औरंगाबाद यांच्या १९९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु.१०,१३,१००/- च्या अंदाजपत्रकावरती प्राप्त निविदापत्रकापैकी मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची वाटाघाटी अंती२.५% जास्त दराने (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) काम करण्याची तयारी दर्शविल्या नुसार त्यांच्या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५२/१७:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.सिध्दार्थ नगर येथे नविन ३०० एम.आर.सी.सी.गटार बांधणे,दगडी गटार बांधणे आणि अस्तित्वात असलेल्या गटाराची विशेष दुरुस्ती करणे या कामाकरीता रक्कम रु.४,४५,१००/- चे अंदाजपत्रक सा.बां.विभाग औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यात आली असून मा.अयुक्त यांनी दि.२९-२-९६ अर्थसंकल्प झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत खुली गटार या शिर्षा अंतर्गत ५० लाखाची तरतुद केली आहे.प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सिध्दार्थनगर येथे नविन ३०० एम.एम.डाय.आर.सी.सी.गटार बांधणे,दगडी गटार बांधणे आणि अस्तित्वात असलेल्या गटाराची विशेष दुरुस्ती करण्याच्या सा.बां.विभाग औरंगाबाद यांच्या ९५-०६ च्या दरसुची नुसार तयार करण्यांत आलेल्या रु.४,४५,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५३/१८:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.चिकलठाणा येथे महानगरपालिकेच्या नियोजित नविन आठवडी बाजार जवळील सार्वजनिक शौचालय दुरुस्त करणे,स्वीपर क्वार्टर्स बांधणे,उपरोक्त रोड तयार करणे व शौचालयास पाणी पुरवठा

करणेस्तव ५० एम.एम.डाय.जकात वाहिनी टाकणे या कामाकरीता रक्कम रु.२,२९,५३०/- चे अंदाजपत्रक सा.बां.विभाग औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यांत आली असून मा.आयुक्त यांनी दि.२१-२-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच सदरील कामाकरीता महानगरपालिकेचे सन १९९५-९६ अर्थसंकल्प झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत १८ खेडी विकास कार्यक्रम सार्वजनिक शौचालय या शिर्षाअतंर्गत ४४ लाखाची तरतुद केली आहे. प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार चिकलठाणा येथे मनपाच्या नियोजित नविन आठवडी बाजार जवळील सार्वजनिक शौचालय दुरुस्त करणे,स्वीपर क्वॉर्टर्स बांधणे,रोड तयार करणे व शौचालयास पाणी पुरवठा करणेस्तव ५० एम.एम.डाय जलवाहिनी टाकणे या कामासाठी सा.बां.खात्याच्या ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेल्या रु.२,२९,५३०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५४/१९:**

सहाय्यक आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,नंदन संजय महादु जि.नाशिक यांनी सन १९९० मध्ये दुग्ध व्यवसाय व्यवस्थापन व पशुसंवर्धन अभ्यास क्रमातील पदविका (पशुधन पर्यवेक्षक) परिक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केलेली असुन पर्यवेक्षकाची आवश्यकता असल्याचे कळविले आहे.

त्यानुसार श्री.नंदन संजय महादु यांना ठराविक वेतन रु.१५००/- (रु.एक हजार पाचशे फक्त) दर महा याप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपाची नियुक्ती देण्यांस हरकत नसावी.

करीता प्रकरण स्थायी समितीच्या विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार श्री.नंदन संजय महादु यांना रु.१५००/- दरमहा प्रमाणे पशुधन पर्यवेक्षक म्हणून ठराविक वेतनावर तात्पुरत्या स्वरुपाची नियुक्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५५/२०:**

स्थायी समितीच्या बैठकीमध्ये वकीलांचे पॅनल बदलण्याबाबत चर्चा झालेली आहे.त्यानुसार खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यांत येतो.

औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे व विरुध्द विविध न्यायालयात एक दर ३६०८ एवढी प्रकरणे न्याय प्रविष्ट असुन १८१५ प्रकरणे अंतिम निर्णयास्तव प्रलंबित आहेत.न्यायालयातील प्रलंबित व निकाली प्रकरणे दर्शविणारा तक्ता पताका "अ" वर जोडण्यांत आला आहे.सदरील न्यायप्रविष्ट प्रकरणे न्यायालयात चालविणेसाठी महानगरपालिकेतर्फे सन १९९४ पासुन कार्यरत असलेले वकीलाचे पॅनल बदलून नविन पॅनल नियुक्त करणेची कार्यवाही चालू असून ती नियुक्ती एक वर्षासाठी असेल.

सध्या जे विधिज्ञ महापालिकेतर्फे काम पाहतात त्यांचे कडे बरीचशी महत्वाची प्रकरणे दिलेली असून त्यांचा निकाल लागे पर्यंत ती पुर्वीच्याच वकीलांना चालविण्यांत देणे योग्य होईल.तथापी त्यांची जर ती प्रकरणे पुढे चालविण्याची इच्छा असेल तर ती प्रकरणे त्यांचे कडून काढून घेऊन नविन वकीलांना हस्तांतरीत करण्यांत येतील व अशा प्रकरणात

अर्धी फीस नविन वकीलांना हस्तांतरीत करण्यांत येतील व अशा प्रकरणात अर्धी फीस नविन वकीलांना देण्यांत येतील.वकीलांना द्यावयाची फीस व खर्च खालीलप्रमाणे राहील.

१) उच्च न्यायालयीन सर्व प्रकरणे फीस रु.१५००/- खर्च रु.५००/-
९) जिल्हा व दिवाणी न्यायालयातील फीस रु.५००/- खर्च रु.२५०/-
सर्व प्रकरणे व अपील
३) विशेष व प्रतिनिधीक स्वरुपाचे दावे फीस रु.८००/- खर्च रु.२५०/-
४) किरकोळ प्रकरणे उदा.एम.आर.जे. फीस रु.३००/- खर्च रु.१००/-
आय,आर.डी.वगैरे
५) कामगार न्यायालय,औद्योगिक न्यायालय फीस रु.४००/- खर्च
रु.१००/-
तक्रार निवारण मंच व इतर.
६) फौजदारी प्रकरणे फीस रु.३००/- खर्च रु.१००/-
७) कॅव्हेटस फीस व खर्च रु.२००/-

**<u>अटी व शर्ती</u>**

१) सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणात द्यावयाची फीस व खर्च मंजुर करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना राहतील.तसेच उच्च न्यायालयातील व कनिष्ठ न्यायालयातील प्रकरणांचे स्वरुप पाहून विशेष फीस मंजुर करण्यांचे अधिकार मा.आयुक्त यांना राहिल.
२) सर्व साधारण सभा/ स्थायी समिती/विधी समिती यांचे वेळोवेळीच्या शिफारशीनुसार विशेष वकील नेमण्याचा व त्यांना विशेष फिस देण्यांचा अधिकार आयुक्तांना राहील.
३) प्रत्येक प्रकरणाचे सुरवातीस त्या प्रकरणात नियुक्त करण्यात आलेल्या वकीलास एकूण फीसच्या अर्धी रक्कम व संपूर्ण खर्चाची रक्कम देण्यांत येईल.
४) उर्वरित अर्धी फीस प्रकरणाचा अंतिम निकाल लागल्यानंतर देण्यांत येईल.
५) कॅव्हेटस व इतर किरकोळ प्रकरणात फीस व खर्च एकदम देण्यांत येईल.
६) दाव्याचा निकाल लागल्यानंतर निकालाचे तारखेपासून १५ दिवसाचे आंत निर्णयाची प्रत कार्यालयात सादर करणे वकीलास बंधनकारक राहील.
७) कोणतेही प्रकरण वकीलांकडे हस्तांतरीत करण्याचा अथवा त्यांचे कडून काढून घेण्याचा अधिकारी आयुक्त/विधी सल्लागार यांना राहील.
८) विशिष्ट प्रकरणाचे महत्व लक्षात घेऊन विशिष्ट विधिज्ञ नेमण्याचा व त्यांना विशिष्ट फीस देण्यांचा अधिकार आयुक्त यांना राहील.
९) महानगरपालिके विरुध्द दाखल झालेल्या कोणत्याही दाव्यातील आवश्यक ती माहिती कागदपत्रे संबंधित विभाग प्रमुखाने विधी विभागाचे पत्र प्राप्त झाल्या पासून ८ दिवसांचे आत विधी सल्लागार यांचेकडे पाठविणे बंधनकारक राहील.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेस मंजुरीस्तव सादर.

**औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.**
**विधी विभाग**
**न्यायप्रविष्ट व निकाली प्रकरणांचा तक्ता.**

| अ. क्र. | मनपाविरुध्द न्यायालयात दाखल प्रकरणे(सन १९८३ ते १० सप्टें.१९९५) | एकूण | निकाली | | प्रलंबित | सन ९४-९५ वर्षातील मनाई | मनाई हुकुम रद्द प्रकरणे |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | हुकुमाची प्रकरणे | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मनपाचे बाजूचे | मनपाचे विरुध्द | | | |
| १) | अनधिकृत बांधकामे | ११४९ | ३६६ | ९१ | ६९२ | ९१ | २० |
| २) | रस्ता रुंदीकरण व भुसंपादन | ३९७ | ८२ | २१ | २९४ | २८ | ०५ |
| ३) | मालमत्ता कर | ११९० | ४८४ | ३०९ | ३९७ | २७ | ०८ |
| ४) | इतर(जकात,पाणी पट्टी,ग्राहक मंच,भूमी अभिलेख) | ५७९ | २४६ | ५२ | २८१ | १७ | ०९ |
| ५) | सर्व्हीस(कामगार,आद्योगिक, उच्च न्यायालय) (रिट याचिका) | १५७ | ५६ | १२ | ८९ | ३ | ०१ |
| ६) | अन,गोठयाच्या वापराबाबत | ५२ | ४० | - | १२ | - | - |
| ७) | निवडणुकीबाबत दावे व याचिका | ८४ | ३९ | - | ५० | - | - |
| | | ३,६०८ | १,३०८ | ४८५ | १,८१५ | ११६ | ४३. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार न्यायप्रविष्ट प्रकरणे न्यायालयात चालविण्यास कार्यरत वकीलांचे पॅनल बदलून नविन पॅनल बनविण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यांस न्यायालयीन प्रकरणांच्या संदर्भाने वकीलांना द्यावयाची फीस व खर्च तसेच प्रस्तावित अटी व शर्ती यांना सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५६/२१:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.एकनाथनगर येथे प्रा.शाळा बांधणेच्या कामासाठी ठराव क्र.५२२ दि ५-८-९४ अन्वये रक्कम रु.९,७५०००/- चे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.त्या निविदेचा ठराव क्र.६१० दि.१९-१०-९४ ला प्रशासकीय मान्यता मिळाली असून तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दराची श्री.शेख शरीफ यांची निविदा आहे.सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे कार्यालयीन पत्र क्र./मनपा/अ(इ)/६७ दि.२९-४-९४ अन्वये दराचे वाटाघाटीस मक्तेदारास बोलावून सदर फीस ८% ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.५%(अडीच टक्के) जास्त दराने करुन घेण्यास प्रशासक साहेबांनी मान्यता दिली व मक्तेदारानेही त्यास संमती दिली त्या अनुषंगाने सदरील काम संबंधित गुत्तेदारांमार्फत करुन घेण्यात आले आहे.

मा.आयुक्त साहेबांनी स्थळ पाहणीच्या वेळेस सदर शाळेत आणखी काही अतिरिक्त कामे करुन घेणे बाबत सुचना दिलेल्या आहे.जसे बॉटनिकल गार्डन संरक्षित भिंत बांधणे,ग्रील बसविणे पाण्याची टाकी बांधणे, फ्लॉवर बेड बांधणे इत्यादी वाढीव कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.११,४६,८६५/- अन्वये मंजुरी दिलेली कआहे.सबब सदर कामासाठी सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु.११,४६,८६५/- मंजुरीस्तव अतिरिक्त बाबीचे काम मुळ एजन्सी श्री.शेख शरीफ यांचेकडून चालू दरसुचीनुसार घेणेच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार एकनाथनगर येथे प्रा.शाळा बांधण्याच्या कामासाठी ठराव क्र.५२२ दि.५-८-९४ अन्वये रु.७५,०००/- च्या अंदाजपत्रकास मान्यता मिळाल्यानुसार या

शाळेत बॅटनिकल गार्डन करीता संरक्षित भिंत बांधणे,ग्रील बसविणे,पाण्याची टाकी बांधणे,फ्लॉवर बेड बांधणे इ.वाढीव कामासाठी तयार करण्यात रु.११,४६,८६५/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास तसेच हे काम एजन्सी श्री.शेख शरीफ यांच्याकडून चालू दरसुची नुसार करुन घेण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५७/२२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.सिल्कमिल कॉलनी भागात २० खाटी रुग्णालय बांधणेच्या कामासाठी सर्वसाधारण सभा दि.२०-१२-९५ विषय क्र.६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखानि/७८/९६ दि.२४-१-९६ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (६) निविदा विक्री झाल्या.निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (२) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या.त्या दि.६-२-९६ ला उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.आर.एल.बारवाल | ९.५१% | जास्त दराने |
| २) श्री.कुलवंतसिंग | १५% | --//-- |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.५१% जास्त दराची श्री.आर.एल.बारवाल यांची निविदा आहे.

सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे मा.आयुक्त साहेबांनी संबंधित गुत्तेदारास वाटाघाटी करीता बोलाविण्या बाबत आदेशीत केल्यानुसार संबंधितांस जा.क्र./मनपा/उअ/(इ)/२००/९६ दि.७-३-९६ रोजी पत्र देऊन मा.आयुक्त साहेब यांचे दालनात दि.८-३-९६ रोजी वाटाघाटी करीता बोलाविण्यात आले.त्या अनुषंगाने वाटाघाटी अन्वये मा.आयुक्तांनी सदरील काम ९.५१% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराने करण्यास मंजुरी दिली व त्यास संबंधित मक्तेदारानेही संमती दर्शविली आहे.२५ लाख सबब अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.५१% जासत ऐवजी (वाटाघाटी अन्वये) अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त निविदेचा ठराव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्कमिल कॉलनी भागांत २० खाटांचे रुग्णालय बांधण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रु.२५ लाखाच्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभा ठराव क्र.६ दिनांक २०-१२-९५ अन्वये मंजुरी प्राप्त झालेल्या निविदांपैकी वाटाघाटीअंती श्री.आर.एल.बारवाल यांनी ९.५१% जास्त दराऐवजी ४% जास्त दराने काम करण्याची तयारी दर्शविलीआहे. श्री.आर.एल.बारवाल यांच्या ४% जास्तीच्या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५८/२३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.बायजीपुरा येथील ८० फुट डी.पी.रस्त्यावरील मोकळया जागेत दवाखाना व वाचनालयासाठी इमारत बांधण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.१४,४०,०००/- ला मा.सर्वसाधारण सभा बैठक दि.२०-१२-९५ ठराव क्र.११२/२ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा नि/५२/९५ दि.३०-१२-९५ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (२) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या दि.१८-१-९६ ला उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.एस.एम.मंडोरे १२% जास्त दराने.
२) श्री.आर.एल.बारवाल ९.९९% जास्त दराने.

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९९% जास्त दराची श्री.आर.एल.बारवाल यांची निविदा आहे.सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे मा.आयुक्त साहेबांनी संबंधित गुत्तेदारास वाटाघाटी करीता बोलाविण्याबाबत आदेशीत केल्यानुसार संबंधितास जा.क्र./मनपा/उअ(इ) २००/९६ दि.७-३-९६ रोजी पत्र देऊन मा.आयुक्त साहेब यांचे दालनात वाटाघाटीकरीता बोलाविण्यात आले.त्या अनुषंगाने वाटाघाटी अन्वये मा.आयुक्तांनी सदरील काम ९.९९% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जासत दराने करण्यास परवडणार नाही असे मक्तेदाराने दर्शविले आहे.

सबब अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९९% जास्त ऐवजी (वाटाघाटी अन्वये) अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जासत निविदेचा ठराव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.महंमद मुश्ताक अहमद : प्रस्तावित रेटमध्ये जर संबंधित एजन्सी काम करण्यांस तयार नसेल तर जी एजन्सी प्रस्तावित दरामध्ये काम करण्यास तयार असेल त्या एजन्सीकडून काम करुन घेण्यांत यावे.

मा.सभापती : सुचना मान्य करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बायजीपुरा ८० फुट डी.पी.रस्त्यावरील मोकळया जागेत दवाखाना व वाचनालयासाठी इमारत बांधण्याच्या रु.१४,४०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभा ठराव क्र.११२/२ दि.२०-१२-९५ अन्वये मंजुरी मिळाल्यानुसार प्रापत निविदांपैकी वाटाघाटीअंती श्री.आर.एल.बारवाल यांनी ४ टक्के जास्त दराने काम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने श्री.आर.एल.बारवाल यांची ४ टक्के जास्त दराची निविदा सर्वानुमते मंजुर करण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५९/२४:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,उल्कानगरी येथील मनपाच्या खुल्या जागेवर संरक्षीत भिंत व तारकुंपण करणेबाबत सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९५-९६ च्या दरसुची अन्वये रक्कम रु.२,८५,०००/- चे अंदाजपत्रक तयार झाले त्यास प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.सदरचा खर्च शहर सौंदर्यीकरणाच्या विशेष अनुदानातून (रुपये १० कोटी) या तरतुदीमधून करण्यांत येणार आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार उल्कानगरी येथील मनपाच्या खुल्या जागेत संरक्षित भिंत व तारकुंपण करण्याच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या ९५-९६ च्या दरसुची अन्वये तयार करण्यांत आलेल्या रुपये २,८५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६०/२५:**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की,समतानगर चौकाचा विकास करुन सुशोभिकरण करण्याचे दृष्टीने सदरील चौकात विजयस्तंभ उभारुन त्यावर अशोकचक्र बसविण्याचे कामी मा.आयुक्त यांचे आदेशानुसार मारुती फायबर्स यांचेकडून सदरील कामाचे कोटेशन घेण्यात आले.सदरील कामाची किंमत कोटेशन नुसार रुपये ६५,०००/- होती.मा.आयुक्तांनी संबंधितास प्रत्यक्ष चर्चेसाठी बोलावून सदरील काम हे रुपये ६०,०००/- मध्ये करावयास सुचविले त्यास संबंधिताने मान्यता दिली असून सदरील काम हे सिव्हील वर्कसहित मारुती फायबर्स यांचेकडून टर्न की बेसीसवर करुन घेण्याचे मान्यतेस्तव

प्रस्ताव सादर.मान्यता झाल्यास सदरील काम १४ एप्रिल पुर्वी पुर्ण करावयाचे त्वरीत चालू करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार समतानगर चौकाचा विकास करुन सुशोभिकरण करण्याच्या दृष्टीने सदर चौकात विजयस्तभ उभारुन त्यावर अशोक चक्र बसविण्यासाठी टर्न फी बेसीसवर रुपये ६०,०००/- च्या अंदाजपत्रकास व हे काम मारुती फायबर्स यांच्याकडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६१/२६:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.किराडपुरा प्राथमिक शाळेसमोरील मोकळया जागेवर व्यायाम शाळेसाठी हॉल बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.३३५/३१ दि.२८-१२-९५ अन्वये रक्कम रु.४,६०,०००/- चे अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे.सदरील काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/५२/९५दि.३०-१२-९५ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपय्रंत एकूण (७) निविदा विक्री झाल्या.निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (२) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या.त्या दि.१८-२-९६ ला उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.सय्यद जमीर | ५% | जास्त दराने |
| २) श्री.सिद्दीकी एस.झेंडे | १५.१९% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची श्री.सय्यद जमीर यांची निविदा आहे.सदर निविदा दर जास्त वाटत असल्यामुळे मक्तेदारास दराचे वाटाघाटीबाबत मा.आयुक्तांचे दालनात बोलाविण्यांत आले परंतु वाटाघाटी होऊ शकली नाही.संबंधित गुत्तेदाराच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची निविदा स्विकृती करीता शिफारस केली असता मा.आयुक्त महोदय यांनी अंदाजपत्रकीय दराप्रमाणे काम करुन घेण्याचे आदेश दिले.परंतु गुत्तेदराने त्यास संमती दिली नाही.काळाची गरज पाहता व वेळे अभावी गुत्तेदारास पुन्हा बोलावून मा.आयुक्त महोदय यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराने करण्याची मंजुरी दिली व त्यास संबंधित मक्तेदारानेही संमती दर्शविली.

सबब अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त ऐवजी (वाटाघाटी अन्वये) अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त निविदेच्या ठराव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार किराडपुरा प्राथमिक शाळेसमोरील मोकळया जागेवर व्यायामशाळेसाठी हॉल बांधण्याच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.३३५/३१ दि.२८-१२-९५ अन्वये मंजुरी दिल्यानुसार प्राप्त निविदापैकी मे.जागीर यांनी वाटाघाटीअंती सदर काम ३% जास्त दराने करण्याची संमती दर्शविल्याने दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.तथापी या जागेत व्यायामशाळा न बांधता सार्वजनिक वाचनालय बांधण्यात यावे.मुळ प्रस्तावात व्यायामशाळेऐवजी सार्वजनिक वाचनालय हॉल अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६२/२७:**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की,डॉ.हेडगेवार रुग्णालयाजवळील एम्प्लामेंट एक्सचेंज चौकातील वाहतुक बेटाची उंची वाढवुन तेथे चार फुट व्यासाचा व आठ फुट उंचीचा कॅप्सुल लॅम्प बसवुन चौकाचे सुशोभिकरणाचे कामी मारुती फायबर्स यांचेकडून कोटेशन घेण्यात आले.सदरील कामास सिव्हील वर्क सहित

रु.७५,०००/- खर्च दाखविण्यांत आला होता.मा.आयुक्तांनी संबंधितास चर्चेस बोलावुन सदरील काम रु.६५,०००/- मध्ये करावयास सुचविले त्यास संबंधिताने मान्यता दिली असून सदरील काम हे कलात्मक असल्याने मारुती फायबर्स यांचेकडून टर्न फी बेसीसवर करुन घेण्याचे मान्यतेस्तव सादर.मान्यता झाल्यास सदरील काम त्वरीत चालु करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार डॉ.हेडगेवार रुग्णालय जवळील एम्प्लामेंट एक्सचेंज चौकातील वाहतुक बेटाची उंची वाढवुन तेथे चार फुट व्यासाचा व आठ फुट उंचीचा कॅप्सुल लॅम्प बसवुन चौकाचे सुशोभिकरणाचे कामी मारुती फायबर्स यांचेकडून कोटेशन घेण्यात आले. सदरील कामास सिव्हील वर्क सहित रु.७५,०००/- खर्च दाखविण्यांत आला होता.मा.आयुक्तांनी संबंधितास चर्चेस बोलावुन सदरील काम रु.६५,०००/- मध्ये करावयास सुचविले त्यास संबंधिताने मान्यता दिली असून सदरील काम हे कलात्मक असल्याने मारुती फायबर्स यांचेकडून टर्न फी बेसीसवर करुन घेण्याचे मान्यतेस्तव सादर.मान्यता झाल्यास सदरील काम त्वरीत चालु करण्यांत येईल.

**विषय क्र. ५६३/२८:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,रुपये ७,९४,६३०/- चे एन-६ म्हाडा कॉलनी,यु.एच.बी./३०,एम.आय.डी.स्कीम येथील खुल्या जागेवर तार कंपाऊंड वॉल बांधण्याचे अंदाजपत्रकीय रकमेस प्रस्ताव क्र.३३४/३० दि.२८-१२-९५ च्या स्थायी समिती मंजुरी अन्वये सदर कामाचे बी-१ नमुन्यात निविदा मागण्याकरीता शहरातील दैनिक लोकमत,टाईम्स दैनिक सिटीजन्स इत्यादी वर्तमान पत्रात प्रसिध्द केले.या अनुषंगाने विक्रीच्या तारखेपर्यंत कोरे निविदा एकूण १९ विकले गेले व स्विकारण्याच्या तारखेपर्यंत दर भरुन सिलबंद पाकीटात एकूण ४ निविदा प्राप्त झाल्या.सदरील निविदा उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आले त्यात दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सी | दिलेले दर | |
|---|---|---|---|
| १) | एस.एस.असोशिएटस | १९.५८% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| २) | पारस कन्स्ट्रक्शन | १६.०५% | --//-- |
| ३) | एस.ए.नवाब | १४.०३% | --//-- |
| ४) | स.सुजान अली हाश्मी | १०.११% | --//-- |

सदरील निविदा पत्रकात सर्वात कमी तुलनात्मक दृष्टया श्री.एस.एच.असोशिएट गुत्तेदार यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ा१९.५८% कमी दराचे दर आहे.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार एन-६ म्हाड कॉलनी युएचबी-२० एमआयजी स्कीम येथील खुल्या जागेवर तार कंपाऊंड वॉल बांधण्याच्या रुपये ७,९४,६३०/-च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.३३४/३० दि.२८-१२-९५ अन्वये मंजुरी दिल्यानुसार प्राप्त निविदा पैकी श्री.एस.एस.असोशिएटस यांचे दर तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.५८% कमी असल्याने श्री.एस.एच.असोशिएट यांच्या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६४/२९:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,सिडको एन-५ येथील म्हाडा कॉलनी मधील खुल्या जागेवर तार कंपाऊंड वॉल बांधणे या कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस (रुपये

३,७९,५००) यांस स्थायी समिती प्रस्ताव क्र.३३४/३० दिनांक २८-१२-९५ च्या मंजुरी अन्वये या अनुषंगाने सदर कामाचे बी-१ नमुन्यात निविदा मागविण्याकरीता शहरातील दै.लोकमत,दै.अंजिठा,दै.आलमगीर टाईम्स इत्यादी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आले.या अनुषंगाने विक्रीच्या तारखेपर्यंत कोरे एकूण निविदा २० विकले गेले.व स्विकारण्याच्या तारखेपर्यंत दर भरुन सिलबंद पाकीटात एकूण आठ निविदा प्राप्त झाले.

सदरील निविदा लेखाधिकारी यांच्या दालनात उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आले त्यात दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सी | दिलेले दर | |
|---|---|---|---|
| १) | सिद्दीकी एस.झेड. | २२.९९% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दर |
| २) | एस.एच. असोशिएटस | १८.१८% | --//-- |
| ३) | बी.आर.महाजन | १५.२% | --//-- |
| ४) | मन्नानखाँन | १४.९०% | --//-- |
| ५) | बी.बी.खंडागळे | ७.२५% | --//-- |
| ६) | मे.अजित कन्स्ट्रक्शन | ५.५१% | --//-- |
| ७) | ए.एस.शर्मा | अंदाजपत्रकीय दराच्या दरात | |
| ८) | राजेंद्र शिंदे | कोरे निविदा | |

सदरील निविदा पत्रकात सर्वात कमी तुलनात्मकदृष्टया श्री.सिद्दीकी एस.झेड.यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.९९९% कमी दराचे दर आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सिडको एन-५ येथील म्हाडा कॉलनी तील खुल्या जागेवर तार कंपाऊंड वॉल बांधण्याच्या रुपये ३,७९,५००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.३३४/३० दि.२८-१२-९५ अन्वये मंजुरी मिळाल्यानुसार प्राप्त निविदांपैकी श्री.सिद्दीकी एस. झेड.यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.९९९% कमी असल्याने स्विकृतीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६५/३०:**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की,पीरबाजार उस्मानपुरा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी बांधकाम चालू आहे.तेथील स.नगरसेवक व मा.आयुक्त यांचे प्रत्यक्ष चर्चेनुसार तेथे दोन फायबरचे हत्ती बसवुन सुशोभिकरण करण्याचे ठरले.सदरील काम हे कलात्मक असल्याने मारुती फायबर्स यांचेकडून कोटेशन घेण्यात आले.मारुती फायबर्स यांनी सदरील कामाची किंमत रु. ९०,०००/- दर्शविली मा.आयुक्तांनी संबंधितांस चर्चेस बोलावून सदरील काम हे रुपये ८०,०००/- मध्ये करण्यांस सुचविले त्यास मारुती फायबर्स यांनी मान्यता दिली असुन सदरील काम हे १४ एप्रिल ९६ पर्यंत पुर्ण करावयाचे असल्याने मारुती फायबर्स यांचेकडून टर्न फी बेसीसवर करुन घेण्याचे मान्यतेस्तव सादर.मान्यता झाल्यास सदरील काम त्वरीत चालू करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार पीरबाजार उस्मानपुरा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळयाजवळ दोन फायबरचे हत्ती बसविण्याचे काम रु.८०,०००/- मध्ये मे.मारुती फायबर्स यांच्याकडून टर्न फी बेसीसवर करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६६/१:**

सहाय्यक आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,राज्य शासन सेवेतील अभियंत्यांना सुधारीत वेतनश्रेणी मंजुर करण्या संबंधी पाटबंधारे विभाग,शासन निर्णय क्र.तेपुर/६२९/९२/आ (प्र) दिनांक १४-१२-१९९५ अन्वये निर्णय घेतला आहे.

सदर शासन निर्णयाचे अनुषंगाने महानगरपालिकेतील अभियंत्यांना खालील प्रमाणे वेतनश्रेणी द्यावी लागेल.

| | जुनी वेतनश्रेणी | सुधारीत वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १) कनिष्ठ अभियंता | १४००-२३०० | १६४० ते २९०० |
| २) शाखा अभियंता | २०००-३२०० | २००० ते ३५०० |
| ३) उप अभियंता | २०००-३५०० | २२०० ते ४००० |
| ४) कार्यकारी अभियंता | ३०००-४५०० | ३२०० ते ४६२५ |

सदरील शासन निर्णयानुसार-

ब) उपरोक्त सुधारीत वेतनश्रेणीमुळे देय होणारा कुठल्याही प्रकारची थकबाकी दिनांक १-१-८६ ते ३१-१२-१९९५ या कालावधीसाठी देय असणारा नाही.१-१-१९८६ पासून सदरील प्रमाणे सुधारीत वेतनश्रेणीनुसार वेतन निश्चिती करून त्याप्रमाणे देय वेतन दि.१-१-१९९६ पासून प्रत्यक्षात देण्यात येईल.

क) संबंधित कर्मचारी /अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम १९८८ च्या संबंधीत नियमाखालील विकल्प आवश्यक असल्यास हे आदेश निर्गमीत झाल्याच्या तारखेपासून ३ महिन्याच्या आत द्यावा.

ड) दिनांक १ जानेवारी १९९६ नंतर व या आदेशाच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीत वरच्या पदावर पदोन्नत झालेल्या पदधारकांना त्यांच्या वरच्या पदाच्या वेतनश्रेणीत वेतन निश्चितीचा विकल्प शासन निर्णय वित्त विभाग पीएबाय-१९८२ /सीआर-११०० (१) /सेवा-३,दिनांक ६ नोव्हेंबर १९९४ च्या आदेशातील तरतुदीनुसार नव्याने देण्याची मुभा राहिल असा विकल्प संबंधितांना हे आदेश निर्गमीत झाल्याचे तारखेपासून ३ महिन्याचे आत द्यावा.त्याबाबत सुध्दा दिनांक १ जानेवारी १९८६ ते ३१ डिसेंबर १९९५ या कालावधीत या संबंधीची कोणतीही थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही.

इ) या वेतनश्रेणी सुधारणामुळे पदधारकांना विशेष वेतनमिळत असल्यास ते या पुढेही अनुज्ञेय व अबाधित राहिल.

सदरील सुधारीत वेतनश्रेणी राज्य शासन सेवेतील अभियंत्यांना मंजुर करणेबाबत पाटबंधारे विभागाकरीताचा शासन निर्णय आहे.महानगरपालिका ही स्वायत्त संस्था नाही.स्वायत्त संस्थांना नियंत्रक विभाग म्हणून मंत्रालयातील नगर विकास विभाग म्हणून मंत्रालयातील नगर विकास विभाग असुन वेतनश्रेणीत वाढ,नविन पदनिर्मिती या करीता या विभागाची मान्यता घेण्यात येते.

महानगरपालिकेतील अभियंत्यांना सुधारीत वेतन श्रेणी लागु करणेबाबत प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.तसेच सदर ठराव पारीत करुन नगर विकास विभागाकडे मनपातील अभियंत्यांना सुधारीत वेतनश्रेणी लागु करण्योबाबत प्रस्ताव पाठविणे योग्य होईल. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शासन निर्णय क्र.वेपुर/६२९/९२/आ (प्र) दिनांक १४-१२-९५ अन्वये राज्य शासन सेवेतील अभियंत्यांना सुधारीत वेतनश्रेणी देण्याबाबत राज्य शासनाने निर्णय घेतलेला आहे.सदर शासन निर्णयाचे अनुषंगाने महापालिका अस्थापनेवरील

अभियंत्यांना प्रस्तावात दर्शविलेल्या शासन निर्णयातील अटी व शर्तींच्या अधिन राहून खालीलप्रमाणे वेतनश्रेणी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| | जुनी वेतनश्रेणी | सुधारीत वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १) क.अभियंता | १४००-२३०० | १६४० -२९०० |
| २) शाखा अभियंता | २०००-३२०० | २००० ते ३५०० |
| ३) उप अभियंता | २०००-३५०० | २२०० ते ४००० |
| ४) कार्यकारी अभियंता | ३०००-४५०० | ३२०० ते ४६२५ |

मनपा अस्थापनेवरील अभियंत्याना सुधारीत वेतनश्रेणी लागु करण्यांबाबत प्रस्ताव शासनाकडे (नगर विकास विभाग) पाठविण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

मा.आयुक्त : डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटरच्या कामासाठी बोलाविलेल्या निविदांपैकी श्री.मंडोरे यांची निविदा २० टक्के जास्त दराची आहे.वाटाघाटीतही त्यांनी दर कमी करण्यास नकार दिलेला आहे.

मा.सभापती : सदर प्रकरणात मा.आयुक्तांनी त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा व काम करवुन घेण्याबाबत प्रयत्न करावा.

श्री.महमद मुश्ताक अहमद : प्रस्तुत सभाग्रहात सौ.आशा मगरे यांचे अपील दाखल झाले आहे ते बरोबर नाही.त्यांनी मा.आयुक्त पातळीवर न्याय मिळवुन घ्यावा.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू),श्री.हमीदउद्दीन ताबा : अपीलमध्ये दर्शविल्यानुसार मा.आयुक्तांनी मागणी मान्य करावी.

सौ.रजनी जोशी : मा.सभापती (सभाग्रहास) अपील करणारी महिला असून ती अपंग आहे व हे वर्ष महिला वर्ष म्हणून घोषीत आहे.

कु.माया लाडवाणी : त्या अनुषंगाने अपंग महिलेची मागणी मंजुर करावी.

श्री.गौतम खरात,श्री.प्रकाश निकाळजे : अपील प्रमाणे मा.सभापतींनी सहानुभूतीपुर्वक अपंग महिलेस न्याय दयावा.

मा.सभापती : श्रीमती आशा गोविंद मगरे यांनी स्थायी समितीसमोर त्यांना वार्षीक वेतनवाढ देण्याच्या संदर्भाने निवेदन सादर केलेले आहे.श्रीमती आशा मगरे या अपंग असल्याने मा.आयुक्तांनी निवेदनावर व त्यांना मनपा सेवेत सामावून घेणे व वार्षीक वेतनवाढ देण्याबाबत सहानुभूतीपुर्वक विचार करावा.

राष्ट्रगीतानंतर दुपारी ४.३० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहिर केले.

स्वाक्षरीत /-
नगर सचिव,
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत /-
सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १८-३-९६ रोजी भरलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.सोमवार दि.१८-३-९६ रोजी दुपारी ३.०० वाजता मा.सभापती श्री.प्रदीप कुमार जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभागृहात स्थायी समिती सभेस सुरुवात झाली.सभेस निम्ननिर्दिष्ट स.सभासद उपस्थित होते.तसेच महानगरपालिकेचे अधिकारीही उपस्थित होते.**

१) श्री.अब्दुल रशिदखान (मामू)
२) श्री.सुभाष कच्छवाह
३) श्री.डॉ.कराड भागवत.
४) श्री.गौतम भागाजी खरात.
५) सौ. रजनी रमेश जोशी.
६) श्री.प्रकाश निकाळजे.
७) श्री.कंवरसिंग बैनाडे.
८) श्री.महंमद मुश्ताक अहमद.
९) कु.माया लिंबाजी लाडवाणी.
१०) श्री.प्रभाकर विधाते.
११) श्री.महादेव सुर्यवंशी.
१२) सौ.पद्मा शिंदे.
१३) श्री.सुदाम सोनवणे.
१४) श्री.हमदीउद्दीन ताबा.

**संवाद :**

श्री.हमीदउद्दीन ताबा : कार्यालयातील जेटींग मशिन बऱ्याच दिवसांपासून बंद आहे.त्यामुळे ड्रेनेजच्या तक्रारी बऱ्याच वाढलेल्या आहेत.ही मशिन त्वरीत दुरुस्त करण्यात यावी.

श्री.मुश्ताक अहमद : नविन छोटया जेटींग मशिन खरेदी करण्यात याव्यात.शहरातील छोटया गल्ल्यातून वाहणाऱ्या ड्रेनेजच्या समस्या हयामुळे योग्यरित्या हाताळता येतील.

मा.सभापती : जेटींग मशिन त्वरीत दुरुस्त करुन घेण्यात यावे.

श्री.कंवरसिंग बैनाडे : शहरातील बऱ्याच वस्त्यांवरील झाडे वाळलेली आहेत अशी वाळलेली व रहदारीस अडथळा करणारी झाडे त्वरीत तोडेन टाकण्यात यावीत.

मा.आयुक्त : बरीचशी झाडे रस्त्यांमध्ये आलेली आहेत.वृझतोड बाबत निसर्गप्रेमी संघटनांचे सदस्य आक्षेप घेतात.त्यांनाही विश्वासात घेवून लवकरच अशी झ ाडे काढली जातील.

श्री.प्रभाकर विधाते : विद्युत कॉलनीतील व्यायात शाळा आमदार फंडातून बांधण्यात आलेली आहे.तीच्या मालकी हक्का बाबत काही वाद उत्पन्न झालेला आहे.या इमारतीवर सध्या कोणाचा ताबा आहे.याचा खुलासा व्हावा.

मा.आयुक्त : मालमत्ता अधिकारी यांनी मालकी हक्काची कागदपत्रे पाहुन पुढील कार्यवाही करावी.

मा.सभापती : शहरात विद्युतच्या बऱ्याचशा तक्रारी आहेत.सध्या या विभागाचा कार्यभार एकाच उप अभियंत्यांकडे आहे.शहराचा विस्तार व वाढती कामे पाहता या विभागाची पुनर्रचना करण्याबाबत मा.आयुक्त प्रस्ताव तयार करावा.

श्री.प्रकाश निकाळजे : महानगरपालिकेच्या ज्या मालमत्ता आहेत.त्यांची पी.आर.कार्ड महानगरपालिकेच्या नावाने बनविण्यात यावे.जिल्हा परिषद कडील शाळा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत होतांना त्या शाळांना नक्की एरिया किती याची माहिती दिली गेली नव्हती.तेव्हा पी.आर.कार्ड बनवून महानगरपालिकेच्या जागांना फेसिंग करण्यांत यावे.

डॉ.भागवत कराड : बऱ्याचशा चौकांचे सौंदर्यीकरण अंतर्गत सुशोभिकरण करण्यात आलेले आहे.मात्र बऱ्याचशा चोकातील पुतळे वेळोवेळी साफ केले जात नाहीत.अशा चौकातील बरेचशे विद्युत दिवे बंद असतात.याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

श्री.हमीदउद्दीन ताबा : उर्दू शाळांची संख्या व विद्यार्थी संख्या पाहता शिक्षकांचे प्रमाण कमी आहे.तेव्हा उर्दू शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्यात याव्यात.

मा.आयुक्त : रिक्त जागा भरण्याबाबत योग्य ती कार्यवाही केली जाईल.

श्री.सुदाम सोनवणे : नारळीबाग भाग एज्युकेशन झोन असतांनाही या भागात काही नागरीकांना बांधकाम परवानगी दिली जाते.वर का नागरिकांना ती नाकारली जाते.

मा.सभापती : १९७५ च्या विकास आराखडया प्रमाणे नारळीबागेतील काही भाग एज्युकेशन झोन आहे.ज्या भागात हे आरक्षण नाही त्याच भागात बांधकाम परवानगी देण्यांत येते.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) : बारापुल्ला भागात जुना जकात नाका आहे.येथे काही कर्मचारी राहतात.त्यांना ही जागा रितसर देण्यांत आली आहे काय?याची माहिती देण्यांत यावी.तसेच या रेखांकनातील जागा कोणास देण्यात आलेल्या आहेत काय? रेखांकनातील लोकांनी खुली जागा /आरक्षणे विकसीत करण्याचे परवानगी मागीतली तर त्यांना देता येतील का याची माहिती देण्यात यावी.

मा.आयुक्त : या ठिकाणी आपण मिनी स्टेडियम बांधणार होतो पण त्यावर न्यायालयाचा मनाई हुकूम आला होता.(संबंधित संस्थेची परवानगी असेल तर खुल्या जागेपैकी १०% जागा समाजोपयोगी कार्यासाठी देता येऊ शकते.) तथापी सहा.संचालक नगररचना यांनी यावर सविस्त टिप्पणी तयार करावी.

श्री.अब्दुल रशिदखान (मामू) :विजयनगर भागात घराचे बांधकाम करण्यासाठी महानगरपालिकेने परवानगी दिलेली असतांना तेथे होस्टेलचे बांधकाम केले आत आहे.तेव्हा बांधकाम दिलेल्या परवानगी प्रमाणेच होत आहे काय याची पाहणी केली जावी.

मा.सभापती : सहा.संचालक नगर रचना यांनी स्वत: पाहणी करुन अहवाल द्यावा.नियमाप्रमाणे बांधकाम परवानगीचा वाटा होत नसेल तर ती रद्द करण्यांत यावी. पाणी पुरवठा,जलनि:सारण सारख्या महत्वाच्या व तातडीच्या कामांना स्थायी समिती सभेची मंजुरी मिळेल याची खात्री बाळगुन आयुक्तांनी त्यांच्या स्तरावर कामे सुरु करावीत व प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविले तरी त्यास स्थायी समितीचा विरोध राहणार नाही.

श्री.हमीदउद्दीन ताबा : एकाच कंत्राटदारास अनेक कामे दिल्यामुळे तो कोणतीच कामे वेळेवर पूर्ण करत नाही. तेव्हा कंत्राटदारांना एकाच वेळ किती कामे दयावीत याबाबत नियम बनवण्यात यावेत.

श्री.महादेव सुर्यवंशी : नारेगांव भागात शाळेजवळच्या जागेवर उद्यान बांधण्यात यावे.

मा.सभापती : मा.आयुक्तांनी स्थळ पाहणी करून जागा निश्चित करावी.

श्री.प्रकाश निकाळजे : तुळशी अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या लोकांनी मालमत्ता कर भरलेला आहे.तेव्हा त्यांना इतर नागरी सुविधा पुरविण्यांत याव्यात.

मा.आयुक्त : तेथील नागरिकांनी ७०% टॅक्स भरले तर त्यांना सर्वच सुविधा पुरविता येतील.

मा.सभापती : १९९४ मध्ये डॉ.रझवी,पशुधन विकास अधिकारी यांना प्रशासकीय कार्य पार पाडत असतांना श्री.कुरेशी यांनी त्यांच्या विरुध्द पोलीस केस केली होती.तिच्या निषेधार्थ दि.१९ व २० ऑगस्ट ९४ रोजी अधिकारी/कर्मचाऱ्यांनी,तसेच मागील वॉर्डाच्या पिरियडमध्ये श्री.मानकापे यांनी केलेल्या केसेसच्या विरोधात कर्मचाऱ्यांनी एकूण तीन दिवस संप केलेला होता.कर्मचाऱ्यांच्या न्याय मागण्या व भावना लक्षांत घेता संपात सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांचा / अधिकाऱ्यांचा कपात करण्यांत आलेला ती दिवसांचा पगार त्यांना देण्यात यावा.

**विषय क्र. ५६७/१:**

दिनांक ८-३-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.गौतम खरात : दि.८-३-९६ रोजीच्या स्थायी समितीतील ठराव क्र.५६६/३१ नुसार महानगरपालिकेतील अभियंत्यांना शासनाच्या ठरावानुसारच वेतनश्रेणी व वर्ग देण्यात येणार आहेत.तेव्हा हा प्रस्ताव परत शासनाकडे पाठविण्याची आवश्यकता नसावी.

मा.सभापती : शासनाने वेतनश्रेणी निश्चित केलेली असल्याने परत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याची गरज नाही.अभियंत्यांना शासन निर्णयानुसार वेतन श्रेणी ब दर्जा देण्यांत यावा.

श्री.महादेव सुर्यवंशी : गत स्थायी समिती सभेत सुचित केल्यानुसार श्री.सी.एल.जयवळ यांच्या प्रकरणात माहिती देण्यांत यावी.

मा.आयुक्त : १९९४ मध्ये तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार श्री.जयवळ यांची चौकशी करण्यात आली.त्यांनी स्वतःच स्वतःचे गोपनिय अहवाल लिहून पुनर्विलोकन केलेले आहेत.ही बाब प्रशासकीय कमकाजाच्या दृष्टीकोनातून अक्षेपार्ह आहे.यावरच त्यांनी नियमांचा भंग करुन दोन जादा वेतनवाढी मिळविलेल्या आहेत.इतर अधिकाऱ्यांशी त्यांची वागणूक अत्यंत उध्दटपणाची आहे.तसेच आत्मदहनासारख्या धमक्या देणे ही बाब दखलपात्र गुन्हाही आहे.

श्री.सुदाम सोनवणे : गोपनिय अहवाला संदर्भाने जवाबदार असणाऱ्या इतरही संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यांत यावी.

श्री.हमीदउद्दीन ताबा,डॉ.भागवत कराड : श्री.जयवळ यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आलेला आहे.त्यांच्या विरुध्दची चौकशी पाहता हा पुरस्कार महानगरपालिकेने काढून घ्यावा.

मा.सभापती : मा.आयुक्तांच्या म्हणण्यानुसार दोन वेतनवाढी देण्यात जर शासनाच्या निर्णयाप्रमाणे पाच वर्षाचा अवधी असावयास पाहिजे.तर ज्या अधिकाऱ्यांनी श्री.जयवळ यांना पाच वर्षाच्या आंत दोन जादा वेतनवाढी कशा दिल्या याचीही चौकशी करण्यात यावी.प्रकरणात आयुक्तांनीच संत एकनाथ रंग मंदिर कँटीन बाबतचा ठराव पारित झालेला आहे.कँटीन चालकाने भाडे वाढवून दिलेले आहे.त्याने विद्युत देयक आकारण्यात येऊ नये.तथापि दैनंदिन वापरासाठी लागणारे विद्युत दिवे पंखे,फ्रिज वगळता इतर विद्युत साधणे त्यास चालविता येणार नाहीत.

**ठराव :**

दिनांक ८-३-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती इतिवृत्तास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

"विषय क्र.५६६/३१-अभियंत्यांना वेतनश्रेणी व दर्जाबाबत शासनानेच निर्णय घेतलेला असल्याने महानगरपालिकेने त्यांची अंमलबजावणी करतोना परत शासनाची मंजुरी घेण्याची आवश्यकता नाही.प्रस्तावाची अंमलबजावणी करण्यात यावी." तसेच १९९४ मध्ये डॉ. रझवी,पशुधन विकास अधिकारी यांना प्रशासकीय कामे पार पाडत असतांना श्री.कुरेशी यांनी त्यांच्या विरुध्द पोलीस केस केली होती.तीच्या निषेधार्थ दि.१९ व २० ऑगस्ट,९४ रोजी अधिकारी/कर्मचारी यांनी तसेच मागील वॉर्डाच्या पिरीयडमध्ये श्री.मानकापे यांनी केलेल्या केसेसच्या विरोधात कर्मचाऱ्यांनी एकमण तीन दिवस संप केलेला होता.कर्मचाऱ्यांच्या न्याय मागण्या व भावना लक्षात घेता संपात सहभागी झालेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांचा कपात करण्यांत आलेला तीन दिवसांचा पगार त्यांना देण्यांत येतो.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६८/२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर के आहे की,सिडको एन-६ येथील प्राथमिक शाळेच्या इमारतीस संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी रक्कम रु.५०२,४२०/- चे अंदाजपत्रक तसरी करण्यांत आले असून मा.आयुक्तांनी दि.६-३-९६ ला मंजुरी दिलेली आहे.सबब सदर कामासाठी रक्कम रु.५,०२,४२०/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.सदरचा खर्च सन ९६-९७ या आर्थक वर्षात विकास इमारती,शाळा,दवाखाने या लेखा शिर्षातून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सिडको एन-६ येथील केंद्रीय प्राथमिक शाळेच्या इमारतीस संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी रक्कम रु.५,०२,४२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६९/३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मंजुरपुरा येथील प्राथमिक शाळेवर पहिला मजा बांधण्याच्या कामासाठी रक्कम रु.३,४६,२७०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यांस मा.आयुक्तांनी दि.२६-२-९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे.सबब सदर कामाचे रक्कम रु.३,४६,२७०/- चे अंदाजपत्रक मंजुरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.सदरचा खर्च सन ९६-९७या आर्थिक वर्षात भांडवली कामाच्या अर्थ तरतुदीमधून करण्यांत येईल.(विकास इमारती शाळा, दवाखाने, बांधकाम)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मंजुरपुरा येथील प्राथमिक शाळेवर पहिला मजला बांधण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रु.३,४६,२७०/- च्या अंदाजपत्रकास व सदरचा खर्च ९६-९७ च्या आर्थिक वर्षाच्या भांडवली कामाच्या अर्थ तरतुदीमधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७०/४:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालयासाठी खडी रस्ते तयार करण्याचे कामासाठी रक्कम रु.१,२८,०५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास मा.आयुक्तांनी दि.६-३-९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे.सबब सदर कामाचे रक्कम रु.१,२८,०५०/- चे अंदाजपत्रक मंजुरीसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सदरचा खर्च प्राणी संग्रहालय विकसीत करणे या लेखा शिर्षातून सन ९६-९७ या वर्षात करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालयामध्ये खडी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रु.१,२८,०५०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च ९६-९७ या वर्षात प्राणी संग्रहालय विकसीत करणे या लेखा शिर्षातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७१/५:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,सिडको एन-१२ येथील महानगरपालिकेच्या प्रा.शाळेला कुंपण भिंत व मैदान सपाटीकरण करणेच्या कामासाठी रक्कम रु.२,५६,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्तांनी दिनांक १-३-९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे.सबब सदर कामाचे रक्कम रु.२,५६,६००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.सदरचा खर्च सन ९६-९७ या वर्षात विकास इमारती व शाळा व दवाखाने बांधणे या लेखा शिर्षामधून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सिडको एन-१२ येथील महानगरपालिकेच्या प्रा.शाळेला कुंपण भिंत व मैदान सपाटीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्यरक्कम रु.२,५६,६००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे काम सन ९६-९७ च्या विकास इमारती व शाळा दवाखाने बांधणे या लेखा शिर्षातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७२/६:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो कबीरनगर स्लम भागात जुनी प्रिकास्ट व्ही टाईप गटार दुरुस्त करणे व नियोजित ३०० मी.मी.व्यासाची अर्धगोलाकार प्रिकास्ट सरफेस गटार तयार करणे या कामाकरीता रक्कम रु.६,६०,०००/- चे अंदाजपत्रक सा.बां.विभाग,औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यात आले असून मा.आयुक्त यांनी दि.६-३-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच सदरील कामाकरीता महानगरपालिकेचे सन ९६-९७ च्या अथ्रसंकल्पातील झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमा अंतर्गत खुली गटार या शिर्षा अंतर्गत तरतूद केली आहे.प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.कबीरनगर स्लम भागात जुनी प्रिकास्ट व्ही.टाईप गटार दुरुस्त करणे व नियोजित ३०० मी.मी.व्यासाची अर्धगोलाकार प्रिकास्ट गटार सरफेस गटार तयार करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रु.६,६०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे काम ९६-९७ च्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७३/७:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,सादिया सिनेमाच्या मागे व्यापारी संकुल बांधकामासाठी ठराविक अनामत रक्कम देऊन झोपडपट्टयावर ३० वर्षाकरीता दुकाने देण्याच्या निविदा अनुक्रमे,९-१-९५ व २३-३-९५ मागविण्यात आल्या होत्या.प्रापत निविदापैकी जे भाडे योग्य होते त्यांना अनामत रक्कम भरण्याकरीता सुचविले असता काही गाळे धारकांनी अनामत रक्कम भरल्या आहेत.ज्या दुकानांकरीता निविदा प्राप्त झाल्या नाहीत आणि ज्या दुकानाकरीता योग्य भाडयाच्या निविदा प्राप्त झाल्या नाहीत आणि ज्या दुकानाकरीता योग्य भाडयाच्या निविदा प्राप्त झाल्या नाहीत अशा दुकानाकरीता फेर निविदा मागविणेच्या मान्यतेस्तव सादर.

तसेच स्थायी समिती सभा दि.९-६-९५ मध्ये सदरील बांधकामाच्या निविदेतील दरास मंजुरी देतांना या प्रस्तावित दुकानांपैकी काही दुकाने छोटी करण्याचे निर्देश प्राप्त झाल्या अशा दुकानदारापंपैकी शक्य असलेल्या काही दुकानाचा आकार लहान करून सुधारीत नकाशा तयार करुन घेण्यात आला आहे.तरी सुधारीत केलेल्या नकाशाप्रमाणे दुकांनाचा आकार लहान करून उपलब्ध असलेल्या दुकानाचा झोपडपट्टयावर निविदा पुन्हा बोलाविण्याच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सादिया सिनेमाच्या मागे व्यापारी संकुलातील दुकानासाठी फेर निविदा मागविण्यासाठी तसेच दुकानांच्या आकाराबाबत तयार करण्यात आलेल्या सुधारीत नकाशात सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७४/८:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,सिध्दार्थ उद्यान येथील प्राणी संग्रहालयातील अंतर्गत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी रक्कम रु.५,४५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्तांनी दि.२६-२-९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे.रस्ते डांबरीकरण केल्यामुळे उद्यानात येणाऱ्या पर्यटकांना व तर भेट देणाऱ्या नागरिकांना रस्त्यांचा त्रास होणार नाही व उद्यानाचीही शोभा वाढेल.सबब सदर कामाचे रक्कम रु. ५,४५,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.सदरचा खर्च शासकीय अनुदान १० कोटी मधुन सन १९९५-९६ या वर्षामध्ये करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सिध्दार्थ उद्यानातील प्राणी संग्रहालयातील अंतर्गत रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रु.५,४५,०००/- च्या अंदाजपत्रकीय तरतुदीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७५/९:**

शिक्षणाधिकारी महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रस्ताव तयार केला आहे की,पोलीस कॉलनी प्रभागात ९५-९६ वर्षात बालवाडी वर्ग सुरु करण्यात आलेला आहे.त्या वर्गासाठी ९६-९७ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ ली चा वर्ग सुरु करणे आवश्यक आहे.त्यासाठी इ. १ली ते ४थी चा वर्ग सुरु करणे आवश्यक आहे.त्यासाठी इ.१ली ते ४थी पर्यंत प्राथमिक शाळा सुरु करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार पोलीस प्रभागात ९६-९७ वर्षात १ली ते ४थी पर्यंतची प्राथमिक शाळा सुरु करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७६/१०:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,शहरातील सोडीयम व्हेपर स्ट्रीट लाईट वेळेवर बंद व चालु होण्यासाठी स्ट्रीट लाईट कंट्रोलरची आवश्यकता आहे.सदर कंट्रोलर खरेदी करण्याकरीता रक्कम रु.१,१३,१००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च ९६-९७ च्या विद्युत साहित्य या शिर्षकाखाली करण्यांत येईल.तरी रक्कम रु.१,१३,१००/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शहरातील सोडियम व्हेपर स्ट्रिट कंट्रोलर करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रु.१,१३,१००/- च्या अंदाजपत्रकावरती आयुक्तांनी यांच्या स्तरावर कार्यवाही करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ५७७/११:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मनपाचे मुख्य प्रशासकीय इमारतीचे (जुन्या) ८ ते १० वर्षापुर्वी वायरींग काम झालेले असून सदर इमारतीमध्ये विविध कक्षाचे फेरबदल झालेत व इमारतीचे पुर्ण प्लॅस्टर काढुन नविन प्लॅस्टर करतांना केलेले वायरिंग काढण्यात येऊन त्यानंतरच नविन विद्युत वायरिंग तातडीने करण्यास्तव सा.बा.खात्याचे दरसुचीप्रमाणे रु.१,७०,०००/- (रुपये एक लाख सत्तर हजार) चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन काम लवकर करावयाचे असल्याने मे.लुना इलेक्ट्रीकल औरंगाबाद यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करण्यास मा.आयुक्तांची अंतिम कार्योत्तर मंजुरी मिळाली आहे.

तरी सदर कामाच्या विद्युत करणाचे अंदाजपत्रकीय खर्च रुपये १,७०,०००/- हा भांडवली खर्चातून सन ९५-९६ या वर्षात करण्यास तथा मे.लुना इलेक्ट्रीकल्स,औरंगाबाद यांचेकडून अंदाजपत्रकीय दरावर करुन घ्यावयास प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीचे नविन विद्युत वायरिंग करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रु.१,७०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच हा खर्च ९५-९६ या वर्षातील भांडवली खर्चातून करण्यास व हे काम मे.लुना इलेक्ट्रीकल्स,औरंगाबाद यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७८/१२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.फुलेनगर येथील खडी रस्ते तयार करण्याकरीता एकूण पाच गल्ल्या मधील ओटे पाडून खडी रस्ते ४ मीटर रुंद तयारा करण्यात आले आहे.परंतु उर्वरित दोन गल्ल्यामध्ये जास्त प्रमाणात रहाती घरे नियोजित ४ मीटर रुंद खडी रस्त्यांमध्ये बाधीत होत असून सध्या सदर गल्ल्या २.४० मीटर ते २.७० मीटर पर्यंत रुंद रस्ता उपलब्ध आहे.

परंतु सदरील अरुंद रस्ता रहदारीस अडचणीचा,अडथळयाचा असल्यामुळे ४ मीटर रुंदीचा खडी रस्ता तयार करण्याकरीता एकूण २४ घरे बाधीत होत आहेत. व त्यांना कुठल्याही प्रकारचा मोबदला न देता त्यांच्या घरांच्या दर्शनी भागाच्या भिंती पाडून त्यांना नियोजित ४ मीटर रुंदीचा रस्ता सोडून पुन्हा राहत्या घराच्या दर्शनी भिंती महानगरपालिकेतर्फे बांधुन देण्याचा प्रस्ताव आहे.

प्रस्तावास एकूण ७.५४ लाख रुपये खर्च येणार असुन तेथील नागरिकांची सदर नियोजित प्रस्तावास संमती दर्शविली आहे.

सदरील प्रस्ताव मंजुर झाल्यास नियोजित ४ मीटर रुंद खडी रस्ते व डांबरी रस्ते तयार करण्यात येतील व त्याचा खर्च या प्रस्तावामध्ये समाविष्ट नसुन या व्यतिरिक्त वेगळे खडी व डांबरी रस्त्यांचे अंदाजपत्रक तयार करुन काम करुन घेण्यात येईल.

तसेच सदरील प्रस्ताव मंजुर केल्यास रहदारीस सोईस्कर हावून सदर गल्लीमधील नागरिकांचे राहणीमान व जीवनमान उंचविण्यास मदत र्होल.

मंजुरी व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार फुलेनगर येथे खडी रस्ते तयार करण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७९/१३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला क,महानगरपालिकेच्या बांधकामासाठी मागविलेली सिमेंट पुरवठा करण्यांची निविदा मंजुरी होणे आहे.(दि.१९-१-९६) त्यास वेळ लागेल.निविदेतील दर हा रु.१४८=०० प्रति गोणी आहे.तसेच वरील बाबतीत व्ही.ए.ट्रेडींग कंपनी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी रु.१४६=०० प्रति गोणी ४३ ग्रेड देण्याचे मान्य केले असुन त्यामध्ये त्यांनी खालील अटी दिल्या आहेत.

१) ४३ ग्रेडचे ओ.पी.सी.सिमेंट
२) सिमेंट कंपनीचा चाचणी अहवाल देण्यांत येईल.
३) एकूण १०,००० (दहा हजार) सिमेंट गोण्या देणार.
४) सिमेंट दिल्यानंतर ४८ तासात १००% पेमेंट अदा करणे.

वरील अटी मान्य करुन सिमेंटची निविदा मंजुरीसाठी आहे.त्यास वेळा लागेल.याकरीता सिमेंट अभावी शासनाच्या अनुदानातील कामे बंद पडु नये म्णून व्ही.ए.ट्रेडींग कंपनी कडून रु.१४६=०० प्रति गोणी या दराने १००० (एक हजार) गोणी तातडीने विकत घेण्यात यावे असा आदेश मा.आयुक्त साहेबांनी दिला आहे.त्या आधारे व्ही.ए.ट्रेडींग कंपनी कडून १००० गोणी खरेदी केली आहे.

तरी त्याची एकूण रक्कम रु.१४६=०० प्रति गोणी प्रमाणे १,४६,०००/- (एक लाख शेहेचाळीस हजार) कार्योत्तर मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मे.व्ही.ए.ट्रेडींग कंपनी कडून रु.१४६=००प्रति गोणी या दराने १००० गोणी सिमेंट खरेदीसाठी झालेल्या रक्कम रु.१,४६,०००/- च्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८०/१४:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,नवाबपुरा भागात शहाबाद फरशी बसविणे,खांडकी दुरुस्त करणे व पॅचेसचे खडीकरण करणे या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.२,१२,१८९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील कमाचा खर्च सन ९६-९७ च्या रस्ते व दुरुस्ती या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु.२,१२,१८९/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्य विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार नवाबपुरा भागात शहाबाद फरशी बसविणे,खांडकी दुरुस्त करणे,खडी करण करणे आदी कामासाठी सा.बा.खात्याच्या ९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.२,१२,१८९/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८१/१५:**

अतिरिक्त शहर अभियांत्रिकी यांनी प्रस्ताव दिला की,मो.भावसिंगपुरा येथील स.न.५१/२ मध्ये खडी रस्ते तयार करणे या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार रक्कम रु.३,७१,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु.३,७१,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार भावसिंगपुरा स.न.५१/२ मध्ये खडी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,७१,२००/- अंदाजपत्रकास व सदरचा खर्च ९६-९७ च्या भांडवली रस्ते या शिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८२/१६:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,अल्तमशा कॉलनी भागात खडी रस्ते तयार करणे व खांडकी बसविणे या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१,७८,९३५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु.१,७८,९३५/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार ,अल्तमशा कॉलनी भागात खडी रस्ते तयार करणे व खांडकी बसविण्याच्या कामासाठी सन ९४-९५ च्या सा.बा.खात्याच्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,७८,९३५/- च्या अंदाजपत्रकास व सदरचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८३/१७:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,मो.बेगमपुरा,जयसिंगपुरा भागात शहाबाद फरशी बसविणे व जुनी खांडकी दुरुस्त करणे या कामासाठी सा.बा.खात्याच्या दरसुचीनुसार रक्कम रु.६,४४,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या रस्ते दुरुस्ती या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधुन करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु.६,४४,३००/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार ,मो.बेगमपुरा,जयसिंगपुरा भागात शहाबाद फरशी बसविणे व खांडकी दुरुस्त करण्याच्या सा.बा.खात्याच्या सन १९ - १९ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेल्या रु.६,४४,३००/- च्या अंदाजपत्रकास व सदरचा खर्च ९६-९७ च्या अंदाजपत्रकास व सदरचा खर्च ९६-९७ च्या रस्ते दुरुस्ती या लेखा शिर्षकाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८४/१८:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,बसैय्येनगर भागात अंतर्गत सिडको हद्दीपर्यंत ५० फुट विकास रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.९,९१,११०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु.९,९१,११०/- चे अंदाजत्रक मंजुरीचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार बसैय्येनगर भागात अंतर्गत व सिडको हद्दीपर्यंत ५० फुट विकास रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठी सा.बा.खात्याच्या ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.९,९१,११०/- च्या अंदाजपत्रकास व सदरचा खर्च भांडवली रस्ते या लेखा शिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८५/१९:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,एस.टी.कॉलनी,दमडी महल भागातील रोडचे डांबरीकरण या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.४,११,८२२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील कामाचा खर्च

सन ९६-९७ च्या रस्ते दुरुस्ती या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु.४,११,८२२/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार एस.टी.कॉलनी,दमडी महल भागातील रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सा.बा.खात्याच्या ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु.४,११,८२२/- च्या अंदाजपत्रकास व सदरचा खर्च सन ९६-९७ च्या रस्ते दुरुस्ती या लेखा शिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८६/२०:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,खडकेश्वर भागातील रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण करणे या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.२,५५,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ चया रस्ते दुरूस्ती या लेखा शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु.२,५५,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार ,खडकेश्वर भागातील रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता सा.बा.खात्याच्या सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु.२,५५,६००/- च्या अंदाजपत्रकास व सदरचा खर्च ९६-९७ च्या रस्ते दुरुस्ती लेखा शिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८७/२१:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,संजयनगर आणि कैलासनगर यांना जोडणारा कल्व्हर्ट बांधणे या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१,५७,१००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु.१,५७,१००/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, संजयनगर आणि कैलासनगर यांना जोडणारा कल्व्हर्ट बांधण्यासाठी सा.बा.खात्याच्या सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु. १,५७,१००/- च्या अंदाजपत्रकास व सदरचा खर्च ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८८/२२:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,कोहिनुर कॉलनी बारापुल्ला भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन ९४-९५ च्या

दरसुचीनुसार रु.३,९६,९२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील कामाचा खर्च सन ९५-९६ च्या भांडवली रस्ते या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रु.३,९६,९२५/-चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्स्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार कोहिनुर कॉलनी बारापुल्ला भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या सा.बा.खात्याच्या ९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.३,९६,३२५/- च्या अंदाजपत्रकास व सदरचा खर्च ९५-९६ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८९/२३:**

अतिरिक्त शहर अभियंता यांपी प्रस्ताव दिला की,मो.काझीवाडा येथील भागात खांडकी बसविणे व दुरुस्त करणे या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन ९२-९३ च्या दरसुचीनुसर रक्कम रु.२,६०,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यात येईल.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले रु.२,६०,६००/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार काझीवाडा येथील भागात सा.बा.खात्याच्या सन ९२-९३ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु.२,६०,९००/- च्या अंदाजपत्रकास व सदरचा खर्च ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९०/२४:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सिटी चौक ते रोहीलागल्ली पर्यंतच्या रोडचे रुंदीकरण व खडीकरण करुन साईट गटार बसविणे या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन ९५-९६ च्या भांडवली रस्ते या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रु.२,०७,८००/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबातचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सिटी चौक ते रोहिला गल्ली पर्यंतच्या रोडचे रुंदीकरण व खडी करण करुन साईड गटार बनविण्याच्या कामासाठी सा.बा.खात्याच्या ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु.२,०७,८००/- च्या अंदाजपत्रकास व सदरचे काम ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९१/२५:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,मो.रशिदपुरा त्रिवेणी नगर भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार रु.७,६१,८८१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील काम सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रु.७,६१,८८१/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार रशिदपुरा त्रिवेणी नगर भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सा.बा.खात्याच्या ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेल्या रु.७,६१,८८१/- च्या अंदाजपत्रकास व सदरचे काम ९६-९७ च्या भांडवली रस्ते या शिर्षाखाली उपलब्ध तरतुदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९२/२६:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,अमीतनगर,विशालनगर भागातील रोडचे डांबरीकरण करणे या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार रु.२,९४,९२८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रु.२,९४,९२८/-चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार विशाल नगर,अमीतनगर भागातील रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सा.बा.खात्याच्या ९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु.२,९४,९२८/-च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे काम ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षाखाली उपलब्ध तरतूदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९३/२७:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,लायब्ररीयन्स व कला कोऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी येथे खडी रस्ते तयार करणे या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार रुपये २,१३,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधुन करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु.२,१३,३००/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार ,लायब्ररीयन्स व कला कोऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी येथे खडी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रुपये २,१३,३००/- च्या अंदाजपत्रकास व सदरचे

काम सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधुन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९४/२८:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,नेहरुनगर भागातील रोडवर खांडकी बसविणे या कामसाठी सा.बा.खात्याच्या सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार रु.१,५८,३८६/- चे अंदजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षाखाली असलेल्या तरतुदी मधून करण्यांत येईल.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले रु.१,५८,३८६/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार नेहरुनग भागातील रोडवर खांडकी बसविण्याच्या कामासाठी सा.बा.खात्याच्या ९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु.१,५८,३८६/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे काम ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९५/२९:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,मो.कबाडीपुरा येथील बारुदगर नाल्यावर फुटब्रीज बांधणे या कामासाठी सा.बा.खात्याच्या ९२-९३ च्या दरसूचीनुसार रु.४,२०,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील कमाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रुपये ४,२०,२००/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार कबाडीपुरा येथील बारुदगरनाल्यावर फुटब्रीज बांधण्याच्या कामासाठी सा.बा.खात्याच्या ९२-९३ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु.४,२०,२००/- च्या अंदाजपत्रकास व सदरचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९६/३०:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,मो.बेगमपुरा डिंबरगल्ली येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु.५,५०,३००/-चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.तरी सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या रस्ते दुरुस्ती या लेखा शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधुन करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रु.५,५०,३००/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो.बेगमपुरा डिंबरगल्ली येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी सा.बा.खात्याच्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु.५,५०,३००/- च्या अंदाजपत्रकास व सदरचे काम ९६-९७ च्या रस्ते दुरुस्ती या लेखा शिर्षाखालील उपलब्ध तरतुदीमधून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९७/३१:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,रामकृष्ण गोदावरी स.गृहनिर्माण संस्था मधील रस्त्याचे खडीकरण करणे या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार रू.१,३४,४००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील कामाचा खर्च सन ०६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या रु.१,३४,४००/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार रामकृष्ण गोदावरी गृहनिर्माण संस्था मधील रस्त्याचे खडीकरण करण्याच्या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु.१,३४,४००/- च्या अंदाजपत्रकास व सदरचा खर्च सन ९६-९७ या भांडवली रस्ते या लेखा शिर्षाखालील उपलब्ध तरतुदीमधून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९८/३२:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,शहरातील चार चौकात असलेल्या जुन्या वाहतुक संकेतांकाचे लॅम्प हेड बदलणेच्या कामाकरीता वाहतुक शाखेच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार रू.३,१६,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील खर्च सन ९६-९७ च्या विद्युत देखभाल व दुरुस्ती या शिर्षाखाली करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेले रु.३,१६,०००/- चे अंदजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शहरातील चार चौकात असलेल्या जुन्या वाहतुक संकेतांकाचे लॅम्प हेड बदलणेच्या कामाकरीता वाहतुक शाखेच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेल्या रू.३,१६,०००/- च्या अंदाजपत्रकास व सदरचा खर्च सन ९६-९७ च्या विद्युत देंखभाल दुरुस्ती या शिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी

**विषय क्र. ५९९/३३:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,शहरातील सोडीयम व्हेपर दिव्याच्या देखभाल दुरुस्ती करीता लागणारे विद्युत साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे.सदर साहित्य खरेदी करण्याकरीता सा.बा.खात्याच्या(विद्युत) सन ९५-९६ च्या दरसुची नुसार रु.४,९७,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च सन ९६-९७ च्या विद्युत साहित्य या शिर्षकाखाली करण्यात येईल.

तरी रु.४,९७,५००/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शहरातील सोडीयम व्हेपर दिव्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी लागणारे विद्युत साहित्य खरेदी करण्याकरीता सा.बा.खात्याच्या ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु.४,९७,५००/- अंदाजपत्रकास व सदरचा खर्च ९६-९७ च्या विद्युत साहित्य खरेदी या शिर्षकाखाली सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६००/३४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,शहरातील स्ट्रिट लाईट दुरुस्ती करीता ४० वैट टयुब रॉड व ४० वॅटचे स्टार्टर खरेदी करणे आवश्यक आहे.सदरील साहित्य खरेदी करण्यासाठी सा.बा.खात्याच्या (विद्युत) सन ९५-९६ च्या सदरील साहित्य खरेदी करण्यासाठी सा.बा.खात्याच्या (विद्युत) सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु.४,९९,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदरील खर्च सन ९६-९७ च्या विद्युत साहित्य खरेदी या शिर्षाखाली करण्यात येईल.

तरी रु.४,९९,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शहरातील स्ट्रीट लाईट दुरुस्ती करीता ४० वॅट टयुब रॉड व ४० वॅटचे स्टार्टर खरेदी करण्यासाठी सा.बा.खात्याच्या (विद्युत) ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु.४,९९,०००/- च्या अंदाजपत्रकास व सदरचा खर्च ९६-९७ च्या विद्युत साहित्य खरेदी या शिर्षकाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०१/३५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,शहरातील मर्क्युरी दिव्यांची देखभाल व दुरुस्ती करण्याच्या कामासाठी लागणारे विद्युत साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे.सदरील साहित्य खरेदी करण्याकरीता सा.बा.खात्याच्या (विद्युत) दरसुचीनुसार रु.४,७८,२५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील खच्र सन ९६-९७ वर्षाच्या विद्युत साहित्य खरेदी या शिर्षकाखाली करण्यात येईल.

तरी रु.४,७८,२५०/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शहरातील मर्क्युरी विद्युत दिव्यांची देखभाल व दुरुस्ती करण्याच्या कामासाठी सा.बा.खात्याच्या (विद्युत) दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु.४,७८,२५०/- च्या अंदाजपत्रकास व सदरचा खर्च सन ९६-९७ च्या विद्युत साहित्य खरेदी याशिर्षकाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०२/३६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,मित्र नगर लिमयेवाडी मधील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार रु.३,१७,४३२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या रस्ते दुरुस्ती या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधुन करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रुपये ३,१७,४३२/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मित्रनगर लिमयेवाडी मधील अंतर्गगत रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु.३,१७,४३२/- च्या अंदाजपत्रकास व सदरचा खर्च सन ९६-९७ च्या रस्ते दुरुस्ती या लेखा शिर्षकातील उपलब्ध तरतुदी मधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०३/३७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,सहयोग नगर मधील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु.३,०५,८४२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या लेखा शिर्षातून उपलब्ध असलेल्या तरतुदी मधुन करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रु.३,०५,८४२/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सहयोग नगर मधील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सा.बा.खात्याच्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेल्या रु.३,०५,८४२/- च्या अंदाजपत्रकास व सदरचे काम सन ९६-९७ च्या लेखा शिर्षातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०४/३८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,गारखेडा सर्वे नं.१९,५१ व ५२ मधील अंतर्गत रस्त्यावर डांबरीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दर सुचीनुसार रक्कम रु.५,१६,४४५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील कामाचा खर्च सन १९९६-१९९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधुन करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी करण्यात आलेले रक्कम रु.५,१६,४४५/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार गारखेडा सर्वे नं.१९,५१ व ५२ मधील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सा.बा.खात्याच्या ९५-९६ दरसुचीनुसार तयार करण्यात

आलेल्या रु.५,१६,४४५/- भांडवली रस्ते या लेखा शिर्षाखालील उपलब्ध तरतुदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०५/३९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,चौंडेश्वरी सोसायटी,भुषन नगर,गिरजादेवी सोसायटी व रुणवाल ले आऊट मधील रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.४,१४,१५४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील कामाचा खर्च सन १९९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु.४,१४,१५४/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार चौंडेश्वरी सोसायटी,भुषण नगर गिरजादेवी सोसायटी व रुणवाल ले आऊट मधील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सा.बा.खात्याच्या ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु. ४,१४,१५४/- च्या अंदाजपत्रकास व सदरचा खर्च भांडवली रस्ते या लेखा शिर्षाखालील उपलब्ध तरतुदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०६/४० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रसताव दिला की,गजानन कॉलनी व श्रीहरीनगर भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.९,२९,७५९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील कामाचा खर्च सन १९९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधुन करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रुपये ९,२९,७५९/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार गजानन कॉलनी व श्रीहरी नगर भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेल्या रु.९,२९,७५९/- च्या अंदाजपत्रकास व सदरचे काम ९६-९७ च्या भांडवली रस्ते या शिर्षा खाली उपलब्ध तरतुदीमधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०७/४१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,राजनगर,मयुरबन कॉलनी व शितलनगर मधील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.८,८७,५४५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधुन करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु.८,८७,५४५/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार ,राजनगर,मयुरबन कॉलनी व शितलनगर मधील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु.८,८७,५४५/- च्या अंदाजपत्रकास व सदरचे काम ९६-९७ च्या भांडवली रसते या लेखा शिर्षकाखालील उपलब्ध तरतुदीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०८/४२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,गजानन कॉलनी ते सारंग सोसायटी पर्यंतच्या ५० फुट रुंद विकास रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.२०,३३,२२/-चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील कामाचा खर्च सन १९९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधुन करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु.२०३३२२=०० चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार ,गजानन कॉलनी ते सारंग सोसायटी पर्यंतच्या ५० फुट रुंद विकास रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.२०,३३,२२/-चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील कामाचा खर्च सन १९९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०९/४३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,सिल्कमिल कॉलनी येथील अरुंद रस्त्याचे गल्ल्यामध्ये शहाबादी फरशी बसविणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दर सुचीनुसार रक्कम रु.५,८४,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील कामाचा खर्च सन १९९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा उपलब्ध असलेल्या तरतुदी मधून करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु.५,८४,७००/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सिल्क मिल कॉलनी येथील अरुंद रस्त्याचे गल्ल्यामध्ये शहाबादी फरशी बसविणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दर सुचीनुसार तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.५,८४,७००/- च्या अंदाजपत्रकास करण्यांत सदरचे काम भांडवली रस्ते या लेखा शिर्षाखालील उपलब्ध तरतुदीमधून करण्यांस सर्वानंमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१०/४४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,उस्मानपुऱ्यातील शहा कॉलनी मधील तसेच पोस्ट ऑफीस जवळील भुपसिंग ओबेरॉय यांच्या घराजवळील रस्त्याचे व

म्हाडा कॉलनी मधील रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.६,२४,१५३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील कामाचा खर्च सन १९९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु.६,२४,१५३/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,उस्मानपुऱ्यातील शहा कॉलनी मधील तसेच पोस्ट ऑफीस जवळील भुपसिंग ओबेरॉय यांच्या घराजवळील रस्त्याचे व म्हाडा कॉलनी मधील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेल्या रु.६,२४,१५३/- च्या अंदाजपत्रकास व सदरचे काम ९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध तरतुदीमधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६११/४५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,ज्योतीनगर रेखांकनामधील रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.८,२३,०१०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरील कामाचा खर्च सन १९९६-९७ च्या रस्ते दुरुस्ती या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु.८,२३,०१०/-चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार ज्योतीनगर रेखांकनामधील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.८,२३,०१०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च ९६-९७ मधील रस्ते दुरुस्ती या लेखा शिर्षकाखालील उपलब्ध तरतुदी मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१२/४६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,हमालवाडा रेल्वे स्टेशन भागातील गल्ल्यांमध्ये शहाबाद फरशी बसविणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.२,११,८६५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील कामाचा खर्च सन १९९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधुन करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु.२,११,८६५/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार हमालवाडा रेल्वे स्टेशन भागातील गल्ल्यांमध्ये शहाबाद फरशी बसविणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या

दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.२,११,८६५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१३/४७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,गारखेडा येथील मोरेश्वर सोसायटी,दिलीप पाटील ले आऊट आणि श्रीनगर भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.३,५३,४३५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील कामाचा खर्च सन १९९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधुन करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु.३,५३,४३५=०० चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार ,गारखेडा येथील मोरेश्वर सोसायटी,दिलीप पाटील ले आऊट आणि श्रीनगर भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेल्या रु.३,५३,४३५/- च्या अंदाजपत्रकास व सदरचे काम ९६-९७ मधील भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखाली तरतुदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१४/४८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,हर्सुल भागातील स.नं.१९४/२ चे नविन खडी रस्ते तयार करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१,५३,४००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील कामाचा खर्च सन १९९६-१९९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधुन करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु.१,५३,४००/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार हर्सुल भागातील स.नं.१९४/२ येथे नविन खडी रस्ते तयार करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,५३,४००/- च्या अंदाजपत्रकास व सदरचे काम ९६-९७ मधील भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध तरतुदीमधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१५/४९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,मो.लक्ष्मी कॉलनी (बारापुल्ला) भागातील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१,९२,६५०/-चे अंदाजपत्रक तयार करण्यांत

आले आहे.सदरील कामाचा खर्च सन १९९६-९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधुन करण्यात येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु.१,९२,६५०/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार,मो.लक्ष्मी कॉलनी (बारापुल्ला) भागातील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेल्या रु.१,९२,६५०/- च्या अंदाजपत्रकास व सदरचे काम ९६-९७ मधील भांडवली रस्ते या लेखा शिर्षा खालील उपलब्ध तरतुदीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१६/५० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,चेलीपुरा भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.५,२०,५९७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे.सदरील कामाचा खर्च सन १९९६-९७ च्या रस्ते दुरुस्ती या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु.५,२०,५९७/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, ,चेलीपुरा भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.५,२०,५९७/- च्या अंदाजपत्रकास व सदरचे काम ९६-९७ च्या रस्ते दुरुस्ती या लेखा शिर्षाखाली उपलब्ध तरतुदीतून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१७/५१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,हर्सुल येथील हरसिध्दी सोसायटी मधील रस्त्यांचे खडीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१,८३,८४२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील कामाचा खर्च सन १९९६-१९९७ च्या भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदी मधुन करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु.१,८३,८४२=०० चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, हर्सुल येथील हरसिध्दी सोसायटीतील रस्त्यांचे खडीकरण करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१,८३,८४२/- च्या अंदाजपत्रकास व

सदरचे काम ९६-९७ मधील भांडवली रस्ते या लेखा शिर्षकाखालील उपलब्ध तरतुदीमधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१८/५२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,लिटल फ्लॉवर ते विद्यापीठ रस्त्यावर रस्ता दुभाजक टाकुन त्यावर लोखंडी जाळी बसविणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१५,०२,१००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.३८८/१० दिनांक १९-१-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण १९ कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत यापैकी फक्त पांच निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली.प्राप्त निविदा पत्रके दिनांक        रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.सलीम पटेल | १२.९९ | टक्के कमी दराने |
| २) श्री.मन्नान खान | ७.८६ | टक्के कमी दराने |
| ३) श्री.कुलवंतसिंग | ६.१० | टक्के कमी दराने |
| ४) मे.राणा कन्स्ट्रक्शन | ५.१० | टक्के कमी दराने |
| ५) श्री.आर.एल.बारवाल | ५.१० | टक्के कमी दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी श्री.सलीम पटेल यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.९९% कमी आहेत.

तरी श्री.सलीम पटेल यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.९९% कमी दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार,लिटल फ्लॉवर ते विद्यापीठ रस्त्यावर रस्ता दुभाजक टाकुन त्यावर लोखंडी जाळी बसविण्याच्या कामासाठी स्थायी समिती विषय क्र.३८८/१० दिनांक १९-१-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झाल्यानुसार प्राप्त दरपत्रकापैकी श्री.सलीम पटेल यांचे निविदा दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.९९% कमी असल्याने श्री.सलीम पटेल यांच्या निविदा दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१९/५३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिली की,स्ट्रीट लाईट फिक्चर्स लावण्या करीता ब्रॅकेट व क्लॅप खरेदी करण्याच्या कामाकरीता स्थायी समिती विषय क्र.४२३/९ दिनांक ५-२-९६ अन्वये रक्कम रु.२९२५००=०० अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली.प्राप्त निविदा पत्रके दिनांक १४-३-९६ रोजी उघडण्यांत आली.त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | प्राप्त दर | |
|---|---|---|---|
| | | ब्रॅकेटसाठी | क्लॅपसाठी |
| १) | मे.नॅशनल फॅब्रीकेशन वर्क्स | रु.९२=००<br>(प्रति नग) | ३१=००<br>(प्रति नग) |

| | | | |
|---|---|---|---|
| २) | मे.वर्षा मेटल वर्क्स | रु.९२=५०<br>(प्रति नग) | २८=१०<br>(प्रति नग) |

वरील प्राप्त दरामध्ये ब्रॅकेटसाठी मे.नॅशनल फॅब्रीकेशन वर्क्स यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे रक्कम रु.९२=०० प्रति नग असे व क्लॅम्पसाठी मे.वर्षा मेटल वक्स्र यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे रक्कम रु.२८=१० असे आहेत.,

परंतु सदरील साहित्य दोन वेगवेगळया एजन्सीकडुन घेतल्यास साहित्याचा पुरवठा वेळेवर होणारा नाही करीता दोन्ही ॲटम एकाच एजन्सीकडुन खरेदी केल्यास ते विना विलंब मिळु शकतील म्हणून दोन्ही ॲटम एकाच एजन्सी कडून घेण्याचे ठरल्यास तुलनात्मकदृष्टया मे.वर्षा मेटल वर्क्स यांचे कडून वरील दर्शविलेल्या दराने साहित्य खरेदी केल्यास २२३०५०=०० इतका खर्च अपेक्षित आहे.

परंतु सदरील जास्त वाटत असल्याने मे.वर्षा मेटल वर्क्स यांना प्रत्यक्ष दराचे वाटाघाटीस्तव बोलावले असता ते सदरील साहित्य ब्रॅकेट रक्कम रु.९०=०० प्रति नग या दराने व क्लॅम्प रक्कम रु.२७.००. प्रति नग या दराने पुरविण्यास तयार आहेत व या दराने साहित्या खरेदी केल्यास रक्कम रु. इतका खर्च येणार आहे.करण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार स्ट्रीट लाईट फिक्चर्स लावण्याकरीता ब्रॅकेट व क्लॅप खरेदी करण्याच्या रु.२,९२,५००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.४२३/९ दि.५-२-९६ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे.प्राप्त दरपत्रकापैकी व वाटाघाटीअंती मे.वर्षा मेटल वर्क्स यांनी सदरील साहित्य ब्रॅकेटसह रु.९०/- प्रति नग या दराने व क्लॅप रु.२७/- प्रति नग या दराने पुरविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२०/५४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,शहरात नविन रोवण्यात आलेल्या पोलवर ओढण्यासाठी ॲल्युमिनियम कंडक्टर वायर खरेदी करण्याच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.८०००००=०० च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.१८३ दिनांक १८-३-९५ अन्वये मंजुरी मिळालेली आहे.

त्यानुसार सदरील कामा करीता निविदापत्रके (चौथ्या वेळ) मागविली असता प्राप्त निविदा पत्रकामध्ये एकाही पुरवठा दराने दर नमुद केलेले नाहीत व आपण मागविलेली वायरची साईज उपलब्ध नसल्याचे कळविले आहे.आपण म.रा.वि.म.ने दिलेल्या साईज नुसार म्हणजे ७/३.३ मी.मी.आकाराच्या वायर करीता निविदा पत्रके मागविली होती,परंतु सदर आकाराची वायर उपलब्ध नसल्याने व कोणीही पुरवठा दराने दर नमुद केलेले नसल्याने व सध्या शहरात पोल उभे असल्याने त्यावर वायर ओढणे अत्यंत गरजेचे असल्याने प्रथम,द्वितीय व तृतीय वेळेस ज्या आकाराच्या वायर करीता निविदा पत्रके मागविली होती त्याच आकाराचे वायर खरेदी करणे आवश्यक आहे.

यापुर्वी प्रथम,द्वितीय व तृतीय वेळेस आपण ७/१.९६ मी.मी.या आकाराच्या वायर करीता निविदा पत्रके मागविण्यांत आली होती.तृतीय वेळी निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण चार निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली होती.त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.जायको इंटरप्रायजेस | रक्कम रु.८७००=०० | प्रति कि.मी. |
| २) मे.कॅपको एजन्सीज | रक्कम रु. ८४९५=०० | --//-- |
| ३) मे.पगारीया इंटरप्रायजेस | रक्कम रु. ८७८१=०० | --//-- |
| ४) मे.सत्यम वायर्स | रक्कम रु. १०२५०=०० | --//-- |

वरील प्राप्त निविदा पत्रकामध्ये मे.कॅपको एजन्सीज यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे रक्कम रु.८४९५=०० प्रति कि.मी.असे आहेत.

आपणास सध्या १२० कि.मी.वायरची आवश्यकता आहे.कॅपको एजन्सीज यांच्या कडून ७/१.९६ कि.मी.आकाराचे वायर रक्कम रु.८४९५=०० प्रति कि.मी.या दराने खरेदी करावयाचे असल्यास रक्कम रु.१०,००,०००=०० इतका खर्च येणार आहे.

तरी मे.कॅपको एजन्सीज यांच्या कडून ७/१.९६ मी.मी.आकाराची १२० मी.मी.वायर रक्कम रु.८४९५=०० यासाठी येणाऱ्या रक्कम रु.१०,१९,४००=०० च्या खर्चास मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरात नविन रोवण्यात आलेल्या पोलवर ओढण्यासाठी ॲल्युमिनियम कंडक्टर वायर खरेदी करण्याच्या कामासाठी ८०००००=०० रकमेस स्थायी समिती ठराव क्र.१८३/ दि.१८-३-९५ अन्वये मंजुरी मिळाल्यानुसार प्राप्त निविदा पैकी मे.कॅपको एजन्सीज यांच्या कडुन ७/१.९६ मी.मी.आकाराची १२० कि.मी.वायर रुपये ८४९५/- प्रति कि.मी.दराने खरेदी करण्यासाठी येणाऱ्या खर्चाच्या रु.१०,१९,४००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२१/५५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,पैठणगेट,दलालवाडी प्रभागात फरशी बसविणे,जुनी खांडकी दुरुस्त करणे व नविन खांडकी बसविण्याच्या कामा करीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसुची नुसार रक्कम रु.२,७३,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील कामाचा खर्च सन १९९५-९६ च्या भांडवली रस्ते या शिर्षकाखाली करण्यांत येईल.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली.प्राप्त निविदापत्रके दिनांक ११-३-९६ रोजी उघडण्यांत आली.त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) मे.आलिफ असोशिएट १.०० टक्का कमी दराने.
२) मे.पारस कन्स्ट्रक्शन ३.०० टक्के जास्त दराने.
३) श्री.एस.एम.मंडोरे ५.०० टक्के जास्त दराने.

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी मे.आलिफ असोशिएटस यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०० टक्का कमी आहेत.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,६३,७००=०० च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम मे.आलिफ असोशिएटस यांच्या कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०० टक्का कमी या दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार पैठणगेट,दलालवाडी प्रभागात फरशी बसविण्याच्या कामासाठी सा.बा.खात्याच्या ९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेल्या रु.२,७३,७००/- च्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या कामासाठीच्या प्राप्त निविदांपैकी मे.आलिफ असोशिएटस यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०० टक्के कमी असल्याने त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२२/५६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,उस्मानपुरा येथील चौकात स्वयंचलीत वाहतुक संकेतांक बसविण्याच्या कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.४,७१,४७५/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्रमांक ४०५/२७ दिनांक १९-१-९६ अन्वये स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे.

त्यानुसार सदर कामाकरीता निविदा पत्रके मागविण्यांत आली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण तीन निविदा पत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत सदर तिन्हीही निविदा दर भरुन प्राप्त झाली.प्राप्त निविदा पत्रके दिनांक १४-३-९६ रोजी उघडण्यांत आली.त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| | मर्यादित (मेल्ट्रॉन) |
| १) मे.महाराष्ट्र इलेक्टॉनिक महामंडळ | ७.९५ टक्के जास्त दराने |
| २) मे.न्युक्लीऑनिक्स,पुणे | ८.२५ टक्के जास्त दराने |
| ३) मे.फरीन इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स लॅब | ९.२५ टक्के जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी मे.महाराष्ट्र इलेक्टॉनीक महामंडळ मर्यादित (मेल्ट्रॉन) यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.७५ जास्त आहेत.

परंतु सदरील दर जास्त असल्याने मे.महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक महामंडळ मर्यादित (मेल्ट्रॉन) यांना सदर कामाचे दराबाबत वाटाघाटीस्तव प्रत्यक्ष बोलावले असता वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.९५ टक्के जास्त या दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने करण्यांस तयार आहेत व महानगरपालिकेतर्फे त्यांना सदर कामासाठी येणाऱ्या साहित्यावर जकात माफी देण्यांत येणार आहे.

तरी सदरील काम मे.महाराष्ट्र इलेक्ट्रानिक महामंडळ मर्यादित (मेल्ट्रान) यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याबाबतचा व या कामासाठी येणाऱ्या साहित्यावर जकात माफी देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार उस्मानपुरा येथील चौकात स्वयंचलीत वाहतुक संकेतांक बसविण्याच्या कामासाठीच्या ४,७१,४७५/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.४०५/२७ दिनांक १९-१-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झाल्या नुसार प्राप्त निविदा पैकी व वाटाघाटीअंती मे.महाराष्ट्र इलेक्ट्रानिक महामंडळ मर्यादित (मेल्ट्रॉन) यांनी अंदाजपत्रकीय दराने काम करण्याची तयारी दर्शविल्याने मेल्ट्रॉन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने काम करुन घेण्यास व या कामासाठी येणाऱ्या साहित्यावर जकात माफी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२३/५७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,टी.व्ही.सेंटर येथील चौकात स्वयंचलित वाहतुक संकेतांक बसविण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.३,३४,९४०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्रमांक ४०५/२७ दिनांक १९-१-९६ अन्वये स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे.

त्यानुसार सदर कामाकरीता निविदा पत्रके मागविण्यांत आली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदा पत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके

स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदर तिन्हीही निविदा पत्रके प्राप्त झाली.प्राप्त निविदा पत्रके दि.१४-३-९६ रोजी उघडण्यांत येणार आहे.

तरी सदरील काम मे.महाराष्ट्र इलेक्ट्रानिक्स महामंडळ मर्यादित (मेल्ट्रान) यांच्या कडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याबाबतचा व या कामासाठी येणाऱ्या साहित्यावर जकात माफी देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार टी.व्ही.सेंटर चौकात स्वयंचलित वाहतुक संकेतांक बसविण्याच्या कामाच्या रक्कम रु.३,३४,९४०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.४०५/२७ दि.१९-१-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झाल्यानुसार प्राप्त निविदांपैकी व वाटाघाटी अंती मे.महाराष्ट्र इलेक्ट्रानिक महामंडळ मर्यादित (मेल्ट्रान) यांनी सदरचे अंदाजपत्रकीय दराने करण्याची तयारी दर्शविल्याने मेल्ट्रॉन यांच्या दरास व या कामासाठी येणाऱ्या साहित्यावर जकात माफी देण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२४/५८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,एम.आय.डी.सी.रेल्वेस्टेशन येथील बालभारती ऑफीस ते नाथ यांचे घर एम.आय.डी.सी.कॉलनी अंतर्गत आणि हॉलिडे कॅम्प ते मिलींद नगर रस्त्यांचे डांबरीकरण करणेचे कामासाठी सन १९९४-९५ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.३५०६७५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास मा.आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामाचा खर्च शासकीय अनुदान १९९५-९६ चे रक्कम रु.१० कोटी च्या तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण पाच कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकारण्याचे अंतिम तारखेपर्यंत एकूण एक निविदा पत्रक दर भरलेल्या प्राप्त झाल्या.असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.डी.अजितसिंग १९.९९ कमी दराने

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १९.९९% कमी दराने श्री.डी.अजितसिंग यांची निविदा आहे.

तरी सदर कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.३,५०,६७५/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम श्री.डी.अजितसिंग यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.९९% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार एम.आय.डी.सी.रेल्वेस्टेशन येथील बालभारती ऑफीस ते नाथ यांचे घर एम.आय.डी.सी.कॉलनी अंतर्गत आणि हॉलीडे कँप ते मिलींद नगर रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामासाठी मागविण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२५/५९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,महानगरपालिका मुख्य कार्यालयातील दालनासाठी एअर कंडीशनिंग युनिट बसविण्याच्या कामाकरीता दरपत्रके

मागविली असता एकूण तीन दरपत्रके प्राप्त झाली.प्राप्त दरपत्रके उघडण्यांत आली.त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे.नरीमन सेल्स ॲण्ड सर्व्हीस | रक्कम रु.३२८५२=०० | प्रति नग |
| २) मे.परविन ट्रेडर्स | रक्कम रु.३६०६४=०० | प्रति नग |
| ३) व्हिडीओकॉन | रक्कम रू.३०३००=०० | प्रति नग |

वरील प्राप्त दरपत्रका मध्ये व्हिडीओकॉन कंपनीचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे रक्कम रु.३०३००=०० प्रति नग असे आहेत,परंतु सदरील दर जास्त वाटत असल्याने कंपनीस आणखी दर कमी करणे बाबत विनंती केली असता व्हीडीओकॉन कंपनीने वरील दिलेल्या दरावर आणखी ५ टक्के सुट देण्याचे व एअर कंडीशनिंग युनिट बसवुन देण्याची तयारी दर्शविली आहे.नंतर दिलेली ५ टक्के सुट वरील दरातुन वजा केल्यास प्रति नग रक्कम रु.२८७८५=०० असे दर येतात.

परंतु सदर युनिट बसविण्यापुर्वी काही किरकोळ कामे करावी लागणार आहेत जसे स्टॅबलायझर पावर सप्लाय,ग्रीलवर्क ही कामे करणे जरुरी आहे.त्या करीता दरपत्रके मागविली असता मे.आदित्य मार्केटींग सेल्स ॲण्ड इंडस्ट्रीयल सप्लाय यांचे दर रू.२४४००=०० इतका असा एकूण रक्कम रु.१९७११०=०० इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी एअर कंडीशनिंग युनिट रक्कम रु.२८७८५=०० प्रति नग या दराने ६ नग मे.व्हीडीओकॉन कंपनीकडून खरेदी करण्याचा व इतर किरकोळ कामे मे.आदित्य मार्केटींग सेल्स ॲण्ड इंडस्ट्रीयल सप्लाय यांच्या कडून रक्कम रु.२४४००=०० मध्ये करुन घेण्याबाबतचा तसेच यासाठी येणाऱ्या एकूण रक्कम रु.१९७११०=०० च्या खर्चास मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार महापालिका मुख्य दालनासाठी एअर कंडीशनिंग युनिट बसविण्याच्या कामासाठी प्राप्त दरपत्रकांपैकी वाटाघाटीअंती मे.व्हिडीओकॉन कंपनीने एअर कंडीशनिंग युनिट प्रति नग रु.२८,७८५/- दराने ६ नग व मे.आदित्य मार्केटिंग सेल्स ॲण्ड इंडस्ट्रीयल सप्लाय यांच्याकडून रु.२४,४००/- मध्ये किरकोळकामे करुन घेण्यास तसेच यासाठी येणाऱ्या एकूण रु.१,९७,११०/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२६/६० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,नविन प्रशासकीय इमारती मधील स्थायी समितीच्या सभागृहासाठी फर्निचर पुरवठा करणे व बसविण्याच्या कामाकरीता दरपत्रके मागविली असता एकूण तीन दरपत्रके प्राप्त झाली.प्राप्त दरपत्रके उघडण्यांत आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) सुंदर फर्निचर | रक्कम रु. १९२०९०=०० |
| २) सुपर फर्निचर | रक्कम रु. १४३९५०=०० |
| ३) स्टार फर्निचर | रक्कम रु. १४७०१०=०० |

वरील प्राप्त दरपत्रकामध्ये मे.सुपर फर्निचर यांचे दरपत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच रक्कम रु.१४३९५०=०० असे आहेत.परंतु सदरील दर जास्त वाटत असल्याने मे.सुपर फर्निचर यांना दराबाबत वाटाघाटीस्तव बोलावले असता त्यांनी सदरील काम रक्कम रु.१,४३९५०=०० ऐवजी रक्कम रु.१६७५२=०० मध्ये करुन देण्याची तयारी

दर्शविली आहे.त्यानुसार सदरील काम मे.सुपर फर्निचर यांच्याकडून वरील रक्कमे मध्ये करुन घेण्यांत आले आहे.

तरी सदर काम मे.सुपर फर्निचर यांच्या कडून रक्कम रु.१३६७५२=०० मध्ये करुन घेण्याचे कामास कार्योत्तर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार नविन प्रशासकीय इमारती मधील स्थायी समिती सभागृहास फर्निचरचा पुरवठा करण्यांसाठी मागविण्यांत आलेल्या दरपत्रकामध्ये व वाटाघाटीअंती मे.सुपर फर्निचर यांनी सदरचे काम रक्कम रु.१३६७५२/- मध्ये करुन दिल्याने त्यांच्या रक्कमेस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२७/६१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,औरंगपुरा,स्वातंत्र सैनिक कॉलनी,नागेश्वरवाडी,सुंदर नगर,रिप्स हॉटेल,कुंभारवाडा भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मान्यता प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदर कामाकरीता निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त एकच निविदा पत्रक दर भरुन प्राप्त झाले असुन ते निविदा पत्रक मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचे असून त्यांनी निविदा पत्रकात अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७ टक्के जास्त दर नमुद केलेला आहे.परंतु सदर दर जास्त वाटत असल्याने त्यांना सदर कामाचे दराबाबत वाटाघाटीस्तव बोलावले असता वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन हे सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.०० टक्के जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०० टक्का जास्त दरा ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०० टक्का जास्त या दराने करण्यांस तयार आहेत.

तरी मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांच्या कडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०० टक्का जास्त या दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार औरंगपुरा, स्वातंत्र सैनिक कॉलनी,नागेश्वरवाडी,सुंदर नगर,रिप्स हॉटेल,कुंभारवाडा भागातील रस्त्यांचे डांबरीकरणास स्थायी समितीने मंजुरी दिल्यानुसार प्राप्त निविदा मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यंनी वाटाघाटीअंती सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०० टक्के जास्त दराने करण्यांची तयारी दर्शविल्यानुसार त्यांच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ६२८/६२ :**

पशुधन विकास अधिकारी,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की,महानगरपालिका औरंगाबाद प्राणी संग्रहालया करीता एक हत्तीचे जोडपे खरेदी करावयाचे आहे.कर्नाटक राज्य शासनाने औरंगाबाद महानगरपालिकेस अशा प्रकारचे हत्तीच्या जोडप्याची किंमत रु.५.५० लाख असून सदरच्या किंमतीचा धनादेश चामराज नगन वन विभाग कर्नाटक यांना अदा करावयाचा आहे.

तरी हत्ती जोडपे खरेदी करीता येणाऱ्या रु.५.५० लाख (रु.पाच लाख पन्नास हजार मात्र) या खचा्रस मंजुरी देण्यांत यावी.तसेच या अनुषंगाने भराव्या लागणाऱ्या टॅक्सेसना मान्यता देण्यात यावी.प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार महानगरपालिका औरंगाबाद प्राणी संग्रहालयासाठी कर्नाटक शासनाकडून हत्तीचे जोडपे खरेदी करण्यासाठीच्या रु.५.५० लाखाच्या खर्चास व अनुषंगाने भराव्या लागणाऱ्या टॅक्सेसना सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२९/६३ :**

स.नगर सेवकांच्या स्वेच्छानिधीतून विविध कामे हाती घेता येतात.या कामामध्ये बेरोजगार युवक/युवतींना तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठी सदर तरतुद स.सदस्यांच्या मागणी नुसार उपलब्ध करुन देण्यांत यावी.या नियमाच्या स्वेच्छनिधी वापरा बाबत नियमावलीत समावेश करावा.

तसेच १९९५-९६ या आर्थिक वर्षात ज्या स.नगरसेवकांनी प्रशिक्षणाबाबत प्रस्ताव सादर केले आहे.त्यांना मंजुरी देण्यांत यावी व प्रशिक्षण देणाऱ्या संस्थाना प्रशिक्षणाची फी (शुल्क) अगाऊ

**संवाद :**

प्रकल्प संचालक : काही स.नगरसेवकांनी अर्ज केला आहे की,नगर सेवक स्वेच्छा निधीतून बेकार युवकांना रोजगार मिळविण्यास सहाय्यभुत ठरावे यासाठी नगरसेवक स्वेच्छा निधीतील रक्कम बेरोजगार युवक युवतींना प्रशिक्षण देण्यासाठी वापरता येईल अशी दुरुस्ती नगर सेवक स्वेच्छा निधी नियमावलीत करण्यांत यावी.

डॉ.भागवत कराड : अशा प्रकारच्या ट्रेनिंग काही बेकारांना देता आले तर ते स्वतःचा व्यवसाय करु शकतील.तेव्हा अशी दुरुस्ती नियमावलीत करण्यांत यावी.जे नगर सेवक त्यांच्या निधीतून अशा प्रकारचे ट्रेनिंग देऊ इच्छितील त्यांच्याच निधीतुन हा पैसा वापरला जाईल.

श्री.महादेव सुर्यवंशी : महापालिकेतर्फे काही ट्रेनिंग दिल्या जातात,परंतु यासाठी ठेवण्यांत आलेला कालावधी हा अत्यंत अपुरा पडतो.कॉम्प्युटर सारखे कोर्सेस ४-६ महिन्यात शिकुन एखादी व्यक्ती स्वतःचा व्यवसाय करु शकणार नाही,तेव्हा ट्रेनिंगचा कालावधीच वाढविण्यात यावा.

श्री.गौतम खरात : अनेक होतकरु गरीब विद्यार्थी त्यांच्याकडे बौध्दीक क्षमता असतांनाही केवळ परिस्थिती मुळे पुढे येऊ शकत नाहीत.नगर सेवकांनी आपआपल्या वॉर्डातील काही गरीब होतकरु विद्यार्थ्यांना अशा प्रकारच्या ट्रेनिंग्ज त्यांच्या निधीतुन दिल्या तर ते निश्चितपणे स्वतःचा व्यवसाय करु शकतील.

मा.सभापती : सर्व बाबींच्या तपशिलासह प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे विचारार्थ ठेवण्यांत यावा.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव सर्व बाबींचा उहापोह करुन सर्वसाधारण सभेपुढे विचारार्थ ठेवावा असे सर्वानुमते ठरविण्यांत आले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३०/६४ :**

कार्यकारी अभियंता हयांनी प्रस्ताव सादर केला आहे की, एन-११ जलकुंभापासुन ते प्रियदर्शनी इंदिरानगर पर्यंत २५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकावयाची

आहे.त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९४-९५ च्या दर सुचीनुसार रक्कम रु.४,९९,०१५=०० एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदर कामाचा खर्च हा शासकीय अनुदान सन १९९५-९६ मधुन करण्यांत येणार आहे.

कार्यालयाची निविदा सुचना क्र.५६/९५-९६ जी की दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्दीस देण्यांत येवून बी-१ निविदा मागविण्यांत आल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण चौदा (१४) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस दोन(२) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे आहेत.

१) श्री.शेख शकील अहेमद ५०% जास्त
२) श्री.सलीम पटेल. अंदाजपत्रकीय दर

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया कमी दर हा श्री.सलीम पटेल यांचा आहे म्हणजेच अंदाजपत्रकीय दरानुसार असा दर आहे.

तरी श्री.सलीम पटेल हयांची अंदाजपत्रकीय दरानुसारची निविदा व अंदाजपत्रकास मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, एन-११ जलकुंभापासुन ते प्रियदर्शनी इंदिरानगर पर्यंत २५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकण्याच्या कामासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाच्या ९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु.४,९९,०१५/- च्या अंदाजपत्रकावरती प्राप्त झालेल्या निविदांपैकी श्री.सलीम पटेल यांच्या अंदाजपत्रकीय निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३१/६५ :**

कार्यकारी अभियंता पा.पु.व.ज.नि.यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,आंबेडकर नगर येथे २५० मी.मी.व्यासाची जलनिःसारण वाहिनी टाकण्याच्या रक्कम रु.३,२५,२५०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती मध्ये ठराव क्र.४४७/२३ दिनांक १३-२-९६ द्वारे मान्यता मिळाली होती त्या अनुषंगाने दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण अकरा निविदा विक्री झाल्या होत्या त्यापैकी दोन निविदा प्राप्त झाल्या असुन खालीलप्रमाणे दर दर्शविलेले आहे.

१) श्री.डी.सी.पंजाबी ३ टक्के जास्त
२) श्री.शेख सलीम अहेमद ४ टक्के जास्त

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ३ टक्के जास्त दराची श्री.डी.सी.पंजाबी यांची निविदा आहे,परंतु सदरच्या वाटाघाटीसाइी संबंधितांस कार्यालयीन पत्र क्र.२४९/९६ दि.१२-३-९६ द्वारे बोलावले असता संबंधिताने अंदाजपत्रकाच्या दराने काम करण्यांस तयार असल्या बाबत लेखी कळविले आहे.

तरी अंदाजपत्रकीय दराने श्री.डी.सी.पंजाबी यांची निविदा स्विकारणेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, आंबेडकर नगर येथे २५० मी.मी.व्यासाची जलनिःसारण वाहिनी टाकण्याच्या रक्कम रु.३,२५,२५०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती मध्ये ठराव क्र.४४७/२३ दिनांक १३-२-९६ अन्वये मान्यता दिल्यानुसार निविदांपैकी व वाटाघाटीअंती

श्री.डी.सी.पंजाबी यांनी सदरचे काम अंदाजपत्रकीय दराने करण्यांस संमती दर्शविल्यानुसार अंदाजपत्रकीय दराने काम करण्या बाबतची श्री.डी.सी.पंजाबी यांची निविदा सर्वानुमते स्विकारली जाते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३२/६६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.हर्सुल स्लम येथे नविन डांबरी रस्ते तयार करणे बाबत कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९४-९५ नुसारच्या दरसुची नुसार ७५३८०४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील काम नविन डांबरी रस्ते तयार करणे रक्कम रु.११०.०० लाख या शिर्षकातून करण्यांत येईल.

सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.६-३-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रक्कम रु.७५३८०४/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, मो.हर्सुल स्लम येथे नविन डांबरी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसुची नुसार तयार करण्यांत आलेल्या रु. ७५३८०४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३३/६७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.संजयनगर येथे नाल्यास पुर नियंत्रक संरक्षित भिंत बांधण्याचे कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१२,६०,३१९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील काम महाराष्ट्र शासन निधी रु.१०.०० कोटी या शिर्षकातून करण्यांत येईल.सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.११-१-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून प्रस्तावित कामासाठी निविदा पत्रके मागविण्यांत आली असता अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या.

नवाब यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.०१% कमी दराची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार संजय नगर येथे नाल्यास पुर नियंत्रक संरक्षित भिंत बांधण्याच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१२,६०,३१९/- च्या अंदाजपत्रकास वरती प्राप्त निविदापैकी श्री.एस.ए.नवाब यांची निविदा तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.०१% कमी दराची असल्याने श्री.एस.ए.नवाब यांच्या निविदा स्विकृतीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३४/६८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.हर्सुल स्लम येथे ३०० एम.एम.व्यासाची अर्धगोलाकार गटार तयार करणे बाबत कामाकरीता सार्वजनिक बांधकाम

खाते यांच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसुचीनुसार रु.२,४८,८७०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील काम खुल्या गटारी बांधणे रु.५०.०० लाख या शिर्षकातून करण्यात येईल.सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.१५-२-९६ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रु.२,४८,८७०/- यांस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार,मो.हर्सुल स्लम येथे ३०० एम.एम.व्यासाची अर्धगोलाकार गटार तयार करण्याच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेल्या रु.२,४८,८७०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३५/६९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,आमखास मैदान जवळील नियोजित भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यानाचे पहिल्या टप्प्याचे काम रक्कम रु.९ लक्ष ज्यामध्ये भव्य प्रवेशद्वार,संरक्षित भिंत,स्टेपिंग ग्राऊंड,कॅसकेट सपाटीकरण इत्यादी कामे रितसर बी-१ निविदेवर श्री.एम.सलीम गुत्तेदार मार्फत सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९३-९४ च्या दरसुचीच्या ४% जास्त दराने काम प्रगती पथावर चालु आहे.हे काम मार्च अखेर पर्यंत पुर्ण होणार आहे.दरम्यानच्या काळात संबंधित नगरसेवक श्री.गौतम खरात यांनी विनंती केली की,लॅण्ड स्केपींगच्या नकाशाप्रमाणे,डीझाईन प्रमाणे काम उर्वरित त्वरीत हाती घेण्यात यावे असे आदेश झाले आहे.त्या अनुषंगाने उर्वरीत कामाचे म्हणजेच ५.५६ लक्ष रुपये १४-३६-९.००=५.३६लक्ष) इतक्या रक्कमेचे काम सध्या सुरु असलेल्या कामा मध्येच अंदाजपत्रक सुधारीत करुन मंजुर गुत्तेदारा कडुन म्हणजेच एम.सलीम कडून ४% जास्त दराने (सन९३-९४ च्या डी.एस.आर.अन्वये) काम त्वरीत करुन घेण्याचा प्रस्ताव आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार,डॉ.बाबासाहेब उद्यानातील आंबेडकर उद्यानातील कामासाठी बनविण्यांत आलेल्या सुधारीत अंदाजपत्रक रु.७,०४,३०६+९,००,०००=१६,०४,३०६/- रक्कमेस व सदरील काम श्री.एम.सलीम यांच्या कडून ४% जास्त दराने जे सन ९३-९४ चे डी.एस.आर.अन्वये आहे.करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३६/७० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.रहेमानिया कॉलनी स्लम येथे खडी रस्ते तयार करणे व खुल्या गटारी बांधणे बाबत कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसुची नुसार रु.५५४७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.सदरील काम खडी रस्ते आणि कल्व्हर्ट बांधणे रु.४५.०० लाख या शिर्षकातून करण्यांत येईल.

सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.६-३-९६ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रु.५५४७००/- यांस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार रहेमानिया कॉलनी स्लम येथे खडी रस्ते तयार करणे,खुल्या गटारी बांधणे आदी कामा बाबत सा.बा.खात्याच्या सन ९४-९५ च्या दरसुचीनुसर तयार करण्यांत आलेल्या रु.५,५४,७००/- च्या अंदाजपत्रकास व सदरचे काम खडी रस्ते आणि कलव्हर्ट बांधणे रु.४५.०० लाख याशिर्षातुन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३७/७१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.बनेवाडी गावात अर्धगोलाकार व दगडी गटार बांधणे या कामाकरीता अंदाजपत्रक रक्कम रु.६,८३,५००/- सार्वजनिक बांधकाम विभाग,औरंगाबाद यांची दरसुची सन १९९३-९४ प्रमाणे तयार करण्यांत आले असून मा.आयुक्त यांनी दि.८-३-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच सदरील कामाकरीता महानगरपालिकेचे सन १९९५-९६ अर्थसंकल्प झोपडपट्टी सुधारणा कायक्रम अंतर्गत खुली गटार या शिर्षा अंतर्गत ५० लाखाची तरतुद केली आहे.

प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार बनेवाडी भागात अर्धगोलाकार व दगडी गटार बांधण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रु.६,८३,५००/- च्या सा.बा.खात्याच्या ९३-९४ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास व सदरचे काम ९५-९६ च्या अर्थसंकल्प झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत खुली गटार या शिर्षा अंतर्गत ५० लाखाच्या तरतुदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३८/७२ :**

चिस्तीया कॉलनी येथे १०० व १५० मी.मी.व्यासाची जलवाहीनी टाकण्याचे अंदाजपत्रक रक्कम रु.७,७८,०००/- चे तयार करण्यात आले आहे.सदरील कामावर होणारा खर्च हा १९९६-९७ च्या आर्थिक वर्षात भांडवली खर्च या शिर्षकाखाली करण्यात येणार आहे.

तरी जलवाहिनी टाकण्याचे अंदाजपत्रक रक्कम रु.७,७८,०००/- चे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

सौ.पद्मा शिंदे : या भागातील लोकांकडुन अशा कामासाठी २५ टक्के लोक वर्गणी घेऊन ही कामे करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

मा.सभापती : शहरातील इतरही काही झोपडपटटयातून अशा प्रकारच्या सुविधा पुरविण्यासाठी महानगरपालिकेतर्फे २५ टक्के लोक वर्गणी घेतली जात आहे.त्याच धर्तीवर या भागातील लोकही २५ टक्के लोक वर्गणी भरावयास तयार असतील तर सदरचे काम हाती घेण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार चिस्तीया कॉलनी १०० व १५० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी या भागातील लोक २५ टक्के लोक वर्गणी भरत असतील तर अशी लोक वर्गणी भरुन घेऊन काम सुरु करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३९/७३ :**

चेअरमन,भरतनगर सहकारी गृहनिर्माण सोसायटी मर्यादित यांनी स.न.९ भाग शहानुरवाडी हया जागे मधील कार्यालयाचा आदेश जा.क्र.ए.एमसी/टीपीएस/एलवायटी/६१०/८६ दिनांक १८-३-८६ च्या मंजुरा रेखांकना मधील खुली जागा जिचे क्षेत्र १२१४.६३ चौ.मी.आहे व जी महानगरपालिकेस नोंदणी कृत दस्तऐवज क्र.१६८३ दिनांक १८-३-८६ अन्वये हस्तांतरीत झालेली आहे ती व्यायाम शाळा बांधण्यासाठी मागणी केलेली आहे.

सदर जागेवर विकास नियंत्रण नियमावली १३-३-१-३ मधील तरतुदी नुसार खुन्या जागेच्या १०% अथवा जास्तीत जास्त २००.०० चौ.मी.बांधकाम करता येते.तेवढे क्षेत्र संबंधितांस भाडेपट्टयावर देण्या संबंधाने जागेचे भाडे रुपये ७६५२/- निश्चित करण्यात आले आहे.

संबंधितास सदर जागा द्यावयाची मागणी मान्य असल्यास सदर जागेवर झालेल्या महानगरपालिका तर्फेचा खर्च आजच्या दराने संबंधितांकडून घेण्यासह इतर अटी व शर्ती संबंधाने करारनामा इत्यादीची पुर्तता करुन त्या अटीस व शर्तीस पात्र राहून संबंधितास ३० वर्षाचे कालावधी करीता जागा हस्तांतर करण्यासाठी रितसर कार्यवाही करण्यांत येईल.

करीता प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

चेअरमन भरत नगर सहकारी गृहनिर्माण सोसायटी मर्यादित हयांनी मागणी केलेली त्यांची सोसायटीची खुली जागा जी स.नं. ९ भाग शहानुरवाडी या मंजुर रेखांकनातील आहे जी महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेली असून जीचे क्षेत्रफळ सुमारे १२१४.६३ चौ.मी.आहे.

त्यांनी सदर जागा व्यायाम शाळेकरीता मागणी केलेली असून विकास नियंत्रण नियमावली नुसार देय असलेले जास्तीत जास्त क्षेत्र २०० चौ.मी.आहे.

त्यासाठीचे भाडे रु.७६५२/- प्रति वर्ष व त्या जागेवर महानगरपालिकेतर्फे झालेला खर्च आजच्या दराने संबंधितांनी भरण्याचे अटीवर व इतर अटी व शर्तीस आधिन राहून संबंधितांना ३० वर्षाचे कालावधी करीता जागा हस्तांतर करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४०/७४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.मसनतपुर येथील खडी व डांबरी रस्त्याचे नुतनीकरण व रुंदीकरण करणे,काही खांडकी रस्त्याचे खडी रस्त्यात रुपांतर करणे,इतर खांडकी रस्ते दुरुसत करणे या कामाकरीता एकूण रक्कम रु.४,००,०००/-चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसुची १९९४-९५ प्रमाणे तयार करण्यात आली असून मा.आयुक्त साहेबांनी दिनांक २५-१२-९५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून सदरील कामासाठी निविदा क्र.मनपा/लेखा/६३/९६ दिनांक

१९-२-९६ द्वारे निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त तीन (३) मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या,त्या निविदा दि. १४-३-९६ रोजी मा.मुख्य लेखा परिक्षक व उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्या असता तुलनात्मकदृष्टया गुत्तेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.अब्दुल खालेब | ०.११% | कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा |
| २) श्री.बंसल कन्स्ट्रक्शन | ५% | जास्त --//-- |
| ३) श्री.मो.अझहर | ४% | जास्त --//-- |

वरीलपैकी तुलनात्मकदृष्टया व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.११% कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा दररची निविदा श्री.अब्दुल खालेब यांची असुन सदरील काम झोपडपटट्‌ी सुधारणा कार्यक्रम अंतर्गत खडी रस्ते या शिर्षाअंतर्गत करण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मसनतपुर येथील खडी व डांबरी रस्त्याचे नुतनीकरण व रुंदीकरण करणे काही खांडकी रस्त्याचे खडी रस्त्यात रुपांतर करणे,इतर खांडकी रस्ते दुरुस्त करणे या कामासाठी सा.बा.खात्याच्या सन ९४-९५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रु.४,००,०००/- च्या अंदाजपत्रकासाठी प्राप्त निविदा पैकी तुलनात्मदृष्टया व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.११% कमी दराची श्री.अब्दुल खालेब यांची निविदा सर्वानुमते स्विकारली जाते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४१/७५ :**

दिनांक १८-३-९६ रोजी सहाय्यक आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,डॉ.दिनकर देशपांडे हे महानगरपालिका अस्थापनेवर १९८३ पासुन आरोग्य वैद्यकीय या पदावर रु.३०००-४५०० या वेतन श्रेणीत कार्यरत आहेत.दिनांक ३१-१२-९३ रोजी त्यांची वेतनश्रेणी ही कमाल मर्यादा रु.४५०० येथे कुंठीत झालेली आहे.त्यामुळे दि. १-१-९४ पासुन त्यांना कोणतीही वेतनवाढ व पुढील वेतनश्रेणी देण्यांत आलेली नाही.आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदास भविष्यात कोणतेही पदोन्नती नाही हे पद वेतन श्रेणीत असणे जरुरी आहे,ही बाब लक्षात घेता शासन नियमानुसार त्यांना पुढील वेतन श्रेणी रु. ३७००-५०० दि.१-१-९४ पासुन देण्याबाबत प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार आरोग्य वैद्यकिय अधिकारी,डॉ.दिनकर देशपांडे यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदासाठी असलेल्या रुपये ३००० ते ४५०० या वेतनश्रेणीत कमाल मर्यादा रु.४५०० ही गाठल्यामुळे त्यांना दि.१-१-९४ पासून वेतन वाढ देण्यात आलेली नाही ही बाब लक्षात घेता व शासन नियमानुसार त्यांना पुढील वेतन श्रेणी रु.३७०० ते ५००० दिनांक १-१-९४ पासुन देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४२/७६ :**

अति.शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,जुन्या प्रशासकीय इमारती मधील मा.स्थायी समिती सभापती,महापौर,उपमहापौर,विरोधी पक्षनेता,सभागृह नेता यांच्या दालनात जिप्सम बोर्डाचे सिलींग ॲल्युमिनियम फ्रेमसह दरवाजे व खिडक्या बसविण्याच्या कामासाठी स्थायी समिती विषय क्र.४३४/१० अन्वये रक्कम रु.३,६०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम मे.एलोरा कन्स्ट्रक्शन यांच्या कडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास स्थायी समितीची मान्यता प्राप्त झाली आहे,परंतु प्रत्यक्ष काम करते वेळी मा.सभापती,स्थायी

समिती व मा.महापोर यांनी वेळोवेळी सुचविल्याप्रमाणे बदल करण्यांत आले त्यामुळे अंदाजपत्रकास घेतलेल्या परिणामात प्रत्यक्ष काम करते वेळी वाढ झालेली आहे.तसेच काही बाबी ज्या अंदाजपत्रकात समाविष्ट त्या समाविष्ट करुन सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु.६,९०,८९०=०० चे तयार करण्यांत आले आहे.

तरी नविन तयार करण्यात आलेल्या सुधारीत रक्कम रु.६,९०,८९०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम मे.एलोरा कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्या कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याबाबत प्रस्ताव विचाराथ्र तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार जुन्या प्रशासकीय इमारती मधील स्थायी समिती सभापती,महापौर,उपमहापौर,विरोधी पक्षनेता,सभागृह नेता यांच्या दालनांस जिप्सम बोर्डाचे सिलींग अॅल्युमिनियम फ्रेमसह,दरवाजे व खिडक्या बसविणेच्या कामासाठी स्थायी समिती विषय क्र.४३४/१० अन्वये रु.३,६०,०००/- च्या अंदाजपत्रकास व सदरील काम मे.एलोरा कन्स्ट्रक्शन यांच्या कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास मंजुरी देण्यांत आलेली आहे.तथापि प्रस्तावात दर्शविल्यानुसार वाढीव कामासाठी बनविण्यांत आलेल्या सुधारीत अंदाजपत्रकास रक्कम रु.६,९०,८९०/- तसेच हे काम मे.एलोरा कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्या कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४३/७७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,शहाबाजार येथील प्राथमिक शाळेवर पहिला मजला बांधणे व शाळेची उत्तर बाजु फेरफार करुन दवाखान्यासाठी स्वतंत्र तयार करणे या कामासाठी रक्कम रु.७,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून कार्यालयीन कार्यवाही पुर्ण करुन प्रत्यक्ष कामास मार्च महिन्यात सुरुवात करावी म्हणजे कामावर पडणारा खर्च ९६-९७ बजेट मध्ये होईल.या अटीवर मा.आयुक्तांनी दि.११-१-९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे.सबब सदर कामाचे रक्कम रु.७,००,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.सदरचा खर्च विकास इमारती,शाळा,दवाखाने बांधणे या लेखा शिर्षामधुन करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शहाबाजार येथील प्राथमिक शाळेवर पहिला मजला बांधणे व शाळेची उत्तर बाजुत फेरफार करुन दवाखान्यासाठी स्वतंत्र इमारत तयार करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.७,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४४/७८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,हॉटेल आशियाना ते स्टेट बॅंक ऑफ हैद्राबाद ब्रॅंच,बन्सीलालनगर या रोडवर विद्युत व्यवस्था करणेसाठी २५० वॅट सोडीयम व्हेपर फिटींग तसेच भुमिगत केबल वायरींग करण्याचे कामाचे अंदाजपत्रक सा.बा.दरसुची सन ९५-९६ नुसार रु.३,३५,००४/- चे करण्यांत आले असून सदरील कामाचा खर्च शासकीय अनुदानातून करण्यांत येईल.

तरी सदरील कामाच्या अंदाजपत्रकीय खर्चास रु.३,३५,००४=०० मंजुरी मिळण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉटेल आशियाना ते स्टेट बँक ऑफ हैद्राबाद ब्रँच,बन्सीलालनगर या रोडवर विद्युत व्यवस्था करणेसाठी २५० वॅट सोडीयम व्हेपर फिटींग तसेच भुमिगत केबल वायरींग करण्याचे कामासाठी सन ९५-९६ च्या सा.बा.दरसुची नुसार तयार करण्यात आलेल्या रु.३,३५,००४/- चे अंदाजपत्रकास तसेच कामाचा खर्च शासकीय अनुदानातून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

मा.सभापती : श्री.हमीद ताबा स.नगरसेवक यांनी त्यांच्या वॉर्डात फंक्शन हॉल बांधण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावावर मा.आयुक्तांनी विचार करुन प्रस्ताव मंजुरीस्तव ठेवावा.तसेच सदरच्या पत्रात मागणी केल्यानुसार व्यायाम शाळे ऐवजी या भागात लायब्ररी बांधण्यासाठी एस्टमेंट तयार करण्यांत यावे.

सायंकाळी ५.०० वाजता सभा १५ मिनिटांसाठी तहकुब करण्यांत आल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

तहकुब सभा सायंकाळी ५.१५ वाजता मा.सभापती यांच्या अध्यक्षतेखाली पुर्ववत झाली.

**विषय क्र. ६४५/१ :**

दिनांक १८-३-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.कंवरसिंग बैनाडे : गुलमंडीवर मुत्री बांधण्यात आलेली आहे.या रस्त्यावर नेहमीच वर्दळ असते या मुत्रीची साफसफाई दररोज केली जात नाही.त्यामुळे रस्ता नेहमी घाण असतो.तेव्हा तेथील मुत्री हटविण्यांत यावी.

मा.आयुक्त : गुलमंडीवर इतरत्र सध्या कोठेही मुत्री बांधण्यात येणार नाही.तेव्हा हे पुरुष प्रसाधन गृह हटविण्या ऐवजी त्याच ठिकाणी आधुनिक पध्दतीने बनविण्यांत येईल.

श्री.सुदाम सोनवणे : महानगरपालिकेच्या शाळांना कंपाऊंड वॉल बांधण्याबाबत मी यापुर्वीही वेळोवेळा मागणी केलेली आहे.त्यामुळे महानगरपालिकेच्या जागेचे संरक्षण होणार आहे.तेव्हा त्यावर कार्यवाही करण्यांत यावी.

मा.आयुक्त : ९६-९७ च्या अंदाजपत्रकात या संबंधाने तरतुद करण्यांत आलेली आहे.त्यातुन ती कामे हाती घेतली जातील.

**ठराव :**

दि.१८-३-९६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगितानंतर सायंकाळी ५=४० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

स्वाक्षरीत /-
नगर सचिव,
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत /-
सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**स्थायी समिती सभा इतिवृत्त.**

**दि.१९मार्च १९९६ रोजी दुपारी ३.०० वाजता मा.सभापती,स्थायी समिती श्री.प्रदीप कुमार जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सदस्यांना निवृत्त करण्याबाबत स्थायी समिती सभेचे आयोजन करण्यांत आले होते.सदर सभेस निम्ननिर्दिष्ट स.सभासद उपस्थित होते.तसेच मनपा अधिकारी उपस्थित होते.**

१) श्री.अब्दुल रशिदखान (मामू)
२) श्री.सुभाष कच्छवाह
३) श्री.डॉ.कराड भागवत.
४) श्री.गौतम खरात.
५) सौ. रजनी जोशी.
६) श्री.कंवरसिंग बैनाडे.
७) श्री.प्रकाश निकाळजे.
८) श्री.महंमद मुश्ताक अहमद.
९) श्री.विजयकुमार मेहेर.
१०) श्री.प्रभाकर विधाते.
११) श्री.महादेव सुर्यवंशी.
१२) सौ.पद्मा शिंदे.
१३) श्री.हमदीउद्दीन ताबा.

**विषय क्र.१ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० (३) व २०(४) अन्वये स्थायी समितीचे आठ सदस्य चिठ्ठया टाकून (ड्रा पध्दतीने) निवृत्त करणे.

सर्वप्रथम मा.सभापती यांनी उपस्थित स्थायी समिती सभासदांना सभासद निवृत्तीच्या संदर्भाने व कायद्यातील तरतुदींच्या संदर्भाने माहिती दिली मा.सभापती यांनी विषद केले की,स्थायी समितीस एक वर्ष पुर्ण होत असल्याने सध्या अस्तित्वात असलेल्या स्थायी समितीतील आठ सदस्य निवृत्त होतील तथापी ही प्रक्रीया पार पाडण्यासाठी सर्व स.सभासदांची नावे असलेल्या चिठ्ठया एका डब्यात टाकून त्यातील आठ चिठ्ठया उचलल्या जातील व ते सभासद निवृत्त झाले असे समजण्यात येईल.चिठ्ठयावरील नावे पाहण्यासाठी विरोधी पक्षातर्फे श्री.रशिद खान (मामू) तर सत्ताधारी पक्षातर्फे डॉ.विजयकुमार मेहेर यांना पाचरण करण्यांत आले.

मा.सभापती यांनी चिठ्ठया उचलून त्यावरील नावे वाचुन निम्ननिदिष्ट सभासद स्थायी समिती तून निवृत्त होत असल्याची घोषणा केली.तथापी सध्याच्या स्थायी समितीची मुदत १ एप्रिल ९६ पावेतो असुन सध्याचे स.सभासद १ एप्रिल ९६ पावेतो स्थायी समिती कामकाजात भाग घेऊ शकतात असेही स्पष्ट केले.

स्थायी समितीतुन निवृत्त होणारे सभासद खालीलप्रमाणे :-

१) श्री.अब्दुल रशिदखान (मामू)
२) सौ.पद्मा शिंदे.
३) श्री.सुभाष कच्छवाह

४) श्री.महंमद मुश्ताक अहमद.
५) श्री.सुदाम सोनवणे
६) श्री.प्रभाकर विधाते.
७) श्री.प्रकाश निकाळजे.
८) श्री.प्रदीप जैस्वाल.

सदर प्रसंगी मा.सभापती यांनी सर्व स.नगरसेवक,मनपा अधिकारी कर्मचारी यांनी स्थायी समितीस वर्षभर दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले.

या समयी इतर स.सभासदांची समायोचित भाषणे झाली.विरोधी पक्षनेता त्यांच्या वतीने स.नगरसेवक श्री.मोहसीन अहमद यांनी समायोचित भाषण केले.

राष्ट्रगीतानंतर ४.०० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहिर केले.

स्वाक्षरीत /-
नगर सचिव,
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत /-
सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका,औरंगाबाद.